**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**
**वृत्तपत्रविद्या विषयातील विद्यावाचस्पती**
**(पीएच. डी) साठी सादर केलेला शोधप्रबंध**

# वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव

विशेष संदर्भ – सांगली जिल्ह्यातील गेल्या दहा वर्षातील विकासकामे
(कालावधी १९९६ ते २००६)

**संशोधक**
हेमंत दत्ताजीराव मोरे
सर्व्हे नं. १९७ / ७ अ / २, अयोध्यानगर,
यशवंतनगरजवळ, सांगली.

**मार्गदर्शक**
डॉ. एस. के. कुलकर्णी
पुणे

**ऑगस्ट २०१३**

# प्रतिज्ञापत्र

मी हेमंत दत्ताजीराव मोरे लिहून देतो की, मी ‘वृत्तपत्रांचा विकास कामांवरील प्रभाव’ या विषयावरील प्रबंध डॉ. एस. के. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः संशोधित केलेला असून तो पूर्णतः स्वतंत्र आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली आहे. या संदर्भात योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. सदर माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र उपयोग केलेला नाही.

दिनांक : २ ऑगस्ट २०१३

**हेमंत दत्ताजीराव मोरे**

# ऋणनिर्देश

विकासकामांचा खालावत चालेला दर्जा हा वृत्तपत्रीय बातम्यांमुळे सुधारू शकतो का? वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो का ? वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील गैरप्रकारांना आळा बसू शकतो का ? या अनुषंगाने अभ्यास करण्याचे निश्चित केले. माझे मार्गदर्शक डॉ. एस. के. कुलकर्णी, पुणे यांच्याशी दोन–तीन बैठकांमध्ये चर्चा करून प्रबंधाची रूपरेषा निश्चित केली. विकासकामे योग्य पद्धतीने होण्यासाठी वृत्तपत्रांचा प्रभाव आवश्यक आहे का ? या दृष्टीने अभ्यास केला. चांगल्या दर्जाची विकासकामे व्हावीत, यासाठी वृत्तपत्रांची भूमिका काय असावी? या दिशेने संशोधन करण्याचा हा प्रयत्न होय. माझ्या संशोधन कार्यात अनेकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपाने सहकार्य केले आहे, या सर्वांचे या ठिकाणी आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांचे मला मोलाचे मार्गदर्शन लाभले. माझ्या संशोधन विषयाचे नाव अंतिम करण्यात डॉ. दीपक टिळक सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यामुळे मी माझ्या विषयाला समर्पक असे शीर्षक देऊ शकलो. माझे मार्गदर्शक डॉ. एस. के. कुलकर्णी यांनी त्यांच्या प्रचंड व्यापातून वेळ काढून मला आवश्यक तेथे तत्परतेने मार्गदर्शन केले. विद्यार्थी म्हणून समजवून घेऊन प्रोत्साहन देत माझ्याकडून प्रबंध पूर्ण करून घेतला. त्यामुळे डॉ. एस. के. कुलकर्णी सरांचा मी कायम ऋणी राहीन. दै. 'केसरी' (पुणे)च्या व्यवस्थापिका डॉ. गीताली टिळक–मोने यांचेही मला मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सांगली कॅम्पसचे प्रमुख श्री. मनोहर पेशवे यांनी संशोधन विषय ठरल्यापासून सातत्याने मला प्रोत्साहन दिले. संशोधन पूर्ण करण्यासाठी सततचा पाठपुरावा केला. त्यामुळेच मी संशोधन पूर्ण करू शकलो. त्यांचाही मी ऋणी आहे.

विलिंग्डन कॉलेजचे प्राध्यापक डॉ. वि. दा.वासमकर यांनी मला प्रबंधाच्या सुरूवातीपासून ते प्रबंध पूर्ण होण्यापर्यंत मोलाची मदत केली. विषयानुरूप अनुक्रमणिका तयार करण्यापासून ते प्रत्येक मुद्द्यांबाबत मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. डॉ. वासमकर याच्यांमुळे प्रबंधाला आकार आला. त्यांचा मी मनापासून ऋणी आहे.

टिळक विद्यापीठाच्या पीएच.डी. विभागाच्या प्रमुख प्रा. पौर्णिमा वाते, रामदास नेहूलकर व इतर स्टाफ यांनी अत्यंत आत्मीयतेने मला सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

सांगली केसरीचे दत्तात्रय शिंदे यांनी सतत सहकार्य केल्यामुळे मला बळ मिळाले. प्रबंध पूर्ण करण्यासाठी सर्व त्या गोष्टीत रस दाखवून मनापासून सहकार्य केल्यामुळे वेळेत प्रबंध सादर

करणे शक्य झाले, तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सांगली केंद्रातील पल्लवी जोशी, गजानन कुंभार, अनघा कुलकर्णी, श्रीहरी महिंद्रकर या सर्वांची मला मोलाची मदत झाली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी (पुणे), सदाशिव पेठेतील विद्यापीठाची शाखा व सांगली केंद्र या तीनही ठिकाणच्या ग्रंथालयांचा मला अभ्यासासाठी मोठा उपयोग झाला. या सर्वांचे मी आभार मानतो.

संशोधन माहिती संकलनासाठी सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक, कंत्राटदार, शासकीय अधिकारी आणि पत्रकार यांनी मुलाखत व प्रश्नावली भरून देण्यासाठी आपला बहुमूल्य वेळ दिला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझे मित्र व शासकीय कंत्राटदार असलेले महावीर पाटील, शिरीष चौगुले, हिंमत कोळी, प्रवीण कोले, दत्तगुरू जाधव, उदय पाटील, संजीव व्होरा, राजेंद्र पोळ, प्रसन्न कुलकर्णी, तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी रघुनाथतात्या केडगे यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता सलीम मुल्ला यांनीही मला विषयाशी संबंधित शासकीय व तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

दैनिक केसरीच्या सांगली आवृत्तीमधील सौ. माधवी पेशवे, सौ. स्मिता गाडगीळ, योगेश नरूटे, उदय पतंगे, श्रीपाद पाटील, अरुण चोपडे, कृष्णा माळी व सहकाऱ्यांनी प्रबंध पूर्ण करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले. मल्हारी कांबळे यांनीही संशोधनकार्यात आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध करण्यासाठी मदत केली, तसेच वृत्तपत्रांचे जुने संदर्भ साहित्य उपलब्ध करण्यासाठी अविनाश कोळी, शशिकांत पवार यांनी मदत केली. या सर्वांचा मी आभारी आहे. प्रबंधाचे मुद्रण गजानन मोरे यांनी केले याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

# प्रमाणपत्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे) यांच्याकडे वृत्तपत्रविद्या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी)साठी 'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' या शोधप्रबंधाचे काम हेमंत दत्ताजीराव मोरे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले असून माझ्या माहितीप्रमाणे ते त्यांचे स्वतःचे स्वतंत्र काम आहे. या शोधप्रबंधासाठी वापरलेले संदर्भ साहित्याची त्यांनी योग्य त्या ठिकाणी नोंद केली आहे, म्हणून दिले हे प्रमाणपत्र.

ठिकाण : पुणे सही/-

दिनांक :

**(डॉ. एस. के. कुलकर्णी)**

# अनुक्रमणिका


| प्रकरण पहिले : उपोद्‌घात | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १.१ | : | प्रस्तावना | १२ |
| १.२ | : | विषयाचे स्वरूप | १५ |
| १.३ | : | विषयाचे महत्त्व | २७ |
| १.४ | : | विषयाची निवड | २८ |
| १.५ | : | अभ्यासाची उद्दिष्टे | २८ |
| १.६ | : | गृहीतके | २९ |
| १.७ | : | संशोधन पध्दती | ३० |
| १.८ | : | अभ्यासाच्या मर्यादा | ३१ |
| १.९ | : | प्रकरणांची रूपरेषा | ३२ |

**प्रकरण दुसरे : मराठी वृत्तपत्रांची वाटचाल व त्यांचा समाजावरील प्रभाव**

| | | | |
|---|---|---|---|
| २.१ | : | वृत्तपत्रांचा इतिहास | ३७ |
| २.२ | : | मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ | ३९ |
| २.३ | : | स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचा उद्देश आणि कार्य | ४३ |
| २.४ | : | स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वृत्तपत्रांची वाटचाल | ४६ |
| २.५ | : | वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप (माहिती तंत्रज्ञान आणि बदललेले रूप) | ४८ |
| २.६ | : | वृत्तपत्रातील बातम्या, लेख यांची ओळख | ५० |
| २.७ | : | वृत्तपत्रातील विविध विभागांची रचना व कामाचे स्वरूप | ५१ |
| २.८ | : | सांगली जिल्ह्यातील वृत्तपत्रांचा इतिहास | ५४ |
| २.९ | : | सांगली जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रे | ५६ |

**प्रकरण तिसरे : सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा**


| | | | |
|---|---|---|---|
| ३.१ | : | प्रास्ताविक | ६३ |
| ३.२ | : | महाराष्ट्राची भौगोलिक रचना | ६५ |
| ३.३ | : | सांगली जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती आणि वैशिष्ट्ये | ७२ |
| ३.४ | : | विकासकामाची व्याख्या आणि प्रकार | ८२ |
| ३.५ | : | विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणा | ८३ |
| ३.६ | : | विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया | ८४ |
| ३.७ | : | विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी | ८७ |
| ३.८ | : | सांगली जिल्ह्यातील १९९६ ते २००६ या कालावधीतील प्रमुख विकासकामे | ८९ |
| ३.९ | : | सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च | १०८ |


**प्रकरण चौथे : विकासकामांसदर्भातील वृत्तपत्रांचा दृष्टिकोन**


| | | | |
|---|---|---|---|
| ४.१ | : | वृतपत्रांमधील विकासकामांसदर्भातील बातम्या/माहितीचे प्रकार | ११४ |
| ४.२ | : | वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची जबाबदारी | १२१ |
| ४.३ | : | बातमीदाराची विकासकामांसदर्भातील बातम्यांबाबतची नैतिकता | १२८ |
| ४.४ | : | विकासकामांबाबतच्या बातम्यांचे सादरीकरण | १३४ |
| ४.५ | : | विकासकामांबाबतच्या बातम्या व इतर बातम्या यांचा तौलनिक अभ्यास | २०० |
| ४.६ | : | वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठीची प्रश्नावली व त्याचे विश्लेषण | २०८ |

**प्रकरण पाचवे : वृत्तपत्रातील विकासकामांबाबतच्या वृत्तांमुळे होणारे आर्थिक व सामाजिक परिणाम**


| | | |
|---|---|---|
| ५.१ : | विकासकामांच्या बातम्यांमुळे होणारी जनजागृती आणि प्रतिक्रिया (प्रश्नावली–विश्लेषण) | २१६ |
| ५.२ : | बातम्यांमुळे विकासकामांवर तसेच संबंधित यंत्रणेवर होणारे परिणाम | २३३ |
| ५.३ : | बातम्यांमुळे विकासकामांमधील भ्रष्टाचारावरील अंकुश | २४३ |
| ५.४ : | वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील जाहिराती व त्याचे फायदे | २४६ |
| ५.५ : | वृत्तपत्रांमधील बातम्यांमुळे अनावश्यक विकासकामांवरील अंकुश | २४८ |
| ५.६ : | रस्त्यांवरील अपघात आणि वृत्तपत्रीय बातम्या | २५४ |
| ५.७ : | विकासकामे व वृत्तपत्रातील बातम्या यासंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया (प्रश्नावली व विश्लेषण) | २५७ |
| ५.८ : | विकासकामांमुळे/विकासकामांसाठी लागणाऱ्या साहित्यामुळे (माती, वाळू, वीट, दगड, मुरूम इत्यादी) पर्यावरणावर होणारे परीणाम, प्रदूषणात पडणारी भर आणि त्याबाबतची वृत्तपत्रांची जबाबदारी | २६१ |
| ५.९: | वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील लोकसहभाग | २६३ |
| ५.१०: | विकासवार्ता आणि विकासाचे मूल्यमापन (त्या–त्या परिसरामध्ये झालेले आर्थिक, सामाजिक बदल) | २६५ |

## प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी


| | | | |
|---|---|---|---|
| ६.१ | : | निष्कर्ष | २७९ |
| ६.२ | : | शिफारशी | २८४ |


## परिशिष्टे


| | | | |
|---|---|---|---|
| १ | : | प्रश्नावली | २८८ |
| २ | : | नकाशा | ३९७ |
| ३ | : | संदर्भ सूची | |
| | | अ) संदर्भ ग्रंथ सूची | ३०० |
| | | ब) वृत्तपत्र सूची | ३०२ |
| | | क) तक्ता सूची | ३०३ |

## प्रकरण पहिले

# उपोद्घात

## प्रकरण पहिले : उपोद्‌घात


१.१ : प्रस्तावना

१.२ : विषयाचे स्वरूप

१.३ : विषयाचे महत्त्व

१.४ : विषयाची निवड

१.५ : अभ्यासाची उद्दिष्टे

१.६ : गृहीतके

१.७ : संशोधन पध्दती

१.८ : अभ्यासाच्या मर्यादा

१.९ : प्रकरणांची रूपरेषा

## १.१ प्रस्तावना

वर्तमानपत्रात रोज आपण रस्ते बांधणी, पूल उभारणी, पाझर तलाव, शाळा–आरोग्य केंद्र उभारणी, निकृष्ट दर्जाची रस्त्यांची कामे अशा प्रकारच्या विकासकामांबद्दलच्या बातम्या वाचत असतो. विकासकामे ही सर्वसामान्य लोकांशी निगडित असल्यामुळे वृत्तपत्रांमधील विकासकामांच्या बातम्यांना आज विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या भागात कोणती नवीन विकासकामे होणार आहेत ? त्याला निधी कोठून येतो ? विकासकामांना मंजुरी कशी मिळते ? विकासकामांचा दर्जा योग्य पद्धतीने राखला जातो का नाही ? याविषयी सर्वसामान्य नागरिकांना माहिती होणे, याविषयी चर्चा होणे, लोकांचे मतप्रदर्शन होणे हे लोकहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते आणि अशा गोष्टींसाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे.

जनतेकडून कररूपाने जमा झालेले पैसे हे विकासकामांवर खर्च होत असतात. त्यामुळे या पैशांचा अपव्यय टाळणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. याकामी वृत्तपत्रांची भूमिका प्रभावी ठरते.

सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी ‘केसरी’ या वृत्तपत्राच्या पहिल्या अंकात वृत्तपत्रांचा प्रमुख उपयोग स्पष्ट करताना असे लिहले आहे, ‘रस्तोरस्ती रात्री दिवे लागलेले असल्याने व पोलिसांची गस्त सारखी फिरत असल्याने जो उपयोग होत असतो तोच ज्या त्या जागी वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्याने होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनी आपापली कामे चोख रीतीने चालविली असता त्यात प्रजेचे किती कल्याण असते हे कोणास सांगावयास नको.’[१]

४ जानेवारी १८८१ साली लोकमान्य टिळक यांच्या वृत्तपत्राने मांडलेली ही भूमिका आजही वृत्तपत्रांना तंतोतंतपणे लागू पडते. वृत्तपत्रांमुळे विकासकामांमधील चांगल्या–वाईट अशा सर्व बाजू जनतेपुढे येत असतात. एखाद्या विकासकामाबद्दल बातमीदाराने आवाज उठविल्यावर पुढे त्याचे नेमके काय परिणाम होतात हे त्या बातमीदारास माहीत नसते. त्यामुळे अशा विकासकामांबद्दल बातमी देताना त्याचे काय परिणाम होतात ? हे त्या बातमीदारास माहीत असणे आवश्यक आहे.

वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे रखडलेली विकासाची कामे सुरू होतात का ? या बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो का ? विकासकामांमधील भ्रष्टाचाराला आळा बसतो का ? एखाद्या नवीन विकास योजनेसाठी वृत्तपत्राने आवाज उठविल्यावर त्याचा उपयोग होतो

का? वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव किती ? या सर्व प्रश्नांच्या बाबतीत लोकशाहीच्या या चौथ्या स्तंभाचा आढावा घेणे आवश्यक व महत्त्वपूर्ण ठरते. या आढाव्याच्या निष्कर्षासाठी प्रातिनिधिक स्वरूपात सांगली जिल्ह्यात १९९६ ते २००६ या कालावधीत विकासकामांसंदर्भात वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा अभ्यास केला आहे.

**वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या विकासकामांच्या बातम्याबाबतची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे**

१) वृत्तपत्रे ही शहरी तसेच ग्रामीण भागात सर्वत्र उपलब्ध होत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना विकासकामांबद्दलची विविध माहिती वृत्तपत्रांद्वारे मिळते.

२) एखादे काम निकृष्ट दर्जाचे होत असेल तर वृत्तपत्रात त्यासंबंधी आलेल्या बातमीमुळे त्याची जोरदार चर्चा होते.

३) विकासकामांसंदर्भातील बातम्यांमुळे कामाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी दबाव निर्माण होत असतो.

४) वृत्तपत्रांमुळे आवश्यक व गरजेच्या विकासकामांबद्दल पाठपुरावा होतो.

५) वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या विकासकामांच्या जाहीर निविदांमुळे अनेक कंत्राटदारांना त्याची माहिती मिळते. त्यामुळे विकासकामे स्पर्धात्मक रीतीने होण्यास मदत होते.

६) आंदोलने, मोर्चा आदींच्या बातम्यांमुळे लोकांची मागणी शासनाच्या निदर्शनास येते.

वृत्तपत्रांमध्ये १६ व्या शतकापासून विकासकामासंदर्भात बातम्या येत आहेत. वृत्तपत्रात आलेल्या विकासकामांच्या बातम्यांमुळे जनजागृती होत असते, लोकमत बनत असते. या बातम्यांमुळे नागरिकांच्यात वेगवेगळ्या पद्धतीने चर्चा होऊन दबाव गट निर्माण होत असतो.

विकासकामे योग्य पद्धतीने करून घेणे तसेच विकासकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाचे विविध विभाग कार्यरत आहेत. परंतु लवकर खराब होणारे रस्ते, दोन-तीन वर्षातच दुरूस्तीला येणाऱ्या इमारती, पाण्याच्या कालव्यांची गळती आदींमुळे विकासकामांवर शासकीय अधिकाऱ्यांचे योग्य नियंत्रण नाही, असे दिसून येते. याबाबतीत एखादा-दुसरा नागरिक काहीच करू शकत नाही किंवा त्याचा आवाज इतरांपर्यंत पोहचू शकत नाही. एखाद्या वृत्तपत्राच्या बातमीदाराला ही गोष्ट निदर्शनास आल्यास तो वृत्तपत्रांद्वारे त्या मुद्यांवर प्रकाश टाकू शकतो.

वृत्तपत्रात विकासकामांसंबंधातील एखादी बातमी आल्यास त्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा

होत असते. त्या बातमीत तथ्य आहे का नाही या बाबतीतही लोक जाणून घ्यायचा प्रयत्न करत असतात. या गोष्टींमुळे जनमत तयार होत असते. त्याचा विकासकामांवर प्रभाव पडतो.

प्रत्येक जिल्ह्यात किमान पाच ते सहा मोठी दैनिके किंवा त्यांच्या आवृत्त्या प्रसिद्ध होत असतात. या दैनिकांमधील प्रतिनिधींचे त्या परिसरामध्ये सूक्ष्म निरीक्षण सुरू असते. त्यामुळे एखाद्या वृत्तपत्रात बातमी चुकली तर ती दुसऱ्या वृत्तपत्रात येत असते. एखाद्या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला 'मॅनेज' करावयाचा प्रयत्न होऊ शकतो. परंतु अनेक दैनिकांच्या प्रतिनिधींना एकाच वेळी 'मॅनेज' करणे अशक्य गोष्ट आहे. त्यामुळे विकासकामांमधील सर्वच चांगल्या आणि वाईट गोष्टींची चर्चा वृत्तपत्रांद्वारे होऊ शकते.

वृत्तपत्रात एखाद्या कामाबद्दल किंवा त्या कामांसंदर्भातील अधिकाऱ्याबाबत आलेल्या बातमीची माहिती वृत्तपत्राद्वारे, लोकचर्चेद्वारे किंवा अन्य मार्गाने त्यांच्या वरिष्ठांपर्यंत हमखास पोहोचतेच. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून त्या अधिकाऱ्याला कामचुकारपणाची किंवा कर्तव्यात कसूर केल्याबाबत विचारणा होऊ शकते. वेळप्रसंगी कारवाईही होते. त्यामुळे विकासकामांमध्ये गुणवत्ता व दर्जा राखण्याबाबत महत्त्वपूर्ण उपयोग होत असतो.

विकासकामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने स्वतंत्र असा गुणवत्ता नियंत्रण (Quality control) विभाग तयार केला आहे. लवकर खराब होणाऱ्या रस्त्यांमुळे किंवा निकृष्ट दर्जाच्या इमारती उभारणीच्या कामांमुळे या विभागांचे विकासकामांवर आवश्यक तेवढे नियंत्रण नसते हे दिसून येते.

**विकासकामांचे महत्त्व लक्षात घेता वृत्तपत्रेही या बातम्यांना ठळक प्रसिद्धी देत असतात. या बाबतीत वृत्तपत्रांनी काही धोरण अंगीकारले आहे. त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे,**

१) शासनातर्फे मंजूर होणाऱ्या विविध विकासकामांना प्रसिद्धी देणे.

२) आवश्यक किंवा लोकहिताच्या असलेल्या विकासकामांबद्दल चर्चा घडविणे.

३) विकासकामांचा दर्जा, गुणवत्तेबद्दल चर्चा करणे, आवाज उठविणे तसेच दबाव निर्माण करणे.

४) लोकांच्या मताला प्रसिद्धी देणे.

५) जनहितासाठी शासनाने काय करावे किंवा काय करू नये याबाबत टिकाटिप्पणी करणे.

६) परिसराच्या विकासासाठी कोणती योजना असावी ? काय धोरण राबवावे ? याबाबत

बातमी, विशेषवृत्त किंवा अग्रलेखांद्वारे मुद्दे उपस्थित करणे.

विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव किती आणि कसा आहे हे जाणून घेण्यासाठी सांगली जिल्ह्यातील १९९६ ते २००६ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या तीन प्रमुख दैनिकांचा अभ्यास करण्यात आला. या प्रकरणी सामान्य नागरिक, शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, कंत्राटदार यांची मते महत्त्वपूर्ण ठरतात. विविध मासिके, पुस्तके, स्मरणिका यामध्ये प्रसिद्ध झालेले विकासकामांसंदर्भातील लिखाणही अभ्यासाच्या दृष्टीने उपयोगी ठरते.

### १.२ विषयाचे स्वरूप

सांगली जिल्ह्यात 'केसरी', 'पुढारी', 'सकाळ', 'लोकमत', 'तरुण भारत' आणि 'पुण्यनगरी' ही प्रमुख वृत्तपत्रे तर 'नवसंदेश', 'राष्ट्रशक्ती', 'अग्रदूत', 'जनप्रवास', 'ललकार', 'प्रतिध्वनी' ही स्थानिक वृत्तपत्रे दररोज प्रसिद्ध होतात. या वृत्तपत्रांमध्ये विकासकामांसंबंधी अनेक बातम्या येत असतात. एखाद्या नवीन रस्त्याच्या कामाला मिळालेली मंजुरी, सामाजिक सभागृहाचे झालेले उद्घाटन याची सविस्तर माहिती लोकांना वृत्तपत्रांमुळेच मिळते. यामुळे नागरिकांना आपल्या भागातील विकासकामांची व नियोजित आराखड्याची कल्पना येते. रस्त्याची झालेली दुरवस्था किंवा खराब रस्त्यांमुळे झालेले अपघात याची माहितीही आपणास वृत्तपत्रांमुळेच मिळते. रखडलेल्या बंधाऱ्याचे काम किंवा शासकीय योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार याबाबत वृत्तपत्रात जोरदार आवाज उठविला जातो. विकासकामांसाठी केल्या जाणाऱ्या आंदोलनाची जनजागृती वृत्तपत्रांमुळेच होते.

**सांगली जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रात विकासकामांसंबंधी आलेल्या बातम्यांमधील प्रतिनिधिक स्वरूपाच्या बातम्या पुढे दिल्या आहेत. त्यावरून वार्तांचे स्वरूप लक्षात येऊ शकते.**

| | **वार्ता** | **पान क्र.** |
|---|---|---|
| १) | भोसेसह १७ गावांच्या योजनेची कामे मार्गी<br>१०० कोटींचा खर्च : ९८ किलोमीटरच्या वाहिका,<br>६ हजार हेक्टर शेतीला पाणी मिळणार. | १७ |
| २) | सांगली-कोल्हापूर चौपदरीकरणाला मुहूर्त<br>पुढील महिन्यात काम सुरू : मुंबईच्या कंपनीला ठेका,<br>१९६ कोटीच्या प्रकल्पासाठी बांधकाम विभागाने दिली वर्क ऑर्डर. | १८ |
| ३) | बेडग रस्त्याची अवस्था दयनीय<br>खड्ड्यांचे साम्राज्य : पंचायत समितीचे दुर्लक्ष. | १९ |
| ४) | म्हैसाळ योजनेचे काम निकृष्ट<br>डोर्ली येथे सिमेंट, वाळूऐवजी माती, मुरूमाचा वापर. | २० |
| ५) | 'ताकारी' अस्तरीकरण, पोटकालवे रखडले<br>कार्वे परिसरातील चित्र : 'पाटबंधारे'च्या दुर्लक्षाबद्दल<br>शेतकऱ्यांतून नाराजी. | २१ |
| ६) | दुष्काळी जनतेचा आक्रोश<br>साडेतीन लाख लोकांना टँकरचे पाणी, जनावरांना<br>'नाही कुणी वाली'. | २२ |
| ७) | सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम विभाग) सांगली<br>निविदा सूचना क्रमांक २३ सन २००६-०७ (जाहिरात). | २३ |
| ८) | दगड फोडणे हाच माझ्या कुटुंबाचा आधार (विशेष वृत्त). | २४ |
| ९) | सहा कोटी खर्च; पण समस्या आहे तशाच<br>समस्याग्रस्त माधवनगर - ४ (वृत्तमालिका). | २५ |
| १०) | खेड्यांमध्ये अस्वस्थता (विशेष लेख). | २६ |

# भोसेसह १७ गावांच्या योजनेची कामे मार्गी

## १०० कोटींचा खर्च : ९८ किलोमीटरच्या वाहिका, ६ हजार हेक्टर शेतीला मिळणार पाणी

**संतोष भिसे** : सकाळ वृत्तसेवा

मिरज, ता. २९ : म्हैसाळ प्रकल्पांतर्गत १७ गावांच्या पाणी योजनेची कामे अखेर मार्गी लागली आहेत. डोंगरवाडी उपसा सिंचन योजनेसाठी वीजपंप व अन्य विद्युत-यांत्रिकी कामांची निविदा कृष्णा खोरे महामंडळाने आज जाहीर केली. भोसेसह सतरा गावांसाठीच्या कामाचा शंभर कोटींचा कार्यदिशही पंधरवड्यापूर्वी देण्यात आला आहे. या योजनेसाठी वनविभागाची परवानगीही मेअखेर मिळण्याची शक्यता आहे. दोन्ही टप्प्यांची कामे दोन वर्षांत संपून पंढरपूर रस्त्यालगतच्या गावांना दोन वर्षांत पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



**बेळंकी** : डोंगरवाडी उपसा सिंचन योजनेच्या पंपगृहाची इमारत तयार आहे; तेथे बसवण्यात येणाऱ्या ४४० अश्वशक्तीच्या चार पंपांची निविदा रविवारी जाहीर करण्यात आली. (सागर घाडगे : सकाळ छायाचित्रसेवा)

सोनी, भोसे, करोली, पाटगाव, तानंग, कळंबी, सिद्धेवाडी, मानमोडी, खरकटवाडी, रसुलवाडी, सांबरवाडी, खंडेराजुरी, पायाप्पाचीवाडी, शिपूर, कानडवाडी आदी गावांना योजनेचा लाभ होणार आहे. गेल्या पाच वर्षांपासून ही गावे म्हैसाळ प्रकल्पाच्या पाण्यासाठी संघर्ष करत होती. दोन वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर काहीशा हालचाली झाल्या; परंतु परत कामे थंडावली. पंधरा दिवसांपूर्वी पुन्हा मोर्चा काढल्यानंतर कार्यदिश देण्यात आला.

या प्रकल्पातील डोंगरवाडी उपसा योजनेच्या पंपगृहाची इमारत तयार आहे. त्यामध्ये ४४० अश्वशक्तीचे चार पंप बसवण्यात येणार आहेत. त्यासह वीजपुरवठा व अन्य तांत्रिक कामांसाठीची ३८ कोटींची निविदा महामंडळाने आज जाहीर केली. पंपिंग यंत्रसामग्री, विद्युत-यांत्रिकी उपकरणांचे डिझाईन, उत्पादन, पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वित करणे यासाठी तीन महिन्यांची मुदत आहे. स्वीच यार्डची दोन कोटींची निविदाही आठवडाभरात निघणार आहे. पंपगृहापासूनच्या रायझिंग मेनचे चार कोटी खर्चाचे काम दोन महिन्यांत पूर्ण होईल. येथून तेरा किलोमीटरवरील खंडेराजुरी तलावात पाणी जाईल. या योजनेतून खंडेराजुरी, शिपूर परिसरातील १५७६ हेक्टर शेतीला सिंचन होईल.

तलावातून एकूण ९८ किलोमीटरच्या बंदिस्त पाईपलाईनमधून भोसे-सोनी परिसर व उपळावीच्या काही भागापर्यंत पाणी जाईल. या १७ गावांमधील ४५८१ हेक्टर शेती सिंचनाखाली येईल. २० किलोमीटरची मुख्य बंदिस्त पाईपलाईन व ७८ किलोमीटरच्या अन्य उपशाखा असतील. मुख्य पाईप १७०० मिलिमीटर, तर उपळावी हद्दीतील शेवटची पाईप ३५० मिलिमीटर व्यासाची असेल. शंभर कोटींच्या कामाचा कार्यदिश देण्यात आला असून महिन्याभरात भोसे योजनेची कामे सुरू होणार आहेत. डोंगरवाडी व शिपूर हद्दीत वनविभागाची जमीन यासाठी लागणार असून त्यांची ना-हरकत मागण्यात आली आहे. तसा प्रस्ताव वनविभागाच्या नागपूर कार्यालयाकडे पाठवण्यात आला असून महिन्याभरात परवानगी मिळण्याची अपेक्षा असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### शासनाचे सात कोटी वाचले

सोनी-भोसे परिसरासाठी जमिनीखालून बंदिस्त पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. २० किलोमीटरची मुख्य लाईन आणि ७८ किलोमीटरच्या उप-प्रवाही नलिका टाकण्यात येणार आहेत. त्यासाठी शिवगंगा समूह आणि इंडियन ह्युम कंपनीमध्ये प्रिस्टेस्ड पाईपांची निर्मिती सुरू आहे. जमिनीखालून प्रवाह जाणार असल्याने भूसंपादनासाठीच्या सात कोटी रुपयांची बचत झाली आहे. खुल्या कालव्यामध्ये ३०० मीटर लांबीचे तीन जलसेतू होते. ते उभारण्यासाठी दीड-दोन वर्षांचा कालावधी गेला असता; तोदेखील वाचला आहे. खुल्या कालव्यासाठी २४० हेक्टर जमिनीची गरज होती; आता ही जमीन शेतकऱ्यांकडून घ्यावी लागणार नाही. पाईपलाईनच्या कडेला रस्त्यासाठीच्या फक्त ३५ हेक्टर जमिनीत काम भागणार आहे.

### दृष्टिक्षेपात

- १७ गावांमधील ६ हजार २०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली
- ९८ किलोमीटर जमिनीखालून पाईपलाईन
- मुख्य पाईपलाईन १ हजार ७०० मिलिमीटरची
- कालव्यांची तोडफोड, पाणीचोरीला आळा
- भूसंपादनाचे ७ कोटी वाचले

वृत्तपत्रात आपण दररोज पिण्याच्या पाणी योजना, रस्ते, अंगणवाडी बांधकाम, जलस्वराज्य, जलसंधारण आदी प्रकारच्या विकास कामांसंबधीच्या अनेक बातम्या वाचत असतो.



# सांगली-कोल्हापूर : महामार्ग विकासाचा...

# खिसा रिकामा जनतेचा

## २८ वर्षांत २००० कोटींचा भुर्दंड : भांडवलदारांची भागिदारी : ठेकेदारांचे कोटकल्याण



सांगली : मोहन यादव

सांगली-कोल्हापूर या रस्त्याच्या चौपदरीकरणामुळे विकासाचे ढोल बडवले जात आहेत. मात्र खासगीकरणातून होणाऱ्या या रस्त्याच्या टोलरूपी लुटीचा ठेका देण्यात येणार आहे. जनतेच्या खिशातून २८ वर्षांत दोन हजार कोटींची लूट होणार आहे. वास्तविक पाहता हा रस्ता शासकीय यंत्रणेकडून अवघ्या ७० ते ८० कोटींत होणे शक्य आहे. पण ठेकेदार व भांडवलदारांच्या कोटकल्याणासाठी हा घाट घातला जात आहे.

### काय आहे सद्यस्थिती

- प्र.रा.मा.क्र.३ हा रत्नागिरी,कोल्हापूर,सोलापूर,नांदेड,नागपूर असा रस्ता
- कोकण,पश्चिम महाराष्ट्र,मराठवाडा,विदर्भ यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता
- शिरोली ते सांगली लांबी ४०. ११ कि.मी.
- अस्तित्वातील वाहन मार्गाची रुंदी सात मीटर
- बसवान खिंड ते अंकली रस्ता(जैनापूर,निमशिरगाव मार्गे)हा १२.५० कि.मी.

### कशासाठी चौपदरीकरण

- ४१ किलोमीटरसाठी वाहतूक कोंडीमुळे ७० ते ९० मिनिटांचा कालावधी
- दररोज १३ हजार वाहनांची वर्दळ
- वर्षाला सरासरी १५० अपघात शेकडो जखमी, ४५ ते ५० जण ठार
- गेल्या तीन वर्षात ११० जणांचा मृत्यू
- कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यांना जोडणारा वाहतुकीचा रस्ता
- कर्नाटक व आंध्र प्रदेश या दोन्ही राज्यातील वाहतूक सदर रस्त्यावरून
- रस्त्याच्या दुतर्फा बागायती शेती,साखर कारखाने व मोठे उद्योग
- इचलकरंजीतील कापड उद्योगातील अवजड वाहनांची वर्दळ

### प्रकल्पाचा मोठा फुगा

- बजेट : ११६.७२ कोटी
- टोल कालावधी : २८ वर्षे
- बांधकाम कालावधी : २ वर्षे
- व्याजाचा दर : १२ टक्के
- परताव्याचा दर : १४ टक्के

### लुटीचा महामार्ग

- बीओटी तत्वावर काम ; भांडवलदारांची भागिदारी; ठेकेदारांचे कोटकल्याण

### घरे व शेतीवर फिरणार नांगर

वृत्तपत्रात येणाऱ्या नवीन रस्त्यांच्या मंजुरीबद्दलची किंवा रस्त्यांच्या उद्घाटनाच्या बातमीमुळे लोकांना विकासकामाची किंवा शहराच्या नियोजित आराखड्याची कल्पना येते. यामुळे उद्योगधंदे किंवा व्यवसायासाठी जागा निवडताना या बातम्यांचा लोकांना फार उपयोग होतो.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सांगली

# निविदा सूचना क्रमांक २३ सन २००६-२००७

खालील कामाच्या सीलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सांगली (दूरध्वनी क्रमांक २३७८९८) हे महाराष्ट्र शासनाकडील खालील वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून ब-१ नमुन्यातील खालील तारखांना पोहोचतील अशारीतीने मागवीत आहेत. निविदा खालीलप्रमाणे दर्शविलेल्या तारखांना सुट्टीखेरीज सकाळी ११ ते दुपारी १६.०० मा. अधीक्षक अभियंता सा. बां. मंडळ, कोल्हापूर/ कार्यकारी अभियंता सा. बां. (प.) विभाग सांगली व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग मिरज यांचे कार्यालयात मिळतील व भरून दिलेल्या निविदा अधीक्षक अभियंता सा. बां. मंडळ कोल्हापूर यांचे कार्यालयात ज्या त्या तारखांना दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

निविदापूर्व बैठक मा. मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग पुणे यांचे कार्यालयात दिनांक २८/१२/०६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लाखात | बयाणा रक्कम | कामाची मुदत | कोऱ्यानिविदा देणेचा दिनांक | निविदा भरून परत देणेचा दिनांक | कोऱ्या निविदा निविदा नमुन्याची किंमत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विटा पारे हातनूर मांजर्डे बस्तवडे प्रजिमा २९ रस्त्याचे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. भाग तालुका हद्द ते रा. सा. १३६ किमी १६/५०० ते २९:५००. | २३७.०० | २३८०००/- | अठरा महिने | २०/११/२००६ ते १०/०१/२००७ | २५/०१/२००७ | १०,०००/- | वर्ग ३ व त्यावरील |
| २. | सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील बस्तवडे गव्हाण मळणगांव शिरढोण प्रजिमा ३८ रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. भाग गव्हाण ते मळणगाव किमी ५/०० ते १३/००. | १९०.०० | १९००००/- | अठरा महिने | २०/११/२००६ ते १०/०१/२००७ | २५/०१/२००७ | १०,०००/- | वर्ग ३ व त्यावरील |

वृत्तपत्रात येणाऱ्या शासकीय कामांच्या निविदांमुळे अनेक ठेकेदारांना या कामाबाबत माहिती होते. त्यामुळे स्पर्धात्मक दरात या निविदा कमीतकमी रकमेला मंजूर होऊन शासनाचा मोठा फायदा होतो.

# बेडग रस्त्याची अवस्था दयनीय

## खड्ड्यांचे साम्राज्य : पंचायत समितीचे दुर्लक्ष

सकाळ वृत्तसेवा

मिरज, ता. २८ : बेडग रस्त्याच्या दुरुस्तीकडे पंचायत समितीचे दुर्लक्ष झाले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून वाहनचालकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. निधी नसल्याचे कारण सांगत बांधकाम विभाग त्याच्या डांबरीकरणाला टाळाटाळ करत आहे.

बेडग रस्त्यावरील ओढ्यापर्यंतचा भाग महापालिका हद्दीत आहे. उर्वरित भागाची देखभाल जिल्हा परिषदेकडे आहे. महापालिका हद्दीतील रस्त्यावर सर्वत्र खड्डेच-खड्डे निर्माण झाले आहेत. जकात नाक्यापासून ओढ्यापर्यंतच्या भागात सुस्थितीतील रस्ता शिल्लक नाही. दुचाकी वाहने खड्डे चुकवत धावू शकत नाहीत. चारचाकी वाहनांनाही खड्ड्यातून जाण्याशिवाय पर्यायच नाही. पंचायत समितीने यापूर्वी या रस्त्याचे वेळोवेळी फक्त पॅचवर्कच केले आहे. नव्याने डांबरीकरण मात्र केले नाही.

या मार्गावरून अथणी, कवठेमहांकाळ आदी भागातून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. मिरज-सांगलीला येणारी वाळूदेखील मोठ्या प्रमाणात याच मार्गाने येते. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे ही वाहतूक थंडावली आहे. सध्या खड्डे भरण्यासाठी खडी टाकण्यात आली आहे; मात्र फक्त पॅचवर्कची मलमपट्टी न करता संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करावे, अशा मागणी आहे. उर्वरित आरगपर्यंतच्या रस्त्यावरही अनेक ठिकाणी खड्डे निर्माण झाले आहेत; तेदेखील भरून घेण्याची ग्रामस्थांची मागणी आहे.



मिरज : बेडग रस्त्याची अशी दयनीय अवस्था झाली असून वाहनचालकांना कसरत करत प्रवास करावा लागत आहे.

(सागर घाडगे : सकाळ छायाचित्रसेवा)

रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत किंवा खराब रस्त्यांमुळे झालेल्या अपघाताबाबत वृत्तपत्रातून जोरदार आवाज उठवण्यात येतो. त्यामुळे शासकीय अधिकारी या वृत्ताची दखल घेऊन रस्त्यांची दुरुस्ती करतात.

# म्हैसाळ योजनेचे काम निकृष्ट

## डोर्ली येथे सिमेंट, वाळूऐवजी माती, मुरुमाचा वापर

**नागज : वार्ताहर**

म्हैसाळ योजनेच्या सहाव्या टप्प्यातील कवठेमहांकाळ व जत तालुक्याच्या सीमेवर चालू असलेली कामे निकृष्ट पद्धतीने सुरू आहेत. या कामात सिमेंट व वाळूऐवजी माती व मुरुमाचा सर्रास वापर सुरू आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कंत्राटदाराचा मनमानी कारभार सुरू आहे.

म्हैसाळच्या कॅनॉलची कामे सध्या ढालेवाडी, इरळी, डोर्ली भागात सुरू आहेत. कॅनॉलच्या मार्गात अनेक ठिकाणी पूल बांधण्याची कामे आहेत. या कामात माती व मुरुमाचा वापर केला जात आहे. डोर्ली (ता. जत) येथे पुलाचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी लागणारा सिमेंटचा माल तयार करताना आठ पाट्या वाळू, आठ पाट्या खडी व एक पोते सिमेंट वापरायचे असताना दहा पाट्या वाळू, दहा पाट्या खडी व केवळ अर्धा पोते सिमेंट वापरले जाते. अर्थात हा सारा प्रकार साऱ्यांच्या डोळ्यादेखत सुरू असताना कोणीही तक्रार करत नाही.

पाण्यासाठी आसुसलेल्या जनतेला कामापेक्षा लवकर पाणी येणे महत्त्वाचे वाटते. वर्षानुवर्षाच्या दुष्काळामुळे हतबल बनलेल्या जनतेच्या असहायतेचा फायदा कामे करणाऱ्यांनी मात्र पुरेपूर उठवला आहे.



**डोर्ली (ता. जत) येथे सुरू असलेल्या म्हैसाळ योजनेच्या कामात माती व मुरुमाचा वापर केला जात आहे.**

वरिष्ठांची मर्जी सांभाळून या कामात हात धुवून घेण्याचा उद्योग चालवला आहे.

म्हैसाळ योजनेच्या कामाची पाहणी आणि पाण्याचे पूजन करण्याच्या निमित्ताने गृहमंत्री आर. आर. पाटील केंद्रीय राज्यमंत्री प्रतीक पाटील आदींसह जिल्ह्यातील डझनभर जबाबदार नेते या भागात फिरले, मात्र निकृष्ट कामाबाबत एकानेही चकार शब्द काढला नाही. या उलट गृहमंत्री पाटील यांनी सुरू असलेल्या कामाचे कौतुक केले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निकृष्टदर्जाची कामे सुरू आहेत. या कामावर पाटबंधारे विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. पण, दुर्गम भाग असल्याने या भागात अधिकारी फिरकत नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराचे चांगलेच फावले आहे.

विकासकामात गैरव्यवहार होत असेल आणि त्याची बातमी वृत्तपत्रात आलेली असेल तर याची शासनाकडून दखल घेतली जाऊन संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात येते.

# ‘ताकारी’ अस्तरीकरण, पोटकालवे रखडले

## कार्वे परिसरातील चित्र : ‘पाटबंधारे’च्या दुर्लक्षाबद्दल शेतकऱ्यांतून नाराजी

दिलीप कोळी : सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. ३१ : ताकारी पाणी योजनेमुळे कार्वे (ता. खानापूर) परिसरातील २०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. मात्र, ताकारी कालव्याच्या अस्तरीकरण, पोटकालव्याची कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे पाणी कधी मिळेल याबद्दल शाश्वती नसल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत आहे. मुळात कालव्यात गेलेल्या जमिनीचे पैसे १६ वर्षांनी मिळाल्याचा संताप शेतकऱ्यांच्या मनात पूर्वीपासूनच आहे.

१९९२ मध्ये सुरू झालेल्या या योजनेंतर्गत कार्वे परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादन केल्या. कालव्याचे काम झाल्यानंतर खंबाळे तलावापर्यंत पाण्याची चाचणी घेण्यात आली. अर्धवट व निकृष्ट कालव्याची कामे व पुलांची कामे यामुळे पाणी पुढे येत नव्हते. त्यातच पाण्याचा अनधिकृत उपसा होत होता. तासगाव पंचायत समितीचे तत्कालीन सभापती राजेंद्र पाटील यांच्या पुढाकाराने लोकवर्गणीतून अस्तरीकरणाचे काम करून खंबाळे तलावापासून पाच किलोमीटरपर्यंत म्हणजे कार्वेच्या ओढ्यात पाणी आणून सोडले. परंतु त्यानंतर पाटबंधारे खात्याच्या दुर्लक्षामुळे पाणी आलेच नाही.

खासदार प्रतीक पाटील यांनी या योजनेला केंद्रीय जलआयोगाची मान्यता घेऊन (ए. आय. बी. पी) योजनेत समावेश करून घेतला व राहिलेले कालव्याचे अस्तरीकरण व पोटपाटाला निधी आणला. त्यातून अस्तरीकरणाची ठिगळबाजी करण्यात आली. डिसेंबरमध्ये ताकारीचे पाणी सोडण्यात आले होते. परंतु कार्वे परिसरात पाण्याचे फक्त दर्शनच झाले आहे. अस्तरीकरण नसल्यामुळे पाणी झिरपून जात आहे. कार्वे परिसरातील शेतकऱ्यांना भविष्यात चाराटंचाई व पिण्याच्या पाण्याची सोय होईल, अशी आशा आहे. तीन ठिकाणी पोटकालवे मंजूर झाले आहेत. त्यातील एकाचे काम मध्यंतरी सुरू केले. तेही सध्या रखडलेल्या अवस्थेत आहे.




**कार्वे :** ताकारी कालव्याचे अस्तरीकरण केले नसल्याने पाणी कालव्यात झिरपत आहे. दुसऱ्या छायाचित्रात रखडलेले काम. (छायाचित्र : दिलीप कोळी)

रखडलेल्या शासकीय कामाबद्दल वृत्तपत्रात बातमी आल्यास त्याची शासकीय अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जाते. कामातील अडथळे दूर करून काम चालू करण्यात येऊन लोकांची गैरसोय दूर होते.

# दुष्काळी जनतेचा आक्रोश

## साडेतीन लाख लोकांना टँकरचे पाणी ■ जनावरांना 'नाही कुणी वाली'

दिनराज वाघमारे | दि. ५ (सांगली)

**भीषण** दुष्काळाच्या तडाख्यात सांगली जिल्ह्याचा उत्तर-पूर्वभाग पुन्हा एकदा कोलमडला आहे. जत, आटपाडी, कवठेमहांकाळ या तीन तालुक्यांतील सर्व, तर खानापूर, तासगाव, मिरज, कडेगावमधील अनेक गावे दुष्काळाच्या वणव्यात होरपळत आहेत. पाणी, चाऱ्यासाठी माणसे व जनावरांचा आक्रोश सुरू असल्याचे विदारक चित्र दिसत आहे.

सांगली जिल्ह्याची विचित्र भौगोलिक परिस्थिती आहे. नदीकाठचा पश्चिम भाग सधन, तर पूर्वेकडील भाग कायम दुष्काळी. त्यामुळे कृष्णेला पूर असला तरी, जत, आटपाडीत दुष्काळ असतो, अशी नेहमीची स्थिती आहे. मागील वर्षापासून पावसाने अधिक ओढ दिल्याने यंदा दुष्काळाचे रौद्ररूप प्रकट झाले आहे.

यावेळच्या दुष्काळाने १९७२ च्या भीषण दुष्काळाच्या आठवणी ताज्या केल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी सुरू असलेली मारामार, दिवसभर टँकरची प्रतीक्षा, रणरणत्या उन्हात पाण्यासाठी अनेक मैलांची पायपीट अशी बिकट परिस्थिती दुष्काळग्रस्तांच्या वाट्याला आली आहे. जनावरांचे चारा-पाण्यावाचून प्रचंड हाल होत असून, निम्म्यावर पशुधन कसायाच्या हवाली जात आहे.

जिल्ह्याच्या सात तालुक्यांतील ११५ गावे व ९८० गावांत असा वणवा पेटला आहे. या गावात प्रशासनाने १५२ टँकरची सोय केली आहे. ३ लाख ५४ हजार ५८५ लोक टँकरच्या पाण्यावर आहेत. सर्वाधिक ६७ टँकर जत तालुक्यात सुरू आहेत. जत तालुक्याच्या पूर्व भागातील जनजीवन दुष्काळाने विस्कळीत झाले आहे. आटपाडी तालुक्यात ३७, खानापूर १४, तासगाव व कवठेमहांकाळ तालुक्यात प्रत्येकी ११ टँकर सुरू आहेत. मिरज पूर्व भागात ६, तर कडेगाव तालुक्यात ५ टँकर सुरू आहेत. टँकरसाठी शासनाने १२७ विहिरी अधिग्रहण केल्या आहेत.

लोकांना टँकर दिले असले, तरी या टँकरचे कोणतेही नियोजन करण्यात आले नाही. भारनियमन, प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे लोकांना दिवसभर टँकरची प्रतीक्षा करावी लागते.

टँकरच्या खेपांचा कागदी मेळ सुरू असला तरी, प्रत्यक्ष लोकांना पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. जनावरांचे तर पाण्यावाचून अतिशय हाल होत आहेत.

> सिंचन योजनांबाबत सर्वच नेत्यांनी आणि पक्षांनी श्रेयवाद थांबवावा. योजना पूर्ण होण्यासाठी निधीची तरतूद कशी करायची, याबाबत त्यांनी विचार करावा. कामे पूर्ण झाल्यानंतर बिले वेळेवर मिळतील, याची शाश्वती मिळाल्याशिवाय ठेकेदारही गतीने कामे करणार नाहीत. किंबहुना त्यामुळेच कामे रेंगाळत आहेत.
>
> \- प्रतीक पाटील
> केंद्रीय कोळसा राज्यमंत्री

### 152 टँकर

- जिल्ह्यातील ११५ गावे व ९८० वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा
- १५२ टँकर तैनात
- सर्वाधिक ६७ टँकर जत तालुक्यात
- आटपाडी- ३७, कवठेमहांकाळ-११, तासगाव- ११, कडेगाव- ५, मिरज- ६, खानापूर- १५



▼ तलाव कोरडे पडल्यामुळे पशुधनालाही टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. आगळगाव (ता. कवठेमहांकाळ) येथे टँकरने खड्ड्यात पाणी सोडल्यानंतर शेळ्या-मेंढ्यांनी केलेली गर्दी.

### चाऱ्याचा कागदी खेळ

दुष्काळी भागातील जनावरांना चारा देण्यासाठी शासनाने प्रत्येक पंचायत समिती गणात चारा डेपो सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. चार महिन्यांपासून हे डेपो प्रत्यक्ष सुरू झालेले नाहीत. जनावरांच्या चाऱ्याचा सर्व कागदी खेळ झाला आहे. अनेक जाचक अटींच्या जंजाळात या छावण्या अडकल्या आहेत.

### ४६४ कूपनलिका

जिल्ह्याच्या दुष्काळी टापूत भूजल पातळी झपाट्याने खालावत चालली आहे. प्रशासनाने पिण्याच्या पाण्यासाठी टंचाई निधीतून ४६४ कूपनलिका खोदल्या आहेत. नव्याने २७४ कूपनलिका मंजूर करण्यात आल्या आहेत. खोदलेल्या अनेक कूपनलिकांना पाणी लागले नाही. त्यामुळे त्या वाया गेल्या आहेत.

### 'रोहयो'ची कामे अपुरी

टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची ८५५ कामे सुरू करण्यात आली आहेत. या कामांवर १० हजार ६१६ मजूर काम करीत आहेत. 'रोहयो'ची कामे कायद्याच्या कचाट्यात अडकल्याने अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झालेला नाही. मागील वर्षी 'रोहयो'वर ४५ कोटी ४० लाख रुपयांचा खर्च झाला आहे.

# दुष्काळाचे दुखणे कायमचे, उपचार तात्पुरतेच

सांगली | दि. ५ (प्रतिनिधी)

**दुष्काळ** हे जिल्ह्यातील अनेक तालुक्यांचे कायमचे दुखणे आहे. त्यावर शासन मात्र तात्पुरती मलमपट्टी करीत आले आहे. जेवढा खर्च चव्हाण दुष्काळी भागाची पाहणी करण्यासाठी उद्या (शुक्रवारी) जिल्ह्यात येत असून, ते तरी या दुखण्यावर 'ऑपरेशन' करणार का? असा सवाल दुष्काळग्रस्तांनी उपस्थित केला आहे.

लागले आहेत. जत, आटपाडी व कवठेमहांकाळ हे तालुके कायम दुष्काळी, तर मिरज, तासगाव, खानापूर तालुक्यांचा पूर्वभागही कायम दुष्काळी आहे. अनेक वर्षे दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या या तालुक्यात

कवठेमहांकाळ तालुक्यांसाठी असलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजना, आटपाडी, खानापूर तालुक्यांसाठीची ताकारी-टेंभू योजना याच कायम उपाय ठरू शकतात. या योजना अनेक वर्षे निधीअभावी

राज्याच्या वाट्याचा १० टक्के निधी देण्यातही राज्य शासन अपयशी ठरत आहे.

दुष्काळाचे हे विदारक चित्र पाहून मुख्यमंत्र्यांनी खास बाब म्हणून सिंचन योजनांना प्राधान्याने निधी देण्याची

### दुष्काळी जनतेच्या अपेक्षा

- म्हैसाळ, ताकारी, टेंभू योजनेला प्राधान्याने निधीची आवश्यकता
- जनावरांना पाणी व चाऱ्याची तातडीने व्यवस्था करावी
- जलसंधारणाची कामे, कायम पाणी योजना सुरू कराव्यात



दुष्काळ, महापूर, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तींवरही वृत्तपत्रातून सविस्तर लिखाण करण्यात येते. याबाबतची कारणे कोणती ?, कोणत्या उपाय योजना कराव्यात ? आदी संदर्भात सखोल माहिती देण्याचा वृत्तपत्रांचा प्रयत्न असतो.

# दगड फोडणे हाच माझ्या कुटुंबाचा आधार

मनोहर पवार/जत

जत तालुक्यात गेल्या पाच वर्षांपासून पडलेला प्रचंड दुष्काळ, रोजगारासाठी रात्रं-दिवस भटकूनहि रोजगार मिळत नाही. अपंग पतीला घेऊन रस्त्यावरील दगड फोडून दररोज मिळणाऱ्या ५० रुपयांतून कुटुंबाची गुजराण करीत असल्याची प्रतिक्रिया लमाणतांडा (दरीबडची) ता. जत, जि. सांगली येथील सौ. कमलाबाई सखाराम राठोड यांनी दिली.

संख ते लमाणतांडा (दरीबडची) या रस्त्याच्या खडीकरणाचे काम चालू आहे. त्या कामावर कमलाबाई राठोड आपल्या दोन मुली व दोन मुलांसह अंगावर दगड फोडायचे काम घेतात. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत काम करतात. या कामासाठी त्यांना दररोज ५० रुपये मिळतात. भर उन्हात हे कुटुंब पोटाची खळगी भरण्यासाठी राबत होते.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, 'काय ऐकतूयास आमची परिस्थिती? माझा नवरा एका हातानं अपंग आहे. तो घरातच बसून असतू.



लमाणतांडा (दरीबडची) ता. जत येथील भर उन्हात आपल्या मुला-बाळांसह दगड फोडणारी सौ. कमलाबाई राठोड. (छाया : मनोहर पवार, जत)

त्यामुळं पोटाला घालायचं काय?, मला तीन पोरी, दोन पोरं हायत... यांच्या पोटाला काय बिबं घालायचं काय? त्यासाठी उन्हातान्हात त्यांना घेऊन ५० रुपयासाठी आम्ही दिवसभर राबतूया. आम्हाला आता उन्हाच्या चटक्याची इतकी सवय झालीया की, उन्हच लागेनासं झालंया. दिवसभर राब-राब राबण्याशिवाय पर्याय नाही. आमची शेतजमीन नाही. कामाला गेल्याशिवाय आमचं भागत नाही. पुढारी येत्यात, निवडणुकीपुरतं मतं मागत्यात, जात्यात. पुन्हा हिकडं लोक मेल्यात का ते बी बगत नाहीत. या पुढाऱ्यांना आता इथून पुढं मत टाकणार नाही. सरकारनं कोणती बी सवलत दिली नाही. रोजगार हमीची कामं नाहीत. हे काम संपल्यावर आम्ही जायाचं कुठं? मी महिला असल्यामुळं ऊस तोडीसाठी बी मला कोण नेत नाही. त्यामुळे अनेक वेळा काम नसल्यामुळे मला व माझ्या घरच्यांना अनेक वेळा उपाशी झोपायची वेळ आल्याचे या महिलेने रडून सांगितले.

१ मे रोजी महाराष्ट्रात कामगार दिन उत्साहात साजरा होतो. कामगारांना मात्र हा कामगार दिन कधीहि साजरा करता आला नाही. कामासाठी अनेक कामगारांना सावकाराचे उंबरे झिजविण्याची वेळ आली आहे.

अनेक हॉटेल्स, बिअरबार, रस्त्याच्या कामावर बालमजूर आहेत, तर अनेक मजुरांची मोठ्या प्रमाणात छळवणूक केली जाते. महिला कामगारांना तर अत्याचाराला बळी पडावे लागते. अनेक महिला मजुरांच्यावर बलात्कार, विनयभंग झाले आहेत. मात्र सरकार असो अथवा कामगार संघटना असो, कोणीहि याची दखल घेतली नाही. केवळ नावापुरत्या या कामगार संघटना झाल्या आहेत. आज कामगार दिन अनेक कामगारांना माहीतच नाही. दररोजचे कामच त्यांच्या जीवनाचा आधार बनले आहे.

रस्त्यांच्या कामासाठी राबणाऱ्या मजुरांच्या व्यथेबद्दलही सामाजिक बांधिलकी म्हणून वृत्तपत्रातून आवाज उठवण्यात येतो.

# सहा कोटी खर्च; पण समस्या आहे तशाच

**माधवनगर : शिवाजी कांबळे**

सन २००० पासून आतापर्यंत रस्ते, पाणी अशा विकासकामांवर सुमारे कोटींचा निधी खर्च झाला आहे; परंतु गावची कोणतीही समस्या सुटली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, ठेकेदार व लोकप्रतिनिधी यांनी हा निधी संगनमताने हडप केल्याचा आरोप होत आहे.

माधवनगर ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामांवर सुमारे पाच कोटी रुपये खर्च झाले आहेत; परंतु येथील नागरिकांची कोणतीही समस्या सुटलेली नाही. बांधकाम विभाग, ठेकेदार व लोकप्रतिनिधी यांच्या भ्रष्ट कारभारामुळे हा विकास निधी नेमका कुठे व किती मुरला याची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. अपवाद सोडला तर गावातील सर्व रस्ते खराब आहेत. गावात गटारी नसल्याने ड्रेनेजची व्यवस्था नाही. पूर्वीपेक्षा जादा पाणी मिळत असले, तरी गावातील पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. दरवर्षी विविध योजनांतून गावातील



**माधवनगर : लाखोचा खर्च करून रस्त्याची अवस्था खराबच राहिली आहे.** (छाया : मिलिंद)

विकासकामांवर लाखो रुपये खर्ची पडतात; परंतु नागरी समस्या मात्र आहे तशाच आहे. झालेल्या विकासकामांचा दर्जा व त्यावर झालेल्या खर्चाची

**समस्याग्रस्त माधवनगर-४**

माहिती घेतली, तर बरीच तफावत आढळते. गटार, रस्ते अशी काही कामे काही दिवांत अथवा महिन्यांत नामशेष झालेली दिसतात.

ग्रामपंचायत, आमदार व खासदार निधीतून होणाऱ्या कामांसाठी ठराविक ठरलेल्या ठेकेदारांनाच ठेके दिले जातात. इतक्या मोठ्या प्रमाणावर शासनाच्या पैशाच्या अपव्यय होत असताना संबंधित यंत्रणांना त्या दोषी ठेकेदारांवर कारवाई करताना दिसत नाही. उलट 'अर्थपूर्ण' संबंधातून त्या ठेकेदाराला पाठीशी घालण्यात येते.

ग्रामपंचायतीतील घरपट्टी व स्थानिक अन्य कराच्या माध्यमातून प्रत्येकवर्षी सुमारे वीस लाखांचे उत्पन्न मिळते. बारावा वित्त आयोग, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, निर्मल ग्राम आदींच्या माध्यमातून तसेच आमदार, खासदार निधी, जिल्हा परिषदेचा निधी आदीच्या माध्यामातून लाखो रुपये मिळत असतात.

लोकवर्गणीतून काही रक्कम उपलब्ध झाली आहे. सन २००० ते २००९ या काळामध्ये विविध योजनेच्या माध्यमातून सुमारे पाच कोटी रुपये खर्ची पडले आहेत. यामधील वर्गवारी अशी ग्रामपंचायतीचा स्वत: चा निधी १ कोटी, आमदार निधी १ कोटी ५० लाख, खासदार निधी ७५ लाख, जिल्हा परिषद निधी १ कोटी ५० लाख, यशवंत ग्रामसमृद्धी, बारावा वित्त आयोग आदींच्या माध्यमातून पंचायत समितीच्या माध्यमातून मिळालेला १ कोटींचा निधी खर्ची पडला आहे. प्रत्येकवर्षी कर्मचारी पगारावर सुमारे दहा लाख खर्च होतात.

**(क्रमश:)**

अनावश्यक किंवा लोकांना उपयोगी नसणाऱ्या विकास कामांबद्दल वृत्तपत्रामधून चर्चा होते.



# आमचा गाव विकासाच्या दिशेने....

केसरी
८ जुलै २०१२/२१
वर्धापनदिन विशेषांक

# खेड्यांमध्ये अस्वस्थता

**अनेक कारणांनी खेड्यांत आज अस्वस्थता खदखदते आहे. त्यावर उपाय म्हणजे गाव सोडणे. त्यासाठी मग तरुण-तरुणींचे लोंढे शहरांकडे गेले नाहीत तर नवल? त्यातून मग दोन्ही बाजूला अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, होत आहेत. सरकारला त्याचा अभ्यास करायचा नाही, की त्यात काही सुधारणा करायची नाही. शेती सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न नाहीत. त्यामुळे खेड्यांतील दुखणे यापुढच्या काळात वाढतच जाणार आहे.**



सुधीर कुलकर्णी

ग्रामविकासासाठी सरकार सारे प्रयत्न करीत आहे, तरीही त्यात अपुरेपणा आहे. त्यामुळे खेड्यांचा सर्वांगीण विकास होताना दिसत नाही. काही विकासकामे जरूर झाली. मात्र, खेड्यांचा शहरात चाललेला लोंढा कमी होत नाही. त्यामुळे एका बाजूला शहरे फुगत आहेत. दुसऱ्या बाजूला खेड्यांना

जिथे शेतीच्या पाण्याचे काय? त्यामुळे ग्रामीण भागात पाण्याच्या व थंडपेयांच्या बाटल्या पोहोचल्या आहेत. पुरेशी वीज नाही. त्यामुळे शेती व उद्योगांचे उत्पादन घटते आहे.

गरजांसाठी मातीमोल दराने वृक्षतोड होते. ओढ्या, नद्यांतील वाळूची लूट होते. जलसंधारणाची





कामे यशस्वी होत नाहीत. जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेली आहे. त्यामुळे एक भकासपण वा बकालपण देखील

येथे अनुभवण्यास मिळते. सहकार संपत चालला आहे. चार लोकांनी एकत्रितपणे लोकांसाठी, समूहासाठी सेवाभावी कामे

करायची असतात, हेच विसरले आहे. त्यातून प्रत्येकजण आपलेच उखळ पांढरे करण्याच्या मागे लागला आहे. काहीजण खेडी

सुधारल्याचा आभास निर्माण करीत आहेत. आता तिथे कसले प्रश्नच नाहीत, असे त्यांना वाटते. खेडी सुधारली म्हटले, तर मग शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात? त्याविषयी काही वाटणे देखील आता का बंद झाले आहे? शेतकरी आहे तिथेच वर्षानुवर्षे का आहे? त्याच्या मुलांना चांगले शिक्षण मिळते का? बेकार तरूणांना नोकऱ्या आहेत का? गावात किती उद्योग आले? शेतीपूरक वा प्रक्रिया उद्योगांची आजची स्थिती काय आहे? याची गावागावात तपासणी केली पाहिजे. आज येथे शिक्षण मिळते त्यांना येथे काम आहे का? आज

**(पुढील मजकूर पान २२ वर)**

वृत्तपत्रांच्या वर्धापनदिनी विकासकामांवर पुरवण्या काढून विकासकामांच्या समस्या, अडीअडचणी, फायदे-तोटे यावर चर्चा घडवली जाते.

## १.३ विषयाचे महत्त्व

महाराष्ट्रातील ९५ टक्के विकासकामे ही शासनातर्फे केली जातात. उर्वरित ५ टक्के कामे ही लोकसहभाग, लोकवर्गणी किंवा खासगी संस्थांमार्फत केली जातात. राज्यातील पाणलोट क्षेत्र, डोंगराळ प्रदेश, जंगल क्षेत्रासह उर्वरीत सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे राबविली जातात. जनतेचा कर रूपाने जमा झालेला पैसा या विकासकामांवर खर्च होत असतो. दरवर्षी मोठमोठे पाटबंधारे प्रकल्प, मोठे पूल, रस्ते तसेच वेगवेगळ्या योजना मंजूर होत असतात. लगेचच खराब होणारे रस्ते, निकृष्ट दर्जाच्या इमारती यामुळे शासनाच्या निधीचा योग्य प्रमाणात विनियोग होत नसल्याचे दिसून येते. दोन–तीन वर्षातच पुन्हा त्याच विकासकामांवर होणारा खर्च, काही विकासकामे कागदोपत्री दिसतात, परंतु प्रत्यक्षात गायब अशी परिस्थिती बऱ्याच ठिकाणी दिसते. त्यामुळे अशा गोष्टींवर अंकुश असण्याची गरज निर्माण झाली. या गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी लोकांचा किंवा लोकांच्या गटाचा आवाज कमी पडतो. त्यामुळे अशा गोष्टी प्रभावी जनमाध्यम असलेल्या वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होणे गरजेचे झाले आहे. ज्या ठिकाणी लोक जागृत आहेत व जेथे चांगल्या–वाईट विकासकामांची वृत्तपत्रांद्वारे चर्चा होते त्या भागात चांगल्या प्रतीची विकासकामे झाल्याचे दिसून येते. सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार पाहता लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून गौरवलेल्या वृत्तपत्रांना सध्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विकासकामांचा जनतेला किती उपयोग झाला ? शासकीय निधी योग्य पद्धतीने खर्च झाला की नाही ? विकास कामांसंदर्भात परिसरातील अवस्था काय आहे ? तसेच विकासकामांच्या मूल्यमापनाचा अभ्यास करून ती वृत्तपत्रांद्वारे नागरिकांपुढे मांडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विकासकामे राबविताना शासकीय अधिकारी, कंत्राटदार यांना येणाऱ्या अडचणी तसेच विकासकामांच्या बातम्या लिहिताना वार्ताहरांना येणाऱ्या अडचणी विचारात घ्यावा लागतील. निकृष्ट दर्जाची विकासकामे आणि त्याबाबतीत वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धी मिळाल्यानंतरची परिस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्या क्षेत्रातील सामाजिक आणि आर्थिक मूल्यमापन करण्याची गरज आहे. तसेच याबाबतीत असणाऱ्या त्रुटी शोधून काढणे या उद्देशाने हा अभ्यास केला आहे.

## १.४ विषयाची निवड

'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' हा विषय मी संशोधनासाठी आत्मविश्वासाने निवडला. महाराष्ट्र राज्याच्या विकासकामांचा विचार करता सधन असणारा सांगली जिल्हा हा विकासकामे खेचून आणण्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे. कृष्णा खोरे (टेंभू, ताकारी, म्हैसाळ) योजना, जलसंधारण योजना, पाणलोट विकास कार्यक्रम, बीओटी तत्त्वांवरील नदींवरचे पूल, मिरज–पंढरपूर ब्रॉडगेज रेल्वे मार्ग आदीबाबतीत सांगली जिल्ह्याने अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत मोठा निधी प्राप्त केला आहे. कृष्णा खोरे योजनेअंतर्गत एकूण कामांवर ४२०० कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत दरवर्षी २०० कोटींहून अधिक निधी विकासकामांवर खर्च होत असतो. जलसंधारण योजना राबविण्यातही सांगली जिल्हा आघाडीवरच होता. जलसंधारणाच्या कामात सांगली जिल्ह्याने अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत. जलसंधारणाच्या कामांसाठी सांगली जिल्ह्यात कोट्यवधी रूपये खर्च झाले आहेत. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (बीओटी) या तत्त्वावर सांगली जिल्ह्यात अनेक पूल आणि रस्त्यांची कामे झाली. या कामांसाठी नागरिकांना अनेक वर्षे टोल रूपाने पैसे मोजावे लागतात. इतर जिल्ह्याच्या तुलनेत आमदार व खासदार फंडातूनही मोठ्या प्रमाणावर निधी सांगली जिल्ह्यात दरवर्षी येतो. नाबार्ड, हुडको आदि संस्थांकडूनही मोठा निधी सांगली जिल्ह्यात खर्च होत असतो. स्वाभाविकच विकासकामांचा दर्जा व गुणवत्ता पाहता याची पडताळणी करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषयाची निवड केली.

## १.५ अभ्यासाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन विषयाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

१) सांगली जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांच्या बातम्यांचा आढावा घेणे.

२) संशोधनासाठी निवडलेल्या क्षेत्राची भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक बाजू अभ्यासणे.

३) विकासकामांच्या वृत्तपत्रीय बातम्यांचा प्रभाव कितपत पडत असतो हे तपासणे.

४) ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना या विकासकामांच्या बातम्यांचा किती प्रमाणात फायदा होतो हे अजमावणे.

५) विकास कामांचा दर्जा आणि गुणवत्ता टिकण्यासाठी वृत्तपत्रांची भूमिका कशी महत्त्वपूर्ण ठरते

हे अभ्यासणे.

६) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील गैरप्रकारांना आळा बसतो का ? हे अभ्यासणे.

७) वृत्तपत्रांच्या प्रभावामुळे विकासकामांमध्ये खर्च होणाऱ्या सार्वजनिक पैशाचा अपव्यय टाळता येतो का? याचा आढावा घेणे.

८) विकासकामांच्या बातम्यांमुळे जनजागृती होते का ? तसेच लोकलढा उभारला जाऊ शकतो का? याविषयी अभ्यास करणे.

९) विकासकामांमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासावर वृत्तपत्रीय बातम्यांमुळे लक्ष वेधले जाते का? या विषयी आढावा घेणे.

१०) वरील सर्व विषयांमधील त्रुटी शोधणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

## १.६ गृहीतके

'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' या विषयावर अभ्यास करताना खालील गृहीतके निश्चित करण्यात आली.

१) शासकीय विकास योजनांबद्दल जनतेमध्ये जागृती करण्यात वृत्तपत्रे यशस्वी झाली आहेत.

२) वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो.

३) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो.

४) गावागावांमध्ये विकासकामे होण्यासाठी वृत्तपत्रीय बातम्या, लेख यांचा उपयोग झाला आहे.

५) विकासकामांवर शासकीय अधिकाऱ्यांचे पूर्ण नियंत्रण असते.

६) विकासकामांसंदर्भात बातम्या देताना त्या अभ्यासपूर्ण आणि संपादकीय विभाग, वार्ताहर यांच्या निरीक्षणातून दिल्या आहेत.

७) विकासकामे पूर्ण होऊन शासकीय निधीचा योग्य वापर व्हावा असा शासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आहे.

८) विकासकामांमुळे दळणवळणसुविधा उपलब्ध झाल्यामुळे परिसरातील लोकांच्या राहणीमान सुधारले आहे.

### १.७ संशोधन पद्धती

या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी तसेच साधन सामग्री आणि माहिती उपलब्ध होण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा अवलंब करण्यात आला.

### प्राथमिक स्रोत

या संशोधनासाठी प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी स्तरीकरण पद्धतीने (Stratified sampling method) प्रत्यक्ष मुलाखतीसाठी सर्वसामान्य नागरिक, कामगार, डॉक्टर, स्थापत्य अभियंते, शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, वार्ताहर यांची निवड केली.

१) निवड पद्धतीत पहिल्या स्तरांवर सांगली जिल्ह्याची निवड केली. कारण संशोधकाचे कार्यक्षेत्र सांगली जिल्हा आहे.

२) दुसऱ्या स्तरावर १९९६ ते २००६ हा कार्यकाल विस्तारभयास्तव निश्चित केला.

३) तिसऱ्या स्तरावर विविध दैनिकांच्या संपादकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

### मुलाखती

प्राथमिक माहिती संकलनासाठी प्रश्नावलीच्या साहाय्याने नागरिकांच्या मुलाखती घेतल्या. प्रथम पथदर्शी (Pilot study) अभ्यासासाठी सांगली जिल्ह्यातून प्रश्नावली भरून घेतल्या. प्रश्नावलीमध्ये मुलाखत देणाऱ्याचे नाव, पत्ता, शिक्षण, वय, व्यवसाय, वार्षिक उत्पन्न अशी वैयक्तिक माहितीही घेण्यात आली, तसेच वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या विकासकामांच्या बातम्यांसंदर्भातही काही प्रश्न विचारण्यात आले. विकासकामांसंदर्भातील बातम्या वाचता काय ? विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रांमध्ये माहिती असते काय ? या बातम्यांमध्ये पारदर्शीपणा असतो काय ? वृत्तपत्रांमध्ये आलेल्या या बातम्यांचा उपयोग होतो का? वृत्तपत्रांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो का ? विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव जाणवतो काय ? वृत्तपत्रांकडून आपल्या अपेक्षा काय ? असे वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न या प्रश्नावलीद्वारे नागरिकांना विचारण्यात आले.

### अधिकाऱ्यांच्या मुलाखती

विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांच्या मुलाखती

घेतल्या. वृत्तपत्रातील विकासकामांच्या बातम्या वाचता काय? रस्ता दुरूस्ती आदी सारखी मागणी वृत्तपत्रांद्वारे करण्यात आली असल्यास त्याची दखल घेता काय ? वृत्तपत्रामध्ये कोणत्या प्रकारच्या बातम्यांना प्रसिद्धी द्यावी ? वृत्तपत्रांकडून आपल्या अपेक्षा काय ? असे प्रश्न प्रश्नावलीद्वारे विचारण्यात आले.

### वार्ताहरांच्या मुलाखती

वर्तमानपत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्यांसाठी प्रश्नावली तयार करून मुलाखती घेतल्या. विकास कामांसंदर्भात आपण बातम्या लिहिता का ? लेखात कोणते विषय हाताळता ? विकास कामासंदर्भात दिलेल्या बातम्यांची नागरिक व संबंधित अधिकारी दखल घेतात का ? त्या बातम्यांचा पाठपुरावा होतो का? विकासकामांसंदर्भातील बातम्यांमुळे कामांचा दर्जा सुधारतो का? आदी माहिती या प्रश्नावलीद्वारे मिळविण्यात आली.

### दुय्यम स्रोत

सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सांख्यिकी विभाग आदी शासकीय कार्यालयाकडून माहिती तसेच शासकीय आदेश प्राप्त केले.

संदर्भ साहित्य, पुस्तके, मासिके, अहवाल, शासकीय मासिके, नागरीक, प्रकल्प यांचा या संदर्भात साहित्य म्हणून वापर केला. शासकीय, निमशासकीय तसेच खासगी कार्यालये, दैनिकांची कार्यालये यांच्याकडूनही विविध माहिती मिळविली.

### १.८ अभ्यासाच्या मर्यादा

‘वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव’ या विषयाचा अभ्यास करीत असताना तसेच विषयानुरूप माहिती संकलीत करीत असताना खालील मर्यादा आढळून आल्या.

१) विकासकामे आणि वृत्तपत्र यांच्यातील संबंधावर फारच थोड्या प्रमाणावर लिखित साहित्य उपलब्ध आहे.

२) तज्ज्ञ व्यक्तींनीही या विषयावर सविस्तर लिखाण केलेले नाही.

३)  माहिती संकलित करताना वस्तुनिष्ठ माहिती पुरवली गेली असेलच असे नाही.

४)  काही वेळा शासकीय गुप्तते माहितीमुळे अभ्यासावर मर्यादा आल्या.

५)  शासकीय अधिकारी माहिती देताना काही वेळा टाळाटाळ करतात तसेच अपूर्ण माहिती देतात.

६)  विकासकामांबद्दल लिखाण करणाऱ्या वार्ताहरांकडे स्वत:ची कात्रणे नसल्यामुळे अभ्यासावर मर्यादा आली.

७)  बऱ्याच वार्ताहरांना त्यांनी दिलेल्या विकासकामांच्या बातम्या सांगता येत नाहीत.

८)  विषयाला अनुसरून तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली सहजासहजी भरून मिळत नाहीत. त्याबाबतीत वारंवार पाठपुरावा करावा लागतो.

९)  कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांच्याकडे विकासकामांची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्याकडून योग्य माहिती मिळत नाही.

१०) विकासकामे करणारे कंत्राटदारही माहिती देताना उघड बोलण्यास कचरतात.

अर्थात, या सर्व मर्यादांवर मात करीत संशोधन केले.

**१.९ प्रकरणांची रूपरेषा**

'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' हा विषय वृत्तपत्रे, त्यांच्याशी संबंधित वार्ताहर, विकासकामे करणारे कंत्राटदार, विकासकामांवर देखरेख करणारे शासकीय अधिकारी, ज्यांच्यासाठी विकासकामे होतात ते सामान्य नागरिक, जेथे विकासकामे होतात तो परिसर आदी घटकांवर अवलंबून आहे. त्यामुळे प्रकरणांची रूपरेषा ठरवताना सांगली जिल्ह्याची भौगोलिक परीस्थिती आणि वैशिष्ट्ये, सांगली जिल्ह्यातील वृत्तपत्रे, या वृत्तपत्रांशी संबंधित वार्ताहर, सांगली जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील वृत्तपत्रांचे वाचक, सांगली जिल्ह्यातील विविध शासकीय विकासकामे करणारे कंत्राटदार, सांगली जिल्ह्यातील विकासकामे आदींचा विचार प्रकरणांची रूपरेषा ठरवताना केला.

अभ्यासविषयाची विविध टप्प्यांमध्ये विभागणी करून एकूण सहा प्रकरणे निश्चित केली. उपोद्घात या पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, विषयाचे स्वरूप, विषयाचे महत्व, विषयाची निवड, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पध्दती, अभ्यासाच्या मर्यादा आदी घटकांचा समावेश केला.

विषयाला अनुसरून मराठी वृत्तपत्रांचा आढावा घेण्यासाठी दुसरे प्रकरण तयार केले आणि त्याला 'मराठी वृत्तपत्रांची वाटचाल व त्यांचा समाजावरील प्रभाव' असे नाव दिले. या प्रकरणात वृत्तपत्रांचा इतिहास, मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ, स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचा उद्देश व कार्य, स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वृत्तपत्रांची वाटचाल, वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप, वृत्तपत्रातील बातम्या–लेख यांची ओळख, वृत्तपत्रातील विविध विभागांची रचना व कामाचे स्वरूप, सांगली जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रे या घटकांचा अभ्यास केला.

विषयाशी संबंधित विकासकामांचा सर्वसमावेशक आढावा घेण्यासाठी 'सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा' हे तिसरे प्रकरण तयार केले. या प्रकरणात प्रास्ताविक, महाराष्ट्राची भौगोलिक रचना, सांगली जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती व वैशिष्ट्ये, विकासकामाची व्याख्या आणि प्रकार, विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणा, विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया, विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी, सांगली जिल्ह्यातील १९९६ ते २००६ या कालावधीतील प्रमुख विकासकामे, सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च असे मुद्दे अभ्यासले.

विविध वृत्तपत्रांचे विकासकामांसंदर्भातील धोरण अभ्यासण्यासाठी 'विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांचा दृष्टिकोन' हे चौथे प्रकरण तयार केले. या प्रकरणात वृतपत्रांमधील विकासकामांसदर्भातील बातम्या, माहितीचे प्रकार, वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची जबाबदारी, बातमीदाराची विकासकामांसदर्भातील बातम्यांबाबतची नैतिकता, विकासकामांबाबतच्या बातम्यांचे सादरीकरण, विकासकामांबाबतच्या बातम्या व इतर बातम्या यांचा तौलनिक अभ्यास, वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठीची प्रश्नावली व त्याचे विश्लेषण आदी मुद्द्यांचा उहापोह केला.

समाजाच्या विविध घटकांवर होणारा विकासकामांच्या बातम्यांचा परिणाम अभ्यासण्यासाठी 'वृत्तपत्रातील विकासकामांच्या वृत्तांमुळे होणारे आर्थिक व सामाजिक परिणाम' या पाचव्या प्रकरणाचा प्रबंधात समावेश केला. या प्रकरणात विकासकामांच्या बातम्यांमुळे होणारी जनजागृती आणि प्रतिक्रिया (प्रश्नावली–विश्लेषण), बातम्यांमुळे विकासकामांवर होणारे परिणाम, बातम्यांमुळे विकासकामांमधील भ्रष्टाचारावरील अंकुश, वृत्तपत्रातील विकासकामांसदर्भातील जाहिराती व त्याचे

फायदे, वृत्तपत्रांमधील बातम्यांमुळे अनावश्यक विकासकामांवरील अंकुश, वृत्तपत्रांनी विकासकामांबद्दल आवाज उठविल्यानंतर संबंधित यंत्रणेवर होणारे परिणाम, विकासकामे व वृत्तपत्रातील बातम्या यासंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया (प्रश्नावली व विश्लेषण), विकासकामांमुळे/विकासकामांसाठी लागणाऱ्या साहित्यामुळे (माती, वाळू, वीट, दगड, मुरूम इत्यादी) पर्यावरणावर होणारे परिणाम, प्रदूषणात पडणारी भर आणि त्याबाबतची वृत्तपत्रांची जबाबदारी, वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील लोकसहभाग, वार्ता आणि विकासाचे मूल्यमापन, विकासकामांच्या बातम्या, विकासकामे व त्या-त्या परिसरामध्ये झालेले आर्थिक, सामाजिक बदल आदी घटकांचा अभ्यास केला.

वरील पाचही प्रकरणांमधील मुद्द्यांचा अभ्यास व विश्लेषण करून 'निष्कर्ष व शिफारसी' हे सहावे प्रकरण तयार केले. या प्रकरणामध्ये निष्कर्ष, शिफारशी, प्रश्नावली, नकाशा, संदर्भ साहित्य आदी घटक नमूद केले.

**प्रकरणाचा समारोप**

उपोद्घात या पहिल्या प्रकरणात 'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' या विषयाचे काय स्वरूप आहे, हे मांडले आहे. अभ्यासासाठी या विषयाचे महत्त्व काय? तसेच संशोधनासाठी या विषयाची का निवड केली, याची थोडक्यात मिमांसा केली आहे. या विषयाला अनुसरून कोणती गृहीतके ठरविली? संशोधनाची पध्दत काय आहे? अभ्यासावर कोणत्या मर्यादा येतात? आदी बाबींचाही या प्रकरणात उहापोह केला आहे.

---

**संदर्भ**

१) 'केसरी' वृत्तपत्र - ४ जानेवारी १८८१ पृष्ठ क्रमांक १ .

## प्रकरण दुसरे

# मराठी वृत्तपत्रांची वाटचाल व त्यांचा समाजावरील प्रभाव

# प्रकरण दुसरे : मराठी वृत्तपत्रांची वाटचाल व त्यांचा समाजावरील प्रभाव

२.१ : वृत्तपत्रांचा इतिहास

२.२ : मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ

२.३ : स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचा उद्देश आणि कार्य

२.४ : स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वृत्तपत्रांची वाटचाल

२.५ : वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप (माहिती तंत्रज्ञान आणि बदललेले रूप)

२.६ : वृत्तपत्रातील बातम्या, लेख यांची ओळख

२.७ : वृत्तपत्रातील विविध विभागांची रचना व कामाचे स्वरूप

२.८ : सांगली जिल्ह्यातील वृत्तपत्रांचा इतिहास

२.९ : सांगली जिल्ह्यातून प्रसिध्द होणारी प्रमुख वृत्तपत्रे

## २.१ वृत्तपत्रांचा इतिहास

आपल्या अवतीभोवती काय चाललेय या कुतूहलातून बातमीचा जन्म झाला. लोकांना जे हवे आहे ती माहिती देण्यासाठी वृत्तपत्र अस्तित्वात आले. सुरुवातीच्या काळात तोंडी शब्दांनी, सार्वजनिक ठिकाणी पत्रके लावून किंवा दवंडी पिटवून लोकांना माहिती दिली जाई. १३ व्या शतकात पाश्चात देशातील व्यापारी व्यावहारिक धोरण आखता यावे यासाठी स्वतःचे बातमीदार नेमू लागले.[१] सत्ताधारी मंडळी किंवा राज्यकर्ते आपल्या प्रजेचे मन जाणण्यासाठी हेर नेमू लागले. ग्रीक नाटकांमध्ये ताजी बातमी आणि चुटचुटीत टीका यांचा समावेश केला जाऊ लागला. इंग्लंडमधील राज्यकर्ते तर दुसऱ्या देशात आपले दूत आणि वृत्तलेखक ठेवून बातमी, माहिती जाणून घेत असत.

युरोपात मुद्रणकलेला उदय १५ व्या शतकात झाला.[२] सुरुवातीच्या काळात बातमीपत्र हे हॉलंडमध्ये छापून इंग्लंडमध्ये आणले जाई. १६२१ मध्ये नॅथेनियल बटर नावाच्या ग्रंथविक्रेत्याने इंग्लंडमधील वृत्तपत्रांची सुरुवात केली. सरकारी बातमी पत्राप्रमाणे सर्वसामान्य लोकांसाठी बातमी पुरविण्यासाठी खासगी अखबार तयार करण्यात येऊ लागले. ही बातमीपत्रे सुरुवातीच्या काळात हस्तलिखित स्वरूपात असत. वृत्ताच्या अनेक हस्तलिखित प्रती तयार करणे अवघड होते. या अडचणीमधून मार्ग काढण्यासाठी मुद्रण कलेचा शोध लावण्यात आला. मुद्रणकलेमुळे अनेकांचे बातमीविषयक कुतूहल एकाच वेळी माफक खर्चात पूर्ण करणे शक्य झाले.

### भारतीय वृत्तपत्रे

रामायणातील नारदमुनींना पत्रकारांचा आद्यपुरूष मानले जाते.[३] कौरव-पांडव यांच्यातील युद्धाची इत्यंभूत बातमी रणांगणावर न जाता आंधळ्या धृतराष्ट्राला सांगणाऱ्या संजयला आधुनिक पत्रकारितेचे जनक मानावे लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांनाही हेरांकरवी शत्रूची खडानखडा माहिती मिळे. मोगल बादशहासुद्धा खास बातमीदार नेमून गुप्त बातम्या मिळविण्याचा प्रयत्न करीत असत.

भारतात सर्वात प्रथम मुद्रणालयाची स्थापना पोर्तुगिजांनी केली.[४] पोर्तुगीज धर्मप्रचारकाने

१५५७  इ. स. ला गोव्यात प्रथम पुस्तक छापले. इ. स. १६८४ ला मुंबईमध्ये एक छापखाना सुरू झाला. इ. स. १७७६ मध्ये विलियम बेल्टसने इच्छापत्र देऊन वृत्तपत्र काढण्याची इच्छा व्यक्त केली.

इंग्रजांनी भारतामध्ये आपले हातपाय पसरायला चालू केल्यानंतर सर्वप्रथम बंगाल येथील सत्ता हस्तगत केली. त्या बंगाल मध्येच भारतातील पहिले वृत्तपत्र निघाले. त्यानंतर मुंबई, चेन्नई , दिल्ली या मुलुखांमध्ये वृत्तपत्रांना सुरुवात झाली.

जेम्स हिकी याने भारतातील पहिले वृत्तपत्र सुरू केले.[५] २९ जानेवारी १७८० रोजी 'बेंगाल गॅझेट' या नावाचे इंग्रजी साप्ताहिक जेम्स हिकी याने चालू केले. दुसरे वृत्तपत्र 'इंडिया गॅझेट' नावाने नोव्हेंबर १७८० मध्ये कोलकाता येथेच सुरू झाले.[६] १७८४ मध्ये सरकारच्या अधिपत्याखाली 'कलकत्ता गॅझेट' हे वृत्तपत्र निघाले. मद्रासचे सरकारी मुद्रक रिचर्ड जॉन्टन याने १२ ऑक्टोबर १७८५ रोजी 'मद्रास कुरियर' हे पत्र चालू केले.[७] मुंबईमध्ये १७८९ साली 'बॉम्बे हेरॉल्ड' हे तेथील पहिले वृत्तपत्र सुरू झाले.

जेम्स हिकीने 'दि बेंगाल गॅझेट'मधून मुख्य न्यायधीशांची आलोचना केल्याने त्यांचे मुद्रणालय जप्त करण्यात आले.[८] तसेच १७८२ साली जेम्स यांना अटक करण्यात आले. जेम्स हिकी याला भारतीय वृत्तपत्रांच्या इतिहासाचा अग्रदूत म्हणून ओळखले जाते. इ. स. १७९९ साली गर्व्हनर जनरल लॉर्ड वेलस्लीने भारतातील सर्व वृत्तपत्रांना बंधने लावली.[९] संपादक, मुद्रक व मालक यांचा स्पष्ट उल्लेख वृत्तपत्रांमध्ये करणे आवश्यक करण्यात आले. इ. स. १८२३ मध्ये वृत्तपत्र परवाना कायदा अमलात आला.[१०]

## २.२ मराठी वृत्तपत्रांचा प्रारंभ

भारतात वृत्तपत्रक्षेत्रात इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रांनी श्रीगणेशा केल्यानंतर ५० वर्षांनी म्हणजेच १८३२ साली स्वतंत्र अशा मराठी वृत्तपत्रास सुरुवात झाली. मराठी वृत्तपत्रांची सुरुवात मुंबईमधून झाली. मुंबईत मुद्रणाची सोय, वृत्तपत्रांचा खास वाचक वर्ग या गोष्टी असल्यामुळे वृत्तपत्रांना पोषक असे वातावरण होते. मुंबई हे बेट १६६१ पासून ब्रिटीशांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या आधिपत्याखाली होते. युरोपियन लोकांच्या मुंबईत असलेल्या प्राबल्यामुळे तेथे इंग्रजी वृत्तपत्रांची सुरुवात लवकर झाली. मुंबईत इंग्रजी वृत्तपत्र निघाल्यानंतर ४५ वर्षांनी मराठी वृत्तपत्रांना प्रारंभ झाला.

कोकणातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ले येथील बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे वृत्तपत्र मुंबईत सुरू केले.[११]

बाळशास्त्री जांभेकर यांना इंग्रजी, मराठी, संस्कृत, बंगाली, कन्नड आदि तेरा भाषा अवगत होत्या.[१२] बंगाली वृत्तपत्रांपासून स्फूर्ती घेऊन वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. दर्पण हे सुरुवातीस आठ पानी पाक्षिक होते. वाचकांच्या मागणीनुसार काही महिन्यातच ते साप्ताहिक बनले. 'दर्पण' चा आकार १९ इंच बाय ११।। इंच इतका होता. लोकांमध्ये ज्ञानप्रसार करण्याचे साधन तसेच समाज प्रबोधन करावे या मुख्य हेतूने जांभेकरांनी 'दर्पण'ची सुरुवात केली.

'दर्पण'च्या अगोदर 'मुंबापूर वर्तमान' हे वृत्तपत्र अस्तित्वात असल्याचा पुरावा सापडतो. लंडन येथून निघणाऱ्या 'एशियाटिक जर्नल ॲड मंथली रजिस्टर' या वृत्तपत्रात 'मुंबापूर वर्तमान' याचा उल्लेख सापडतो. २० जुलै १८२८ रोजी रविवारी 'मुंबापूर वर्तमान' प्रसिद्ध झाल्याचा उल्लेख आढळतो.[१३] परंतु या वृत्तपत्राचा चालक, प्रकाशक, संपादक कोण होते ? ते किती काळ चालले? याचा मात्र कुठेही उल्लेख आढळत नाही. त्यामुळे 'मुंबापूर वर्तमान' हे आद्य मराठी वृत्तपत्र होते असे मानता येत नाही. त्यामुळे आद्य मराठी वृत्तपत्राचा मान 'दर्पण'लाच आहे.

'दर्पण' हे वृत्तपत्र द्विभाषिक होते. पानाच्या डावीकडे इंग्रजी वृत्त असे तर उजवीकडे त्याचेच भाषांतर मराठी असे. पहिल्या अंकातील प्रस्तावनेत दर्पणकारांनी म्हटले होते की, 'नव्या ज्ञानाचा, पाश्चात विद्यांचा लोकांना परिचय व्हावा, त्याचा अभ्यास व्हावा, व त्याद्वारा देशाची समृद्धी व

लोकांचे कल्याण साधावे अशा हेतूने हे वृत्तपत्र काढण्यात येत आहे.[१४] बाळशास्त्री जांभेकर यांचे आयुष्य अल्पजीवी होते.

बाळशास्त्रींच्या निधनानंतर २६ जून १८४० रोजी दर्पणचा शेवटचा अंक निघाला. साठेआठ वर्षे हे वृत्तपत्र चालले.

सूर्याजी कृष्णाजी यांनी ४ जुलै १८४० रोजी प्रसिद्ध केलेले 'मुंबई अखबार' हे वृत्तपत्र पहिले केवळ मराठी असलेले वृत्तपत्र ठरले.[१५] दर शनिवारी प्रसिद्ध होणारे हे साप्ताहिक पक्षपात न ठेवता वास्तविक असेल तेच लिहिले जाईल हा उद्देश ठेवून प्रकाशित होत राहिले. 'मुंबई अखबार' चा आकार १७ इंच बाय १३ इंच इतका होता.

मुंबई अखबारनंतर गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांनी २४ ऑक्टोबर १८४१ रोजी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र मुंबईत सुरू केले.[१६] आठ पाने असलेले हे साप्ताहिक ११ इंच बाय ९ इंच या आकारात प्रसिद्ध होत होते. २० ते २२ वर्षे हे वृत्तपत्र चालले. बाळशास्त्री जांभेकर हे सरकारी नोकरीत होते. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला स्वाभाविक काही मर्यादा होत्या. भाऊ महाजन यांनी ब्रिटीशांची नोकरी टाळून वृत्तपत्रक्षेत्रात आपला स्वतंत्र बाणा कायम ठेवला होता.

'प्रभाकर'च्या संपादकांची लढाई दोन आघाड्यांवर होती. एकीकडे अनिष्ट चाली रीतींचा पुरस्कार करणाऱ्या धर्ममार्तंडांच्या विरोधात ते लढत होते. त्याचवेळी स्व-भाषा आणि स्वदेशाभिमानाचा बाणा स्मरूण नव्याने उदयास आलेल्या इंग्रज सरकारला चार बोल खडेपणाने सुनावत होते.' वरील विवेचनावरून १८५० सालाच्या आसपासच्या परिस्थितीची पुरेपुर जाणीव येते. प्रभाकरमध्ये लोकांना उपयुक्त ज्ञान व माहिती मिळत असे. इतर भाषेतील वृत्तपत्रांमधील महत्त्वाच्या बातम्या मराठी रूपांतरित करून यामध्ये वापरण्यात येत असत. सरकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुका व बदल्या, मुंबई बंदरात येणारी जहाजे व त्यावरील प्रवाशांची नोंद, वाचकांची पत्रे अशी नानातऱ्हेची माहिती 'प्रभाकर'मुळे लोकांना मिळू लागली.

विरेश्वर ऊर्फ तात्या छत्रे यांनी मुंबई येथे 'ज्ञानसिंधु' हे साप्ताहिक ७ फेब्रुवारी १८४२ रोजी चालू केले.[१७] दर सोमवारी प्रसिद्ध होणाऱ्या चार पानी 'ज्ञानसिंधु' या साप्ताहिकाचा आकार १७ इंच बाय १२ इंच इतका होता. पुण्यातील पहिले मराठी वृत्तपत्र १८४४ साली विरेश्वर छत्रे यांनी

काढले. 'मित्रोदय' असे या साप्ताहिकाचे नाव होते. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी १२ फेब्रुवारी १८४९ रोजी पुणे येथे 'ज्ञानप्रकाश' हे साप्ताहिक सुरू केले. आठ पाने असलेल्या या वृत्तपत्राचा आकार १३ इंच बाय ८ ।। इंच इतका होता. ज्ञानाचा प्रसार करणे या उद्देशाने हे वृत्तपत्र निघाले. महाराष्ट्रातील लोकांशी संवाद साधण्यासाठी इंग्रजी मिशनऱ्यांनी अहमदनगर येथे 'ज्ञानोदय' हे मराठी वृत्तपत्र काढले.[१८] १८४२ मध्ये सुरू झालेल्या २० पानी या वृत्तपत्राचे पहिले संपादक रेव्ह हेन्री बॅलंटाईन हे होते. ज्ञानोदय हे वृत्तपत्र पाऊणशेपेक्षा जास्त वर्षे सुरू होते. ज्ञानोदयचा ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे हाच उद्देश असला तरी या वृत्तपत्रात बातम्या आणि इतर विषयही असत. भूगोल विद्या, ज्योतिष शास्त्र, सिद्ध पदार्थ विज्ञान या गोष्टींचा समावेशही या वृत्तपत्रामध्ये असे. इतर देशातील घडामोडी संदर्भातील बातम्याही 'ज्ञानोदय' मध्ये वाचण्यास मिळत.

जून १८४२ च्या ज्ञानोदयच्या अंकात अशिया खंडाचा नकाशा देण्यात आला होता. तर १८५१ साली युरोपचा नकाशा या वृत्तपत्रात छापण्याचा मान 'ज्ञानोदय' कडेच जातो. 'ज्ञानोदय'मध्ये बरीच माहिती उपलब्ध असे. नितीशास्त्र, रोमचा इतिहास, संस्कृत व्याकरण, भूगोल, दारूचे अनर्थ, बीजगणित, बलूनची माहिती, पूना कॉलेजची माहिती अशा अनेक गोष्टी या वृत्तपत्रात छापलेल्या आढळतात.

देशात घडलेल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनाही 'ज्ञानोदय' मध्ये प्रसिद्ध झालेल्या आढळतात. 'चाक्या म्हसोबा' या शीर्षकाखाली मुंबईत सुरू झालेल्या देशातील पहिल्या रेल्वे गाडीची बातमी देण्यात आली होती.[१९] डिसेंबर १८५४ च्या अंकात फोटोग्राफी संबंधीची बातमी, टेलेग्राफी यंत्राविषयी माहिती, १८५७ च्या बंडाची माहिती यामध्ये पहावयास मिळते. सामाजिक घडामोडी आणि चळवळींची माहितीही यामध्ये आढळते. पुरवणीचा प्रकारही ज्ञानोदयनेच सुरू केला. 'मुलांचा भाग' असे शीर्षक असलेली लहान मुलांसाठीची पुरवणी १८७३ मध्ये ज्ञानोदयने सुरू केली.

मुंबईच्या विरेश्वर छत्रे यांनी पुण्यात 'मित्रोदय' हे वृत्तपत्र काढले. परंतु स्थानिक लोकांचा त्याला पाठिंबा नव्हता. पुण्यातील नवी विद्या प्राप्त केलेल्या लोकांनी एकत्र येऊन १२ फेब्रुवारी १८४९ मध्ये 'ज्ञानप्रकाश' हे अस्सल पुणेरी वृत्तपत्र सुरू केले.[२०] ज्ञानप्रकाशच्या संपादक मंडळात काकासाहेब लिमये, वि. धो. कुलकर्णी, रा. गो. कानडे, द. शं. कुलकर्णी, स. ह. मोडक, कृष्णाजी

त्रिंबक रानडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गोपाळराव देशमुख, महादेवशास्त्री कोल्हटकर आदींनी वर्णी लावली होती. पुण्यातील उद्योगी लोकांचे कर्तव्य, दुष्काळासंबंधी व्यवस्था, मुंबईच्या गव्हर्नरची अनास्था असे अनेक व महत्त्वाचे विषय ज्ञानप्रकाशने वेळोवेळी हाताळले.

मिशनऱ्यांच्या प्रचाराला शह देण्यासाठी कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी जुलै १८५२ रोजी 'विचारलहरी' हे पाक्षिक सुरू केले.[२१] दर गुरूवारी प्रसिद्ध होणाऱ्या आठ पानी या वृत्तपत्राची छपाई शिळा छापावर छापण्यात येई.

९ एप्रिल १८५३ रोजी वर्तमान दीपिका, ६ मे १८५३ रोजी भाऊ महाजन यांचे धूमकेतू, १८५५ रोजी  नारायण मोरोजी यांचे 'नित्यसार संग्रह', १८६४ मध्ये कोल्हापुरातील पहिले वर्तमानपत्र 'वर्तमानसंग्रह' आदींना सुरुवात झाली.[२२] १८४० ते १८६० या काळात इंग्रजांनी भारतात अनेक आमूलाग्र बदल केले. धर्मांतर करणाऱ्यांना वडिलार्जित इस्टेटीचे भागीदार बनविणारा कायदा, विधवा विवाह कायदा, इंडियन पिनल कोड आदींच्या यात सममावेश होतो.

२ जानेवारी १८६२ रोजी मुंबईत 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र निघाले.[२३] विष्णुशास्त्री पंडीत यांनी सुरू केलेले हे वृत्तपत्र ६२ वर्षे टिकले. ४ मे १८७३ रोजी सुरू झालेले 'सुबोधपत्रिका' हे वृत्तपत्र १०० वर्षे टिकले. ठाणे शहरात २२ जुलै १८६६ रोजी 'अरुणोदय' हे वृत्तपत्र गोपाळ गोविंद दाबक यांनी सुरू केले. उपहास आणि उपरोध यावर हे साप्ताहिक निघत होते. व्यंगावर बोट ठेवून मर्मभेद करण्याचा 'हिंदुपंच'चा बाणा असे.

## २.३ स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचा उद्देश व कार्य

१८ व्या शतकाच्या सुरुवातीस वर्तमानपत्राचे स्वरूप प्रथम ज्ञानाचा प्रसार हे होते. पुढे ते राजकीय आणि सामाजिक प्रश्नांकडे वळले. १८७५ सालाच्या आसपास वृत्तपत्रांचा प्रभाव जाणवू लागल्यानंतर ब्रिटीश सरकारने वृत्तपत्रांवर निर्बंध लादण्यास सुरुवात केली. १८७७ साली ब्रिटीश सरकारच्या वतीने 'वृत्तपत्र अधिकारी' नेमण्यात आला. १८६७ साली मुंबईतील देशी वृत्तपत्रांच्या प्रती नियमित गर्व्हनर जनरलच्या माहितीसाठी पुरविण्याचा आदेश कलकत्ता सरकारने मुंबई सरकारला केला. १८६७ सालच्या आसपास मुंबई इलाख्यातील देशी वृत्तपत्रांचे विशेष महत्त्व वाढू लागले. 'दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट (१८६७) या कायद्यात १८९०, १९१४, १९५२, १९५३, १९५६ साली विशेष दुरुस्त्या करण्यात आल्या.[२४] कायद्यामुळे वृत्तपत्रे सरकारकडे येऊ लागल्याने त्याची व्यवस्था पाहण्यासाठी जून १८६८ मध्ये 'रिपोर्टर ऑन नेटिव्ह प्रेस' हे पद निर्माण करण्यात आले. या पदावर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची नेमणूक करण्यात आली. या अधिकाऱ्याचे काम वृत्तपत्रांबद्दल साप्ताहिक अहवाल सादर करण्याचे होते. यामुळे सरकारला वृत्तपत्रात प्रकट होणारे लोकमत कळू लागले. 'रिपोर्टर ऑन नेटिव्ह प्रेस' या अधिकाऱ्यामुळे देशी भाषातील वृत्तपत्रांची सरकारी दप्तरी व्यवस्थित नोंद होऊ लागली.[२५] साप्ताहिक अहवाल दरवर्षी प्रशासकीय अहवालात समाविष्ट होऊन प्रसिद्ध होऊन लागला.

स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचा उद्देश व कार्य बऱ्याच पुस्तकांमधून लक्षात येते. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या रा. के. लेले यांच्या पुस्तकात त्यावेळच्या परिस्थिती वर्णन करताना लिहिले आहे, 'नवीन इंग्रजी शिक्षण घेऊन पाश्चात्य विचारांशी परिचय झालेला नवसुशिक्षित वर्ग जागृत होऊ लागला होता.[२६] लोकमत संघटित करून प्रकट करण्याची वृत्तपत्रांसारखी साधने तो हाताळू लागला. विद्यापीठातून बाहेर पडलेले काही लोक वृत्तपत्रांकडे वळले. देशी वृत्तपत्रे राजकीय असंतोषाचा उच्चार करू लागली असल्याने सरकारला 'रिपोर्टर ऑन नेटिव्ह प्रेस' या सारखे पद निर्माण करावे लागले.

४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' या वृत्तपत्राचा प्रारंभ झाला आणि महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचे एकूण स्वरूपच पालटले. पुढील ५० वर्षे 'केसरी'च्या विचारांचा प्रकाश सर्वत्र पसरून राहिला होता.[२७] तत्कालीन व त्यानंतरच्या सर्वच वृत्तपत्रांनी 'केसरी'चे अनुकरण करण्यास सुरुवात केली.

लोकमान्य टिळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'केसरी' या वृत्तपत्रास सुरुवात करून वृत्तपत्रक्षेत्रातील एका नव्या अध्यायाला प्रारंभ केला. स्वातंत्र्य लढ्यावेळी लोकांची बातम्यांची भूक वाढत होती. लोकमान्य टिळक यांच्या हाती 'केसरी'चे चालकत्व संपूर्णपणे आल्यानंतर त्यांच्या जहाल आक्रमक धोरणामुळे आगरकरांचे 'सुधाकर' हे वृत्तपत्र वगळता बाकी सर्व वृत्तपत्रे केसरीपुढे निष्प्रभ ठरली. केसरीमुळे 'इंग्रजी सत्ता हे वरदान आहे' या तत्कालीन जनतेचा भोळा समज दूर होऊन स्वाभिमानी युगास सुरुवात झाली.

'लोकमान्य टिळकांचे अक्षर वाङमय' या एस. के. कुलकर्णी यांच्या पुस्तकातील पुढील परिच्छेदावरून त्यावेळच्या परिस्थितीची जाणीव येते. 'लोकमान्य बाळ गंगधार टिळक यांच्या लेखणीने मराठी वृत्तपत्र सृष्टीतील क्रांतीकारी कालखंडाचा प्रारंभ करून दिला.[२८] पाहता पाहता त्याचे पडसाद देशाच्या कानाकोपऱ्यात उमटू लागले. लोकमान्य आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'केसरी' व 'मराठा'ची मुहूर्तमेढ रोवली. स्वातंत्र्याचे आणि राष्ट्र उभारणीचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी लेखणी सरसावली. त्यांच्या लेखणीतून उतरणारे एकएक शब्द महाराष्ट्राचाच नव्हे तर देशाचा स्फूर्तिदाता बनला. अक्षरा-अक्षरातून नवनिर्मितीचा किंबहुना क्रांतिरस पाझरला. शब्द शब्द देशप्रेमाचा निर्झर झाला. त्यांच्या लिखाणात धगधगता अंगार होता. त्याने नसानसातून नवोन्मेष निर्माण केला.' वरील परिच्छेदातून १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी तत्कालीन वृत्तपत्रांचा देशासाठी स्वातंत्र्यप्राती हाच एक मुख्य उद्देश होता हे लक्षात येते. लोकमान्य टिळक यांनीही वृत्तपत्राचा उद्देश विशद करताना म्हटले होते की, ब्रिटीश राजसत्ता उलथवून टाकून स्वराज्य हस्तगत करावयाचे असेल तर वृत्तपत्र हे महान साधन आहे.

'केसरी'बरोबरच त्याकाळी स्वातंत्र्य लढा आणि सामाजिक चळवळ उभी करावयाच्या उद्देशाने अनेक वृत्तपत्रांचा जन्म झाला. १८८२ साली रत्नागिरीतून 'बकुळ', जानेवारी १८८१ रोजी जळगाव येथून 'प्रबोध चंद्रिका', सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथून १८८१ साली 'पंचानन', तासगावातून 'चंडांशू', १५ ऑक्टोबर १८८८ पासून गोपाळ गणेश आगरकर यांनी 'सुधारक'ची सुरुवात केली.[२९] सुधाकर पाठोपाठ मुंबईतून १८८९ साली सुरू झालेल्या 'वार्ताहर' या वृत्तपत्राने मोठी लोकप्रियता मिळवली. १८९६ रोजी शिवराम महादेव परांजपे यांनी 'काळ' हे वृत्तपत्र सुरू केले. १९०५ मध्ये भास्कर भोपटकर यांनी 'भाला' हे मतपत्र काढले.

१९१० साली प्रेस ॲक्ट मंजूर झाला.[३०] या कायद्यानुसार आक्षेपार्ह मजकुरासाठी संपादकाप्रमाणे मुद्रकालाही जबाबदार धरण्यात येऊन दंडाच्या आकारणीसह मुद्रणालये जप्त करण्यात येऊ लागली. या कायद्याच्या त्रासाने अनेकांनी आपली वृत्तपत्रे बंद केली.

पुढील काळात १९१४ साली लोकसेवक, ज्ञानसाधन, आचार्य ही पाक्षिके सुरू झाली. १९१५ साली अच्युत कोल्हटकर यांचे 'संदेश' हे पत्र सुरू झाले. १९१९ मध्ये लोकसंग्रह व १९२० मध्ये 'लोकमान्य' ही दैनिके सुरू झाली. डॉ. ना. भि. परूळेकरांनी पुण्यात 'सकाळ' सुरू केला.[३१] सामान्य जनतेचे मुखपत्र बनलेला 'सकाळ' आज महाराष्ट्रातील सर्व भागातून निघतो. १९२५ मध्ये ज्ञानकोशकार केतकर यांनी 'पुणे समाचार' हे दैनिक सुरू केले. पुणे येथे आचार्य जावडेकर यांनी १९३५ साली 'लोकशक्ती' हे वृत्तपत्र सुरू केले. १९४० च्या सुमारास शि. ल. करंदीकर यांनी 'त्रिकाल' हे दैनिक सुरू केले. १९२० च्या सुमारास बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीचे मुखपत्र 'मूकनायक' हे सुरू केले. १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे डॉ. आंबेडकरांचेच वृत्तपत्र सुरू झाले. १९१९ साली बाबूराव ठाकूर यांनी बेळगाव येथून प्रसिद्ध होणारे 'तरुण भारत' हे वृत्तपत्र चालू झाले. ६ एप्रिल १९३८ रोजी साने गुरूजी यांनी 'काँग्रेस' साप्ताहिक सुरू केले. १ जानेवारी १९३९ पासून 'पुढारी' दैनिक स्वरूपात निघू लागला. गणपतराव जाधव यांनी सुरू केलेले हे वृत्तपत्र सुरुवातीस साप्ताहिक स्वरूपात निघत होते. बहुजन समाजाचे प्रश्न मांडण्याच्या उद्देशाने श्री. जाधव यांनी 'पुढारी' हे वृत्तपत्र सुरू केले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील बहुतेक वृत्तपत्रांचा देशासाठी स्वातंत्र्यप्राप्ती हाच मुख्य उद्देश दिसून येतो. या हेतुने वृत्तपत्रांनी उघडपणे सरकारला कानपिचक्या देणारे व सामान्यांच्या अडचणींना वाचा फोडणारे लेख लिहिले. याबद्दल बऱ्याच वृत्तपत्रांच्या संपादकांना तुरूंगवासही भोगावा लागला. वृत्तपत्रीय लिखाणासाठी तुरुंगवास भोगणारे पहिले मराठी पत्रकार म्हणून लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांचा उल्लेख होतो. लोकमान्य टिळक यांच्यावर १९०८ साली राजद्रोहाचा खटलाही दाखल झाला. त्यात त्यांना शिक्षा होऊन ब्रह्मदेशात मंडाले येथे तुरूंगात ठेवण्यात आले. 'काळ' वृत्तपत्राचे संपादक शिवराम परांजपे यांनाही राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली. 'संदेश'चे अच्युतराव कोल्हटकर यांच्यावरही राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला दाखल झाला.

'राष्ट्रमत'चे संपादक सीतारामपंत दामले, 'भाला'चे श्री. भोपटकर यांच्यावरही राजद्रोहाचे खटले भरण्यात आले. विहार, अरुणोदय, प्रतोद, स्वराज्य, विश्ववृत्त अशी अनेक नियतकालिके स्वातंत्र्यपूर्व काळाआधी खटले होऊन बंद पडली.

देशासाठी स्वातंत्र्यप्राप्ती या बरोबरच जनसंपर्क, समाज प्रबोधन, धार्मिक व सामाजिक विषय, बहुजन समाजासाठी चळवळ, आधुनिक विचारांचा पाठपुरावा, स्व–संस्कृती निर्माण करणे, राष्ट्रीय जागृती करणे आणि लोकांना नव–नवे ज्ञान देणे या उद्देशाने स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी वृत्तपत्रांचे कार्य सुरू होते.

**२.४ स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वृत्तपत्रांची वाटचाल**

ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त होत भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य अमर्यादित झाले. स्वातंत्र्यप्राप्तीचा उद्देश सफल झाल्यानंतर वृत्तपत्रांमधून लोकांचे विविध प्रश्न, अडचणी, समस्या किंवा त्यांच्यावर होणारे अन्याय प्रसिद्ध होऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून वृत्तपत्रांची लोकप्रियता वाढत गेली. तसा खपही वाढत गेला. वृत्तपत्रांच्या वाढत्या खर्चाचा ताळमेळ घालण्यासाठी भांडवलाची गरज निर्माण झाली. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वृत्तपत्रांना व्यावसायिक स्वरूप आले.

वार्ताहर, वृत्तसंस्था, जाहिरातींचे अर्थकारण, छपाई, व्यवस्थापन यासारख्या विभागांची आवश्यकता निर्माण झाली. यामुळे वृतपत्रांकडे भांडवलदार वर्ग ओढला गेला. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर वर्षातच 'लोकसत्ता' या मराठी वृत्तपत्राला पहिल्या वृत्तपत्रसमूहामार्फत चालविण्यास १९४८ साली सुरुवात झाली.[३२] लोकसत्ताचे पहिले संपादक त्र्यंबक विष्णू पर्वते हे होते. १९४८ रोजी 'नवाकाळ' आणि 'प्रभात' ही दैनिके मुंबईत सुरू झाली. नोव्हेंबर १९५६ मध्ये आचार्य प्र. के. अत्रे यांचे 'मराठा' हे दैनिक सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी आचार्य अत्रे यांनी 'मराठा' मधून परखड लिखाण केले. जून १९६२ मध्ये 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्राला सुरुवात झाली.[३३] अनेक स्वतंत्र विषयांना स्थान असलेल्या या वृत्तपत्राचे पहिले संपादक द्वा. भ. कर्णिक होते. रत्नागिरी टाईम्स, संध्यानंद, पुण्यनगरी, सामना ही मराठी वृत्तपत्रे आपआपल्या भागात पत्रकारितेत स्थान टिकवून आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठी वृत्तपत्रांच्या उद्देशात आणि कार्यामध्ये बदल होत गेला. राजकीय

लोकांनी आपल्या राजकारणाचा पाठपुरावा करण्यासाठी वृत्तपत्रे सुरू केली. बऱ्याच वृत्तपत्रांमधून राजकीय विचार प्रसिद्ध होऊ लागले. सामाजिक व राजकीय कामांची प्रसिद्धी मिळविण्यासाठी वृत्तपत्र हे एक प्रभावी साधन झाले. श्रमिकांचे विचार मांडणारी 'श्रमिक विचार' सारखी वृत्तपत्रे निघू लागली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी 'मूकनायक', 'बहिकृत भारत', 'प्रबुद्ध भारत' सारखी वृत्तपत्रे निघाली. समाजवादी विचारांना वाहिलेली 'साधना' साप्ताहिक सारखी वृत्तपत्रे सुरू झाली. हिंदुत्ववादी विचारांना वाहिलेले विवेक, चित्रपट विषयक विचारांना वाहिलेले 'रसरंग' राजकीय व्यंगात्मक टीका करणारी 'मार्मिक'सारखी वृत्तपत्रे, कला–क्रीडा याविषयी माहिती देणारी 'लोकप्रभा', 'षटकार' यासारखी वृत्तपत्रे वाचकांच्या ज्ञानात भर घालण्याचे काम करू लागली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यावेळी आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' सारख्या वृत्तपत्रांनी रान उठविले.

आजच्या घडीला महाराष्ट्रात ११ हजारांहून अधिक वृत्तपत्रे असून यात दैनिक, अर्ध साप्ताहिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके यांचा समावेश आहे. समाज प्रबोधनापेक्षा सनसनाटी वृत्ते आणि राजकीय मतमतांतरे यावर वृत्तपत्रांनी भर दिला आहे. शोध पत्रकारिता, विकास पत्रकारिता असे नवनवे प्रकार वृत्तपत्रामधून दृढ होत आहेत. वाचकांना उपयुक्त आणि मनोरंजक वाटेल असा मजकूर छापण्यावर वृत्तपत्रांनी भर दिला आहे. 'सकाळ' सारख्या अनेक वृत्तपत्रांनी विकासवादी पत्रकारितेचे धोरण अवलंबले आहे. 'पुढारी'सारख्या दैनिकांनी बहुजन समाजाच्या हिताचे धोरण अवलंबले आहे. राजकारणाच्या प्रचारार्थ बाळासाहेब ठाकरे यांच्या 'सामना'सारख्या दैनिकांनी वेगळा ठसा उमटविला आहे.

वृत्तपत्र व्यवसायात व्यावसायिकता आल्यामुळे व खप–उत्पन्न या गोष्टींना प्राधान्य दिल्यामुळे विकासकामे आणि सामाजिक स्वरूपाच्या बातम्यांची जागा आता खून, अपघात, बलात्कार, मारामारी, भ्रष्टाचार अशा भडक व चटपटीत (सेलेबल न्यूजने) बातम्यांनी घेतली आहे. विकासकामांच्या जाहिराती आणि खासगी उत्पादनांच्या जाहिरातींनी पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत स्थान मिळवले आहे. आधी जाहिराती आणि मग जागा उरली तर बातम्या असे प्रकारही सर्रास वृत्तपत्रांमधून दिसू लागले आहेत. संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी, परीक्षेतील नैपुण्य, क्रीडा प्रकारामंध्ये यश, बाजारभाव, व्याख्याने, सभा यांचे वृत्त, उद्योग–धंद्यामधील घडामोडी,

शेअर बाजारातील चढ–उतार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, वाचकांची पत्रे, स्तंभलेख, विशेषवृत्त आदी बातम्यांनी आज वृत्तपत्रांमध्ये आपापले स्थान निश्‍चित केले आहे

### २.५ : वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप

माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात वृत्तपत्रांचे स्वरूप, वृत्तपत्र तयार करण्याचे स्वरूप, यात आमूलाग्र बदल झाला आहे. इंटरनेटच्या रुपाने अक्षरशः माहितीचा खजिना आज वृत्तपत्रांसमोर खुला आहे. कुठलीही माहिती, फोटो एका 'क्लिक'वर उपलब्ध होतोय. पण एक काळ असा होता की, बातम्या, माहिती मिळविण्याची अत्यंत मर्यादित साधने उपलब्ध होती. पारतंत्र्यात तर वृत्तपत्र निव्वळ संपादकाच्या दूरदृष्टीवर, चौकस बुध्दीवर चालत असे. पुढे तारयंत्र आणि रेडिओवरील बातम्या, हेच वृत्तपत्रांचे राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील बातम्या मिळवण्याचे साधन होते. स्थानिक बातम्या मिळविण्याबाबतही मर्यादा होत्याच. मुळात अशिक्षितांचे प्रमाण जास्त. त्यामुळे वार्ताहरही मिळत नसत. शिकलेला कुणी हौशी शाळामास्तर गाठून त्याला वार्ताहर म्हणून नेमले जाई. असे लोक शक्यतो टपालाने आपल्या परिसरातील बातम्या वृत्तपत्राच्या कार्यालयात पोहोच करीत. टेलिफोननेही त्या काळात वृत्रपत्रांना मोठा हात दिला. नंतरच्या काळात दूरदर्शन संचाने क्रांती घडवली. दूरदर्शनवरील बातम्या हेही वृत्तपत्रांचे बातम्या मिळविण्याचे साधन बनले. अनेक दैनिकांमध्ये रेडिओ आणि दूरदर्शनवरील बातम्यांच्या वेळेत केवळ संपादकीय विभागातील जबाबदार व्यक्तींना बसवून घेऊन इतर कोणालाही प्रवेश न देता अक्षरशः दरवाजा बंद करून घेण्यात येत असे.

दिवसागणिक वृत्तपत्र व्यवसायातील तंत्रज्ञानही बदलत गेले. टेलिप्रिंटरसारखे तंत्र पुढे आले. पी.टी.आय., यु.एन.आय. यासारख्या वृत्तसंस्थांच्या वृत्तसेवा टेलिप्रिंटरद्वारे सुरू झाल्या. त्यामुळे राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील बातम्या मिळवणे आणखी सोपे झाले. स्थानिक पातळीवरील बातम्या मिळविण्यासाठीही टेलिप्रिंटरचा मोठा उपयोग आजही होत आहे. आज विविध वृत्तवाहिन्या २४ तास सातत्याने बातम्या देत आहेत. त्याचाही बातम्या मिळविण्यासाठी उपयोग होतो. इंटरनेटने इतर क्षेत्राबरोबरच वृत्तपत्र सृष्टीतही क्रांती घडवली आहे. माहितीचा अफाट खजिना उपसंपादकासमोर खुला आहे. विविध वृत्तवाहिन्यांच्या, वृत्तपत्रांच्या वेबसाईट्स सातत्याने नवनवीन बातम्या, फोटो अपलोड करत असतात. गुगल, याहूसारखी सर्च इंजिन्सही मदतीला

आहेतच. इ–मेल सुविधेमुळे तर जगातल्या कुठल्याही कोपऱ्यातील बातमी ई–मेल केल्यानंतर दुसऱ्या सेकंदाला संबंधित वृत्तपत्राला मिळू शकते, एवढी तंत्रज्ञानाची मदत आज वृत्तपत्रांना होतेय.

जी गोष्ट बातम्या मिळविण्याच्या बाबतीत, तीच गोष्ट बातम्यांच्या सादरीकरणाबाबतही. वृत्तपत्रांचा अगदी सुरुवातीचा काळ आणि आत्ताचा काळ यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. वृत्तपत्रांच्या प्रारंभीच्या काळात खिळ्यांचे विविध फॉन्ट असत. खिळे जुळवून बातम्या कंपोज करणे, कॅमेऱ्यातून घेतलेल्या फोटोचे ब्लॉक तयार करणे, कंपोझ केलेला मजकूर आणि फोटो पानाच्या आकारामध्ये बसवून त्यांच्या सहाय्याने पान लावणे, तत्पूर्वी फोटोचे ब्लॉक तयार करून घेणे, हे एक कष्टाचे व वेळ खाणारे काम असे. नंतर संगणकाचा वापर सुरू झाल्यानंतर खिळे जुळविण्याचा प्रकार बंद झाला आणि संगणकावर अक्षरजुळणी करून त्याच्या प्रिन्ट घेऊन त्या प्रिन्ट आपल्याला हव्या त्या कॉलमात कात्रीने कापून चिकटवून पान तयार करण्याची पध्दत रूढ झाली. खिळे जुळवणीचा त्रास बंद झाला, पण कटिंग–पेस्टिंग हेही एक कौशल्याचे काम होते. डेस्कटॉप प्रिंटिंगमुळे (डी.टी.पी.) पुढे हाही प्रकार इतिहासजमा झाला आणि वेगवेगळ्या सॉफ्टवेअर्समधून पूर्ण पानच संगणकावर तयार करणे शक्य झाले. आज पेजमेकर, क्वॉर्क एक्सप्रेस, इन डिझाईन, कोरल ड्रॉ, यासारखी अत्याधुनिक सॉफ्टवेअर्स वापरून अधिकाधिक आकर्षक पध्दतीने पान सजविणे शक्य झाले आहे. एकेकाळी करावे लागणारे फोटोचे ब्लॉकही इतिहासजमा झाले. स्कॅनरमुळे फोटोंच्या प्रिंट काढून स्कॅनिंग करून ते वृत्तपत्रांमध्ये वापरणे शक्य झाले. आता तर डिजीटल कॅमेऱ्यांमुळे फोटोप्रिंटचीही गरज उरली नाही. तंत्रज्ञानातील काळानुरूप बदल जस–जसे वृत्तपत्रसृष्टीने स्वीकारले, तसेच त्यांचे पडसादही त्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचले. त्याचा वृत्तपत्रसृष्टीस मोठा फायदा झाल्याचे दिसून येते.

### २.६ वृत्तपत्रीय बातम्या व लेख यांची ओळख

वृत्तपत्र हे विविध अंगांनी नटलेले असते. शालेय मुलांपासून वृध्दांपर्यंत, तरूण–तरूणी, गृहिणी, नोकरदार, दुकानदार, असे अनेक प्रकारचे वाचक वृत्तपत्रांशी जोडले गेलेले असतात. त्यामुळे सर्व प्रकारच्या बातम्यांचा समावेश करण्याचा वृत्तपत्रांचा प्रयत्न असतो. सार्वजनिक कार्यक्रम, भाषणे, राजकीय घडामोडी, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, गुन्हेगारी, अपघात, यापासून ते क्रीडा, आर्थिक, चित्रपट, कृषी, विज्ञान, व्यापार–उद्योग आदी विषयांच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये वाचायला मिळतात.

वृत्तपत्रांच्या पहिल्या पानांवर अपघात, खून, मारामारी (गुन्हेगारी वार्ता ), राजकीय आरोप–प्रत्यारोप, लोकप्रतिनिधींच्या घोषणा, महत्त्वाचे शासन निर्णय, पालिका, महापालिकांमधील महत्त्वाच्या घडामोडी यावर आधारीत बातम्यांना प्रसिध्दी दिलेली असते. संपादकीय पानावर अग्रलेख, स्तंभलेख, वार्ताविश्लेषण, प्रासंगिक लेख आदी महत्त्वाच्या घडामोडींवर प्रकाशझोत टाकणारे विश्लेषणात्मक लेख वाचायला मिळतात. वाचकांच्या पत्रांचाही या पानावर समावेश असतो. आतील पानांवर उद्‌घाटन, आंदोलन, राजकीय घोषणा, पत्रकार परिषदा, विशेष वृत्त, सामाजिक समस्या, विकासकामे, शैक्षणिक, कृषी, चित्रपट, मनोरंजन, सांस्कृतिक, व्यापार–उद्योग, आरोग्य, वैज्ञानिक इ.विषयांवर आधारीत बातम्या व लेख यांचा समावेश असतो.

सर्व वयोगटातील वाचक वर्गाच्या आवडी–निवडी गृहित धरून त्या प्रकारच्या बातम्यांचा समावेश वृत्तपत्रांमध्ये करण्यात येतो. लहान मुलांसाठी वैज्ञानिक, ऐतिहासिक अभ्यासविषयक लेख, मनोरंजनात्मक साहित्य तसेच तरूणांसाठी कॉलेजविश्‍व, नवनवीन तंत्रज्ञान, फॅशन, नव्या इलेक्ट्रॉनिक वस्तू यावर आधारीत बातम्यांचा समावेश वृत्तपत्रात असतो. याशिवाय तरूणी, गृहिणींसाठी आरोग्य, पाककला, घराची सजावट, सौंदर्यविषयक टिप्स, महिलांसाठी लघुउद्योग अशा विविध बाबींची माहिती देणाऱ्या बातम्या व लेखांचा समावेश असतो. वाचकांना ज्या विषयी कुतूहल, औत्सुक्य, जिज्ञासा आहे, अशा बातम्या वृत्तपत्रांमधून सामान्यपणे दिल्या जातात. ताजी, नवी आणि इतरांच्या आधी किंवा इतरांच्या बरोबरीने माहिती लोकांना हवी असते. ही गरज वृत्तपत्रीय बातम्या व वृत्तपत्रिय लेख याद्वारे पूर्ण होते. जे मुद्दे बातम्यांमध्ये येत नाहीत वा जे वेगळे विश्लेषण वा विशेष पार्श्‍वभूमी वाचकांना हवी असते, ते सारे लेखांमध्ये समाविष्ट केले जाते.

## २.७ वृत्तपत्रातील विविध विभाग

लोकशिक्षण आणि लोकमत तयार करण्याचे साधन असलेले वृत्तपत्र हे सध्या एक व्यवसाय बनले आहे. लोकांच्या विश्वासार्हतेमुळे भारतीय लोकशाहीत एक ताकद बनलेल्या वृत्तपत्रक्षेत्रात उद्योगपती आणि राजकारणी लोकांनी प्रवेश केला आहे. त्यामुळे या वृत्तपत्रव्यवसायाचा मुख्य उद्देश लोकशिक्षणापेक्षा नफा मिळविणे हा झाला आहे. आधुनिक व्यवसायात मागणीप्रमाणे पुरवठा हा जसा भाग झाला आहे. त्याचप्रमाणे वाचकाचे समाधान हाही घटक आहे.

वृत्तपत्रांचा मुख्य आधार वाचकांचा विश्वास आहे. त्यामुळे व्यवसाय म्हणून देखील ही विश्वासार्हता सांभाळणे वृत्तपत्राचे कर्तव्य आहे. जाहिरातींमुळे वृत्तपत्रांना उत्पन्न जरी मिळत असले तरी समाजहिताच्या आड येणाऱ्या जाहिराती न छापण्याचे तारतम्य बाळगावे लागते.

वृत्तपत्र व्यवसाय विविध विभागांवर अवलंबून असलेले चक्र आहे. वृत्तपत्रांचा खप असल्याशिवाय जाहिराती मिळत नाहीत. जाहिरातींशिवाय उत्पन्न नाही. उत्पन्नाशिवाय जादा पाने, आकर्षक मजकूर देता येत नाही. याशिवाय वृत्तपत्रांचा खप नाही. आधुनिक काळात वृत्तपत्राने आपल्या वाचकांच्या आवडी–निवडी लक्षात घेऊन वृत्त छापणे तसेच सुबक छपाई, आकर्षक मांडणी, वाचकांची आवड व गरज लक्षात घेऊन आपल्या वृत्तपत्राचा ढाचा ठरविणे आवश्यक आहे. वृत्तपत्र हे त्याच्या निर्मितिखर्चापेक्षा कमी किंमतीला विकले जाते. वृत्तपत्र रोज नव्याने तयार होते तरी देखील त्याचा ढाचा एकसारखाच असावा लागतो. सध्या वृत्तपत्रात सुरू असलेली जीवघेणी स्पर्धा आणि प्रचंड गुंतवणूक पाहता जुन्या पद्धतीनुसार वृत्तपत्र चालविणे अशक्य झाले आहे. त्यास धंदेवाईक व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. वृत्तपत्र संस्थेतील विविध माणसांच्या कामाचे संघटन करून त्यांच्याकडून काम करून घेणे आवश्यक आहे. दूरदृष्टी, संघटन, आराखडा, योजना, आदेश, ताबा आणि जबाबदारी या बाबी वृत्तपत्रांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरत आहेत. त्यामुळे कामकामाजातील सुसूत्रीपणासाठी वृत्तपत्रात विविध विभागांची रचना केलेली दिसून येते.

कामाची विभागणी, अधिकार व जबाबदारी विविध कार्यांचा एकमेकाशी संबंध, संघटनेचा आकार इत्यादी गोष्टी गृहीत धरून वृत्तपत्रामध्ये संपादकीय, वितरण, जाहिरात, छपाई, व्यवस्थापन आणि हिशेब असे प्रमुख विभाग करण्यात आलेले आहेत. प्रत्येक विभागाला विशिष्ट प्रकारची तांत्रिक ज्ञानाची गरज आहे, याचा विचार करून कामाची विभागणी करण्यात येते. एखाद्या

वृत्तपत्राचा विस्तार मोठा असेल तर प्रत्येक विभागात अनेक पोटविभाग पाडतात. वृत्तपत्रात सर्व विभागांचे महत्त्व आहे. उच्चस्तरीय व्यवस्थापन आपापल्या वृत्तपत्रांचे धोरण ठरवत असतात आणि या धोरणांप्रमाणे सर्व विभाग कार्यरत असतात. सर्व विभागांचे काम एकमेकांवर अवलंबून असते.

वार्ताहरांकडून आलेल्या बातम्या संपादकीय विभागामार्फत फोटोकंपोज विभागाला दिल्या जातात. फोटोकंपोज विभागात तयार झालेल्या मजुकरापासून पाने लावली जातात. लावलेल्या पानांचे ट्रेसिंग छपाई विभागात दिले जाते. छपाई केलेला अंक वितरण विभागातर्फे वितरित केला जातो. या साखळीतील एखाद्या विभागाने जरी चूक केली तरी अंक निघायला उशीर होतो. उशिरा तयार झालेले अंक बरेच वेळा वाचकांपर्यंत वेळेत पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे त्या अंकाची वाचकांच्या हातात पोहोचण्याआधीच रद्दी झालेली असू शकते.

याचप्रमाणे वृत्तपत्राचे अर्थकारण हे परस्पर विभागांवर अवलंबून असते. त्यामुळे संपादन, वितरण आणि जाहिरात विभाग यांचा एकमेकांशी समन्वय असणे आवश्यक आहे. योग्य समन्वय व सुसूत्रता असल्यास त्या वृत्तपत्राची वाढ होत असते. खरे तर, आता बातमीदार व उपसंपादक संगणकावर बातम्या तयार करणे, त्या दुरुस्त करणे, पान लावणे ही सारी कामे स्वतः करू शकतात. त्यामुळे अंक सुबक तयार होतोच, पण मनुष्यबळही कमी लागते.

कामाची विभागणी, अधिकार, जबाबदारी, नियोजन, सुसूत्रता यांचा विचार करून वृत्तपत्र संस्थेमध्ये संपादकीय, व्यवस्थापन, जाहिरात, छपाई, वितरण, वसुली, संदर्भ ग्रंथालय इत्यादि विभाग असतात. वृत्तपत्राचा खप, उत्पन्न यानुसार त्यांची कमी–अधिक व्याप्ती असते.

अंक वेगवेगळ्या गावात, शहरात, वाडीवस्तीवर पोहोचल्यानंतर स्थानिक एजंट आणि विक्रेत्यांमार्फत त्याचे वाचकांपर्यंत वितरण करण्यात येते. वितरण विभागाचा रोज बाजाराशी संबंध येत असल्यामुळे अंकाबाबत वाचकांच्या प्रतिक्रिया, नवनवीन पुरवण्या, आदींबाबत व्यवस्थापकांना अहवाल देता येतो.

**जाहिरात विभाग**

जाहिरात विभागाला वृत्तपत्राच्या अर्थकारणाचा कणा मानला जातो. वृत्तपत्र हे त्याच्या निर्मितिखर्चापेक्षा कमी किंमतीला विकले जाते. त्यामुळे उत्पादनखर्चातील तफावत तसेच त्यावर फायदा हे केवळ जाहिरातींमुळेच मिळू शकते. जाहिरातीच्या उत्पन्नाशिवाय कोणतेही वृत्तपत्र हे फायद्यात चालू शकत नाही.

[३४] **जाहिरात विभाग**

- जाहिरात व्यवस्थापक
  - नोंदणी प्रमुख
  - हिशेब कारकून
    - वसुली प्रतिनिधी
  - जाहिरात प्रतिनिधी
  - वेगवेगळ्या गावातील जाहिरात प्रतिनिधी

जाहिरात मिळविणे, जाहिरातीची बिले वाटणे, जाहिरातीचे पैसे वसूल करणे, जाहिरातींचे डिझाईन करणे, जाहिरातींची डमी करणे आदी कामे जाहिरात विभागात सुरू असतात.

सध्या जाहिरातींचे उत्पन्न वाढविण्यासाठी वेगवेगळ्या विषयांच्या पुरविण्या करण्यात येतात. राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांचे वाढदिवस, नेत्यांचे वाढदिवस, खेडेगावातील जत्रा–उरूस, अभियंता दिन, डॉक्टर दिन, शिक्षक दिन आदीविषयी वेगळ्या जाहिरातपुरस्कृत पुरवण्या काढून वृत्तपत्राचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. जाहिरातीत एजन्सीद्वारेही वृत्तपत्रांना जाहिराती मिळतात. सिनेमा, नाटके, मेळावे, प्रदर्शन, वाढदिवस आदींच्या मोठ्या प्रमाणावर जाहिराती एजन्सीस्मार्फत वृत्तपत्रांना मिळतात.

## २.८ : सांगली जिल्ह्यातील वृत्तपत्रांचा इतिहास

सांगली जिल्ह्याची स्थापना २१ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्याआधी जुन्या सातारा जिल्ह्यात सांगलीचा समावेश होता. त्याकाळी सांगलीचा उल्लेख दक्षिण सातारा असा केला जात असे. मुळातच सातारा–सांगली ही क्रांतिकारकांची भूमी. त्यामुळे सामाजिक प्रगल्भताही मोठी. अनेक मर्यादा असतानाही समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणून त्या काळात वृत्तपत्रांकडे पाहिले जात असे.

सांगली जिल्ह्यात सांगली संस्थानच्या आश्रयाने १८७६ साली पहिले वृत्तपत्र सुरू झाले. म्हणजे महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्रांना सुरुवात झाल्यानंतर सुमारे ६८ वर्षानंतर सांगली जिल्ह्यात वृत्तपत्र निघाले. संस्थानचे राजपत्र असलेल्या या पत्रास सांगली जिल्ह्यातील पहिल्या वृत्तपत्राचा मान जातो. सुरुवातीला ते मोडी लिपीत निघत असे. जुन्या सातारा जिल्ह्यात १८८१ साली 'महाराष्ट्र मित्र' नावाचे पत्र सुरू झाले. याच वर्षी कऱ्हाड येथून 'पंचानन' नावाचे पत्र निघू लागले.[३५] याच वर्षी तासगाव येथून विनायकराव कौलगीकर यांचे 'चंडांशू' नावाचे पत्र सुरू झाले. त्यानंतर १८८२ साली तासगावमध्येच सदाशिवशास्त्री भिडे यांनी 'आर्यमानु' नावाचे पत्र सुरू केले. १७ नोव्हेंबर १८८३ रोजी इस्लामपूर येथून 'प्रतोद' नावाचे पत्र सुरू झाले. रा. ना. कशाळकर हे त्याचे पहिले संपादक होते. त्यानंतर तासगाव येथून १८८५ साली 'भाग्यता' नावाचे पत्र सुरू झाले. याचवर्षी 'वृत्तसुधा' नावाचे पत्र निघाल्याचीही नोंद आहे. १८९० साली सांगलीत 'विजय' नावाचे पत्र सुरू झाले. पुढे १९०५ साली तासगाव येथून 'लोकबंधू', १९०९ साली इस्लामपूर येथून 'भारतमाता' नावाचे पत्र सुरू झाले. सांगलीत १९०८ साली विष्णुपंत राजवाडे यांनी 'विदूर' नावाचे पत्र सुरू कले. त्यानंतर १९१४ साली इस्लामपूर येथून 'भारतमित्र' नावाचे पत्र सुरू झाले. पुढे तासगाव येथून १९१९ साली 'सत्यप्रकाश' नावाचे पत्र निघू लागले. १९२० साली इस्लामपूर येथून 'भारतवृत्त' नावाचे पत्र सुरू झाल्याचीही नोंद आढळते. १९२३ साली साताऱ्यातून 'ऐक्य' या वृत्तपत्रास प्रारंभ झाला. १९२४ साली सध्याच्या सातारा जिल्ह्यातील वडूज येथून 'रयत' नावाचे पत्र निघत होते. प्रबोधनकार ठाकरे यांचे 'प्रबोधन' हे पत्रही सातारा रोड येथून निघत असे. १९२७ साली साताऱ्यातच 'समर्थ' नावाचे साप्ताहिक सुरू झाले. याशिवाय जुन्या

साताऱ्यातून 'लोकसेवक', 'देशसेवक', 'हंस', 'श्रीशाहू', 'लोकराज्य', 'ग्रामोध्दार', 'जिव्हाळा', 'अंजन', 'लोकनेता', 'ज्योती' आदी वृत्तपत्रे निघत होती. सांगलीमध्ये १ ऑक्टोंबर १९३० रोजी सांगली वृत्तपत्र मंडळाने 'दक्षिण महाराष्ट्र' हे पत्र सुरू केले. गो. रा. बिनीवाले हे या मंडळाचे सचिव, तर हरि गोविंद टिळक हे या पत्राचे पहिले संपादक होते. याचवर्षी तासगाव येथून 'विचारी भारत' नावाचे पत्र सुरू झाले, पुढे १९३७ साली 'तासगाव समाचार', १९३८ साली 'तासगाव वृत्त' ही वृत्तपत्रे तासगाव येथूनच सुरू झाली. त्यानंतर १ ऑगस्ट १९३९ रोजी ना. ल. जोग यांनी 'दख्खन समाचार' हे पत्र सुरू केले.

पुढे बापुराव खराडे यांनी २६ जानेवारी १९५० रोजी 'प्रजासत्ता' नावाने, तसेच २ आक्टोंबर १९६० रोजी 'समाधान' साप्ताहिक सुरू केले. याशिवाय मधल्या काळात ज. वा. पाटणकर, न. ग. कमतनूरकर यांचे 'विश्वास' सदाशिवराव फडके यांचे 'विजय', नानासाहेब वसगडेकर यांचे 'नवी दिशा', बाळासाहेब चिवटे यांचे 'लोकनेता', ॲड. पाटणकर यांचे 'महात्मा', नंतरच्या काळात खासदार झालेले शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. बाळासाहेब पाटील यांचे 'जनसत्ता', हुद्दार यांचे 'लोकसखा', चिवटे यांचे 'किसान', 'हुतात्मा', 'इशारा' अशी पत्रे निघत होती.

## २.९ सांगली जिल्ह्यातून प्रसिध्द होणारी प्रमुख वृत्तपत्रे

सांगली जिल्ह्यातून दररोज लहान–मोठी अशी १५ हून अधिक वृत्तपत्रे प्रसिद्ध होतात. तसेच काही मोठ्या दैनिकांच्या जिल्हा आवृत्त्याही निघतात यातील काही प्रमुख वृत्तपत्रांची माहिती पुढील प्रमाणे

(अ.क्र., नाव, संस्थापक, संपादक, कार्यकारी संपादक, आवृत्ती प्रमुख या क्रमाने)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **पुढारी** | – | गणपतराव जाधव – प्रतापसिंह जाधव – दिलीप लोंढे – चिंतामणी सहस्त्रबुध्दे |
| २) | **सकाळ** | – | नानासाहेब परूळेकर – प्रतापराव पवार, अध्यक्ष – श्रीराम पवार – अशोक घोरपडे |
| ३) | **लोकमत** | – | जवाहरलाल दर्डा – राजेंद्र दर्डा – वसंत भोसले – श्रीनिवास नागे |
| ४) | **तरूण भारत** | – | बाबुराव ठाकूर – किरण ठाकूर जयवंत मंत्री – मंगेश मंत्री |
| ५) | **दक्षिण महाराष्ट्र केसरी** | – | बाळ गंगाधर टिळक – डॉ. दीपक टिळक – सुकृत खांडेकर – मनोहर पेशवे |
| ६) | **पुण्यनगरी** | – | मुरलीधर शिंगोटे – मुरलीधर शिंगोटे – विजय जाधव – दत्ता कुलकर्णी |
| ७) | **जनप्रवास** | – | सुनिल इनामदार – संजय भोकरे – हणमंत मोहिते |
| ८) | **ललकार** | – | बापूराव खराडे – बापूराव खराडे – सुभाष खराडे |
| ९) | **अग्रदूत** | – | अण्णासाहेब कुंभोजकर – संजय कुंभोजकर |
| १०) | **प्रतिध्वनी** | – | नेमगोंडा पाराज – सुकुमार पाटील |
| ११) | **नवसंदेश** | – | गणपतराव भोसले – कमलाकर भोसले – सुजय भोसले |
| १२) | **राष्ट्रशक्ती** | – | दीनानाथ भोसले – सुरेश भोसले – प्रदीप भोसले |

सांगली जिल्ह्यातून दररोज पुढारी, सकाळ, दक्षिण महाराष्ट्र केसरी, लोकमत, तरूण भारत, पुण्यनगरी या मोठ्या दैनिकांच्या जिल्हा आवृत्त्या प्रसिध्द होतात. या दैनिकांचा सांगली जिल्ह्यातील खप दहा हजारापासून ५० हजारापर्यंत आहे, तर या दैनिकांची सर्वसाधारणपणे किंमत दोन ते तीन रूपये आहे. या वृत्तपत्रांच्या पानांची संख्या १२ ते २० इतकी आहे. यामध्ये स्थानिक बातम्यांबरोबरच राज्य तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्वाच्या बातम्यांचा समावेश केलेला दिसून येतो. दररोज या दैनिकांमधून आरोग्यविषयक, शेतीविषयक, शैक्षणिक, महिलांसांठी, तरुणांसाठी विविध सदरे प्रसिध्द केली जातात, याशिवाय दर रविवारी मुख्य अंकासोबत आठवड्यातील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा घेणाऱ्या वेगळ्या पुरवण्याही प्रसिध्द केल्या जातात.

ललकार, जनप्रवास, अग्रदूत, प्रतिध्वनी, नवसंदेश, राष्ट्रशक्ती ही स्थानिक दैनिकेही सांगलीतून दररोज प्रसिध्द होतात. या वृत्तपत्रांची किंमत १ ते ३ रूपयांपर्यंत आहे. पानांची संख्या ४ ते १२ पर्यंत असते. या वृत्तपत्रांमध्ये स्थानिक बातम्यांना प्राधान्य दिले जाते. आजकालच्या वृत्तपत्र क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमध्ये ही स्थानिक दैनिके अजूनही आपली लोकप्रियता टिकवून आहेत.

सांख्यिकी विभागाकडील अहवालानुसार सध्या सांगली जिल्ह्यातून एकूण १४७ वर्तमानपत्रे व नियतकालिके प्रसिध्द होतात. यामध्ये ३३ दैनिके, ५७ साप्ताहिके, ४ पाक्षिके, तर ५३ मासिकांचा समावेश आहे. यातील मिरज तालुक्यातून ३३ दैनिके, ५७ साप्ताहिके, ४ पाक्षिके, तर ४५ मासिके प्रसिध्द होतात, तर खानापूर तालुक्यातून ८ मासिके प्रसिध्द होतात. मिरज व खानापूर तालुका वगळता जिल्ह्यातील इतर तालुक्यातून वृत्तपत्रे वा नियतकालिके प्रकाशित होत नाहीत, असे दिसून येते. सांगली जिल्ह्यातून प्रसिध्द होणाऱ्या विविध दैनिक व नियतकालिकांचा तक्ता पुढे दिला आहे.

तक्ता क्र. १

## मुद्रणालये आणि त्यांनी प्रकाशित केलेली वर्तमानपत्रे व नियतकालिके

जिल्हा-सांगली

संदर्भ - ३१.३.२०१०

| अ.क्र. | तालुका | दैनिक वर्तमान पत्रे आणि नियतकालिके | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दैनिक | साप्ताहीक | पाक्षिक | मासिक | त्रैमासिक | वार्षिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | शिराळा | - | - | - | - | - | - |
| २ | वाळवा | - | - | - | - | - | - |
| ३ | पलूस | - | - | - | - | - | - |
| ४ | खानापूर | - | - | - | ८ | - | - |
| ५ | आटपाडी | - | - | - | - | - | - |
| ६ | तासगाव | - | - | - | - | - | - |
| ७ | मिरज | ३३ | ५७ | ४ | ४५ | - | - |
| ८ | क.महांकाळ | - | - | - | - | - | - |
| ९ | जत | - | - | - | - | - | - |
| १० | कडेगाव | - | - | - | - | - | - |
| एकूण जिल्हा | | ३३ | ५७ | ४ | ५३ | ० | ० |

**प्रकरणाचा समारोप**

'मराठी वृत्तपत्रांची वाटचाल व त्यांचा समाजावरील प्रभाव' या प्रकरणाचा अभ्यास करण्यासाठी वृत्तपत्रविषयक अधिक माहिती अभ्यासली. वृत्तपत्रांची सुरुवात, मराठी वृत्तपत्रांचा उदय, स्वातंत्र्यपूर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचे कार्य, तसेच उद्देश अभ्यासले. बदलत्या काळात वृत्तपत्रांचे स्वरूप काय आहे? वृत्तपत्रात कोणत्या प्रकारच्या बातम्या व लेख असतात, या गोष्टींचा या प्रकरणात सविस्तर अभ्यास केला. वृत्तपत्रातील विविध विभागांचे कार्य व रचना याची सखोल माहिती या प्रकरणात अभ्यासली. सांगली जिल्ह्यातील वृत्तपत्रांचा इतिहास व सांगली जिल्ह्यातून प्रसिध्द होणारी प्रमुख वृत्तपत्रे आदी मुद्द्यांचा उहापोह या प्रकरणात केला आहे.

----------------------------------------------------------

**संदर्भ**


१) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – रा. के. लेले – पान क्र. ९

२) तत्रैव – पान क्र. १०

३) तत्रैव – पान क्र. ११

४) इतिहास, भाग ३ – प्रा. प्रशांत देशमुख – पान क्र. ९३

५) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे – संजय कोल्हटकर व प्रसाद कुलकर्णी – पान क्र. ४

६) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – रा. के. लेले – पान क्र. २४

७) तत्रैव – पान क्र. २६

८) इतिहास, भाग ३ – प्रशांत देशमुख – पान क्र. ९३

९) तत्रैव – पान क्र. ९३

१०) तत्रैव – पान क्र. ९४

११) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – रा. के. लेले – पान क्र. ५८

१२) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे – पूर्वोक्त – पान क्र. ८

१३) तत्रैव – पान क्र. ७

१४) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – रा. के. लेले – पान क्र. ६१

१५) तत्रैव – पान क्र. ७०

१६) तत्रैव – पान क्र. ७२

१७) तत्रैव – पान क्र. ८३

१८) तत्रैव – पान क्र. ८७

१९) तत्रैव – पान क्र. ९०

२०) तत्रैव – पान क्र. ९४

२१) तत्रैव – पान क्र. ११५

२२) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे – पूर्वोक्त – पान क्र. २०

२३) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – पूर्वोक्त – पान क्र. १४६

२४) इतिहास, भाग ३ – पूर्वोक्त – पान क्र. ९५

२५) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास – पूर्वोक्त – पान क्र. २४८

२६) तत्रैव – पान क्र. २४७

२७) तत्रैव – पान क्र. २७१

२८) लोकमान्य टिळकांचे अक्षर वाङ्.मय – एस. के. कुलकर्णी – पान क्र. ८

२९) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे – पूर्वोक्त – पान क्र. ३१

३०) तत्रैव – पान क्र. ४२

३१) तत्रैव – पान क्र. ४५

३२) तत्रैव – पान क्र. ५८

३३) तत्रैव – पान क्र. ६०

३४) वृत्तपत्र व्यवस्थापन – टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे – पान क्र. १३

३५) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे – पूर्वोक्त – पान क्र. ३१

## प्रकरण ३

# सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा

## प्रकरण तीन : सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा

३.१ : प्रास्ताविक

३.२ : महाराष्ट्राची भौगोलिक रचना व सर्वसाधारण माहिती

३.३ : सांगली जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती आणि वैशिष्ट्ये

३.४ : विकासकामाची व्याख्या आणि प्रकार

३.५ : विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणा

३.६ : विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया

३.७ : विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी

३.८ : सांगली जिल्ह्यातील १९९६ ते २००६ या कालावधीतील प्रमुख विकासकामे

३.९ : सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च

## ३.१ प्रास्ताविक

२१ नोव्हेंबर १९६० रोजी स्थापन झालेला सांगली जिल्हा हा दक्षिण महाराष्ट्रातील एक अग्रेसर जिल्हा म्हणून ओळखला जातो. सांगली जिल्ह्याला विकासकामांची मोठी परंपरा आहे. जुन्या विकासकामांचा विचार करता सांगली ते मिरज लोकल रेल्वे या प्रमुख कामाचा उल्लेख करता येईल. ही रेल्वे १ एप्रिल १९०७ मध्ये सुरू झाली.[१] सांगली संस्थानचे प्रशासक कॅप्टन आर. सी. बर्क यांच्या पुढाकाराने १ लाख ८१ हजार रूपये खर्चाची ही योजना साकारली.

१९२१ मध्ये उभारण्यात आलेल्या ७ लाख रूपये खर्चाच्या आयर्विन पुलामुळे सांगलीची बाजारपेठ गजबजली. सांगलीवाडी, समडोळी, दुधगाव, डिग्रज, तुंग, आष्टा आदी गावांना या पुलामुळे सांगलीची बाजारपेठ सहज उपलब्ध झाली. ब्रिटिशकालिन हा पूल आजही डौलात उभा असून तो मजबूत व सुस्थितीत आहे.

जुन्या विकासकामांचा विचार करता कृष्णा नदीवर बांधण्यात आलेल्या सांगली बंधाऱ्याचाही उल्लेख करावाच लागेल. सांगली बंधाऱ्यामुळे आसपासच्या भागातील शेतीला आणि सांगली शहराला पाणीपुरवठा करणे शक्य झाले. पूर्वीच्या काळी काकडवाडी ओढ्यातून सांगलीला आणलेले पाणी ही योजनाही अत्यंत उपयुक्त ठरली होती. कवलापूर–बुधगावमार्गे चिनी मातीच्या जलवाहिनीतून सांगलीत स्वच्छ व मुबलक पाणी आणणे या योजनेमुळे शक्य झाले होते.

अलिकडच्या काळात म्हैसाळ, टेंभू, ताकारी या पाणीयोजना, अंकलीचा पर्यायी पूल, सांगलीजवळील बायपास पूल, मिरज–म्हैसाळ रस्त्यावरील उड्डाणपूल, सांगली–इस्लामपूर चौपदरीकरण, वाकुर्डे योजना आदी प्रमुख विकासकामे झाली आहेत. इतर जिल्ह्यांच्या मानाने विकासकामांसाठी जादा निधी खेचण्यात सांगली जिल्हा यशस्वी झाल्याने एक प्रगतीपथावरील जिल्हा म्हणून सांगली जिल्ह्याची ओळख निर्माण झाली आहे.

## महाराष्ट्र एका दृष्टिक्षेपात

| | | |
|---|---|---|
| स्थापना | – | १ मे १९६० |
| राजधानी | – | मुंबई |
| जिल्हे | – | ३५ |
| तालुके | – | ३५३ |
| खेडी | – | ४३,७२२ |
| क्षेत्रफळ | – | ३,०७,७१३ चौरस किलोमीटर |
| लोकसंख्या | – | ११,२३,७२,९७२ |
| साक्षरता | – | ८२.९ टक्के |
| राष्ट्रीय महामार्ग | – | ३६८८ किलोमीटर |
| राज्य महामार्ग | – | ३३,२१२ किलोमीटर |
| प्रमुख जिल्हा मार्ग | – | ४६,७५१ किलोमीटर |
| इतर जिल्हा मार्ग | – | ४३,६९६ किलोमीटर |
| ग्रामीण मार्ग | – | ८९,५९९ किलोमीटर |
| मोठे पूल | – | २,१७७ |
| लहान पूल | – | १५,२८८ |
| मोऱ्या | – | १,४९,७३४ |
| नद्यांची खोरी | – | भीमा; कृष्णा; वर्धा–वैनगंगा; गोदावरी आणि तापी–पूर्णा |

### ३.२ महाराष्ट्राची भौगोलिक रचना व सर्वसाधारण माहिती

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असून राज्यात एकूण ३५ जिल्हे आहेत.[२] मुंबई हे राज्याचे राजधानीचे शहर आहे. राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून लोकसंख्या ११,२३,७२,९७२ इतकी आहे. साक्षरतेचे प्रमाण ८२.९ टक्के असून देशात साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा सहावा क्रमांक लागतो.

राज्यातील १०८.६४ लाख हेक्टर क्षेत्र लागवडी खाली असून यातील १५ टक्के क्षेत्र बागायती आहे. तर ८५ टक्के क्षेत्र कोरडवाहू असून ते पावसावर अवलंबून आहे.

देशात १९७२ मध्ये पडलेल्या भयंकर दुष्काळापासून राज्यामध्ये रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. रोजगार हमी योजनेद्वारे खेड्यातील लाखो अकुशल मजुरांना रोजगार तर उपलब्ध झालाच पण याच बरोबर जलसंधारणाच्या मूलभूत संरचनाची उभारणी यामुळे झाली. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जलसंधारणाचे काम हाती घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले.

राज्यात ३५३ तालुके असून येथील खेड्यांची संख्या ४३,७२२ इतकी आहे. राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ३,६८८ किलोमीटर आहे, तर राज्य मार्ग ३३,२१२ किलोमीटर, प्रमुख जिल्हा मार्ग ४६,७५१ किलोमीटर इतर जिल्हा मार्ग ४३,६९६ किलोमीटर, ग्रामीण मार्ग ८९,५९९ किलोमीटर असे एकूण २,१६,९४६ किलोमीटर लांबीचे रस्ते महाराष्ट्र राज्यात आहेत.[३] राज्यात एकूण २,१७७ मोठे पूल आहेत. तर १५,२८८ लहान पूल आहेत.

महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमांचा विचार करता पश्चिमेस अरबी समुद्र, वायव्येस दादरा, नगर, हवेली व गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, आग्नेयेस कर्नाटक आणि दक्षिणेस गोवा राज्य असा विस्तार आहे.

महाराष्ट्राची भूमी अग्निजन्य खडकाची बनलेली आहे. ज्वालामुखीच्या अनेक उद्रेकांतून लाव्हारस वर आला आणि पसरला. त्याचे थरारक थर घट्ट होऊन ही भूमी बनली. सह्याद्री पर्वतरांगांची निर्मितीही ज्वालामुखीच्या उद्रेकातूनच झाली आहे. हा पर्वत तापी नदीपासून कन्याकुमारी पर्यंत सर्वसाधारण अकराशे मैल लांब पसरला आहे. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरचा

सातपुडा पर्वतही सह्याद्रीचाच एक भाग होय. सह्याद्री व सातपुडा या दोन पर्वतांमधील विस्तृत प्रदेशास 'दख्खन'चे पठार म्हणतात.

महाराष्ट्रातील नद्यांचा विचार करता १) कृष्णा २) भीमा ३) गोदावरी ४) वर्धा–वैनगंगा ५) तापी–पूर्णा ही पाच नद्यांची खोरी आहे.[४] ह्या पाच खोऱ्यांचे आपापले वेगळे वैशिष्ट्ये आहेत. पठारी महाराष्ट्रात सर्वात दक्षिणेस कृष्णा खोरे आहे. कोयना, वारणा आणि पंचगंगा ह्या कृष्णा नदीच्या तीन मुख्य उपनद्या आहेत.

महाराष्ट्र हा उष्ण कटिबंधात येतो. त्याचे तापमान सर्वसाधारणपणे जास्त असले तरी पश्चिमेचा अरबी समुद्र आणि सह्याद्री पर्वतरांगा या दोन महाघटकांमुळे या तापमानात बराच फरक पडतो. समुद्राच्या सानिध्यामुळे कोकणचे हवामान दमट असते. उंच उंच डोंगर माथ्यावर हवा थंड असते. पुणे, नाशिक आदि ठिकाणी हिवाळा आणि उन्हाळा फारसा कडक नसतो. सोलापूर, विदर्भचे हवामान फारच विषम असते. नागपूरचा उन्हाळा फारच असह्य होतो.

महाराष्ट्रातील प्रत्येक भागात पावसाचे प्रमाण वेगवेगळे आहे. कोकणामध्ये दिडशे इंच पाऊस पडतो, तर विदर्भात पावसाचे प्रमाण नगण्य आहे.[५] याला कारणीभूत सह्याद्री पर्वतरांगा आहेत. या पर्वतांमुळेच महाराष्ट्राला पाऊस मिळतो.

शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. साठ टक्क्यांहून अधिक लोक शेतीवर जगतात. राज्यात खरीप व रब्बी असे दोन हंगाम असतात. बाजरी, तांदूळ, भुईमूग ही पिके खरीप हंगामात म्हणजे पावसाळ्यात घेतली जातात. गहू, हरभरा, शाळू ही पिके रब्बीत म्हणजे हिवाळ्यात होतात. कोल्हापूर, सांगली, सातारा या भागात ऊस, भुईमूग, गहू, सोयाबीन ही पिके जास्त प्रमाणात घेतात. सोलापूर जिल्ह्यात ज्वारी पीक जास्त पिकते. नाशिक, नगर, पुणे, औरंगाबाद या भागांमध्ये बाजरी अधिक पिकते. कोकण, मावळ, वैनगंगा, खोरे या भागामध्ये तांदूळ जास्त पिकतो. कडधान्ये ही बहुतेक पठारी प्रदेशात होतात. विदर्भ व मराठवाडा या भागामध्ये कपाशीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. आंबा, नारळ, फणस ही फळ पिके कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात होतात.

महाराष्ट्रात सह्याद्री आणि इतर काही पर्वतांवर अनेक अभेद्य किल्ले आहेत. राजगड, रायगड, प्रतापगड, सिंहगड, पन्हाळगड, विशाळगड, तोरणा असे अनेक किल्ले येथे उभारण्यात आले.

यातील बरचे किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधले तर काही दुरूस्त केले.

स्वातंत्र्यलढ्यातही महाराष्ट्रातील अनेक देशभक्त आघाडीवर होते. लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतीसिंह नाना पाटील, चाफेकर बंधू, नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी अशा अनेक नेत्यांनी प्रचंड कष्ट व कारावास भोगून स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत हिरारीने भागे घेतला. यामुळे गांधींच्या जीवनकालातच भारताला स्वातंत्र्य मिळाले.

मुंबई, पुणे, नाशिक येथे मोठ्या औद्योगिक वसाहती आहेत. औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर येथेही अनेक लहान–मोठ्या उद्योगांच्या वसाहती आहेत. महाराष्ट्रात वीज उत्पादनही मोठ्या प्रमाणावर होते. कोयनानगर येथे पाण्यापासून वीज निर्मिती होते तर परळी, औष्णिक वीज निर्मिती होते.

## दृष्टिक्षेपात सांगली जिल्हा[६]

| | | |
|---|---|---|
| सांगलीचे क्षेत्रफळ | – | ८,६५६ चौरस किलोमीटर |
| लोकसंख्या | – | २५,८१,८३५ |
| स्थापना | – | २१ नोव्हेंबर १९६० |
| सरासरी पाऊस | – | ६५० मिलीमीटर |
| तापमान | – | ४२ अंश सेल्सीअस जास्तीत जास्त |
| | – | १४ अंश सेल्सीअस कमीत कमी |
| एकूण तालुके | – | १० |
| खेडी | – | ७२४ |
| जिल्हा परिषद | – | १ |
| महापालिका | – | १ |
| नगरपालिका | – | ४ |
| पंचायत समित्या | – | १० |
| नद्या | – | कृष्णा, येरळा, वारणा, माणगंगा |
| | – | नन्ही, बोर, अग्रणी |
| साखर कारखाने | – | १६ |



सांगली जिल्हा
तालुके
सूची
राज्य सीमा
जिल्हा सीमा
तालुका सीमा
जिल्हा मुख्य ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
आटपाडी
कडेगाव
(खानापूर-तालुका)
विटे
पलूस
तासगाव
कवठेमहांकाळ
जत
शिराळे
इस्लामपूर
(वाळवे तालुका)
सांगली
मिरज
उ.
० १० २०
किलोमीटर

### तक्ता क्र. २

### सांगली जिल्ह्याची लोकसंख्या (२००१ च्या जनगणनेनुसार)[७]

| तालुका | तालुक्याचे ठिकाण | गावांची संख्या | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| मिरज | मिरज | ७२ | २६८९७७ | ३६३७२८ | ६३२७०५ |
| तासगाव | तासगाव | ६९ | ३०८०९४ | २९३६९ | ३७७४६३ |
| कवठेमहांकाळ | कवठेमहांकाळ | ६० | ११७२२१ | ---- | ११७७२१ |
| जत | जत | १२१ | २३८६६२ | ---- | २३८८६२ |
| खानापूर | विटा | ६६ | २२०६८६ | ३१९८६ | २५२६७२ |
| कडेगाव | कडेगाव | ५५ | १३५४३६ | ---- | १३५४३६ |
| आटपाडी | आटपाडी | ६० | ११०९३२ | ---- | ११०९३२ |
| पलूस | पलूस | ३५ | १८९१३५ | ---- | १८९१३५ |
| वाळवा | इस्लामपूर | ३५ | २९१७२९ | ६९५०५ | ३६१२३४ |
| शिराळा | शिराळा | ९५ | १३९४६० | ७४२४ | १४६८८४ |
| १० | १० | ७३१ | १६९५९६५ | ५०२०१२ | २१९७९७७ |

तक्का क्र. ३

## १९८१ ते २००१ रस्ते विकास योजना व मध्यावधी पुनविलोकन योजना जिल्हा सांगली (गोषवारा)

| क्र. | मार्गाचे नांव | एकूण लांबी | अन्य मार्गात अंतर्भूत असलेली लांबी | निव्वळ लांबी | अस्तित्वात असलेली लांबी | | | | नवीन लांबी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नगर पालिका | सा.बां. | जिल्हा परिषद | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| 1 | राष्ट्रीय मार्ग | 29.57 | ------- | 29.57 | ------- | 29.57 | ------- | 29.57 | ------- | |
| 2 | प्रमुख राज्यमार्ग | 110.00 | ------- | 110.00 | 3.00 | 107.00 | ------- | 110.00 | ------- | |
| 3 | राज्यमार्ग | 868.50 | 26.50 | 842.00 | 22.51 | 788.49 | 6.00 | 817.00 | 25.00 | |
| 4 | प्रमुख जिल्हामार्ग | 2205.39 | 44.86 | 2160.53 | 19.20 | 56.18 | 2049.65 | 2125.03 | 35.50 | |
| | एकूण लांबी | 3213.46 | 71.36 | 3142.10 | 44.71 | 981.24 | 2055.65 | 3081.60 | 60.50 | |
| 5 | इतर जिल्हा मार्ग | 2790.88 | 51.18 | 2739.70 | ------- | ------- | 2623.55 | 2623.55 | 116.15 | |
| 6 | ग्रामीण मार्ग | 3326.65 | ------- | 3326.65 | ------- | ------- | 2454.70 | 2454.70 | 871.95 | |
| | एकूण लांबी | 6117.53 | 51.18 | 6066.65 | ------- | ------- | 5078.25 | 5078.25 | 988.10 | |
| | एकूण एकंदर लांबी | 9330.99 | 122.54 | 9208.45 | 44.71 | 981.24 | 8159.85 | 8159.85 | 1048.60 | |

## ३.३ सांगली जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती आणि वैशिष्ट्ये

### सांगली; भौगोलिक स्थिती

सांगली जिल्ह्यातील विकासकामांसंबंधी संशोधन असल्याने जिल्ह्याची माहिती काहीशा विस्ताराने दिली आहे. सांगलीच्या उत्तरेस सातारा जिल्हा असून ईशान्य दिशेला सोलापूर जिल्हा आहे. पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा तर दक्षिणेस कोल्हापूर आणि कर्नाटकातील बेळगाव हे जिल्हे पसरलेले आहे. सांगली जिल्ह्याच्या पूर्वेस कर्नाटकातील विजापूर जिल्हा आहे.[९]

सांगली जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण भागात असून एका बाजूला कर्नाटक राज्याची सीमा आहे तर जिल्ह्याच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वत रांगा आहेत. सागरेश्वर आणि चांदोली ही अभायरण्ये तसेच चांदोली धरण, वज्रचौंडे धरण, बलवडी धरण, राजेवाडी धरण आदी धरणांचा सांगली जिल्ह्यात समावेश आहे.

सांगली जिल्ह्यात मुख्यत्वे कृष्णा नदी असून तिचा उगम सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे होतो.[१०] वारणा, (शिराळा, वाळवा, मिरज तालुका) येरळा (खानापूर, तासगाव तालुका) बोर (जत तालुका), माणगंगा (आटपाडी तालुका) अग्रणी (खानापूर, तासगाव, कवठेमहांकाळ तालुका) या अन्य नद्या सांगली जिल्ह्यातून वाहतात. कृष्णा आणि वारणा नदीचा संगम मिरज तालुक्यातील हरिपूर येथे होतो तर कृष्णा आणि येरळा नदीचा संगम ब्रह्मनाळ येथे होतो.

दंडोबा डोंगर (ता. मिरज), पोकर्णी डोंगर (ता. वाळवा), मल्लीकार्जुन डोंगर (ता. वाळवा), कमळ भैरव डोंगर (ता. तासगाव), शुक्राचार्य डोंगर (ता. आटपाडी), आड्वा डोंगर (ता. कवठेमहांकाळ) होनाई डोंगर (ता. खानापूर) आदि डोंगरांचा सांगली जिल्ह्यात समावेश आहे.

### सांगली; सर्वसाधारण माहिती आणि वैशिष्ट्ये

२१ नोव्हेंबर १९६० रोजी स्थापन झालेल्या सांगली जिल्ह्याकडे राज्यातील एक अग्रेसर आणि संपन्न जिल्हा म्हणून पाहिले जाते. कृषिप्रधान, सहकाराचा मूलस्त्रोत, शिक्षणपंढरी, नाट्यपंढरी, क्रीडानैपुण्य, स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारी, थोर कलावंत आणि साहित्यिकांची

परंपरा असलेला, औद्योगिक क्षेत्रात झेपावत असलेला अशी अनेक वैशिष्ट्ये सांगली जिल्ह्याबद्दल सांगता येतील.

सांगली जिल्ह्यात १० तालुके असून मिरज, वाळवा, शिराळा, तासगाव, पलूस, कडेगाव हे तालुके पाणी योजनांमुळे शेतीने समृद्ध तर जिल्ह्याच्या पूर्वेकडील जत, कवठेमहांकाळ, आटपाडी, खानापूर हे तालुके दुष्काळी तालुके म्हणून ओळखले जातात.

हळदीची मुख्य बाजारपेठ म्हणून सांगली जिल्ह्याचा देशात नावलौकिक आहे. हळदीच्या उत्पादनासाठी तसेच हळदीच्या साठवणुकीसाठी (हळदीचे पेव) सांगली जिल्ह्याला पर्याय नाही. ऊस हे येथील प्रमुख बागायती पिक असून सांगली जिल्ह्यात तब्बल १६ सहकारी साखर कारखाने आहेत. त्यामुळे साखरेच्या उत्पादनात सांगली जिल्ह्याचा मोठा वाटा आहे. द्राक्ष उत्पादनामध्ये सांगलीचे नाव जगाच्या इतिहासावर नोंदविले गेले आहे. थॉम्सन सिडलेस, तास–ए–गणेश, सोनाका इत्यादी प्रसिद्ध द्राक्षजातींचे सांगली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते.

डाळींब उत्पादनातही सांगली जिल्ह्याच्या शेतकऱ्यांनी इतिहास घडविला आहे. जत, आटपाडी, खानापूर, कवठेमहांकाळ या तालुक्यातील शेतकऱ्यांनी दुष्काळाने डगमगून न जाता फोंड्या माळावरती डाळिंबाच्या हिरव्या गार बागा फुलविल्या आहेत. गणेश, मस्कात, भगवा, मृदला या सांगली जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या डाळिंबाच्या जाती जगभरामध्ये निर्यात होत आहेत.[११] या शिवाय ज्वारी, गहू, हरभरा, तंबाखू , बाजारी, सोयाबीन, सूर्यफूल, तांदूळ, मका, भुईमूग ही अन्य पिके आहेत.

अलीकडील पाहणीत सांगली जिल्ह्यात खनिजांचे साठे आढळले असून शिराळा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बॉक्साईटचे साठे आहेत. सुरुवातीच्या काळापासून सांगली जिल्ह्यात औद्योगिक विकासाचे वारे वाहत आहे. किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्करांचा शेती औजारांचा कारखाना देशभरात प्रसिद्ध आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहती, साखर कारखाने, सूतगिरण्या आहेत. मिरज, कुपवाड, इस्लामपूर, शिराळा, विटा येथे उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक वसाहती उभारण्यात आल्या आहेत. सिमेंट पाईप, फौन्ड्री, कोल्ड स्टोअरेज, इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल स्पेटर पार्ट, रंग कारखाने, पुठ्याचे बॉक्स, पापड, भडंग, मेणबत्ती, फरश्या बनविण्याचे अनेक छोटे–मोठे उद्योग या औद्योगिक वसाहतींमध्ये चालतात.

स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारांचा जिल्हा म्हणूनही सांगली जिल्ह्याची ओळख आहे. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड, वसंतदादा पाटील, धोंडीरामबापू माळी अशी ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानींची मोठी परंपरा या जिल्ह्याला लाभली आहे.

नटसम्राट बालगंधर्व, शाहीर पठ्ठे बापूराव, शाहीर अण्णाभाऊ साठे, ज्येष्ठ तमाशा कलावंत काळू–बाळू, साहित्यिक चारूता सागर, ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर, संगीतरत्न अब्दुल करीम खाँ, नाट्याचार्य विष्णुदास भावे, गोविंद बल्लाल देवल, कृष्णाजी खाडिलकर, बाळ कोल्हटकर, मधूसुदन कालेलकर, कवी गिरीश, कवी सुधांशू, मास्टर अविनाश, साहित्यिक ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, प्रा. म. द. हातकणंगलेकर, प्रा. वैजनाथ महाजन अशा थोर सहित्यिक व ज्येष्ठ कलाकारांमुळे सांगलीचे नाव उंचावले आहे. बुद्धिबळातील भिष्माचार्य भाऊसाहेब पडसलगीकर, कसोटीवीर विजय हजारे, गानकोकिळा लता मंगेशकर, विधानसभेचे सभापती वि. स. पागे, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदी दिग्गजांमुळे सांगलीचे नाव पंचक्रोशीत झाले.

सांगलीचे ग्रामदैवत गणेश मंदिर, औदुंबरचे दत्तमंदिर, ताकारीजवळील सागरेश्वर मंदिर, तासगावचे गणेश मंदिर, खानापूर जवळील शुकाचार्य, रेणावी येथील रेवणसिद्ध मंदिर, आरेवाडीचे बिरोबा मंदिर, गुड्डापूर येथील दानाम्मा मंदिर, बत्तीस शिराळ्याची नागपंचमी, सोनसळ येथील चौरंगीनाथ मंदिर, कडेपूर येथील डोंगराई मंदिर आदी सुप्रसिद्ध देवास्थांनामुळे भाविकांची सांगली जिल्ह्यात नेहमीच रेलचेल असते.

चांदोली अभयारण्य, सागरेश्वर अभयारण्य, दंडोबा उद्यान, प्रचितगड, मच्छिंद्रगड, रामगड, मिरजेचा दर्गा, जतचा राजवाडा या ठिकाणांमुळे पर्यटकांचे पाय सांगली जिल्ह्याकडे वळू लागले आहेत.

## सांगली जिल्ह्यातील साखर कारखाने[१२]

| | साखर कारखान्याचे नाव | गाळप क्षमता मे. टन |
|---|---|---|
| १. | निनाईदेवी सहकारी साखर कारखाना, कोकरूड, ता. शिराळा | १७५० |
| २. | विश्वास सहकारी साखर कारखाना चिखली, ता. शिराळा | १२५० |
| ३. | हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखाना, वाळवा, ता. वाळवा | २५०० |
| ४. | राजारामबापू सहकारी साखर कारखाना, साखराळे, ता. वाळवा | ६५०० |
| ५. | राजारामबापू सहकारी साखर कारखाना, कासेगाव शाखा | |
| ६. | सर्वोदय सहकारी साखर कारखाना, कारंदवाडी, ता. वाळवा, | २५०० |
| ७. | क्रांती सहकारी साखर कारखाना, कुंडल ता. पलूस, | २५०० |
| ८. | यशवंत सहकारी साखर कारखाना, नागेवाडी ता. खानापूर | १२५० |
| ९. | माणगंगा सहकारी साखर कारखाना, आटपाडी, ता. आटपाडी | १२५० |
| १०. | तासगाव सहकारी साखर कारखाना, तुरची फाटा, ता. तासगाव | २७५० |
| ११. | वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली ता. मिरज | ५००० |
| १२. | मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना, आरग ता. मिरज | २५०० |
| १३. | महांकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ | १२५० |
| १४ | डफळे सहकारी साखर कारखाना, जत, ता. जत | २५०० |
| १५. | डोंगराई सहकारी साखर कारखाना, कडेपूर ता. कडेगाव | २५०० |
| १६. | सोनहिरा सहकारी साखर कारखाना, वांगी, ता. कडेगाव | २५०० |

## सांगली जिल्ह्यातील रस्त्यांची माहिती

सांगली जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी ९३३० किलोमीटर.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील रस्त्यांची लांबी ९८१ किलोमीटर

जिल्हा परिषदेच्या ताब्यातील रस्त्यांची लांबी ८१५९ किलोमीटर

नगरपालिका व महानगरपालिका यांच्या ताब्यातील रस्त्यांची लांबी ५१५ किलोमीटर

सांगली जिल्ह्यातील खडीकरण असलेल्या रस्त्यांचे एकूण प्रमाण २६ %

इतर माल वापरून तयार केलेल्या रस्त्यांचे प्रमाण ३० %

सांगली जिल्ह्यातील रेल्वे मार्गाची एकूण लांबी १७३.९६ किलोमीटर

रस्ते विकास योजना व मध्यावधी पुनर्विलोकन योजना, जिल्हा सांगली यांच्या सन २००१ अहवालानुसार सांगली जिल्ह्यातील रस्त्यांची एकूण लांबी ९३३० किलोमीटर इतकी आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्गाची लांबी २९.५७ किलोमीटर, प्रमुख राज्य मार्ग ११० किलोमीटर, राज्य मार्ग ८६८.५० किलोमीटर, प्रमुख जिल्हा मार्ग २२०५.३९ किलोमीटर, इतर जिल्हा मार्ग २७९०.८८ किलोमीटर, तर ३३२६.६५ किलोमीटर ग्रामीण रस्त्यांचा समावेश आहे.

## सांगली जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक विश्लेषण

सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८६५६ चौरस किलोमीटर इतके असून २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २५,८३,५२४ इतकी आहे.[१३] यापैकी १३,२०,०८८ पुरूष आणि १२,६३,४३६ इतक्या महिला आहेत. लोकसंख्येच्या बाबतीत सांगली जिल्ह्याचा राज्यात १५ वा क्रमांक लागतो. लोकसंख्या वाढीचा जिल्ह्याचा दर १६.८५ टक्के इतका आहे. सांगली जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. मागे २९८ इतकी आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के (१९.५० लाख) ग्रामीण आणि २५ टक्के (६.३३ लाख) शहरी लोकसंख्या आहे.

जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे ९५७ स्त्रिया असे प्रमाण आहे. जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ७६.६२ टक्के इतके आहे. जिल्ह्यातील एकूण ७.०६ लाख हेक्टर जमीन ५.५६ लाख इतकी वहिती खात्यात विभागली आहे. एकूण खातेदारांपैकी ५८ टक्के खातेदार अत्यल्पभूधारक असून त्यांच्याकडे १ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन आहे. त्या खालोखाल २३ टक के खातेदार अल्प भूधारक असून त्यांच्याकडे एक ते दोन हेक्टर जमीन आहे व १९ टक्के खातेदारांकडे २ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आहे.

जिल्ह्याच्या एकूण ८.३१ लाख हेक्टर क्षेत्रापैकी १९ टक्के क्षेत्र हे जंगलव्याप्त, ओसाड, नापीक, बीनशेती उपयोगाचे, कायम पडक्षेत्र आहे.[१४] हे क्षेत्र लागवडीस योग्य नाही. याशिवाय ८ टक्के क्षेत्र चालू व इतर पडीक आहे. उर्वरित ७३ टक्के क्षेत्र लागवडीस योग्य आहे.

सन २००१-२००२ या सर्वेक्षण वर्षात जिल्ह्यातील एकूण पिकावरील क्षेत्रापैकी ६८ टक्के क्षेत्र अन्न धान्याखाली, १६ टक्के क्षेत्र गळिताच्या पिकाखाली, ८ टक्के क्षेत्र ऊसाखाली व ५ टक्के क्षेत्र चाऱ्याचा पिकाखाली येते. जिल्ह्यातील एकूण तृणधान्याखालील पिकापैकी ७१ टक्के क्षेत्र खरीप व रब्बी ज्वारीखाली व ११ टक्के बाजरीखाली होते. एकूण कडधान्य पिकाखालील क्षेत्रापैकी २३ टक्के क्षेत्र मठ, ३४ टक्के क्षेत्र हरभरा, १९ टक्के कुळथी, ११ टक्के तूर व १३ टक्के क्षेत्र मूग व उडीद या पिकाखाली आहे. उर्वरित क्षेत्र मसूर, वाल, चवळी या पिकाखाली आहे.

जिल्ह्यामध्ये २००९-२०१० या वर्षामध्ये सुमारे २.९० लाख मेट्रिक टन रासायनिक खताचे वाटप झाले. जिल्ह्यात सांगली, तासगाव, खानापूर, आटपाडी, वाळवा व पलूस या सहा नियंत्रित

बाजारपेठा आहेत. या बाजारपेठांमध्ये हळद, ज्वारी, सोयाबीन, तांदुळ, कांदे, गूळ यांची मोठ्या प्रमाणावर आवक होते.

सध्या जिल्ह्यात आरफळ योजना, कृष्णा–येरळा उपसा सिंचन प्रकल्प, टेंभू उपसा सिंचन योजना हे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यरत आहेत. पाटबंधारे प्रकल्पांमुळे एकूण १,३६,६३७ हेक्टर इतके लाभक्षेत्र तयार झाले असून प्रत्यक्षात मात्र १,०९,१९८ हेक्टर क्षेत्र सिंचनाचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ७९.९१ टक्केच सिंचनक्षमतेचा वापर जिल्ह्यात होताना दिसून येतो.

सन २००३ च्या पशुगणनेप्रमाणे सांगली जिल्ह्यात १४.०७ लाख इतके पशुधन आहे.[१५] त्यापैकी २५ टक्के गाई व बैल, ३३ टक्के म्हशी व रेडे, २६ टक्के शेळ्या, १५ टक्के मेंढ्या व १ टक्के इतर पशुधन आहे. तसेच जिल्ह्यात २१.२७ लाख इतके पक्षीधन आहे. जिल्ह्यात १४६ पशुवैद्यकीय दवाखाने, १ फिरता पशुवैद्यकीय दवाखाना व १ कृत्रिम रेतन केंद्र आहे. जिल्ह्यात सन २००९–२०१० च्या सर्वेक्षणानुसार ८३२ दुग्ध सहकारी संस्था कार्यरत असून प्रतिदिन ५.११ लाख लिटर दूध संकलित करण्यात येते. जिल्ह्यामध्ये १२ शीतगृहे असून त्यांची साठवण क्षमता ६.५० लाख लिटर आहे.

सांगली जिल्ह्यातील नद्यांची लांबी ३९२ किलोमीटर असून मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल ६७९५ हेक्टर क्षेत्र तळी, सरोवरे व जलाशयांमार्फत उपलब्ध झालेले आहे. संदर्भ वर्षात भूजल मत्स्य उत्पादन २५०० मेट्रिक टन झाले आहे.

सन २००९–२०१० या वर्षात जिल्ह्यात विजेचा वापर १२८३ दशलक्ष किलोवॅट तास इतका झाला असून संदर्भ वर्षात ६.०२ लाख इतकी वीज कनेक्शनची संख्या आहे.[१६] एकूण विजेमधील १९.३५ कोटी किलो वॅट तास घरगुती कारणासाठी, ५५.४३ कोटी किलोवॅट तास कृषी, ३३.३० कोटी किलो वॅट तास औद्योगिक वापरासाठी, ६.२१ कोटी किलो वॅट तास व्यापारी कारणासाठी तर १३.८० कोटी किलो वॅट तास इतर कारणांसाठी वापर झाला.

सांगली जिल्ह्यामध्ये ९ औद्योगिक वसाहती असून यामध्ये ५९७ प्रकल्प कार्यरत आहेत. सन २००८–२००९ अखेर जिल्ह्यात एकूण ५९२६ सहकारी संस्था असून त्यापैकी ७५४ कृषी पतसंस्था, १४१९ बिगर कृषी पतसंस्था, ५५ पणन संस्था, २१९० उत्पादक संस्था आणि १५०८ सामाजिक सेवा संस्था कार्यरत होत्या. जिल्ह्यात सहकारी तत्त्वावरील एकूण १६ साखर कारखाने

कार्यरत असून २००९–२०१० या वर्षामध्ये ४७.८३ लाख टन ऊसाचे गाळप करून ५८.०८ लाख क्विंटल साखर उत्पादन झाले आहे.

दळणवळणाच्या दृष्टीने सांगली जिल्हा पुढारलेला जिल्हा असून सन २००९–२०१० अखेर जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी ९९२५ किलोमीटर होती. त्यापैकी डांबरी रस्त्यांची लांबी ६०४६ किलोमीटर, खडीच्या रस्त्यांची लांबी १४२६ किलोमीटर तर मुरूमाच्या रस्त्यांची लांबी २४५३ किलोमीटर इतकी आहे.

सन २००९–२०१० अखेर जिल्ह्यात ४.१० लाख वाहने वापरत होती.[१७] यामध्ये दुचाकी वाहनांचे प्रमाण ७७ टक्के इतके आहे. जिल्ह्यात ४१७ पोस्ट कार्यालये असून पत्रपेट्यांची संख्या १३०२ इतकी आहे. जिल्ह्यामध्ये १.२४ लाख वैयक्तिक दूरध्वनी आहेत.

सन २००९–२०१० च्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात १९१० प्राथमिक शाळा, ४६१ माध्यमिक शाळा, १३० उच्च माध्यमिक शाळा होत्या. उच्च शिक्षणासाठी जिल्ह्यात ४१ महविद्यालयांमध्ये सोय असून त्यामध्ये ३११४४ विद्यार्थी शिकत आहेत.

आरोग्याच्या सोयीसाठी जिह्यात शासनाच्यावतीने १९ रूग्णालये, ७ दवाखाने, ४ प्रसूतिगृहे, ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३२० प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहेत. २००९ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात ५२०७७ जन्म व १९६०८ मृत्यूंची नोंद झाली आहे.

सांगली जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ७६.६२ टक्के असून जिल्ह्याचा राज्यात साक्षरतेच्या बाबतीत १५ वा क्रमांक लागतो. शहरी भागात साक्षरतेचे प्रमाण ८४.१७ टक्के असून ग्रामीण भागातील साक्षरता ७४.१४ टक्के आहे. पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ८६.२५ टक्के तर महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण ६६.८८ टक्के आहे. २००८–२००९ मध्ये दरडोई उत्पन्न ४६.६९९ रुपये इतके होते.

सन २००६ च्या नोंदीनुसार जिल्ह्यातील पर्जन्यमान ५४३ मिलीमीटर इतके आहे. जिल्ह्यात शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या ११,५९३ इतकी आहे. तर जिल्हा परिषदकडे १५,४६८, नगरपरिषदेकडे ७.०५१ तसेच महापालिकेकडे २,७०,१०६ इतके कर्मचारी कार्यरत आहेत. जिल्ह्यात मागासवर्गीयांसाठी १६ वसतिगृहे असून यामध्ये १२५६ विद्यार्थी राहतात. जिल्ह्यात २९ शासकीय गोदामे असून त्याची साठवण क्षमता १२ हजार मेट्रिक टन इतकी आहे.

## जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक

## विश्लेषण एका दृष्टिक्षेपात

जिल्ह्यातील पुरुषांची संख्या १३,२०,०८८

जिल्ह्यातील महिलांची संख्या १२,६३,४३६

लोकसंख्या वाढीचा दर १६.८५ टक्के

लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे २९८

जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे ९५७ स्त्रिया

जिल्ह्यात एकूण ८.६१ लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्र

मुख्य पिके ऊस, कापूस, तंबाखू, ज्वारी, बाजरी, हरभरा, तूर, हळद इत्यादी

एका वर्षात २.९० लाख मेट्रिक टन रासायनिक खतांचा वापर

जिल्ह्यात ६ मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ७३ लघु सिंचन प्रकल्प

९५६ पाझर तलाव व ११० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे

२००३ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात १४.०६ लाख पशुधन

२१.२७ लाख कुक्कुट आणि पक्षीधन

१४६ पशुवैद्यकीय दवाखाने

२००९-२०१० च्या गणनेनुसार ८३२ दूध सहकारी संस्था

प्रतिदिन ५.११ लाख लिटर दूध संकलन

मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल ६७९५ हेक्टर क्षेत्र तळी, सरोवरे, जलाशय

२००९-२०१० च्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात १२८३ दशलक्ष किलोवॅट

तास विजेचा वापर

जिल्ह्यामध्ये ९ औद्योगिक वसाहती, त्यामध्ये ५९७ औद्योगिक प्रकल्प कार्यरत

जिल्ह्यातील रस्त्यांची लांबी ९९२५ किलोमीटर

जिल्ह्यातील वाहनांची संख्या ४.१० लाख वाहने

जिल्ह्यात ४१७ पोस्ट कार्यालये

जिल्ह्यातील पत्रपेट्यांची संख्या १३०२

जिल्ह्यातील वैयक्तिक दूरध्वनी संख्या १ लाख २४ हजार

२००९-२०१० च्या सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात १९१० प्राथमिक शाळा

४६१ माध्यमिक शाळा

१३० उच्च माध्यमिक शाळा

उच्च शिक्षणासाठी ४१ महाविद्यालये असून त्यामध्ये ३१,१४४ विद्यार्थी

जिल्ह्यात १९ शासकीय रुग्णालये, ७ शासकीय दवाखाने आणि ४ प्रसूतिगृहे

५९ प्राथमिक आरोग्य केंद्रे

३२० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे कार्यरत

जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण ७६.६२ टक्के

सहकारी संस्था ५९२६

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था ७५२

जिल्ह्यातील आश्रमशाळांची संख्या ११०२

मागासवर्गीय वसतिगृहे १६

शासकीय गोदामे २९

### ३.४ विकासकामाची व्याख्या आणि प्रकार

सामान्यतः विकास तीन प्रकारांचा आहे, त्यात

१) पायाभूत सुविधा (परिसर विकास)

२) आर्थिक विकास (औद्योगीकरण, शेती सुधारणा, रोजगाराच्या संधी, बाजारपेठा इ.)

३) सामाजिक विकास

आपण येथे मुख्यत्त्वे पहिल्या प्रकारावर लक्ष केंद्रीत करीत आहोत. अर्थात प्रत्येक विकास परस्परपूरक असतो. जसे पायाभूत सुविधा वाढल्या की लोकसंख्याही वाढून, परस्परांशी जवळीक होते. रस्ते, पूल, रेल्वे वाहतूक वाढवत सामाजिक अभिसरणाला मदत करतात.

**मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनातर्फे करण्यात येणाऱ्या कामांचे त्यांच्या स्वरूपावरून वेगवेगळे प्रकार करता येतील.**

१) रस्ते बांधणी (खडीकरण, मुरूमीकर, काँक्रीटीकरण, डांबरीकरण)

२) सार्वजनिक वापरासाठीच्या इमारती (समाज मंदिर, शासकीय कार्यालये, सामाजिक भवन, सांस्कृतिक भवन इत्यादी)

३) पाणी पुरवठा योजना

४) सिंचन योजना (धरण, कालवे, बंधारे)

५) सांडपाणी निचरा योजना

६) नदीवरील, रेल्वे क्रॉसिंगवरील किंवा गर्दीच्या ठिकाणचे उड्डाण पूल.

**विकासकामाची व्याख्या**

**विकासकामांची वेगवेगळ्या अर्थाने खालील प्रकारे व्याख्या करता येईल.**

१) लोकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी शासनातर्फे करण्यात येणाऱ्या कामांना विकासकामे म्हणतात.

२) सार्वजनिक वापरासाठी शासनातर्फे करण्यात आलेली कामे म्हणजे विकासकामे होय.

३) नागरी सुविधेसाठी करण्यात आलेली रस्ते बांधणी, पाणीपुरवठा योजना, पूल उभारणी, समाज मंदिर उभारणी आदी कामे म्हणजेच विकासकामे होय.

४) गाव किंवा शहराच्या विकासासाठी शासनातर्फे करण्यात येणारी कामे म्हणजे विकासकामे.

## ३.५ विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणा

जनतेकडून कररूपाने जमा झालेल्या पैशातील काही भाग विकासकामांसाठी खर्च करण्यात येतो. आमदार फंड, खासदार फंड, डोंगरी विकास निधी, जागतिक बँक मदत निधी आदी वेगवेगळ्या शीषर्काखाली हा निधी वेगवेगळ्या शासकीय यंत्रणेमार्फत खर्च होत असतो. विकासकामांचे अंदाजपत्रक बनविणे, निविदा काढणे, विकासकामांवर देखरेख ठेवणे, विकासकामांची मापे घेऊन त्यांची देयके कंत्राटदारांना देणे आदी कामे या शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येतात. विकास कामांसाठी कार्यरत असणाऱ्या शासकीय यंत्रणा पुढीलप्रमाणे –

१) सार्वजनिक बांधकाम विभाग

२) जिल्हा परिषद

३) जलसंधारण विभाग

४) जीवन प्राधिकरण

५) महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ

६) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

७) महानगरपालिका

८) नगरपालिका

९) ग्रामपंचायत

### ३.६ विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया

विकासकामांना मंजुरी कशी मिळते ? कोणत्या फंडातून कोणती विकासकामे करता येतात ? आपल्या भागातील विकासकामे होण्यासाठी कोणत्या शासकीय कार्यालयात पाठपुरावा केला पाहिजे ? आदींबाबत सामान्य जनता अनिभिज्ञ असते. बरेच वृत्तपत्र प्रतिनिधीही विकासकामांच्या मंजुरीच्या प्रक्रियेबाबत अनिभिज्ञ असतात. विकासकामांना मंजुरी कशी मिळते याबाबत सविस्तर माहिती आता आपण पाहू.

आपल्या भागातील खराब रस्ते, नवीन रस्त्यांची मागणी, नवीन इमारतींची मागणी आदीबाबत जनतेकडून लोकप्रतिनिधींना (आमदार, खासदार आदी) निवेदन दिले जाते. सदर मागणीबाबत लोकप्रतिनिधी शिफारस तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवितात. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र पाठवून सदर कामासाठी अंदाजपत्रक (इस्टिमेट) तयार करण्यासाठी सूचना दिल्या जातात. सदर कामासाठी अर्थसंकल्पात तरतूदही करण्यात येते. सदर कामासाठी नाबार्ड, हुडको, बजेट आदी फंड हेड सुचविण्यात येतो. सदर कामाची बजेट प्लेट तयार करून अंदाजित रक्कम ठरविण्यात येते. हा प्रस्ताव मंजुरीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासनाकडे पाठविण्यात येतो. जिल्हा नियोजन कमिटीची कामे जिल्हाधिकारी मंजूर करतात तर बजेटच्या कामांना मंत्रालयात मंजुरी मिळते. प्रस्तावित कामांना बजेटच्या व्हाईटबुकमध्ये नंबर मिळतो आणि आर्थिक वर्षासाठी त्या कामासाठी तरतूद करण्यात येते. विकासकामाचा व्हाईटबुकमध्ये समावेश झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात येते. अंदाजपत्रक विहित मार्गाने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले जाते. रस्ते आणि इमारतीसाठींच्या दोन लाखापर्यंतच्या कामांना कार्यकारी अभियंता मंजुरी देतात. १० लाखापर्यंतच्या कामांना अधीक्षक अभियंता तर २५ लाखापर्यंतच्या कामांना मुख्य अभियंता प्रशासकीय मंजुरी देतात. (सोबतचा तक्ता क्रमांक ५ पहा)

प्रशासकीय मान्यतेनंतर अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सादर होते. कार्यकारी अभियंता २५ लाखापर्यंत तर अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांना पूर्ण अधिकार प्रशासकीय मान्यतेसाठी देण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर सुधारित अंदाजपत्रकाचे डीटीपी बनविण्यात येते. यानंतर सदर कामाच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात होते. वृत्तपत्रात जाहिरात देऊन

निविदा मागविण्यात येतात. ज्या ठेकेदाराची निविदा कमी रकमेची आहे त्याला सदरचे काम मंजूर होते. सेक्युरिटी डिपॉझीट भरून घेऊन कामाचा आदेश (वर्क ऑर्डर) देण्यात येते.

संबंधित शाखा अभियंताच्या देखरेखीखाली कामाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार ठेकेदाराला काम करावे लागते. योग्य टप्पे पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराच्या मागणीनुसार त्याला देयक (बिल) दिले जाते. काम पूर्ण झाल्यानंतर अंतिम देयक दिले जाते.

उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता हेही वेळोवेळी कामांना भेटी देऊन निविदेतील अटीप्रमाणे आणि योग्य दर्जाचे काम चालू आहे की नाही याबाबत पाहणी करतात.

**तक्ता क्रमांक – ४**

**विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया**

↓

लोकांकडून लोकप्रतिनिधींना कामासंबंधी निवेदन

↓

लोकप्रतिनिधींचे जिल्हाधिकाऱ्यांना कामासंबंधी शिफारस पत्र

↓

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंदाजपत्रक तयार करण्यासाठी कार्यकारी अभियंत्याला पत्र

↓

बजेट प्लेट

↓

कामाची अंदाजित रक्कम मंजुरीसाठी शासनाकडे

↓

व्हाईट बुकमध्ये नंबर

↓

कामाचे अंदाजपत्रक (एस्टिमेट)

↓

प्रशासकीय मान्यता

↓

तांत्रिक मान्यता

↓

डीटीपी

↓

निविदा प्रक्रिया

↓

काम चालू आदेश

↓

शाखा अभियंताच्या देखरेखीखाली काम सुरू

↓

कामाची देयके

↓

## [१८] तक्ता क्रमांक – ५

## विकासकामाच्या मंजुरीबाबतचे अधिकार

| घटक | मुख्य अभियंता | अधीक्षक अभियंता | कार्यकारी अभियंता |
|---|---|---|---|
| १) रस्ते, इमारतीसाठी प्रशासकीय मंजुरी | २५ लाखापर्यंत | १० लाखापर्यंत | २ लाखापर्यंत |
| २) इमारतीसाठी तांत्रिक मान्यता | पूर्ण अधिकार | पूर्ण अधिकार | २५ लाखापर्यंत |
| ३) रस्त्यांसाठी तांत्रिक मान्यता | पूर्ण अधिकार | ६० लाखापर्यंत | २५ लाखापर्यंत |
| ४) निविदा स्वीकार | १२५ लाखांच्यावर | १२५ लाखापर्यंत | २५ लाखापर्यंत |
| ५) धोकादायक इमारतींची विक्री किंवा पाडापाडी | २ लाखापर्यंतच्या बुक व्हॅल्यूवर | १.२५ लाखापर्यंतच्या बुक व्हॅल्यूवर | ०.२५ लाखापर्यंत बुक व्हॅल्यूवर |
| ६) मशिनरी किंवा गाड्यांचा लिलाव | पूर्ण अधिकार | ३०,००० पेक्षी कमी असलेल्या बुक व्हॅल्यूवर | लागू नाही |

### ३.७ विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी

रस्ते बांधणी, शाळा–आरोग्य केंद्र उभारणी, नळपाणी पुरवठा योजना, पाझर तलाव, पूल उभारणी, शासकीय इमारती, जलस्वराज्य प्रकल्प या विकासकामांसाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून निधी येतो. जनतेकडून कररूपाने जमा झालेले पैसे शासकीय निधी म्हणून विकासकामांवर खर्च होतात. खासदार फंड, आमदार फंड, रोजगार हमी योजना, डोंगरी रस्ते विकास निधी आदी विविध प्रकारे वर्गीकरण करून हा निधी विकासकामांवर खर्च होतो. जागतिक बँक, जागतिक कृषी बँक आदी संस्थांचाही निधी विकास कामांसाठी उपलब्ध होत असतो.

**तक्ता क्रमांक – ६**

**विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी**

| अ. नं. | [१९] शासकीय निधीचे नाव | निधीचे वर्गीकरण (क्रमांक) |
|---|---|---|
| १) | आमदार फंड | २५१५ |
| २) | सार्वजनिक बांधकाम राज्य निधी | ००५९ |
| ३) | डोंगरी रस्ते निधी | २५५१ |
| ४) | खासदार फंड | ३०५३ |
| ५) | गंगाजळी निधी | ८६५८ |
| ६) | सार्वजनिक ठेव निधी | ८३४३ |
| ७) | केंद्र आणि राज्य शासन निधी | ८७८६ |
| ८) | आयकर निधी | ००२१ |
| ९) | ऑडिट निधी | ००७० |
| १०) | घरकर्ज परतावा निधी | ६२१६ |
| ११) | व्यवसाय कर निधी | ००२८ |
| १२) | विमा आणि पेन्शन निधी | ८०११ |
| १३) | पोस्ट आणि टेलिफोन निधी | ८७८८ |
| १४) | जनरल प्राव्हिडंट फंड | ८००५ |
| १५) | रोजगार हमी योजना | २५०५ |

| | | |
|---|---|---|
| १६) | रस्ते आणि पूल निधी | ३०५४ |
| १७) | दुर्गम क्षेत्र विकास निधी | ५०५४ (३) |
| १८) | नाबार्ड निधी | ५०५४ (४) |
| १९) | न्याय विभाग निधी | ४२१६ |
| २०) | शासकीय कार्यालय निधी | २०५९ |
| २१) | शासकीय निवासस्थान निधी | २२१६ |
| २२) | शासकीय विश्रामगृहे, तरूंग, न्यायालयीन इमारतींचा निधी | ४०५९ |
| २३) | तंत्रशिक्षण निधी, जागतिक बँक मदत निधी | ४२०२ |
| २४) | सार्वजनिक हॉस्पिटल, शासकीय मेडिकल कॉलेजसाठी निधी | ४२१० |
| २५) | मागासवर्गीय वसतिगृह निधी | ४२२५ |
| २६) | औद्योगिक प्रशिक्षण संस्था निधी | ४२५० |
| २७) | शासकीय दूध योजना निधी | ४४०४ |
| २८) | मत्स्य व्यवसाय निधी | ४४०५ |
| २९) | आश्रमशाळा निधी | ४२२५ |
| ३०) | महापालिका विकास निधी | -- |

## ३.८ सांगली जिल्ह्यातील १९९६ ते २००६
## या कालावधीतील प्रमुख विकासकामे

सांगली जिल्ह्याच्या निर्मितीला ५२ वर्षे पूर्ण झाली असून या कालावधीत जिल्ह्याने विविध क्षेत्रात प्रगती साधली आहे. विकासकामांच्या बाबतीतही सांगली जिल्हा हा पूर्वीपासूनच राज्यात अग्रेसर आहे. एप्रिल १९०७ मध्ये सांगलीत सुरू झालेली रेल्वेगाडी, नोव्हेंबर १९२९ रोजी कृष्णा नदीवर उभारण्यात आलेला आयर्विन पूल, शेती आणि सांगली शहराला पाणीपुरवठ्यासाठी कृष्णा नदीवर बांधण्यात आलेला कोल्हापूर पद्धतीचा बंधारा, शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी १९१३ साली सुरू झालेली पाणी योजना या कामांमुळे सांगली जिल्ह्याची विकासकामांमधील पूर्वापार चालत आलेली परंपरा दिसून येते.

विकासकामांच्याबाबतीत सांगली जिल्ह्याने अलीकडच्या काळातही आघाडी घेतल्याचे दिसून येते. जागृत नागरिक आणि नितीन करीर, मनिषा म्हैसकर यांच्यासारखे कर्तव्यतत्पर शासकीय अधिकारी तसेच माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, माजी आमदार विठ्ठलदाजी पाटील यांच्यासारखे धुरंधर राजकारणी सांगली जिल्ह्याला लाभल्यामुळे गेल्या १०–१५ वर्षात अनेक विकासकामे सांगली जिल्ह्यात दिसून येतात.

सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागांना वरदान ठरणाऱ्या टेंभू–ताकारी आणि म्हैसाळ या तीन कृष्णा खोरे जलसिंचनांतर्गत असणाऱ्या योजना या भागातील लोकांचे उज्ज्वल भवितव्य निर्माण करणाऱ्या योजना ठरत आहेत. १९९६ मध्ये सुरू झालेल्या या तीन योजनांवर आतापर्यंत ३००० कोटी रूपये खर्च झाला असून या योजना पूर्ण होण्यासाठी अजून ३५०० कोटी रूपयांची आवश्यकता आहे. राज्यातील सर्वात जास्त खर्चाच्या योजना म्हणून या तीन योजनांकडे पाहिले जाते. या तीनही योजना २०१४ मध्ये पूर्णत्वास येणार असून यामुळे कवठेमहांकाळ, कडेगाव, तासगाव, खानापूर, आटपाडी, जत, सांगोला या दुष्काळी तालुक्यातील रानामाळांवर या योजनांचे पाणी येणार असून ऊस, द्राक्ष यासारखी नगदी पिके येथील शेतकरी पिकवू शकणार आहे. त्यामुळे या भागाचा आर्थिक समृद्धीचा टप्पा जवळ येऊन ठेपला आहे.

राज्यातील मोठ्या सार्वजनिक बांधकामांना निधीची कमतरता भासू लागल्यामुळे ‘बांधा

वापरा अणि हस्तांतरित करा' (बीओटी) या तत्त्वाचा जन्म झाला. सांगलीतील शेरीनाल्याजवळील कृष्णा नदीवरील पूल, अंकलीजवळील कृष्णा नदीवरील पूल, मिरजेतील रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपूल अशा विकासकामांना बोओटी तत्त्वातून प्रारंभ झाला. या तीनही पुलांचा वापर करताना गाड्यांना टोल आकारण्यात येऊ लागला.

बीओटी (बांधा, वापरा अणि हस्तांतरित करा) तत्त्वातून मुंबई–बेंगलोर या राष्ट्रीय महामार्गाचीही नव्याने उभारणी करण्यात आली. सांगली जिल्ह्यातील नेर्ले ते वाघवाडी दरम्यानचा ३० किलोमीटर लांबीचा रस्ता या महामार्गावर येतो.

जलसंधारणमध्येही सांगली जिल्ह्याने भरीव कामगिरी केली आहे. कडेगाव जिल्ह्यातील अनेक जलसंधारण तलाव याचे साक्षीदार आहेत. शिराळा तालुक्यातील वाकुर्डे योजनेमुळे शिराळा, वाळवा आणि कऱ्हाड तालुक्यातील अनेक शेतींना पाणी मिळू लागले आहे. सांगली–इस्लामपूर चौपदरीकरण, मिरज–पंढरपूर–लातूर असा ब्रॉडगेज रेल्वे मार्ग अशी अनेक विकासकामे गेल्या १० वर्षात पूर्णत्वास आली आहेत.

यातील काही कामांची चर्चा यानंतरच्या पानांमधून केली आहे.

# १. वाकुर्डे योजना

**फोटो क्रमांक : १**



**शिराळा तालुक्यातील वाकुर्डे पाणी योजना**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) वारणा नदीचे पाणी दक्षिण मांड नदीतून कृष्णा नदीला मिळणार.

२) राज्यातील पहिला नदीजोड प्रकल्प.

३) सांगली जिल्ह्यातील शिराळा, वारणा आणि सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्याला या योजनेचा लाभ.

४) या प्रकल्पामुळे २८ हजार ३५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार.

५) उपसा सिंचन योजना.

६) १९ डिसेंबर १९९८ रोजी वाकुर्डे योजनेस मंजुरी.

७) सुरुवातीस १०९.६८ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला.

८) सुधारित आराखड्यानुसार ५४१ कोटी रूपये खर्चास मंजुरी.

**वाकुर्डे योजना :**

शिराळा तालुक्यात वाकुर्डे योजना ही उपसा सिंचन योजना असून या योजनेद्वारे सांगली जिल्ह्यातील वारणा नदीचे पाणी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील दक्षिण मांड नदीतून कृष्णा नदीला सोडण्यात येणार आहे. हा प्रकल्प राज्यातील पहिला नदीजोड प्रकल्प म्हणून नावारूपाला आला आहे. वाकुर्डे योजनेतील पाण्याचा लाभ सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा आणि सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्याला मिळणार आहे.

खिरवडे आणि हात्तेगाव येथील पंप हाऊसमुळे वारणा नदीचे पाणी वाकुर्डे बुद्रुकच्या तलावात आले आहे. या तलावातील एकूण ६.९४ अब्ज घनफूट पाणी वापर करून शिराळा तालुक्यातील ७,२७० हेक्टर, वाळवा तालुक्यातील १८,५६५ हेक्टर व कऱ्हाड तालुक्यातील २, २०० हेक्टर अशी २८,०३५ हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

या योजनेस १९ डिसेंबर १९९८ रोजी मंजुरी देण्यात आली. त्यासाठी १५,७७५ लाभक्षेत्र गृहित धरून १०९.६८ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला. यानंतर त्याचे लाभक्षेत्र वाढविण्यात आले. त्यानुसार २५ ऑक्टोबर २००४ रोजी १९,५७५ हेक्टर लाभक्षेत्र गृहित धरून ३३२.३१ कोटी रूपयांना मंजुरी देण्यात आली. यानंतरही या योजनेत सुधारणा करण्यात आली असून ५४१ कोटी रूपयांचा सुधारित आराखडा बनविण्यात आला आहे.

# २. मिरज–म्हैसाळ रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपूल

**फोटो क्रमांक : २**



**मिरज–म्हैसाळ रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंगवर बांधण्यात आलेला उड्डाणपूल.**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) प्रकल्पाची किंमत : ६.२० कोटी.

२) उद्योजकाचे नाव : एस. पी. कौलगुड, मिरज.

३) काम केलेल्या विभागाचे नाव : कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज.

४) टोल आकारणीचा कालावधी १–११–२००१ पासून ३१–८–२०१२ पर्यंत.

५) बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्व तत्त्वावर या उड्डाणपुलाची निविदा.

६) दुचाकी वाहनांना कर नाही.

७) कार, जीप, टेम्पो इत्यादी वाहनांना १०.५० रूपये टोल.

### मिरज-म्हैसाळ रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपूल

मिरजेहून-म्हैसाळला जाताना सोलापूर आणि कर्नाटकाकडे जाणा-येणाऱ्या रेल्वे मार्गाचे क्रॉसिंग लागते. या मार्गावर धावणाऱ्या प्रवाशी रेल्वे गाड्या आणि मालगाड्यांची संख्या जास्त असल्यामुळे रेल्वे क्रॉसिंगचे फाटक वरचेवर बंद असायचे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशी गाड्यांचा बऱ्याच वेळा खोळंबा व्हायचा त्यामुळे या रस्त्यावर उड्डाणपुलाची गरज होती. त्यामुळे तेथे बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत उड्डाणपूल उभारण्यात आला. २३ एप्रिल १९९८ रोजी सुरुवात झालेल्या या कामाची किंमत ६.२० कोटी इतकी होती. एस. पी. कौलगुड, मिरज या कंपनीने हा पूल उभारला असून त्याबद्दली कंपनीला १-११-२००१ पासून ३१-८-२०१२ पर्यंत टोल वसूल करण्याचे अधिकार देण्यात आले. सुमारे ७८.५० मीटर लांबीचा हा उड्डाण पूल असून त्याच्या पोच मार्गाची लांबी ८७० मीटर इतकी आहे.

**फोटो क्रमांक : ३**




**प्रकल्पासंबंधी माहिती दर्शविणारा फलक**

सध्या या पुलासाठी मोटारसायकल, स्कूटर किंवा इतर कोणत्याही दुचाकी वाहनांसाठी पथकर नाही. कार, जीप, टेम्पो, या वाहनांसाठी १०.५० रुपये टोल आहे. तर टाटा सुमो, मिनीबस, टॅक्स या वाहनांना १६ रुपये टोल आहे. बसेससाठी ४३ रुपये इतका आहे.

# ३. टेंभू योजना

**फोटो क्रमांक : ४**



**कऱ्हाडजवळील कृष्णा नदीवरील टेंभू योजना.**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड जवळील टेंभू गावातील कृष्णा नदीवरील उपसा सिंचन योजना.

२) १९९६ साली १४१६ कोटी रुपये खर्चाच्या योजनेस मंजुरी.

३) सुधारित योजनेचा खर्च ३८३२ कोटी.

४) २२ टी. एम. सी. पाणी उचलण्याची योजना.

५) कऱ्हाड, कडेगाव, तासगाव, खानापूर, आटपाडी, कवठेमहांकाळ आणि सांगोला तालुक्यातील गावांसाठी ही योजना.

६) वरील तालुक्यातील ८०,४७२ हेक्टर जमिनीसाठी पाणी वापर होणार.

**टेंभू योजना :**

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांना वरदान ठरणाऱ्या कृष्णा खोरे जलसिंचन योजनेतील टेंभू योजना ही एक महत्त्वाची योजना. सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील टेंभू गावाजवळ कृष्णा नदीवर ही योजना कार्यान्वित आहे. कऱ्हाड, कडेगाव, तासगाव, खानापूर, आटपाडी, कवठेमहांकाळ आणि सांगोला तालुक्यातील ८०,४७२ हेक्टर जमिनीसाठी या योजनेतील पाण्याचा वापर होणार आहे. १९९६ साली १४१६ कोटी खर्चाच्या योजनेस मान्यता देण्यात आली. सुधारीत योजनेनुसार या योजनेच्या खर्चाचा आराखडा आता ३८३२ कोटी इतका झाला आहे.

**फोटो क्रमांक : ५**



**टेंभू योजनेतील येवलेवाडी (ता. कडेगाव) गावाजवळील ऐन उन्हाळयातील पाणी भरून वाहणारा पोट कालवा**

या योजनेसाठी १११ पंप वापरण्यात येणार असून १५३ मे. वॅ. विजेचा वापर होणार आहे. या योजनेतून २२ टी.एम.सी. पाणी उचलण्यात येणार असून ते ४०९ किलोमीटर लांबीच्या कॅनॉल म्हणून ते वाढणार आहे. या योजनेत एकूण पाच टप्पे (पंपगृहे) असून वर्षभरात पाण्याच्या २३ आवर्तनाद्वारे दुष्काळी भागांना पाणी देण्यात येणार आहे.

**फोटो क्रमांक : ६**



**कऱ्हाडजवळील कृष्णानदीवरील टेंभू बंधारा**

या योजनेत पहिल्या टप्प्याजवळ टेंभू बंधारा निर्माण केला असून त्यास एकूण उभे उचल पद्धतीचे ११ दरवाजे आहेत. यात १२ दशलक्ष घन मीटर पाणी साठा होतो. पहिल्या टप्प्यातील पंपगृहामध्ये १९५० अश्वशक्तीचे ३३ पंप बसविण्यात आले असून २.५ मीटर व्यासाच्या उर्ध्वगामी नलिकेच्या ६ रांगांमधून पाणी उचलण्यात येते.

# ४. सांगलीतील कृष्णा नदीवरील बायपास पूल

**फोटो क्रमांक : ७**



**सांगली येथील कृष्णानदीवरील शेरीनाल्याजवळील बायपास पूल**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) ब्रिटीशकालीन आयर्विन पुलाला पर्यायी पूल.

२) बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर पुलाची उभारणी.

३) ७.५० कोटी खर्चाचा प्रकल्प.

४) अशोका बिल्डकॉन, पुणे या कंपनीने हा प्रकल्प बांधला.

५) टोल वसुलीसाठी १६ वर्षे ९ महिन्यांची मुदत.

६) विविध वाहनांना आकारण्यात येणाऱ्या टोल पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| मोटारसायकल, दुचाकी | – निःशुल्क |
| कार, जीप | – १२ रुपये |
| मिनीबस | – २० रुपये |
| ट्रक | – ४० रुपये |
| ट्रेलर | – ६५ रुपये |

**फोटो क्रमांक : ८**




**सांगलीवाडी येथील टोल नाक्यावर टोल भरण्यासाठी थांबलेली वाहने**

राज्यातील सार्वजनिक बांधकामांना मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता होती आणि तो जमविणे राज्याला अशक्य होते. या अपरिहार्यतेमुळे युती शासनाच्या काळात तत्कालीन बांधकाममंत्री नितीन गडकरी यांनी 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' म्हणजेच 'बीओटी' या तत्त्वाचा अवलंब स्वीकारला. १९९८ साली सांगलीतील कृष्णा नदीवरील या पुलाला मान्यता देण्यात आली. तसेच या प्रकल्पाच्या उभारणीस दोन वर्षाची मुदत देण्यात आली. हा पूल उभारण्यात आल्यानंतर टोलवसुलीसाठी अशोका बिल्डकॉनला १६ वर्षे ९ महिन्यांची मुदत देण्यात आली. सध्या दोन टोल नाक्यांच्या साहाय्याने कंपनीतर्फे टोलवसुली सुरू असून मोटारसायकल, स्कूटर, दुचाकी, रिक्षा या वाहनांना टोलमधून वगळण्यात आले आहे. कार, जीप, टॅक्सी या सारख्या लहान चारचाकी वाहनांना १२ रुपये टोल आकारण्यात येतो, तर मिनीबस २० रुपये, ट्रक ४० रुपये, ट्रेलर ६५ रुपये असा इतर वाहनांसाठी टोल आकारण्यात येतो.

# ५. म्हैसाळ योजना

**फोटो क्रमांक : ९**



**म्हैसाळजवळील कृष्णा नदीवरील उपसा सिंचन योजना**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) १९८६ मध्ये म्हैसाळ योजनेला मंजुरी.

२) १९९५ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात.

३) मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत, मंगळवेढा आणि सांगोला या तालुक्यांसाठी ही पाणी योजना.

४) १७ टीएमसी* पाणी या योजनेद्वारे उलचणार.

५) ७४,२२५ हेक्टर क्षेत्राला म्हैसाळ योजनेतून पाणी देण्याचे नियोजन.

६) १३७ किलोमीटर कालव्यांद्वारे पाच उपसा सिंचन योजनेद्वारे ८ तालुक्यांना पाणी मिळणार

७) म्हैसाळ योजनेसाठी होणारा एकूण खर्च १५५४ कोटी.

(टीप : * – १ टी.एम.सी. = १ अब्ज घनफूट)

**म्हैसाळ योजना :**

सांगली जिल्ह्याचा पश्चिम भाग कृष्णा आणि वारणा नद्यांचे नैसर्गिक वरदान लाभून समृद्धीकडे वाटचाल करत असताना पूर्व भाग मात्र दुष्काळाच्या चटक्यांनी वर्षानुवर्षे होरपळत आहे. हा असमतोल दूर करण्यासाठी म्हैसाळ योजनेची आखणी करण्यात आली. मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत, मंगळवेढा आणि सांगोला या सहा दुष्काळी तालुक्यांना पाणी देण्यासाठी १९८६ मध्ये या योजनेस मंजुरी देण्यात आली. या योजनेद्वारे १७ टीएमसी पाणी दुष्काळी टापूतील ७४,२२५ हेक्टर क्षेत्राला देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १३७ किलोमीटर कालव्यांद्वारे पाच उपसासिंचन योजनांमधून कार्यान्वित होणाऱ्या या प्रकल्पासाठी एकूण १५५४ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**फोटो क्रमांक : १०**



**मालगावजवळील म्हैसाळ योजनेच्या कालव्यावर पाणीउपशासाठी शेतकऱ्यांनी ठेवलेले पंप**

यावर्षी म्हैसाळ योजनेचे पंप ४३ हजार तास चालले. ऑगस्ट २०११ ते एप्रिल २०१२ या कालावधीत २३२ दिवस या योजनेतील पंपगृहे चालू होती. या कालव्यातील ४.८२ टीएमसी पाणी उपसा करण्यात आला. या परिसरातील शेतकऱ्यांनी यावर्षी म्हैसाळ योजनेचे पाणी वापरून द्राक्षे, ऊस, हळद आदी पीक घेऊन सुमारे ६५० कोटींचे उत्पन्न मिळविले.

म्हैसाळ योजनेवर एकूण १८ गावांच्या पाणी योजना निर्माण करण्यात येणार असून सध्या तीन योजना पूर्णत्वास आल्या आहेत. म्हैसाळ योजनेचे पाणी शिवारात पोहचण्यासाठी गव्हाण उपसा, विस्तारित गव्हाण, बनेवाडी उपसा, डोंगरवाडी उपसा सिंचन, आगळगाव–जाखापूर उपसा सिंचन आदी पाच उपसा सिंचन योजनांची निर्मिती करण्यात आली आहे.

# ६. ताकारी प्रकल्प

**फोटो क्रमांक : ११**



**कृष्णा नदीवरील ताकारी योजना**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ताकारीजवळील योजना

२) कृष्णा नदीवरील उपसा सिंचन योजना

३) कडेगाव, खानापूर, वाळवा, तासगाव, पलूस या तालुक्यांसाठी ही योजना

४) ताकारी प्रकल्पाची मूळ किंमत ८२.४३ कोटी

५) सध्याची किंमत ६८४.५५ कोटी

६) आतापर्यंत झालेला खर्च ५५६.७४ कोटी

७) या प्रकल्पाद्वारे २७,४३० हेक्टर क्षेत्राला सिंचनाद्वारे पाणी देण्याचे उद्दिष्ट

८) लाभ क्षेत्रातील गावांची संख्या ५५

९) ताकारी प्रकल्पाच्या कामास १९८४ पासून सुरुवात

**ताकारी प्रकल्प :**

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ताकारी गावाजवळ कृष्णा नदीवर ताकारी प्रकल्प आहे. या योजनेस ज्येष्ठ नेते वसंतदादा पाटील यांनी मंजुरी दिली आणि १९८४ साली या योजनेच्या कामांना सुरुवात झाली. कडेगाव, खानापूर, तासगाव, वाळवा आणि पलूस या तालुक्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेमुळे एकूण २७,४३० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

ताकारी प्रकल्पाची मूळ किंमत ८२.४३ कोटी रुपये इतकी होती. सध्या या योजनेची किंमत ६८४.५५ कोटी रुपये इतकी झाली असून या योजनेवर आतापर्यंत ५५६.७४ कोटी रुपये खर्च झाले आहेत. टेंभू आणि म्हैसाळ योजनेच्या तुलनेत ताकारी योजना लहान आहे. या योजनेमध्ये चार टप्प्यांचा समावेश असून सध्या ५,३४८ हेक्टर क्षेत्र सध्या ओलीताखाली आले आहे. ताकारीजवळ साटपेवाडी बंधाऱ्यातून कृष्णा नदीतून उचललेले पाणी आज ९१ किलोमीटर अंतरापर्यंत गेले आहे.

सध्या दुष्काळाची दाहकता असतानाही ताकारी योजनेमुळे कडेगाव, खानापूर, तासगाव या तालुक्यातील काही भाग हिरवागार बनला आहे. ताकारी योजनेच्या पाण्यावर तेथील लोक ऊस, द्राक्षे, भाजीपाला सारखी जास्त उत्पन्न देणारी पिके होऊ लागली आहेत. पाटबंधारे विभागाने २०१६ अखेर ही योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविले असून उर्वरित कामासाठी २५० कोटी निधीची आवश्यकता आहे.

# ७. अंकली पूल

**फोटो क्रमांक : १२**



**सांगली–जयसिंगपूर रस्त्यावरील अंकली गावाजवळील कृष्णा नदीवरील पूल**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) प्रकल्पाचा खर्च ७.२५ कोटी

२) कामास सुरुवात ४ मार्च १९९९

३) प्रकल्प पूर्ण २२ फेब्रुवारी २०००

४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज यांच्या देखरेखीखाली काम पूर्ण

५) टोलवसुलीचा कालावधी ६ वर्षे ९ महिने

६) पुलाची लांबी २८८ मीटर

७) बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा, या तत्त्वावर पुलाची उभारणी

**अंकली पूल :**

सांगली जिल्ह्यातील अंकली गावाजवळ कृष्णा नदीवर २००० साली पूल उभारण्यात आला. जूना पूल कमकुवत झाल्याने आणि रस्त्यावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याने हा पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्त्वावर या पुलाची ४ मार्च १९९९ रोजी उभारणी सुरू झाली. पुणे येथील अशोका इन्फ्रा या कंपनीने हे काम अवघ्या ११ महिने १८ दिवसात पूर्ण करून २२ फेब्रुवारी २००० रोजी पूल वाहतुकीला खुला केला.

१९९५ साली खासगीकरणातून पूल उभारण्यास शासनाने परवानगी दिली. त्यावेळी २.९६ कोटी रूपयांचे अंदाजपत्रक बनविण्यात आले. १९९७ साली ५.२५ कोटी रूपयांच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. परंतु प्रत्यक्षात काम सुरू होताना ७.२५ कोटी रुपयांच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. २८८ मीटर लांबीचा हा पूल मिरज बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंतांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आला.निविदा मंजुरी वेळी ३ वर्षे ९ महिने इतक्या कालावधीसाठी टोल वसुलीला मुदत देण्यात आली होती. परंतु काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारांच्या मागणीनुसार ६ वर्ष ९ महिने इतक्या कालावधीसाठी टोल वसुलीला परवानगी देण्यात आली. नवीन पूल एकेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून सांगलीहून कोल्हापूरकडे जाणारी वाहने या पुलावरून जातात, तर जुन्या पुलाचेही नुतनीकरण करण्यात आले असून कोल्हापूरहून सांगलीला जाणारी वाहने या पुलावरून जातात.

# ८. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ चे रुंदीकरण

**फोटो क्रमांक : १३**



**कासेगावजवळील पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग**

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

१) सांगली जिल्ह्यात कासेगावपासून कणेगावपर्यंत २१ किलोमीटरचा महामार्ग

२) सांगली जिल्हा हद्दीत १ उड्डाणपूल, वाहनांसाठी ४ भुयारी मार्ग, पादचाऱ्यांसाठी ४ भुयारी मार्ग

३) मुंबई येथील वॉलेचा कंपनीकडून महामार्गाचे रुंदीकरण

४) सांगली जिल्ह्यातील महामार्गाच्या रुंदीकरणासाठी ८५ कोटी ४२ लाख रुपये खर्च

५) पेठ येथे उड्डाणपूल

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ चे रुंदीकरण**

रस्ते विकास महामंडळातर्फे खासगीकरणातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ चे २००१ साली वाढत्या वाहनांची संख्या आणि वाढते अपघात यामुळे महामार्गाचे रुंदीकरण करण्याच्या शासनाने निर्णय घेतला. सांगली जिल्ह्यात कासेगाव पासून कणेगावपर्यंत २१ किलोमीटरच्या महामार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. या रुंदीकरणासाठी ८५ कोटी ४२ लाख रुपये खर्च करण्यात आले. सांगली जिल्ह्यातील कासेगाव, येवलेवाडी, केदारवाडी, नेर्ले, पेठ, कामेरी, येडेनिपाणी, येलूर, तांदुळवाडी, मालेवाडी, कणेगाव आदी १२ गावे या महामार्गावर येतात.

जुना पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग ७ मीटर होता. तो पश्चिम बाजूने ३.५ मीटर वाढविला जाणार आहे. तर पूर्वे बाजूस मध्ये ५ मीटर अंतर सोडून ११ मीटरचा नवीन रस्ता करण्यात आला. याच्या बाहेर दोन्ही बाजूस सर्व्हिस रोड व गटारी उभारण्यात आल्या. रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मुंबई येथील वॉलेचा कंपनीने केले. जिल्हा हद्दीतून पेठ येथे एकमेव उड्डाणपूल उभारण्यात आला. तर कासेगाव तांबवे मार्ग, कामेरी, इस्लामपूर मार्ग, येडेनिपाणी–आष्टा मार्ग, तांदुळवाडी–आष्टा मार्ग आदी ठिकाणी भुयारी मार्ग उभारण्यात आले. ५ ठिकाणी बैलगाडी भुयारी मार्ग ४ ठिकाणी पादचारी भुयारी मार्ग आणि ५ ठिकाणी लेव्हल क्रॉसिंगची सोय करण्यात आली आहे.

## ३.९ सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च

सांगली जिल्ह्यात १९९६ ते २००६ या काळात अनेक विकासकामे सुरू झाली, तर काही पूर्णत्वास आली. म्हैसाळ, ताकारी, टेंभू या सिंचन योजनांच्या कामाला १९९६ नंतर गती आली. या कामांवर कोट्यवधी रूपये खर्च झाले. सांगली जिल्ह्यात 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावरील ३ पुलांची उभारणी १९९८ ते २००१ या कालावधीत करण्यात आली. २० कोटी खर्चून बांधण्यात आलेल्या या तीन पुलांसाठी पथकर आकारण्यात आला.

सांगलीच्या तत्कालीन जिल्हाधिकारी मनिषा म्हैसकर यांनी अथक प्रयत्न करून जलसंधारणाची कोट्यवधीची कामे २००१ ते २००५ या कालावधीत पूर्ण केली. आमदार, खासदार, नगरविकास निधीतून दरवर्षी अनेक रस्ते व शासकीय इमारतींची कामे करण्यात येतात. हुडको, नाबार्डसारख्या केंद्र सरकारच्या निधीतूनही सांगली जिल्ह्यात अनेक विकासकामे पार पडत आहेत. डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत ताकारीजवळील सागरेश्वर, सोनसळ येथील चौरंगीनाथ, कडेपूर येथील डोंगराई येथे कोट्यवधीची विकासकामे वरील कालावधीत करण्यात आली. जिल्हा नियोजन, रोजगार हमी योजना, पूरनियंत्रण कामे, मध्यम प्रकल्प आदी योजनांमधूनही कोट्यवधीची विकासकामे सांगली जिल्ह्यात करण्यात आली. या विकासकामांवर खर्च झालेल्या निधीची सविस्तर आकडेवारी पुढीलप्रमाणे –

## तक्ता क्रमांक – ७

[२०] सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च (खालील सर्व आकडे कोटींमध्ये)

| खर्चाचा तपशील | १९९५ ते १९९६ | १९९६ ते १९९७ | १९९७ ते १९९८ | १९९८ ते १९९९ | १९९९ ते २००० | २००० ते २००१ | २००१ ते २००२ | २००२ ते २००३ | २००३ ते २००४ | २००४ ते २००५ | २००५ ते २००६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा नियोजन | १०३.२८ | ७३.३६ | १८९.६० | १५९.३५ | १३४.०७ | २०७.०२ | ८३.४६ | १०१.२७ | १३८.१२ | १४०.९२ | १३१.५४ |
| रोजगार हमी योजना | १.६५ | ४.७३ | ४.५६ | ५.९७ | ३.६८ | ५.६१ | ३.४८ | ६.२३ | ३९.८० | ३३.२४ | २५.३८ |
| लघु पाटबंधारे | ७७.०३ | ३०.१७ | ११७.०१ | ८०.५९ | ९५.८४ | १५१.२९ | ४१.२४ | ५३.०३ | ३८.१६ | १.३१ | १.७८ |
| मध्यम प्रकल्प | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- |
| पूर नियंत्रण कामे | ०.०२ | ०.०१ | ०.१५ | ०.०२ | ०.१८ | ०.९९ | ०.२९ | ०.७३ | ---- | ०.११ | १.१७ |
| मोठे प्रकल्प | ---- | ---- | ३.०३ | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ५४.३३ |
| रस्ते विकास | १.८० | ३.९२ | ३.७५ | ८.१० | ५.२९ | ८.९० | २.०३ | ३.१९ | १.१० | ७.४१ | १५.५६ |
| पर्यटन | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ०.०८ | ---- | ०.५२ |
| ग्रामीण पाणी पुरवठा | ५.०२ | ४.०२ | ३६.८१ | ११.५० | ४.३२ | ३.९० | ६.८३ | ३.१७ | १५.९४ | १०.४७ | ३.४६ |
| नगर विकास | ०.४६ | ०.४२ | ०.६१ | ०.७७ | ०.३१ | ०.८५ | ०.३९ | १.६५ | १.१५ | १.०० | १.३० |
| डोंगरी विकास कार्यक्रम | ---- | ---- | ०.६६ | ०.७६ | ---- | ०.३९ | ०.१८ | ०.५६ | ०.७३ | ०.३७ | ०.८४ |
| आमदार फंड | ४.५० | २.९१ | ६.९० | ९.११ | ८.७९ | ६.९४ | ८.१० | ८.६७ | ८.५६ | ८.९६ | ८.८३ |
| खासदार फंड | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | ---- | २.०८ | २.०७ | २.२७ |
| | | | | | | | | | | | |

**प्रकरणाचा समारोप**

'सांगली जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा' या प्रकरणात सुरुवातीस सांगली जिल्ह्याची भौगोलीक परिस्थिती, इतिहास, स्थानिक पिके, उद्योगधंदे यांचा आढावा घेतला. सांगली जिल्ह्याची वैशिष्ट्ये अभ्यासली. सांगली जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक विश्लेषणाची सविस्तर नोंद केली.

विकासकामे म्हणजे काय? त्यांचे प्रकार? याबाबतच्या माहितीचा

या प्रकरणामध्ये समावेश केला. विकासकामांसाठी कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, यासारख्या शासकीय यंत्रणांची माहिती घेऊन त्यांच्यामार्फत विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रीया कशी राबविली जाते, हे या प्रकरणात अभ्यासले.

सांगली जिल्ह्यात १९९६ ते २००६ या कालावधीत करण्यात आलेल्या महत्त्वाच्या विकासकामांना भेटी देऊन (उदा. : ताकारी, म्हैसाळ, टेंभू योजना, अंकली पूल, कडेगाव येथील जलसंधारणाची कामे इत्यादी) त्यांच्या ठळक वैशिष्ट्यांची नोंद घेतली. सांगली जिल्ह्यात १९९६ ते २००६ या कालावधीत खर्च झालेल्या निधीची सविस्तर माहितीही या प्रकरणात नोंद केली आहे.

---

**संदर्भ**


१) सांगलीच्या पाऊलखुणा – चिंतामणी सहस्त्रबुध्दे – पान क्र. ४१

२) पीडब्ल्युडी मेड इझी – विष्णू पालवे – पान क्र. १८

३) तत्रैव – पान क्र. १९

४) महाराष्ट्रातील नद्या – श्रीकांत तापीकर – पान क्र. ६

५) तत्रैव – पान क्र. १०

६) आपला सांगली जिल्हा – एन. बी. गुरव – पान क्र. १५

७) आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा सांगली – सांख्यिकी विभाग

अहवाल पान क्र. ७२

८) रस्ते विकास योजनेचे मध्यावधी पुनर्विलोकन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील तक्ता

९) आपला सांगली जिल्हा – पूर्वोक्त – पान क्र. १८

१०) तत्रैव – पान क्र. १९

११) तत्रैव – पान क्र. ८

१२) आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा सांगली – पूर्वोक्त – पान क्र. ७३

१३) तत्रैव – पान क्र. ३

१४) तत्रैव – पान क्र. ४

१५) तत्रैव – पान क्र. ५

१६) तत्रैव – पान क्र. ६

१७) तत्रैव – पान क्र. ६

१८) पीडब्ल्युडी मेड इझी – पूर्वोक्त – पान क्र. २१

१९) तत्रैव – पान क्र. १०६

२०) आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा सांगली – पूर्वोक्त (१९९६ ते २००६)

## प्रकरण ४

# विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांचा दृष्टिकोन

## प्रकरण चौथे : विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांचा दृष्टिकोन

४.१ : वृतपत्रांमधील विकासकामांसंदर्भातील बातम्या, माहितीचे प्रकार

४.२ : वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची जबाबदारी

४.३ : बातमीदाराची विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची नैतिकता

४.४ : विकासकामांबाबतच्या बातम्यांचे सादरीकरण

४.५ : विकासकामांबाबतच्या बातम्या व इतर बातम्या यांचा तौलनिक अभ्यास

४.६ : वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठीची प्रश्नावली व त्याचे विश्लेषण

### ४.१ वृत्तपत्रांमधील विकासकामांसंदर्भातील बातमी, माहितीचे प्रकार

राजकीय, सामाजिक, अपघात, आंदोलने, मारामारी याबरोबरच आपल्या अवतीभोवती विकासकामांसंदर्भात घडणाऱ्या घडामोडींच्या बातम्याही आपणास वृत्तपत्रांमध्ये पाहावयास मिळतात. टेंभू योजनेसाठी १०० कोटींचा वाढीव निधी देण्याचा निर्णय, येळावी बसस्थानक चौकातील रस्त्याची दुरवस्था, बेणापूरच्या पाझर तलावाचे भूमिपूजन, जत तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्ती कामात भ्रष्टाचार, सांगली जिल्हा परिषदेची जाहीर निविदा सूचना, लक्ष्मी चौकातील डांबरीकरण केव्हा होणार? असा सवाल विचारणारी वाचकांची पत्रे आदी स्वरूपातील बातम्या आपण वृत्तपत्रांमध्ये वाचतो. कवलापुरात रस्त्याचे काम बंद पडल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ अशा स्वरूपाच्या सामाजिक बांधिलकीच्या बातम्या, सलगरे परिसरातील विकासकामांकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष अशा स्वरूपातील विशेषवृत्त देणारे लेख, कासेगाव येथे पुलाचा स्लॅब कोसळून चार मजूर जखमी अशा स्वरूपाच्या विकासकामांसंदर्भातील अपघात विषयक बातम्या आपण वृत्तपत्रांमध्ये नेहमी वाचतो. विकासकामांसंदर्भातील बातम्यांचे खालीलप्रमाणे प्रकार करता येतील –

१) उद्घाटन, निवेदन, आंदोलने आदी

२) विकासकामांसंदर्भातील भ्रष्टाचार, विकासकामांची चौकशी करण्याची मागणी

३) विशेषवृत्त, समस्या

४) शासकीय धोरण, शासकीय योजना

५) विकासकामांवरील अग्रलेख, स्तंभलेख

६) विकासकामांसंदर्भातील वाचकांची पत्रे

७) शासकीय जाहीर निविदा सूचना

**विकासकामांसंदर्भातील या बातम्यांच्या प्रकारांचे सविस्तरपणे विश्लेषण पुढीलप्रमाणे**

**१) विकासकामांसंदर्भातील उद्‌घाटन, निवेदन, आंदोलन आदी –**

सर्व वृत्तपत्रांमध्ये उद्‌घाटन, निवेदन, आंदोलन या प्रकारच्या विकासकामांसंदर्भातील बातम्या सर्वात जास्त प्रमाणात आढळून येतात. नवीन रस्त्यांच्या कामांचे लोकप्रतिनिधी तसेच

**फोटो क्रमांक : १३**



अग्रणी नदीवरील बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याची मागणी

राजाराम पाटील/कवठेमहांकाळ

कवठेमहांकाळ तालुक्यातील अग्रण धुळगाव येथील अग्रणी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे काम चार वर्षे झाले रखडले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या योजनेखालील या बंधाऱ्या-

तसेच पाझरामुळेहि शेतकऱ्यांना फायदा झाला असता. तालुका हा दुष्काळी असून शेतीच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असती. बंधाऱ्यांचे काम जर पूर्ण झाले असते तर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शेतकऱ्यांना पाणी मिळाले असते. परंतु पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या ३-४ वर्षांच्या

मान्यवरांच्याहस्ते उद्‌घाटन करतानाच्या बातम्या सर्वात जास्त प्रमाणात वृत्तपत्रांमध्ये आढळून येतात. धरणांचे काम, आरोग्य केंद्राच्या इमारती, सामाजिक सभागृह, पाणी योजना, जलसिंचन योजना यांचे भूमिपूजन या स्वरूपाच्या बातम्याही याच प्रकारात मोडतात. या बातम्या वृत्तपत्रांना सहजासहजी उपलब्ध होतात.

नवीन विकासकामांच्या मागणीसाठी झालेला मोर्चा, रस्ता रोको यासारखी आंदोलने तसेच रस्ते, गटारी यासारख्या विकासकामांच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता यांना दिलेली निवेदनेही याच प्रकारात मोडतात.

विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांमध्ये नागरिकांसाठी दिली जाणारी माहिती, सर्वसाधारण घडामोडी, लहान–सहान घटना, आंदोलने लोकांच्या प्रतिक्रिया या गोष्टींचा छायाचित्रासह या प्रकारात समावेश असतो.

## २) विकासकामांमधील भ्रष्टाचार, कामांची चौकशी करण्याची मागणी –

शासकीय अधिकारी आणि कंत्राटदार यांनी संगनमत करून विकासकामांमध्ये केलेला गैरव्यवहार, केलेल्या कामापेक्षा जास्त रकमेचे बील काढणे, कामांचा दर्जा न राखणे आदी स्वरूपाच्या बातम्या या प्रकारात मोडतात. वेगवेगळ्या संघटनांनी किंवा नागरिकांनी एखाद्या

**फोटो क्रमांक : १४**



म्हैसाळ योजनेचे काम निकृष्ट

डोर्ली येथे सिमेंट, वाळूऐवजी माती, मुरुमाचा वापर

नागज : वार्ताहर

म्हैसाळ योजनेच्या सहाव्या टप्प्यातील कवठेमहांकाळ व जत तालुक्याच्या सीमेवर चालू असलेली कामे निकृष्ट पद्धतीने सुरू आहेत. या कामात सिमेंट व वाळूऐवजी माती व मुरुमाचा सर्रास वापर सुरू आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे कंत्राटदाराचा मनमानी कारभार सुरू आहे.

म्हैसाळच्या कॅनॉलची कामे सध्या ढालेवाडी, इरळी, डोर्ली भागात सुरू आहेत. कॅनॉलच्या मार्गात अनेक ठिकाणी पूल बांधण्याची कामे आहेत. या कामात माती व मुरुमाचा वापर केला जात आहे. डोर्ली (ता. जत) येथे पुलाचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी लागणारा सिमेंटचा माल तयार करताना आठ पाट्या वाळू, आठ पाट्या खडी व एक पोते सिमेंट वापरायचे असताना दहा पाट्या वाळू, दहा पाट्या खडी व केवळ अर्धा पोते सिमेंट वापरले जाते. अर्थात हा सारा प्रकार सान्यांच्या डोळ्यादेखत सुरू असताना कोणीही तक्रार करत नाही.

पाण्यासाठी आसुसलेल्या जनतेला कामापेक्षा लवकर पाणी येणे महत्त्वाचे वाटते. वर्षानुवर्षांच्या दुष्काळामुळे हतबल बनलेल्या जनतेच्या असहायतेचा फायदा कामे करणाऱ्यांनी मात्र पुरेपूर उठवला आहे. वरिष्ठांची मर्जी सांभाळून या कामात हात धुवून घेण्याचा उद्योग चालवला आहे.

म्हैसाळ योजनेच्या कामाची पाहणी आणि पाण्याचे पूजन करण्याच्या निमित्ताने गृहमंत्री आर. आर. पाटील केंद्रीय राज्यमंत्री प्रतीक पाटील आदींसह जिल्ह्यातील डझनभर जबाबदार नेते या भागात फिरले, मात्र निकृष्ट कामाबाबत एकानेही चकार शब्द काढला नाही. या उलट गृहमंत्री पाटील यांनी सुरू असलेल्या कामाचे कौतुक केले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निकृष्टदर्जाची कामे सुरू आहेत. या कामावर पाटबंधारे विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. पण, दुर्गम भाग असल्याने या भागात अधिकारी फिरकत नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराचे चांगलेच फावले आहे.

डोर्ली (ता. जत) येथे सुरू असलेल्या म्हैसाळ योजनेच्या कामात माती व मुरुमाचा वापर केला जात आहे.

विकासकामाच्या चौकशीबाबत केलेली मागणी ही बातमीसुद्धा या प्रकारात मोडते. कामाचा दर्जा न राखल्याबद्दल नागरिकांनी एखादे विकासकाम बंद पाडलेले असते. त्या संदर्भातील बातमीही भ्रष्टाचाराच्या स्वरूपातच (भ्रष्ट–आचार = चुकीची वागणूक, चुकीचे कामकाज, चुकीचे अर्थव्यवहार )मोडते.

विकासकामांमधील भ्रष्टाचाराच्या बातम्या सहजासहजी मिळत नाहीत. त्यासाठी वर्तमानपत्राच्या वार्ताहराची दृष्टी सजग असावी लागते. त्या वार्ताहरांना विकासकामांवर लक्ष ठेवावे लागते. विकास कामांमध्ये दर्जा राखला जातो का नाही हे जाणण्याइतपत त्याची कुवत असली पाहिजे. तरच त्याला अशा स्वरूपाच्या बातम्या मिळू शकतात.

नागरिक जागरूक असतील तर ते आपल्या भागात चाललेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांबद्दल आंदोलन, निवेदनाद्वारे आवाज उठवतात. या माध्यमातून वृत्तपत्रांना विकासकामांमधील भ्रष्टाचाराबाबत बातमी मिळते. विकासकामांचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात येणे आवश्यक आहे.

### ३) विशेषवृत्त, समस्या –

एखाद्या भागाच्या विकासासाठी कराव्या लागणाऱ्या कामांबाबतचा लेख, विकासकामांबाबतचे विश्लेषण आदी लेखन विशेषवृत्त, समस्या या प्रकारात मोडतात.

सांगली महापालिकेची विकासकामे अनुदान कमी मिळाल्याने रेंगाळली; म्हैसाळ कालव्याचा

**फोटो क्रमांक : १५**



# नेवरी प्रादेशिक योजना सुरू करण्याची गरज

## १० गावांतील टंचाईवर मात करणे शक्य : अधिकाऱ्यांनी मानसिकता बदलण्याची गरज

कडेगाव : प्रतिनिधी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून तयार केलेल्या नेवरीसह इतर ९ गावांची प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना सुरू करण्याची मागणी होत आहे. योजनेचे काम पुर्ण झाले असल्याचे सांगणारे जीवन प्राधिकरणचे अधिकारी मात्र, योजना सुरू करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे.

कडेगाव तालुक्यातील कायम दुष्काळी असलेल्या नेवरी, तोंडोली, खेराडे-वांगी, कोतीज, खेराडे (विटा), तुपेवाडी (खे), येतगाव, कान्हरवाडी, भिकवडी खुर्द आणि खानापूर तालुक्यातील हिंगणगादे अशा दहा गावासाठी शासनाने ६ कोटी ३१ लाख २५ हजार रुपये खर्चाची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना १५ जानेवारी १९९९ रोजी मंजूर केली आहे.

हिंगणगाव बुद्रुक (ता. कडेगाव) येथील लघु पाटबंधारे तलाव मध्ये विहीर खुदाई करून तेथून पाईप लाईनच्या सहाय्याने पाणी उचलण्यात येणार आहे. यासाठी २९ हजार ६८९ मिटर लांबीची पाईप लाईन टाकण्यात आली आहे. ढाणेवाडी येथे मुख्य संतुलन पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. या पाणी साठवण टाकी जवळच ३०० द.ल. लीटरने जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. येथील साठवण टाकीतील पाणी वितरित करण्यासाठी तोंडोली व खेराडे-वांगी येथे ५० हजार लिटर, कोतीज व तुपेवाडी, हिंगणगादे येथे प्रत्येकी ४० हजार लिटर, येतगाव येथे २ लाख लिटर, कान्हरवाडी, खेराडे (विटा) येथे ७० हजार लिटर, भिकवडी खुर्द येथे ६० हजार लिटर व नेवरी येथे २ लाख ५० हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण क्षमतेच्या टाक्या उभारण्यात आल्या आहेत.

गेली बारा वर्ष झाले सुरू असलेल्या या योजनेची कामे जवळपास पुर्ण झाली आहेत. गेले एक वर्ष झाले जीवन प्राधिकरणचे अधिकारी योजनेची चाचणी घेत असल्याचे सांगत आहेत.

१) नेवरी प्रादेशिक योजनेचे ढाणेवाडी येथे उभारलेले संतुलन जलाशय व जलशुध्दीकरण केंद्र. २) हिंगणगाव बुद्रुक येथील जॅकवेल व पंपगृहाचे काम पुर्ण झाले आहे. (छाया : राजेंद्र मोहिते)

मात्र, अद्याप चाचणी घेण्याचे काम पुर्ण झालेले नाही. सध्या तालुक्यातील नेवरी, खेराडे-वांगी, खेराडे (विटा), ढाणेवाडी, येतगाव, भिकवडी खुर्द गावात मोठ्या प्रमाणात तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत. टँकरच्या खेपा मंजूरी पेक्षा कमी पडत असल्याने आता नेवरी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सुरू करण्याची मागणी होत आहे. हिंगणगाव बुद्रुक तलावात टेंभू योजनेचे पाणी सोडले जात असल्याने प्रादेशिक योजनेच्या जॅकवेलमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठा झाला आहे. मात्र, जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी मानसिकता योजना सुरू करावी अशी दिसत नाही.

फायदा शेतकऱ्यांना कधी मिळणार; वाकुर्डे–बुद्रुक योजनेला पूर्णविराम मिळण्याची शक्यता; घोषणा नकोत दुष्काळी भागाला पाणी द्या; अशा स्वरूपाचे वृत्तपत्रांमध्ये आलेले लेख हे विकासकामांसंदर्भात आलेले विशेषवृत्त या प्रकारात मोडतात.

विशेषवृत्त हे ज्येष्ठ वार्ताहर, उपसंपादक किंवा वृत्तसंपादक यांच्याकडून लिहिले जाते. विशेषवृत्त लिहिण्यासाठी वार्ताहरला किंवा उपसंपादकाला त्या विषयी पूर्णपणे माहिती असावी लागते. पार्श्वभूमी, आकडेवारी, फायदे–तोटे, परिणाम आदी घटकांचेही ज्ञान असणे आवश्यक असते.

### ४) शासकीय धोरण, शासकीय योजना –

शासनाने मंजूर केलेली नवीन विकासकामे, रखडलेल्या प्रकल्पांना जाहीर केलेला निधी, विकासकामांसंदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेले अध्यादेश या संदर्भातील बातम्या वरील प्रकारात मोडतात.

शेरीनाला योजनेचा प्रस्ताव शासनाने फेटाळला, जिल्ह्यात जलसंधारणासाठी १ कोटीच्या

**फोटो क्रमांक : १६**



## महामार्ग रुंदीकरणासाठी मे अखेर जमीन संपादित करणार!

... पुणकी (वार्ताहर) : महामार्ग ...साठी लागणाऱ्या जमिनी ... संपादित करून मूल्यांकनानुसार ... मालकांना किमती अदा करण्यात ... असल्याची माहिती भूसंपादन ... अजित रेळेकर यांनी ... पत्रकारांना दिली.

... हद्दीतील नोटीसा लागू ... म्हणणे ऐकून घेण्यासाठी ... यांच्यासह कार्यकारी अभियंता ... पाटील, साहाय्यक अभियंता संजय ... अधिकारी वाठार येथे आले ... बोलताना ते म्हणाले की, ... यांच्या धोरणानुसार दिल्ली, ... कलकत्ता या शहरांना जोडणाऱ्या महामार्गाचे चौपदरीकरण सुवर्ण चौरस या योजनेअंतर्गत होणार आहे. या योजनेचा भाग असणाऱ्या शेंद्री (सातारा) ते कागल या १३३ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी आवश्यक जमिनी ३ टप्प्यात संपादित करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात जमिनी संपादित करणे, दुसऱ्या टप्प्यात मूल्यांकन करून किमती निश्चित करणे, तसेच जमीन मालकांचे म्हणणे ऐकून त्यांचे निरसन करणे आणि तिसऱ्या टप्प्यात मूल्यांकनानुसार जमीन मालकांना पैसे अदा करणे, अशी कार्यवाही होणार आहे. वाठार हद्दीतील संपादित होणाऱ्या जमिनीच्या मालकांना नोटीसा लागू करून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे.

शासनाच्या जमिनीच्या किमती व सध्या बाजारभावाप्रमाणे असणाऱ्या किमती यामधील तफावतीविषयी विचारले असता श्री. रेळेकर म्हणाले की, ज्यांच्याकडे जमिनीच्या विक्रीचे दस्त असतील, त्यांनी ते आणून द्यावेत. त्या दस्ताप्रमाणे जमीन मालकाला जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न केला जाईल. जमिनीच्या बदल्यात जमीन व घराच्या बदल्यात घर मिळावे, अन्यथा आंदोलनाद्वारे महामार्गाचे काम बंद पाडले जाईल. या हायवे बचाव कृति समितीच्या निवेदनावर श्री. रेळेकर यांनी, महामार्ग रुंदीकरण हे सार्वजनिक हिताचे काम असल्याने ते बंद पाडणे अशक्य असल्याचे सांगितले.

साहाय्यक अभियंता संजय पाटील यांनी यावेळी सांगितले की, प्रस्तावित १३३ किलोमीटर लांबीच्या महामार्ग रुंदीकरणासाठी ५३३ कोटि रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये घर अथवा जमिनीच्या मोबदल्यात दिली जाणारी किंमत समाविष्ट नाही. राज्य रस्ते विकास महामंडळाच्या 'बांधा वापरा व हस्तांतरीत करा' या धोरणानुसार लवकरच महामार्ग रुंदीकरणाचे काम सुरू होणार आहे.

यावेळी हायवे कृति समितीचे अध्यक्ष प्रदीप पाटील, निमंत्रक राजकुमार चौगले, बाळासाहेब पाटील, विजय धनवडे, बाहुबाली पटेल यांच्यासह अनेक जमीन मालक उपस्थित होते.

कामाचे नियोजन, टेंभू योजनेसाठी १०० कोटींचा वाढीव निधी देण्याचा निर्णय, जलसंधारण कामाच्या तपासणीसाठी तालुकावर निरीक्षण समिती आदी बातम्यांना शासकीय धोरण किंवा शासकीय निर्णय असे म्हणता येईल. या स्वरूपाच्या बातम्या मिळविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, शासनाची परिपत्रके, लोकनियुक्त प्रतिनिधींनी दिलेली माहिती आदींचा आधार घ्यावा लागतो. शासकीय धोरण किंवा शासकीय योजनेमुळे लोकांना आपल्या भागात कोणती विकासकामे होणार आहेत, याची माहिती मिळते.

**५) विकासकामांवरील अग्रलेख आणि स्तंभलेख –**

विकासकामांची कारणमीमांसा करणारे, विकासकामांचे विश्लेषण करणारे, नवीन

**फोटो क्रमांक : १७**



दक्षिण महाराष्ट्र

केसरी

तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हां घडो । त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णी पडो ॥
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो । तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यी पडो

१८ ऑक्टोबर २००२

## विकासाचे रडगाणे

महाराष्ट्रातल्या सत्ताधारी लोकशाही आघाडीतल्या काही मंत्र्यांनी आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनीच आपल्या सरकारची गेल्या तीन वर्षांची कामगिरी समाधानकारक नसल्याची कबुली दिल्यामुळे या सरकारच्या कारभाराबाबत वेगळे भाष्य करायची गरज नाही. शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या युतीच्या सरकारने

विकासकामांचे फायदे–तोटे उधृगत करणारे, विकासकामांमुळे आर्थिक सामाजिक परिणामांचे पृथक्करण करणारे अग्रलेख आणि स्तंभलेख यांना जनहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे.

अग्रलेख किंवा स्तंभलेख याद्वारे विकासकामांचे केलेले विश्लेषण किंवा पृथक्करण हे जनमानसाचे एखाद्या विषयाबद्दलचे मत तयार करत असते. या जनमताचा प्रचंड दबाव प्रशासनावर तयार होतो आणि प्रशासनाला जनमतानुसार निर्णय घेणे भाग पडते. बांधकामाचा दर्जाबाबत नेमके जबाबदार कोण ? (स्तंभलेख); जीवन प्राधिकरणाला जीवदान द्या (स्तंभलेख); विकासाचे रडगाणे (अग्रलेख); पाणलोट विकासाला दिशा देणारे भू–संवर्धन (स्तंभलेख) आदी वृत्तपत्रांमधील प्रसिद्ध झालेली उदाहरणे स्तंभलेख आणि अग्रलेख या प्रकारामध्ये सांगता येतात.

संपादक, वृत्तसंपादक, ज्येष्ठ वार्ताहर, ज्येष्ठ विचारवंत यांच्याकडून अग्रलेख आणि स्तंभलेख लिहिले जातात. संपादकीय पानावर अग्रलेख आणि स्तंभलेखांना स्थान असते. त्यामुळे नागरिक, प्रशासनाचे अधिकारी यांच्याकडून हे लेख गंभीरपणे वाचले जातात.

**६) विकासकामांसंदर्भातील वाचकांची पत्रे –**

एखाद्या विकासकामाबद्दलची नागरिकांची मागणी, निकृष्ट दर्जाच्या कामांबद्दल आवाज उठविणे, एखाद्या विकासकामांबद्दलचे नागरिकांचे विचार, एखाद्या विकास कामातील भ्रष्टाचार आदी

**फोटो क्रमांक : १८**



**रस्त्यांवरचे प्राणघातक खड्डे**

महानगरपालिका क्षेत्रात १२ महिने कोठे ना कोठे रस्ता खुदाई चालू असते. रस्ता खणून आडव्या भल्यामोठ्या चरी काढल्या जातात. पाण्याच्या पाईप्स्, गटार योजना; टेलिफोन वायरिंग इत्यादीसाठी अशी खोदकामे वारंवार करावी लागतात, हे गृहित धरले पाहिजे. परंतु, एकदा हे काम झाल्यावर ही चर, हे खड्डे चांगले मुजवून पूर्वी होता तसा रस्ता केला जात नाही. परिणामी या जागी वर्षानुवर्षाची चर आणि खड्डे तसेच धोकादायकरीत्या तयार होतात. रात्रीच्यावेळी अनोळखी रस्त्याने प्रवास करताना या चरीत अगर खड्ड्यात अडकून गाडी, सायकल व इतर वाहने घसरून अगर

संदर्भात नागरिकांना आपले मत नोंदविण्यासाठी किंवा टीकाटिप्पणी करण्यासाठी वाचकांचे पत्र हे वृत्तपत्रातील सदर चांगलेच प्रभावी ठरते.

संपादकीय पानावर वाचकांच्या पत्राला स्थान असते. त्यामुळे वाचकांची पत्रे गांभीर्याने वाचली जातात. विकासकामांच्या बाबतीत नागरिक किती जागरूक आहेत, याची प्रचिती वाचकांच्या पत्रावरून येते.

वर्षाअखेरीस विकासकामांची घाई, डांबरीकरणी केव्हा होणार?; नागरी सुविधा द्याव्यात; पुलाचे काम करावे; रस्ता रुंदीकरणाकडे दुर्लक्ष आदी प्रकारची उदाहरणे वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वेगवेगळ्या वाचकांच्या पत्रांची देता येईल.

### ७) शासकीय जाहीर निविदा सूचना –

नागरिकांकडून कररूपाने जमा झालेले पैसे शासनाकडून विविध विकासकामांवर खर्च केले जातात. या विकासकामांची जाहीर निविदा सूचना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात येते. वृत्तपत्रांमध्ये या निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यामुळे जास्तीत जास्त कंत्राटदारांना या कामांबद्दल माहिती मिळते.

**फोटो क्रमांक : १९**



महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सांगली

निविदा सूचना क्रमांक २३ सन २००६-२००७

[illegible]

निविदापूर्व बैठक मा. मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग पुणे यांचे कार्यालयात दिनांक २८/१२/०६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लाखात | बयाणा रक्कम | कामाची मुदत | कोऱ्या निविदा देण्याचा दिनांक | निविदा भरून परत देण्याचा दिनांक | कोऱ्या निविदा निविदा नमुन्याची किंमत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील [illegible] रा. मा. १३६ किमी १६/५०० ते २१/५०० | २३७.०० | २३८०००/- | अठरा महिने | २०/११/२००६ ते १०/०१/२००७ | २५/०१/२००७ | १०,०००/- | वर्ग १ व त्यावरील |
| २. | सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील [illegible] किमी ५/०० ते १३/००. | १९०.०० | १९००००/- | अठरा महिने | २०/११/२००६ ते १०/०१/२००७ | २५/०१/२००७ | १०,०००/- | वर्ग १ व त्यावरील |

यामुळे स्पर्धात्मक पद्धतीने कामांचे वाटप होऊन शासनाचा मोठ्या प्रमाणावर फायदा होतो. प्रसिद्ध झालेल्या निविदांमुळे कामाची मुदत आदीबाबतची माहिती कंत्राटदार तसेच सर्वसामान्य नागरिकांना मिळते. वृत्तपत्रांमधील विकासकामांसंदर्भातील जाहीर निविदांच्या जाहिराती या वृत्तपत्रांचे हमखास उत्पन्नाचे साधन आहे. वृत्तपत्रांचा गाडा शासकीय जाहिरातीवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असतो.

## ४.२ : वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांची जबाबदारी

वृत्तपत्रांमध्ये आपण नेहमी नवीन रस्ते, पुलाची बांधकामे, पाणीपुरवठा योजनांची मंजुरी, निकृष्ट विकासकामे, विकासकामांमधील भ्रष्टाचार आदींविषयी वाचत असतो. सर्वसामान्य लोकांशी ही विकासकामे निगडित असल्याने या बातम्यांची नेहमीच चर्चा होत असते. त्यामुळे वृत्तपत्रातील विकासकामांविषयीच्या बातम्यांना वेगळे स्थान प्राप्त झाले आहे.

विकासकामांसंदर्भात माहिती मिळविण्यासाठी वाचकांना व एकूण जन–सामान्यांना वृत्तपत्रांशिवाय दुसरे प्रभावी साधन नाही. वृत्तपत्र हेच जनमत व्यक्त करण्याचे सर्वात चांगले माध्यम आहे. रेंगाळलेल्या किंवा निकृष्ट दर्जाच्या कामाकडे वृत्तपत्रीय बातम्यांमुळे लोकांचे लक्ष केंद्रित होते. वृत्तपत्रात स्वतःबद्दल भ्रष्टाचाराची बातमी प्रसिध्द झाल्यास बदनामी होईल, असा दबाव विकासकामांवर देखरेख करणारे शासकीय अधिकारी, तसेच विकासकामे करणारे कंत्राटदार यांच्यावर असतो. या भीतीपोटी बऱ्याच वेळा विकासकामांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न होतो.

विकासकामांचा दर्जा सुधारण्यासाठी त्या कामांचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. विकासकामे का रखडली? याचा ऊहापोह होणे गरजेचे आहे. विकासकामांसाठी केल्या जाणाऱ्या आंदोलनांची प्रसिध्दी होणे आवश्यक आहे. विकासकामांमुळे समाजावर होणारे चांगले–वाईट परिणाम शोधणे महत्त्वाचे आहे. विकासकामांसाठी राबणाऱ्या कामगारांच्या व्यथा मांडणे गरजेचे आहे. विकासाच्या दृष्टीने योग्य व लोकोपयोगी कामांचा पाठपुरावा होणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींच्या पूर्ततेसाठी वृत्तपत्रांमधून विकासकामांसंदर्भात विविध प्रकारच्या बातम्या छापून येणे आवश्यक आहे व सामाजिक हिताच्या दृष्टिकोणातून याची मोठी जबाबदारी वृत्तपत्रांवर आहे.

विकासकामांच्या बातम्यांना ठळकपणे प्रसिध्दी देणे, योग्य मांडणी करणे, बातमीला फोटोची जोड देणे, बातमी रंगीत लावणे, बातम्यांचा पाठपुरावा करणे, विकासकामांमधील चांगल्या–वाईट गोष्टी अभ्यासून विशेष वृत्त प्रसिध्द करणे, विकासकामांमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत जनजागृती करणे, आदी जबाबदाऱ्या वृत्तपत्रांना पार पाडाव्या लागतात.

वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांची जबाबदारी काय असते? यासाठी खालील मुद्द्यांचा विचार केला.

१) विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झालेल्या विकासकामांच्या बातम्या अभ्यासल्या.

२) विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबत सर्वसामान्य नागरिकांशी चर्चा करून वृत्तपत्रांची जबाबदारी काय असावी, याबाबत त्यांची मते आजमावली.

३) वृत्तपत्रक्षेत्रात काम करणाऱ्या व अनुभव असणाऱ्या संपादकीय विभागातील अधिकाऱ्यांशी, तसेच वार्ताहरांशी विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रांच्या जबाबदारीबद्दल चर्चा करून निरीक्षणे नोंदवली.

४) विकासकामांशी संबंधित असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची वृत्तपत्रांच्या विकासकामांसंदर्भातील बातम्यांच्या जबाबदारीबद्दल मते जाणून घेतली.

५) विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांची विकासकामांच्या बातम्यांबाबत वृत्तपत्रांची जबाबदारी, या मुद्द्यावर मते नोंदविली.

**विकासकामांसंदर्भात विविध दैनिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या काही निवडक बातम्या –**

१) डफळापूर–अनंतपूर रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी (केसरी, दि. १३ एप्रिल २००१, पान ५)

२) निधीअभावी कांदे पाणी योजनेचे काम रेंगाळले (पुढारी, दि. १ एप्रिल २००१, पान १०)

३) खरसुंडी येथील रस्त्यांबाबत ग्रामस्थांतून नाराजी

(लोकमत, दि. १ फेब्रुवारी २००१, पान ७)

४) कमी खर्चात तयार केलेली आदर्श दहा गावांची पाणी योजना

(केसरी, विशेष वृत्त, ५ नोव्हेंबर २००३, पान ९)

५) कृष्णा खोरेच्या रखडलेल्या प्रकल्पांमुळे दुहेरी नुकसान

(पुढारी, विशेष वृत्त, ६ ऑक्टोबर २००२, पान १)

**फोटो क्रमांक : २०**



रखडलेल्या प्रकल्पांमुळे दुहेरी नुकसान

कोल्हापूर (श्रीराम पवार) :

कालावधीसाठी झाली. मे २००० पर्यंत ५६० टी.एम.सी. पाणी अडवणं हेच महामंडळापुढचं लक्ष्य होतं. निदान दाखवलेलं लक्ष्य तरी हेच होतं. प्रत्यक्षात सुरुवातीच्या सुगीच्या काळात करता येईल तितकी उधळपट्टी झाल्याचं चित्र दिसेल आणि पैशाचा पुरवठा अडला तसा महामंडळाच्या कामावरही परिणाम झाला.

कृष्णा खोरे चक्रव्यूहात

ठरल्याप्रमाणं मे २००० पर्यंत सारं पाणी अडलं असतं, कालवे बांधून शिवारापर्यंत पाण्याची गोष्ट दूरची, तरी वेगळे महामंडळ करण्याचं बीज झालं असतं. महामंडळ स्थापन होण्यापूर्वी पाटबंधारे प्रकल्पांच्या कामाची गती फारच कमी होती. ती कृष्णा

सांगण्यात येतं. कोयनेसारखं मोठं धरण आंध्रचा आक्षेप असतानाही निर्मितीचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून केलं गेलं. यात तत्कालीन विचार होता तो, विजेमुळे प्रगती साधेल आणि महाराष्ट्रा विकासात त्यालाच प्राधान्य गरज आहे. हा एक दृष्टिकोन पण त्यातून पाटबंधारे प्रकल्प सिंचनक्षमता वाढवण्याकडे दुर्लक्ष नाकारता येणार नाही.

कृष्णा खोरे स्थापनेनंतर कामांचा वेग कारणं काहीही असोत उपलब्ध विचार करून एकावेळी करायची याचं भान ठेवलं मुदतीत पाणी अडवण्याची

६)  पाण्याच्या नियोजनाची गरज (लोकमत, अग्रलेख, ७ जून २००३, पान ४)

७)  विकासकामांची थकबाकी न दिल्यास शिराळा तालुका ठेकेदार संघटनेचे उपोषण

(केसरी, ३१ ऑक्टोबर २००२, पान ९)

८)  पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी काय केले? – कृष्णा खोरे चक्रव्यूहात

(पुढारी, विशेष वृत्त, ९ ऑक्टोबर २००२, पान ५)

९)  महामार्ग चौपदरीकरणामुळे छोटे व्यावसायिक येणार रस्त्यावर

(लोकमत, विशेष वृत्त, १४ नोव्हेंबर २००३, पान १३)

१०) गोमेवाडी येथील नालाबंडिंग कामावरील मजुरांवर उपासमारीची वेळ

(केसरी, ९ जून २००३, पान ८)

११) वारणा–कडवी नदीच्या संगमावरील पुलाचे काम सुरू करण्याची गरज

(पुढारी, ७ जून २००३, पान ३)

१२) जलसंधारण चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान महत्त्वाचे : जिल्हाधिकारी मनिषा म्हैसकर

(पुढारी, ७ जानेवारी २००५, पान ४)

**फोटो क्रमांक : २१**



# जलसंधारणाच्या चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान महत्त्वाचे

**मनीषा म्हैसकर**

सांगली (प्रतिनिधी) : सांगली जिल्ह्यात
बविलेल्या जलसंधारणाच्या कामात वृत्तपत्रांचे
गदान फार महत्त्वाचे होते, त्यामुळेच आपण हे
म करू शकलो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी
नीषा म्हैसकर यांनी आज येथे केले.

सांगली जिल्हा मराठी पत्रकार
घटनेच्यावतीने आयोजित केलेल्या पत्रकार
दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. त्या
हणाल्या, जलसंधारणाच्या कामात

आणि आताची पत्रकारिता यात फरक पडू लागलेला आहे.

पत्रकार राजीव खांडेकर म्हणाले, एखाद्या विषय हाती घेतल्यानंतर पुढे त्याचा पाठपुरावा घेताना पत्रकार दिसत नाहीत. हा पाठपुरावा झाला पाहिजे. वाचकांना काय हवे आहे, ते देण्याचा प्रयत्न काही वृत्तपत्रांतून होऊ लागलेला आहे, पण अशा करमणूकप्रधान बातम्यापेक्षा लोकांचे प्रबोधन महत्त्वाचे आहे.

यावेळी जिल्हाधिकारी मनीषा म्हैसकर

१३) एक वळण बंधारा भिजवतोय ७० एकर क्षेत्र (पुढारी, १८ जानेवारी २००५, पान १)

१४) धरणे झाली पण नियोजनाअभावी पाणी वाया – कृष्णा का कोपली?

(पुढारी, विशेष वृत्त, २३ ऑगस्ट २००५, पान १)

१५) दीड हजार कोटींचे प्रकल्प पोहोचले चार हजार कोटींवर

(पुढारी, विशेष वृत्त, २३ मे २०१२, पान १३)

वरील बातम्यांवरून असे दिसून येते की, वृत्तपत्रांमध्ये विकासकामांची गरज, त्या विकासकामांमुळे होणारे फायदे-तोटे, विकासकामांमुळे मजुरांवर तसेच सामान्य लोकांवर होणारे परिणाम, रेंगाळलेल्या विकासकामांचा बातम्या, विशेष वृत्त, लेखमालिका किंवा अग्रलेख याद्वारे उहापोह केलेला आहे.

वाचकांच्या सर्वेक्षणावरून असे दिसून येते की, वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या विकास कामांच्या बातम्या १०० टक्के वाचक वाचतात, तर विकासकामांच्या बातम्या न वाचणारे शून्य टक्के वाचक आहेत. १६ टक्के वाचकांच्या मते वृत्तपत्रांमध्ये विकासकामांसंदर्भात परिपूर्ण माहिती नसते. ६५ टक्के वाचकांना असे वाटते की, वृत्तपत्रात येणाऱ्या विकासकामांच्या बातम्यांचा उपयोग होतो. वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव आहे, असे ९८ टक्के वाचकांना वाटते.

**विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांची जबाबदारी आणि वृत्तपत्रांकडून अपेक्षा याविषयी वाचकांची मते खालीलप्रमाणे.**

१) रखडलेल्या विकासकामांवर वृत्तपत्रांनी परखड टीका करावी.

२) वृत्तपत्रांनी विकासकामांना किती निधी मिळतो व तो कशा प्रकारे वापरला जातो? याबाबत लिहावे.

३) जाहिरातींमुळे काही निकृष्ट विकासकामांकडे वृत्तपत्रांचे दुर्लक्ष होते.

४) निकृष्ट दर्जाच्या व अपूर्ण विकासकामांना वृत्तपत्रांनी ठळक प्रसिध्दी द्यावी.

५) काही वृत्तपत्रे राजकारण्यांना फायदेशीर ठरतील, अशा विकासकामांच्या बातम्या देतात.

६) विकासकामांसंदर्भात योग्य माहिती घेऊन अचूक माहिती दिल्यास वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव निर्माण होतो.

७) चांगले विकासकाम करणाऱ्यालाही वृत्तपत्रांमधून प्रसिध्दी द्यावी, त्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळेल.

८) विकासकामांची उपयुक्तता व गुणवत्ता यासंदर्भात वृत्तपत्रांनी बातम्या देताना तडजोड करू नये.

९) विकासकामांच्या बातम्यांना छायाचित्रांची जोड द्यावी.

१०) वृत्तपत्रांनी विकासकामाच्या बातम्यांशी संबंधित शासकीय कार्यालयांचे पत्ते व फोन नंबर संबंधित बातमीमध्ये प्रसिध्द करावेत.

११) वृत्तपत्रांनी विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबत सादरीकरणाची पध्दती बदलावी. अर्थात, वर उल्लेख केलेले मुद्दे विचारात घेऊन वार्तांकन करावे.

१२) वृत्तपत्रांचे ग्रामीण भागातील विकासकामांकडे दुर्लक्ष होते.

१३) इतर राज्यातील चांगल्या विकासकामांचीही माहिती वृत्तपत्रांमधून द्यावी.

**विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांची जबाबदारी आणि वृत्तपत्रांकडून अपेक्षा याविषयी कंत्राटदारांची मते खालीलप्रमाणे.**

१) बातमी योग्य असेल तर विकासकामांचा दर्जा सुधारतो.

२) वृत्तपत्रांकडे तक्रारदर्शक बातमी आल्यास त्याची खातरजमा करावी. तसे न झाल्यास कंत्राटदारांना आर्थिक व मानसिक त्रास होतो.

३) विकासकामे करताना कंत्राटदारांना येणाऱ्या अडीअडचणींची माहिती वृत्तपत्रांनी द्यावी.

४) विकासाच्या दृष्टीने योग्य कामांचा वृत्तपत्रांनी पाठपुरावा करावा.

५) विकासकामांच्या उद्घाटनाच्या बातम्या जास्त प्रमाणात असतात.

६) वृत्तपत्रांमध्ये वस्तुस्थितीपेक्षा ऐकीव माहितीवर आधारित विकासकामांच्या बातम्या दिल्या जातात.

७) वृत्तपत्रांनी विकासकामांसंदर्भातील 'पेड न्यूज' टाळाव्यात. पेड न्यूज ही पत्रकारितेती कीड आहे. तिचे सर्वथैव निर्मूलन आवश्यक आहे.

वृत्तपत्रात विकासकामांच्या बातम्यांचे प्रमाण कमी असते, असे ९६ टक्के कंत्राटदारांना वाटते, तर १६ टक्के कंत्राटदारांनी वृत्तपत्रात स्वतःसंदर्भात आलेल्या बातम्यांचा वाईट अनुभव व्यक्त केला. २४ टक्के कंत्राटदारांना वृत्तपत्रीय बातम्यांचा चांगला अनुभव आला, तर ६० टक्के कंत्राटदारांनी आपण केलेल्या विकासकामांची वृत्तपत्रांनी दखल घेतली नाही, असे मत व्यक्त केले.

**वृत्तपत्रांची विकासकामांसंदर्भातील बातम्यांची जबाबदारी याबाबत विवेचन**

सामान्य लोकांशी निगडित असणाऱ्या विकासकामांवरील बातम्या, लेख, विशेष वृत्त, अग्रलेख देण्याची मोठी जबाबदारी वृत्तपत्रांवर असते. ही जबाबदारी काही वृत्तपत्रांनी व्यवस्थित पार पाडल्याचे अभ्यासात दिसून आले.

नवीन विकासकामांची उद्‌घाटने, विकासकामासंबंधीची आंदोलने आदींची माहिती वृत्तपत्रांनी जबाबदारीने लोकांना बातम्यांद्वारे दिली. विकासकामांची पूर्तता आवश्यकता किंवा त्यातील अडचणी याबाबत लेख किंवा विशेष वृत्ताद्वारे परिपूर्ण व मुद्देसूद माहिती दिल्याचे आढळून आले. विकासकामांबाबत शासकीय धोरण, निधीची कमतरता, विकासकामाबद्दल लोक जागृती व्हावी, या हेतूने वृत्तपत्रांनी समाजजागृतीसाठी अग्रलेख आणि स्तंभलेखाद्वारे वेळोवेळी परखड लिखाण केल्याचे दिसून आले.

म्हैसाळ, ताकारी, टेंभू यासारखे मोठे प्रकल्प रखडल्यानंतर काही वृत्तपत्रांनी आपली जबाबदारी ओळखून हे प्रकल्प का रखडले ? प्रकल्प पूर्ण करणे का गरजेचे आहे ? लोक प्रतिनिधींनी याविषयी काय केले पाहिजे ? या प्रश्नी जनतेने काय करावे ? याची सविस्तर चर्चा वृत्तपत्रातून बातमीद्वारे आणि लेखाद्वारे जबाबदारीच्या जाणीवेतून घडवून आणली, असे आढळून आले.

जी विकासकामे निकृष्ट दर्जाची होत आहेत व ज्या कामांमध्ये भ्रष्टाचार केलेला आढळला अशा बातम्यांना काही वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्ध दिलेली दिसून आली.

दर्जाहीन व निकृष्ट दर्जाच्या विकासकामांचे फोटो प्रसिद्ध करून वृत्तपत्रांनी लोकांच्यात अशा कामांबद्दल चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याचे वृत्तपत्रीय बातम्यांवरून दिसून आले. विकासकामांमुळे सामान्य नागरिक, व्यवसायिक यांच्यावर अन्याय होत असल्यास अशा बातम्याही दिलेल्या दिसून आल्या. तसेच विकासकामांना लागणाऱ्या वीट, वाळू, मुरूम, दगड या साहित्यांमुळे निसर्गाच्या, पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासावरही काही वृत्तपत्रांनी सडकून टिका केल्याचे दिसून आले.

विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रांच्या जबाबदारीबद्दल सामान्य जनतेला, कंत्राटदारांना तसेच शासकीय अधिकाऱ्यांना काय वाटते ? याचा ऊहापोहही या प्रकरणात केला आहे. निकृष्ट दर्जाच्या विकासकामांबरोबरच चांगल्या विकासकामांची बातमीही देण्याची जबाबदारी वृत्तपत्राची असल्याचे नागरिकांनी प्रश्नावलीद्वारे नमूद केले आहे. विकासकामांची उपयुक्तता व गुणवत्ता या संदर्भात बातम्या देताना वृत्तपत्रांनी तडजोड करून नये, असेही नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले.

तर विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांनी वृत्तपत्रांनी आलेली तक्रारदर्शक बातमी खातरजमा करून प्रसिद्ध करावी असे सांगितले. तसेच कंत्राटदारांना विकासकामे करताना येणाऱ्या अडचणींची माहितीही वृत्तापत्रांनी प्रसिद्ध करावी व विकासाच्या दृष्टीने योग्य कामांचा पाठपुरावा वृत्तपत्रांनी करावा असेहि कंत्राटदारांनी वृत्तपत्रांच्या जबाबदारीबद्दलचे मत मांडले.

## ४.३ : बातमीदाराची विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची नैतिकता

विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांबाबत वार्ताहरांचे मोठे योगदान असते. वार्ताहराने किती सखोल व अभ्यासपूर्ण माहिती दिली आहे? बातमीत किती पारदर्शकपणा आहे ? बातमीत सर्वंकष बाजू मांडली आहे का ? बातमी वस्तुस्थितीला धरून आहे का ? या मुद्दयांवर त्या बातमीचा परिणाम अवलंबून असतो. विकासकामांसंबंधी वरवरच्या व चुकीच्या माहितीआधारे दिलेल्या बातमीमुळे लोकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होते. त्यामुळे त्या विकासकामांवर बातमीचा वाईट परिणाम होऊ शकतो. तसेच चांगल्या विकासकामांबद्दल योग्य महिती दिल्यास संबंधित कंत्राटदाराचे किंवा शासकीय अधिकाऱ्याचे कौतुक होते आणि त्यांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे विकासकामांसंदर्भात बातम्या देताना बातमीदाराची नैतिकता महत्त्वाची आहे.

विकासकामांच्या बातम्या देणाऱ्या बातमीदाराची नैतिकता काय असावी ? यासाठी खालील मुद्दे अभ्यासले.

१) बातमीदारांनी दिलेल्या विकासकामांसंदर्भातील वेगवेगळ्या बातम्या अभ्यासल्या.

२) सर्वसामान्य वृत्तपत्र वाचकांशी चर्चा करून बातमीदारांबद्दलची मते आजमावली.

३) विकासकामांचे वृत्त देणाऱ्या बातमीदारांशी चर्चा करून नैतिकतेसंदर्भातील निरीक्षणे नोंदविली.

४) विकासकामांच्या बातम्या देणाऱ्या बातमीदारांबद्दलची शासकीय अधिकाऱ्यांची मते आजमवली.

५) विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांची बातमीदारांविषयीची मते जाणून घेतली.

**विकासकामांसंदर्भात विविध दैनिकांमध्ये वार्ताहरांनी लिहिलेल्या काही निवडक बातम्या खालीलप्रमाणे.**

१) मोरणा धरणाची उंची वाढविणे काळाची गरज

(पुढारी, विशेष वृत्त, दि. २० जानेवारी २००५, पान ५)

२) पन्नास वर्षात जत तालुक्यात केवळ वीस टक्के रस्त्यांचे डांबरीकरण

(पुढारी, विशेष वृत्त, दि. २५ जानेवारी २००५, पान १०)

३) घाटगेवाडी योजनेच्या कामाबद्दल विपर्यास्त बातम्या : मठ

( कॉन्ट्रॅक्टरचा खुलासा,केसरी, दि. ७ जून २००३, पान ९)

**फोटो क्रमांक : २२**



## घाटगेवाडी योजनेच्या कामाबद्दल विपर्यास्त बातम्या : मठ

*जत (प्रतिनिधि) : जत शहरासाठी असलेल्या नवीन घाटगेवाडी योजनेच्या कामाबद्दल विपर्यस्त बातम्या काही विघ्नसंतोषी लोकांमुळे येत असल्याची माहिती ठेकेदार रूद्रमणी मठ यांनी दिली आहे.*

घाटगेवाडी पाणीयोजना ही तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजना आहे. हे काम केवळ १२ दिवसात पूर्ण करून या जलवाहिन्यातून पाणी टाकले जात आहे. या कामासाठी लागणारे सर्व साहित्य आय. एस. आय. मार्क असलेले आहे. जलवाहिन्या टाकण्याच्या खुदाई नियमानुसार ३ फुटा एवढीच केली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या तांत्रिक बाबींची कसोशीने पूर्तता केली आहे. सलग तीन दिवस या योजनेतून पाणी सोडले जात आहे. मात्र एकाहि ठिकाणी जलवाहिनीत गळती नाही. काही विघ्नसंतोषी ठेकेदार त्यांना हे काम न मिळाल्याने ते या कामाची बदनामी करण्याचे कारस्थान करीत आहेत. या कामावरील केवल चोरून नेणे, विजेची पेटी फोडणे असे प्रकार विघ्नसंतोषी लोकांचेच आहेत, असेहि त्यांनी सांगितले.



४) अंकली जुन्या पुलाचे दगड मिरजेत असल्याचा अभियंत्यांचा दावा

(केसरी, अधिकाऱ्याचा खुलासा, दि. ६ नोव्हेंबर २००३, पान ३)

५) दिघंचीचा बंधारा चार वर्षे निधीअभावी अपूर्ण

( विशेष वृत्त, लोकमत, दि. ५ मार्च २००२, पान ७)

६) कापरी–इंगरूळमध्ये निकृष्ट कामामुळे शासनाचा निधी पाण्यात

( विशेष वृत्त, लोकमत, दि. २२ एप्रिल २००१, पान ५)

वरील बातम्यांवरून असे दिसून येते की, वार्ताहरांनी निकृष्ट विकासकामे, अपूर्ण विकासकामे, आवश्यक विकासकामे, बातम्यांबाबत संबंधितांचा खुलासा, विकासकामांबाबत जनजागृती, सामाजिक बांधिलकी आदींविषयी बातम्या, विशेष वृत्त आदींद्वारे ऊहापोह केलेला आहे.

वाचकांच्या सर्वेक्षणानुसार विकासकामांसंदर्भात योग्य बाजू मांडली जात नाही, असे ६६ टक्के लोकांनी सांगितले, तर विकासकामांच्या बातमीमध्ये पारदर्शकता नसते, असे २७ टक्के वाचकांनी सांगितले. काही प्रमाणात पारदर्शकता असते, असे ४२ टक्के वाचकांना वाटते. बातम्यांचा विकासकामांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतो, असे ९६ टक्के वाचकांनी सांगितले.

**विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची बातमीदाराची नैतिकता आणि बातमीदाराकडून अपेक्षा, याविषयी वाचकांची मते खालीलप्रमाणे –**

१) वार्ताहर अभ्यासू व जागरूक असल्यास त्या परिसरातील विकासकामांमधील भ्रष्टाचाराला आळा बसतो.

२) विकासकामांसंदर्भात कोणतीही तांत्रिक माहिती देताना, तज्ज्ञांकडून खातरजमा करून द्यावी. अन्यथा चुकीच्या बातमीमुळे विकासकामांवर वाईट परिणाम होईल.

३) बातमीचा पारदर्शकपणा बातमीदाराच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतो.

४) विकासकामांसंदर्भात वृत्त देणारा बातमीदार निर्भीड, निर्भय व निःस्पृह असावा.

५) वरवरच्या माहितीआधारे दिलेल्या बातमीमुळे लोकांमध्ये गैरसमज पसरतो. वार्ताहर किमान पदवीधर असेल, तर विकासकामांसंदर्भात त्याला सखोल, अभ्यासपूर्ण माहिती देता येईल.

६) वार्ताहर कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसावा.

७) वार्ताहराने माहितीच्या अधिकाराचा वापर करून लोकांपुढे सत्य परिस्थिती मांडावी.

८) वार्ताहर संबंधित अधिकाऱ्यांकडून विकासकामांसंदर्भात माहिती घेत नाहीत. जनमत किंवा लोकप्रतिनिधींच्या वक्तव्याचा आधार घेऊन मोघम स्वरूपाच्या बातम्या दिल्या जातात. विकासकामांमधील भ्रष्टाचाराबाबत जनतेने पुढाकार घेऊन आवाज उठवावा, अशा प्रकारचे लिखाण बातमीदाराकडून व्हावे.

९) विकासकामांसंदर्भातील बातमी बऱ्याच वेळा टीकात्मक असते.

१०) बातमीदार व कंत्राटदार यांचे चांगले संबंध असल्यास विकासकामांच्या बातमीत पारदर्शकता राहत नाही.

विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांच्या सर्वेक्षणानुसार २० टक्के कंत्राटदारांना असे वाटते की, वृत्तपत्रात विकासकामांसंदर्भात वस्तुस्थितीवर आधारित माहिती नसते. २८ टक्के कंत्राटदारांच्या मते विकासकामांच्या बातम्यांमध्ये पादरर्शकपणा नसतो, तर १२ टक्के कंत्राटदारांनी विकासकामांसंदर्भात हेतूपुरस्सर बातम्या दिल्या जात असल्याचे सांगितले. विकासकामांच्या ठिकाणी वार्ताहर येऊन परिपूर्ण माहिती घेऊन जातात, असे ३६ टक्के कंत्राटदारांनी सांगितले, तर १२ टक्के कंत्राटदारांनी वार्ताहर परिपूर्ण माहिती घेत नाहीत, असे सांगितले. तसेच ५२ टक्के

कंत्राटदारांनी विकासकामांच्या ठिकाणी बातमीदार माहिती घेण्यासाठी येत नाहीत, असे सांगितले.

**विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबतची बातमीदाराची नैतिकता आणि बातमीदाराकडून अपेक्षा, याविषयी प्रत्यक्ष विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांची मते खालीलप्रमाणे –**

१) विकासकामांसंदर्भात वार्ताहरांना योग्य माहिती मिळत नाही, किंवा दिली जात नाही, त्यामुळे प्रसिध्द झालेली बातमी पूर्णपणे बरोबर असेलच, असे नाही.

२) बातमीदारांनी विकासकामांसंदर्भात परिपूर्ण माहिती घेऊन बातमी दिल्यास त्या बातमीमध्ये पारदर्शकता येते.

३) विकासकामांबद्दल भडक बातम्या दिल्या जातात, तसेच काही बातम्यांमध्ये अतिशयोक्तीही असते.

४) वार्ताहराने विकासकामांसंबंधित तज्ज्ञांशी सल्लामसलत करून बातमी द्यावी.

५) विकासकामांसंदर्भात वस्तुनिष्ठ बातम्या द्याव्यात.

६) विकासकाम रखडले अथवा निकृष्ट दर्जाचे झाले तर त्याची बातमी येते, परंतु चांगले काम झाले तर त्याची वृत्तपत्राकडून दखल घेतली जात नाही.

७) विकासकामांवर चुकीची बातमी देणाऱ्या वार्ताहराला समज द्यावी.

८) लोकोपयोगी विकासकामांच्या बातमीमध्ये त्या विकासकामाचा तपशील द्यावा.

९) विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांना काही वेळा पत्रकारांकडून जाणूनबुजून त्रास दिला जातो.

१०) वार्ताहराने शासकीय अधिकारी, शासनाचा तांत्रिक प्रतिनिधी व विकासकामांशी संबंधित नागरिक यांच्याशी चर्चा करून बातमी द्यावी.

बातमीदाराने विकासकामांसंदर्भातील शासन निर्णयाची व शासकीय परिपत्रकांची माहिती करून घेतली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, अशा महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांकडून वेळोवेळी शासन निर्णय प्रसिध्द होत असतात. याची माहिती या विभागांच्या वेबसाईटवर किंवा संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये मिळू शकते. विकासकामांच्या बातम्यांमध्ये शासकीय निर्णयांची आणि परिपत्रकांची माहिती समाविष्ट केल्यास ती बातमी परिपूर्ण होऊ शकते.

**काही शासकीय निर्णयांची माहिती उदाहरणासाठी पुढीलप्रमाणे –**

१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग : शासन निर्णय क्र. संकीर्ण – २०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा–७

शासन निर्णय : ई–निविदा कार्यप्रणाली अवलंबण्याबाबत.

२) सार्वजनिक बांधकाम विभाग : शासन निर्णय क्र. सीएटी०१/०५ /प्र.क्र.२६/इमारती२

शासन निर्णय : नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था यांच्यातील कामवाटपाबाबत.

३) सामान्य प्रशासन विभाग : शासन निर्णय क्र. जाहिरात२००९/प्र.क्र.१३७/का–३४

शासन निर्णय : वृत्रपत्रांच्या शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करणेबाबत.

विकासकामांची तांत्रिक माहिती होण्यासाठी शासन निर्णयाची माहिती विकासकामांबाबत बातम्या देणाऱ्यांना असणे आवश्यक आहे. त्यामुळे बातमी सखोल, अभ्यासपूर्ण व परिपूर्ण होते.

**विकासकामांसंदर्भात बातम्या देणाऱ्या वार्ताहरांची मते खालीलप्रमाणे –**

१) नागरिकांची दीर्घकालीन समस्या सुटल्यास त्या विकासकामाचे बातम्यांद्वारे आम्ही कौतुक करीत असतो.

२) विकासकामांचा पंचनामा करताना आम्ही त्यातील चांगल्या गोष्टीही मांडतो.

३) बातमीदारांना वृत्तपत्रात विकासकामांवर विशेष लेख लिहिण्यास कमी जागा मिळते, त्यामुळे त्यांना बातम्यांवरच समाधान मानावे लागते.

४) वृत्तपत्रांमध्ये योग्य बातमी आल्यास अधिक तपशिलासाठी नागरिकांकडून आमच्याकडे विचारणा होते.

५) दर्जाहीन कामांवर तांत्रिकदृष्ट्या लिखाण केल्यास वरिष्ठ शासकीय अधिकारी व राजकारणी लोक त्याची दखल घेतात, तसेच या प्रश्नी बातम्यांमुळे नागरिकांकडूनही अनेकदा आंदोलने केली जातात.

६) भीडभाड न ठेवता वस्तुनिष्ठ लिखाण केल्यास विकासकाम त्वरित मार्गी लागते.

**बातमीदाराची नैतिकता**

विकासकामासंदर्भात वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांबाबत वार्ताहरांचे मोठे योगदान असते असे आढळून आले. प्रत्यक्ष कामावर जाऊन किंवा संबंधित शासकीय अधिकारी, कंत्राटदार यांना भेटून माहिती घेऊन बातमी, लेख, विशेष वृत्त प्रसिद्ध केल्याचे वृत्तपत्रीय बातम्यांवरून दिसून आले. विकासकामांवर बातम्या देताना वार्ताहराला नैतिकता पाळावीच लागते. विकासकामांवर वरवरच्या व चुकीच्या माहितीआधारे बातमी दिल्यास त्याचा विकासकामांवर परिणाम होतो असे मुलाखत देणाऱ्या कंत्राटदारांनी सांगितले.

योग्य व तांत्रिक माहितीसह बातमी दिल्यानंतर संबंधित नागरिकांकडून फोन आले आणि विकासकामाबद्दल सविस्तर माहिती घेतली, असे बऱ्याच वार्ताहरांनी सांगितले. काही वेळा विपर्यस्त करणाऱ्या बातम्या वार्ताहरांनी दिल्याचे आढळून आले. त्यामुळे त्याचा खुलासा छापण्याची वेळ वृत्तपत्रांवर आल्याचे दिसून आले.

काही बातम्यांवरून असेहि दिसून आले की निकृष्ट विकासकामे अपूर्ण विकासकामे अनावश्यक विकासकामे तसेच विकासकामाबद्दल जनजागृती, सामाजिक बांधिलकी आदींविषयी बातम्या आणि विशेष वृत्तांद्वारे ऊहापोह केला आहे.

वार्ताहारांच्या नैतिकतेविषयी बोलताना सामान्य नागरिकांनी सांगितले की वार्ताहर अभ्यासू व जागरूक असला पाहिजे. तांत्रिक गोष्टींची त्याने तज्ज्ञांकडून खातरजमा केली पाहिजे. त्याच्या बातमीत पारदर्शकता असली पाहिजे. तो निर्भड, निर्भय आणि निःस्पृह असला पाहिजे. त्याचा राजकीय पक्षाशी किंवा कंत्राटदाराशी संबंध नसावा. विकासकामांवर चुकीची बातमी देणाऱ्या वार्ताहराला समज द्यावी, अशी अपेक्षा कंत्राटदारांनी व्यक्त केली.

### ४.४ विकासकामांबाबतच्या बातम्यांचे सादरीकरण

विकासकामाची बातमी कशी लागली आहे यावरच वृत्तपत्राचा विकासकामांवरचा प्रभाव अवलंबून असतो.

बातमी कोणत्या पानावर आहे ?

बातमी फोटोसह आहे की नाही ?

बातमी रंगीत आहे का ?

आकर्षक शीर्षक काय दिले आहे ?

उपशीर्षके काय आहेत?

चौकटी आहेत का ?

हे घटक बातम्यांच्या सादरीकरणात महत्त्वपूर्ण ठरतात. बातमीचे सादरीकरण योग्य प्रकारे झाले असेल तर ती बातमी पाहिली अथवा वाचली जाते, त्या बातमीची चर्चा होते. नागरिक, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी आदिंकडून त्याची दखल घेतली जाते. त्यामुळे त्या बातमीचा प्रभाव जाणवतो.

विकासकामांबाबतच्या बातम्यांचे सादरीकरण कसे असते, हे अभ्यासण्यासाठी पुढारी, केसरी आणि लोकमत या प्रमुख वृत्तपत्रांच्या सांगली आवृत्त्यांची निवड केली. विश्लेषणासाठी वरील वृत्तपत्रांचे फेब्रुवारी २००१, एप्रिल २००१, मार्च २००२, ऑक्टोबर २००२, जून २००३ आणि नोव्हेंबर २००३ या सहा महिन्यांचे अंक अभ्यासले. या निवडलेल्या कालावधीत दररोज विकासकामांच्या किती चौरस सेंटीमीटर बातम्या प्रसिध्द झाल्या, हे वर्गीकरण करून अभ्यासले. विकासकामांच्या बातम्या कोणत्या पानावर प्रसिध्द झाल्या आहेत? ती बातमी रंगीत आहे की कृष्णधवल? बातमीस फोटोची जोड आहे की नाही? या दृष्टिकोनातूनही अभ्यास केला.

**विश्लेषणासाठी निवडलेल्या महिन्यातील प्रसिध्द झालेल्या विकासकामांच्या काही बातम्या पुढीलप्रमाणे :**

# विविध दैनिकांमधील विश्लेषणासाठी निवडलेल्या महिन्यातील विकासकामांसंदर्भातील निवडक वृत्ते

**फोटो क्रमांक : २३**


अडथला शर्यतीचा अनुभव घ्यायचाय? मिरजेतील रस्त्यांवरून प्रवास करा!

मिरजेमध्ये म. फुले चौकातील मुख्य रस्त्यावर खड्डे पडल्याने रहदा
निर्माण होत असून खड्डे मुजविण्याकडे महापालिकेचे दुर्लक्ष झा

मिरज (वार्ताहर) : मिरज
त व उपनगरांमध्ये मुख्य
वर असलेल्या अडथळ्यामुळे
ालकांना 'अडथळ्याच्या
' भाग घेतल्याचा अनुभव
ला असून, महापालिका
त्वरित मुख्य रस्त्यांवर
अडथळे दूर करावेत,
होत आहे.
अनेक रस्त्यांवर

दूरसंचार कंपन्यांनी आपल्या वाहिन्या टाकण्यासाठी काढलेले मोठमोठाले खड्डे यामुळे संपूर्ण शहरातील रस्ते झिगझॅग पद्धतीचे झाले आहेत. त्यातच ठिकठिकाणी प्रशासनाने गतिरोधक बसविल्याने प्रवाशांना त्रास होत आहे.
सांडपाण्याची व्यवस्था

खड्डा रस्त्यावरच आलेला आहे. या कारणामुळे वाहन चालवणे जिकीरीचे बनत चालले आहे.
वास्तविक पाहता मिरज शहरही

कर्नाटकात जाण्यास
बसस्थानक, मध्य रे
शासकीय वैद्यकीय म
सगळ्यात महत्त्वाचे

**दैनिक पुढारी – ८ नोव्हेंबर २००३ मधील वृत्त**

**बातमीची वैशिष्ट्ये :**

१) बातमी पान नं. १३ वर प्रसिद्ध (सांगली वार्ता पान नं. १)

२) रंगीत बातमी

३) बातमीला अनुषंगिक फोटो

४) मिरजेतील मुख्य चौकात बऱ्याच दिवसांपासून असलेल्या खड्ड्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी बातमीद्वारे प्रयत्न

५) बातमीकडे वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आकर्षक शीर्षक

# विविध दैनिकांमधील विश्लेषणासाठी निवडलेल्या महिन्यातील विकासकामांसंदर्भातील निवडक वृत्ते

**फोटो क्रमांक : २४**



## रखडलेल्या प्रकल्पांमुळे दुहेरी नुकसान

कोल्हापूर (श्रीराम पवार) :
ठरलेल्या मुदतीत कृष्णा खोऱ्यातले हाती
घेतलेले प्रकल्प पूर्ण करणं महामंडळाला
मलं नाही. मुदत संपली त्यालाही दोन
उलटून गेली आहेत आणि आता तर
च्या टंचाईचं अभूतपूर्व संकट उभं
यात सुरू केलेल्या, बरचसं काम
या प्रकल्पाचं, त्यात झालेल्या
ी रुपयांच्या गुंतवणुकीचं काय?
निर्माण होत आहे. अशा
ल्पांची संख्या फार मोठी
पूर जिल्ह्यातले तर बरेचसे
रे प्रकल्प अर्धवट स्थितीत
ष्णा खोरे महामंडळानं
आहेत त्या बहुतांशी
ना. टप्प झालेल्या
गुंतवणूक अडकली,

कालावधीसाठी झाली. मे २००० पर्यंत ५६० टी.एम.सी. पाणी अडवणं हेच महामंडळापुढचं लक्ष्य होतं. निदान दाखवलेलं लक्ष्य तरी हेच होतं. प्रत्यक्षात सुरुवातीच्या सुगीच्या काळात करता येईल तितकी उधळपट्टी झाल्याचं चित्र दिसेल आणि पैशाचा पुरवठा अडला तसा महामंडळाच्या कामावरही परिणाम झाला.

### कृष्णा खोरे चक्रव्यूहात

ठरल्याप्रमाणं मे २००० पर्यंत सारं पाणी अडलं असतं, कालवे बांधून शिवारापर्यंत पाण्याची गोष्ट दूरची, तरी वेगळे महामंडळ करण्याचं चीज झालं असतं. महामंडळ स्थापन होण्यापूर्वी पाटबंधारे प्रकल्पांच्या कामाची गती फारच कमी होती. ती कृष्णा

सांगण्यात येतं. कोयनेसारखं मोठं
आंध्रचा आक्षेप असतानाही
निर्मितीचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून
केलं गेलं. यात तत्कालीन धुरि
विचार होता तो, विजेमुळे औद्यो
प्रगती साधेल आणि महारा
विकासात त्यालाच प्राधान्य
गरज आहे. हा एक दृष्टिकोन अस
पण त्यातून पाटबंधारे प्रकल्प
सिंचनक्षमता वाढवण्याकडे दुर्लक्ष
नाकारता येणार नाही.

कृष्णा खोरे महाम
स्थापनेनंतर कामांचा वेग वा
कारणं काहीही असोत उपल
विचार करून एकावेळी
करायची याचं भान ठेवलं

**दैनिक पुढारी – ६ ऑक्टोबर २००२ मधील वृत्त**

**बातमीची वैशिष्ट्ये :**

१) बातमी पान नं. १ वर प्रसिद्ध

२) रंगीत बातमी

३) ‘कृष्णा खोरे चक्रव्यूहात’ वृत्तमालिका

४) रखडलेल्या प्रकल्पांमुळे होणाऱ्या नुकसानीची विश्लेषणाद्वारे जनजागृती

५) ‘कृष्णा खोरे’चे प्रकल्प का रखडत आहेत, याची सविस्तर माहिती लेखाद्वारे दिली आहे.

# विविध दैनिकांमधील विश्लेषणासाठी निवडलेल्या महिन्यातील विकासकामांसंदर्भातील निवडक वृत्ते

**फोटो क्रमांक : २५**


पुढारी सांगली वार्ता

कृष्णा खोरे प्रकल्पाच्या प्रश्नावरही जरा 'शक्तिप्रदर्शन' करा

**दैनिक पुढारी – ६ जून २००३ मधील वृत्त**

**बातमीची वैशिष्ट्ये :**

१) बातमी पान नं. १३ वर प्रसिद्ध (सांगली वार्ता पान नं. १)

२) रंगीत बातमी

३) बातमीला अनुषंगिक फोटो

४) विकासकामांवरील विशेष वृत्त

५) कृष्णा खोरे प्रकल्पाला निधी उपलब्ध होण्यासाठी लोकप्रतिनिधी व लोकांनी दबाव निर्माण करावा, यासाठी बातमीद्वारे प्रयत्न

# विविध दैनिकांमधील विश्लेषणासाठी निवडलेल्या महिन्यातील विकासकामांसंदर्भातील निवडक वृत्ते

**फोटो क्रमांक : २६**



## टेंडर न फोडताच कामे वाटून घेण्याचा ठेकेदारांचा प्रयत्न

### चार तासांच्या घोळानंतर जि.प. अध्यक्षांनी अखेर टेंडर फोडले

सांगली (प्रतिनिधी) : जिल्हा परिषदेकडील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांच्या १३ कामांचे टेंडर न फोडताच कामे वाटून घेण्याचा ठेकेदारांनी चालविलेला प्रयत्न तब्बल चार तासांच्या घोळानंतरही असफलच ठरला. जि.प. अध्यक्ष प्रवीण धेंडे यांनी तांत्रिक मुद्दा उपस्थित करून अखेर आज टेंडर फोडले.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील येळावी, ...पोली, शेटफळे, कवठेमहांकाळ, ...खेड, नवेखेड या सहा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल ...च्या १३ कामांचे टेंडर आज ...ण्यात येणार होते. सुमारे ५५ लाख रुपये अंदाजपत्रकीय खर्चाची कामे आहेत. १९ जून रोजी कामांची टेंडर स्वीकारण्याची अंतिम मुदत होती. या दिवशी टेंडर भरताना ठेकेदारांमध्ये नेहमीप्रमाणे साखळी होऊ शकली नव्हती. त्यामुळे स्पर्धात्मक पद्धतीमुळेच टेंडर भरण्यात आले होते. त्यामुळे बहुतेक ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा कमी दरानेच टेंडर भरले होते. शेवटी आज टेंडर फोडण्याच्या शेवटच्या दिवशी ठेकेदारांना या स्पर्धात्मक पध्दतीने टेंडर भरल्यामुळे आपले नुकसान होणार असल्याचा साक्षात्कार झाला. त्यामुळे त्यांनी टेंडर न फोडताच ही कामे अंदाजपत्रकीय दरानेच करण्याचा बेत आखला होता. तशी सर्व फिल्डींगही लावली होती. मात्र एका ठेकेदाराने यामध्ये कोलदांडा घातल्याने इतरांचा मनसुबा अखेर धुळीस मिळाला.

आज दुपारी १२ वाजता ही टेंडर फोडण्यात येणार होती मात्र ठेकेदारांच्या या घोळामुळे सुमारे चार ते साडेचार तास उशीरा टेंडर फोडण्याची प्रक्रिया सु... झाली. जिल्हा परिषद अध्यक्षां... केबिनमध्ये ही प्रक्रिया सुरू असता बाहेर ठेकेदारांनी मात्र घोळ चालवि... होता. बाहेर सुरू असलेल्या गोंधळ... अध्यक्ष धेंडे यांनी दखल घेऊन त... समजही देण्यात आली. ठेकेदा... अध्यक्ष धेंडे यांच्याकडे ही प्रक्रिया रद्द करून फेर टेंडर काढ... विनंती केली. शेवटी एक... वातावरण पाहून धेंडे यांनी त... मुद्दा उपस्थित करून अखेर आ... फोडले. याप्रसंगी उप... अशोकराव शिंदे, उपमुख्य का... अधिकारी सुरेश बेदमुथा ... अधिकारी उपस्थित होते.

**दैनिक पुढारी – २६ जून २००३ मधील वृत्त**

**बातमीची वैशिष्ट्ये :**

१) बातमी पान नं. १ वर प्रसिद्ध

२) रंगीत बातमी

३) विकासकामांच्या टेंडरमधील भ्रष्टाचारावर आधारित बातमी

४) स्पर्धात्मक टेंडर न होण्यामुळे शासनाच्या आर्थिक नुकसानीवर प्रकाशझोत

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

**दैनिक पुढारी – फेब्रुवारी २००१**

**(दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)**

१) १ फेब्रुवारी टेंभू योजनेच्या वाळूची विटा शहरात राजरोज विक्री (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. २

२) १ फेब्रुवारी बांधकाम खात्याच्या उपविभागाअभावी पलूस तालुक्यात विकासकामांना मर्यादा (विशेष वृत्त) पान नं. ९

३) ३ फेब्रुवारी जिल्ह्यातील कामांसाठी विकास मंडळ स्थापन करणार – खासदार प्रकाशबापू पाटील (शासकीय निर्णय) पान नं. ३

४) ६ फेब्रुवारी कऱ्हाड–विजापूर रस्त्याच्या बाजूची अतिक्रमणे काढण्याची मागणी (लोकांची मागणी) पान नं. २

५) ७ फेब्रुवारी शेरीनाला शुद्धीकरण – सुधारित आराखडा सादर करण्याचे आदेश (शासकीय निर्णय) पान नं. ७

६) ८ फेब्रुवारी नागरी सुविधांसाठी सहकार्य हवे (वाचकांची पत्रे) पान नं. १०

७) ९ फेब्रुवारी तासगाव तालुक्यातील १२ बंधाऱ्यांच्या कामाचे नियोजन – आर. आर. पाटील (शासकीय निर्णय) पान नं. ७

८ १३ फेब्रुवारी विटा येथील व्ही. टाईप गटारीच्या चौकशीची मागणी (भ्रष्टाचार) पान नं. ९

९) २२ फेब्रुवारी वारणा धरणाच्या निकृष्ट कामांच्या चौकशीची मागणी (भ्रष्टाचार) पान नं. ७

## विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. ८

२००१ – फेब्रुवारी दैनिक पुढारी (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५९ | १२९ | ३०४ | | | | | ६९२ |
| २ | ० | | | | | | | ०० |
| ३ | २६६ | | | | | | | २६६ |
| ४ | ० | | | | | | | ०० |
| ५ | ४२० | | २५२ | | | | | ६७२ |
| ६ | २३४ | | | | | | | २३४ |
| ७ | ११७ | | | ३५२ | | | | ४६९ |
| ८ | ३८२ | | | | | ४८ | | ४३० |
| ९ | ३४० | | | १६२ | | ४८ | | ५५० |
| १० | ४० | | | | | ३० | | ७० |
| ११ | ९० | | | | | | | ९० |
| १२ | ० | | | | | | | ०० |
| १३ | ३० | १०० | | | | | | १३० |
| १४ | ४० | | १७१ | ३३९ | | | | ५५० |
| १५ | २८१ | | | | | | | २८१ |
| १६ | ७८ | | | | | | | ७८ |
| १७ | ० | | | | | | | ०० |
| १८ | ० | | | | | | | ०० |
| १९ | ८१ | | | | | | | ८१ |
| २० | १६८ | | | १६२ | | | | ३३० |
| २१ | ८० | | | | | | | ८० |
| २२ | ११८ | ९८ | | | | | | २१६ |
| २३ | ९९ | | | | | | २५३ | ३५२ |
| २४ | ० | | | | | | | ०० |
| २५ | ३६६ | | | | | | | ३६६ |
| २६ | ० | | | | | | | ०० |
| २७ | ९० | | | | | | | ९० |
| २८ | ० | | | | | | | ०० |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| **एकूण** | **३५७९** | **३२७** | **७२७** | **१०१५** | **००** | **१२६** | **२५३** | **६०२७** |

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

**दैनिक पुढारी – एप्रिल २००१**

**(दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)**

१) १ एप्रिल माडग्याळ पाणीपुरवठा योजनेच्या निकृष्ट कामाच्या चौकशीची मागणी (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. ९

२) १ एप्रिल निधीअभावी कांदे पाणी योजनेचे काम रेंगाळले – (विशेषवृत्त) पान नं. १०

३) २ एप्रिल टेंडर निघण्यापूर्वी कामाचा ठेका देण्याचा अजब प्रकार (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. ९

४) २ एप्रिल पावलेवाडी (ता. शिराळा) तलावाच्या दुरुस्तीस प्रारंभ, ग्रामस्थांतून समाधान (बातमी) पान नं. ९

५) ४ एप्रिल युतीच्या काळात नियोजन न झाल्यामुळेच कृष्णा खोऱ्याची कामे रखडली – आम. म्हेत्रे (राजकीय बातमी) पान नं. ३

६) ४ एप्रिल बेकायदा सुरक्षा ठेव घेतल्याने जिल्हा परिषद ठेकेदारांत नाराजी (विशेष वृत्त) पान नं. ७

७) ६ एप्रिल डाव्या कालव्याचे काम सुरू करण्याच्या आश्वासनानंतर शेतमजूर शेतकऱ्यांचे ठिया आंदोलन मागे (आंदोलनाची बातमी) पान नं. ३

८) ९ एप्रिल मिरजपूर्व भागातील खराब रस्त्यांच्या चौकशीची मागणी (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. ८

९) १० एप्रिल रांजणी रस्ता सुधारावा (वाचकांची पत्रे) पान नं. १०

१०) ११ एप्रिल कृष्णेचे करोडपती (विशेष वृत्त) पान नं. ३

११) १५ एप्रिल येलूर, कामेरीसाठी स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजना – आ. शिवाजीराव नाईक (शासकीय निर्णय) पान नं. ७

१२) १८ एप्रिल टेंभू प्रकल्पाच्या ६० कोटींच्या कामासाठी ठेकेदारात रस्सीखेच (बातमी) पान नं. १

१३) २१ एप्रिल टेंभू निविदा प्रक्रियेसाठी पोलीस बंदोबस्त; चार दिवसांच्या रस्सीखेचीनंतर कंत्राटदारात ६० कोटींच्या कामाबाबत तडजोड (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. १

१४) २४ एप्रिल टेंभूच्या वादग्रस्त निविदा प्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे धाव; काँग्रेस आमदारांच्या चौकशीच्या मागणीमुळे अधिकारी-कंत्राटदारांचे धाबे दणाणले (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. १

१५) २७ एप्रिल आरफळ बोगद्याचे काम प्रगतिपथावर (विशेष वृत्त) पान नं. ९

## विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. ९

२००१ – एप्रिल — दैनिक पुढारी — (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५३ | १६५ | ५९५ | | | | | ९१३ |
| २ | १०८ | १५३ | ११२ | | | | | ३७३ |
| ३ | ० | | | | | | | ०० |
| ४ | १२६ | | १६८ | | | | | २९४ |
| ५ | ९९ | | | | | | | ९९ |
| ६ | ४३८ | | | | | | | ४३८ |
| ७ | २५ | | ३८० | | | | | ४०५ |
| ८ | ० | | | | | | | ०० |
| ९ | ३६४ | १२६ | | | | | | ४९० |
| १० | २७० | | | | | ७५ | | ३४५ |
| ११ | १०८ | | १०० | | | | १३८ | ३४६ |
| १२ | १४० | | | | | | | १४० |
| १३ | ० | | | | | | | ०० |
| १४ | ० | | | | | | | ०० |
| १५ | १२६ | | | १९६ | | २० | | ३२२ |
| १६ | ० | | | | | | | २० |
| १७ | २१६ | | | १४० | | | | ३५६ |
| १८ | ३३१ | ८१ | | | | | | ४१२ |
| १९ | ७२ | | | | | | | ७२ |
| २० | १६ | | | | | | | १६ |
| २१ | ० | १४४ | | | | | | १४४ |
| २२ | ३११ | ८४ | २५६ | | | | | ६५१ |
| २३ | १४० | | १५४ | | | | | २९४ |
| २४ | ० | १९२ | | | | १६ | | २०८ |
| २५ | ० | | | | | | | ०० |
| २६ | ० | | २०७ | | | | | २०७ |
| २७ | ० | | ४४६ | | | | ४२० | ८६६ |
| २८ | २४० | | | | | | | २४० |
| २९ | ० | ६० | ३६० | | | | | ४२० |
| ३० | ० | | | | | | | ०० |
| | | | | | | | | |
| **एकूण** | **३२८३** | **१००५** | **२७७८** | **३३६** | **००** | **१११** | **५५८** | **८०७१** |

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

**दैनिक पुढारी – मार्च २००२**

**(दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)**

१) १ मार्च धोंडगेवाडीचा रस्ता असून अडचण नसून खोळंबा (विशेष वृत्त) पान नं. ८

२) १ मार्च टेंभू–ताकारीसाठी सरकारने भरीव आर्थिक तरतूद करावी – पृथ्वीराज देशमुख यांची माहिती (बातमी) पान नं. १०

३) २ मार्च टेंभू–ताकारी प्रकल्पासाठी भरीव तरतुदीचा प्रयत्न – पाटबंधारे मंत्री अजित पवार (बातमी) पान नं. ३

४) ७ मार्च निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांचा काळ्या यादीत समावेश – स्थायी समितीचा निर्णय (बातमी) पान नं. ७

५) ७ मार्च माणगंगा नदीवरील बंधारा पूर्तता एक मृगजळ (विशेष वृत्त) पान नं. ८

६) ७ मार्च ड्रेनेजच्या कामामुळे शंभरफुटी रोडजवळ वाहतुकीची कोंडी (विशेष वृत्त) पान नं. ९

७) ८ मार्च निधी अभावी कांदे पाणीपुरवठा योजना रेंगाळली (विशेष वृत्त) पान नं. ७

८) ९ मार्च माडग्याळ येथील निकृष्ट दर्जाच्या खडीकरणाच्या कामाच्या चौकशीची मागणी (भ्रष्टाचाराची बातमी) पान नं. ८

९) १३ मार्च रस्त्याचे प्राणघातक खड्डे (वाचकांची पत्रे) पान नं. १०

१०) १८ मार्च अंतिम टप्प्यात निधी अभावी टेंभू योजना रखडली (विशेष वृत्त) पान नं. ७

११) २० मार्च कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पासाठी २०० कोटींची तरतूद करू – मुख्यमंत्री (बातमी) पान नं. १

१२) २४ मार्च पणुंब्रे पाणी योजना रखडल्याने ग्रामस्थांचे पाण्याविना हाल (बातमी) पान नं. ७

विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. १०

२००२ – मार्च — दैनिक पुढारी — (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३० | | २४७ | | | | | ३७७ |
| २ | ३८२ | | | | | | | ३८२ |
| ३ | १३० | | | | | | | १३० |
| ४ | ० | | | | | | | ०० |
| ५ | ८१ | | | | | | | ८१ |
| ६ | ० | | | | | | | ०० |
| ७ | १३५ | | ३९६ | | | | | ५३१ |
| ८ | ० | | १६८ | | | | १५३ | ३२१ |
| ९ | ० | २४४ | | | | | | २४४ |
| १० | ० | | ३२४ | | | | | ३२४ |
| ११ | ० | | | | | | | ०० |
| १२ | ० | | | | | | | ०० |
| १३ | ० | | | | | ४५ | | ४५ |
| १४ | ० | | | | | | | ०० |
| १५ | १४३ | | | | | | | १४३ |
| १६ | ५३५ | | | | | | | ५३५ |
| १७ | ८१ | | | | | ६९ | | १५० |
| १८ | ० | | ४०५ | | | | | ४०५ |
| १९ | ० | | | | | | | ०० |
| २० | १९४ | | | | | | | १९४ |
| २१ | ० | | | | | | | ०० |
| २२ | २४० | | | | | | | २४० |
| २३ | २३९ | | | | | | १६९ | ४०८ |
| २४ | १५० | | | | | | | १५० |
| २५ | ७७ | | | | | | | ७७ |
| २६ | १०४ | | २३४ | | | | | ३३८ |
| २७ | ९० | | | | | | | ९० |
| २८ | ० | | | | | | २१६ | २१६ |
| २९ | ० | | | | | | | ०० |
| १९ | ० | | | | | | | ०० |
| २० | १६५ | | | | | | | १६५ |
| २१ | १४२ | १४४ | ११७ | | | | | ४०३ |
| २२ | १४६ | | | | | | | १४६ |
| २३ | १३० | | | | | | | १३० |
| २४ | ३५ | | ३२४ | | | | | ३५९ |
| २५ | २६४ | | | | | | | २६४ |
| २६ | ९० | | ३९१ | | | | | ४८१ |
| २७ | २५० | | | | | | | २५० |
| २८ | ३१४ | | | | | | | ३१४ |
| २९ | १९० | | १४० | | | | | ३३० |
| ३० | ० | | | | | | | ०० |
| ३१ | ० | | | | | | | ०० |
| **एकूण** | **३८४१** | **१४४** | **१२९६** | | **३९०** | | **१५०८** | **७१७९** |

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

**दैनिक लोकमत – ऑक्टोबर २००२**
**(दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)**

| | | |
|---|---|---|
| १) | २ ऑक्टोबर | पंतप्रधान सडक योजनेतून ८ कोटीची रस्त्यांची कामे (विशेष वृत्त) पान ७ |
| २) | ३ ऑक्टोबर | कारंदवाडीत रस्त्याच्या कामास प्रारंभ (बातमी) पान ३ |
| ३) | ५ ऑक्टोबर | कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करावा – पवार (पत्रकार परिषद) पान २ |
| ४) | ८ ऑक्टोबर | आरफळचे काम अडीच हजार महिन्यात पूर्ण करणार – आर. आर. पाटील (बातमी) पान ७ |
| ५) | ८ ऑक्टोबर | सलगरे–कोगनोळी रस्त्याची दुरवस्था (बातमी) पान ९ |
| ६) | १५ ऑक्टोबर | शेरीनाल्यावर कायमस्वरूपी बंधारा घालण्याचा विचार (बातमी) पान ७ |
| ७) | १९ ऑक्टोबर | ताकारी, म्हैसाळ, टेंभू, आरफळ योजनांचे वास्तव व भवितव्य समस्या – व्ही. वाय. पाटील (स्तंभलेख) पान ४ |
| ८) | २० ऑक्टोबर | कृष्णा खोरे महामंडळाच्या कंत्राटदारांनी महामार्ग रोखला (बातमी) पान ३ |
| ९) | २३ ऑक्टोबर | विटा नगरपरिषदेच्या विकास कामांची चौकशी करावी – नगरसेवक गायकवाड यांची मागणी (भ्रष्टाचारासंदर्भातील बातमी) पान ७ |
| १०) | २९ ऑक्टोबर | तुंग–बावची पाणी पुरवठा योजनेबाबत संभ्रमावस्था (विशेषवृत्त) पान ९ |
| ११) | ३० ऑक्टोबर | महापालिका नागरी सुविधा देणार काय ? (वाचकांची पत्रे) पान ४ |

## विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. २५

२००२ – ऑक्टोबर — दैनिक लोकमत — (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | | | | | | | ०० |
| २ | १०४ | | ६४ | | | | | १६८ |
| ३ | ३४४ | | | | | | | ३४४ |
| ४ | १०४ | | | | | | | १०४ |
| ५ | ४८८ | | | | | | ३६० | ८०८ |
| ६ | ० | | | | | | | ०० |
| ७ | ० | | | | | | | ०० |
| ८ | २६८ | | | | | | | २६८ |
| ९ | २०० | | | | | | ३६० | ५६० |
| १० | ६४ | | | | | | | ६४ |
| ११ | ११२ | | | | | | | ११२ |
| १२ | १३६ | | | | | | | १३६ |
| १३ | ० | | | | | | | ०० |
| १४ | ३९१ | | | | | | | ३९१ |
| १५ | ८० | | | | | | | ८० |
| १६ | ० | | | | | | | ०० |
| १७ | ८८ | | | | | | | ८८ |
| १८ | २०० | | | | | | | २०० |
| १९ | २८८ | | | | ३४० (स्तंभलेख) | | | ६२८ |
| २० | १६० | | | | | | | १६० |
| २१ | ० | | | | | | १८० | १८० |
| २२ | ३३२ | | | | | | | ३३२ |
| २३ | १७१ | | | | | | | १७१ |
| २४ | १३२ | | | | | | | १३२ |
| २५ | ० | | | | | ४० | | ४० |
| २६ | ० | | | | | | | ०० |
| २७ | ० | | १०८ (फोटो) | | | | | १०८ |
| २८ | ० | | | | | | | ०० |
| २९ | ० | | १४४ | | | | | १४४ |
| ३० | ० | | | | | ४० | | १६८ |
| ३१ | ० | | | | | | | ०० |
| **एकूण** | **३७५०** | | **३१६** | | **३४०** | **८०** | **९००** | **५३८६** |

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

## दैनिक लोकमत – जून २००३
## (दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)

| | | |
|---|---|---|
| १) | ३ जून | पद्माळे येथील ग्रामसभेत विकासकामांवर चर्चा (बातमी) पान ७ |
| २) | ४ जून | जलसंधारणात भ्रष्टाचार होईपर्यंत आपण काय करता होता ?<br>– जिल्हा परिषद सदस्य धेंडे, जिल्हा परिषद सदस्य |
| ३) | ४ जून | कांचन बाबर यांना सवाल (भ्रष्टाचारासंदर्भात बातमी) पान ७ |
| ४) | ७ जून | पाण्याच्या नियोजनाची गरज (अग्रलेख) पान ४ |
| ५) | ९ जून | विकास प्रकल्प राबविताना स्थानिक मताला प्राधान्य हवे –<br>मेधा पाटकर (बातमी) पान ५ |
| ६) | १० जून | जलसंधारण योजनेंअंतर्गत ८ लाखाची कामे (कवठेमहांकाळ)<br>(बातमी) पान ८ |
| ७) | १३ जून | कृष्णा खोरे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लोकसहभाग आवश्यक –<br>अधीक्षक अभियंता घाटे (व्याख्यानमाला) पान ७ |
| ८) | १५ जून | महापालिकेकडून नियमबाह्य कामे झाल्याचा लेखापरीक्षकांचा<br>आक्षेप – ७ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा माजी आमदार<br>दिनकर पाटील यांचा आरोप (भ्रष्टाचारासंदर्भात बातमी) पान १ |
| ९) | १६ जून | चुकीच्या नियोजनामुळे ताकारी–म्हैसाळ योजना अपूर्ण –<br>कागवाडे (बातमी) पान ६ |
| १०) | १६ जून | महापालिकेकडून लोकांचा अपेक्षाभंग (लोकांच्या अपेक्षा)<br>(मुलाखती–समस्या) पान ८ |
| ११) | १६ जून | पाणी शुद्धीकरणाची महापालिकेची धुळगाव योजना<br>(विशेषवृत्त) पान ८ |

| | | |
|---|---|---|
| १२) | १७ जून | दुष्काळ व ओसाडीकरणाच्या मुकाबल्याची गरज – श्रीनिवास महाबळ (स्तंभलेख) पान ४ |
| १३) | १८ जून | महाराष्ट्रात 'जोहड'चा प्रयोग करावा (जोहड म्हणजे छोटे धरण) (वाचकांची पत्रे) पान ४ |
| १४) | १९ जून | पाणी रे पाणी तेरा रंग कैसा (स्तंभलेख) पान ४ |
| १५) | २१ जून | माण नदीवरील बंधाराप्रकरणी दिघंची बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद (बातमी) पान ७ |
| १६) | २६ जून | डाव्या कालव्याच्या पूर्णतसाठी आंदोलन उभारणार – आ. देशमुख (बातमी) पान ४ |
| १७) | २९ जून | पाणी योजनांच्या निधीसाठी शिष्टमंडळ अमेरिकेला जाणार (जागतिक बँकेने देऊ केलेल्या अर्थ साहाय्याच्या करारासाठी २६ पैकी ९ जिल्ह्यांना प्राधान्य, यामध्ये सांगली जिल्हाचा समावेश) (विशेष वृत्त) पान ३ |

## विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. २६

२००३ – जून    दैनिक लोकमत    (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | | | | | | | ०० |
| २ | ७० | | | | | | ४०८ | ४७८ |
| ३ | ० | | | | | | | ०० |
| ४ | ३० | १०० | | | | | | १३० |
| ५ | ० | | | | | | | ०० |
| ६ | ० | | | | | | | ०० |
| ७ | ० | | | | २८८ (अग्रलेख) | ३६ | | ३२४ |
| ८ | ५६ | | | | | | | ५६ |
| ९ | २७२ | | | | | | | २७२ |
| १० | ३०१ | | | | | | | ३०१ |
| ११ | ८० | | | | | | | ८० |
| १२ | ८० | | | | | | | ८० |
| १३ | १४८ | | | | | १६ | | १६४ |
| १४ | ५८ | | | | | | | ५८ |
| १५ | ० | | | | | | | ०० |
| १६ | ४२४ | २९८ | ४१६ | | | | | ११३८ |
| १७ | २८८ | | | | ४०८ (स्तंभलेख) | | | ६९६ |
| १८ | ११० | | | | | ५६ | | १६६ |
| १९ | ४८ | | | | ३०६ (स्तंभलेख) | २५ | | ३७९ |
| २० | ०० | | | | | | | ०० |
| २१ | २१० | | | | | | | २१० |
| २२ | ११० | | | | | | | ११० |
| २३ | १०४ | | | | | | | १०४ |
| २४ | ० | | | | | | | ०० |
| २५ | ० | | | | | | | ०० |
| २६ | २०४ | | | | | | | २०४ |
| २७ | ० | | | | | | | ०० |
| २८ | ० | | | | | | | ०० |
| २९ | ८४ | | १४४ | | | | | २२८ |
| ३० | ० | | | | | ४० | | ४० |
| | | | | | | | | |
| **एकूण** | **२६७७** | **३९८** | **५६०** | | **१००२** | **१७३** | **४०८** | **५२१८** |

**विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या विकासकामांसंबंधीच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या**

**दैनिक लोकमत – नोहेंबर २००३**

**(दिनांक, बातमीचे शीर्षक, बातमीचा प्रकार आणि पान नंबर या क्रमाने)**

| | | |
|---|---|---|
| १) | १ नोव्हेंबर | गुंठेवारीच्या कामातील चौकशीची महापौर शहा यांची मागणी (भ्रष्टाचाराची बातमी) पान ५ |
| २) | २ नोव्हेंबर | वांगी शेळकबाव रस्ता खराब झाल्यामुळे प्रवाशांचे हाल (विशेष वृत्त) पान ६ |
| ३) | ३ नोव्हेंबर | दुष्काळी भागाला सावरण्याचा प्रयत्न : संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस (पत्रकार परिषद) पान १ |
| ४) | ४ नोव्हेंबर | नागेवाडीने घेतला राळेगणसिद्धीचा वसा (विशेष वृत्त) पान १३ |
| ५) | ५ नोव्हेंबर | जिल्हाधिकारी म्हैसकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कलशेट्टी यांना जलस्वराज्यचा पुरस्कार (बातमी) पान ५ |
| ६) | ५ नोव्हेंबर | ५० लाखांवरील जलसिंचन योजनांची मंजुरी आता विभागीयस्तरावर (विशेष वृत्त) पान ८ |
| ७) | ७ नोव्हेंबर | रस्त्याच्या दुरूस्तीमुळे वाहतुकीस अडथळा (विशेषवृत्त) पान १३ |
| ८) | ८ नोव्हेंबर | पाणी पुरवठा योजनेसाठी १९५० कोटींचा निधी लवकरच : जयंत पाटील (शासकीय माहिती) पान ६ |
| ९) | ११ नोव्हेंबर | जतसह १३ गावांची पाणी योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात (विशेषवृत्त) पान ६ |
| १०) | १२ नोव्हेंबर | पश्चिम महाराष्ट्राला १३०० कोटी देण्यास विरोध (बातमी) पान १ |

| | | |
|---|---|---|
| ११) | १३ नोव्हेंबर | वाकुर्डे योजनेच्या श्रेयवादाचे राजकारण पुन्हा तेजीत (विशेष वृत्त) पान १ |
| १२) | १४ नोव्हेंबर | जिल्ह्यातील सिंचनाची कामे पूर्ण करण्यासाठी दबाव आणणार : लोकप्रतिनिधींचा निर्धार (विशेष वृत्त) पान १ |
| १३) | १४ नोव्हेंबर | सिंचनात प्राधान्य कशाला ? (अग्रलेख) पान ४ |
| १४) | १४ नोव्हेंबर | रस्ता चौपदरीकरणामुळे छोटे व्यवसायिक येणार रस्त्यावर (विशेष वृत्त/सामाजिक जाणीव) पान १३ |
| १५) | १८ नोव्हेंबर | जिल्ह्यातील पत्रकारिता विकासाला बळ देणारी : जिल्हाधिकारी म्हैसकर (बातमी) पान ५ |
| १६) | २३ नोव्हेंबर | नागरिकांना खड्ड्यात घालणारा हॉटमिक्सवरील कोट्यवधीचा खर्च – (विशेष वृत्त/भ्रष्टाचारासंदर्भातील बातमी) पान २ |
| १४) | ३० नोव्हेंबर | गटरीचे निकृष्ट बांधकाम नागरिक व मनपाने पाडले (भ्रष्टाचाराची बातमी) पान ५ |

## विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी

तक्ता क्र. २७

२००३ – नोव्हेंबर | दैनिक लोकमत | (खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| दिनांक | उद्‌घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२४ | ८० | | | | | | २०४ |
| २ | ३४० | | ११२ | | | | | ४५२ |
| ३ | ८६० | | | | | ४८ | | ९०८ |
| ४ | ४८ | | २२५ | | | | | २७३ |
| ५ | २४८ | | १४४ | | | | | ३९२ |
| ६ | ० | | | | | | | ०० |
| ७ | ८८ | | १८० | | | | | २६८ |
| ८ | ४९२ | | १७६ | | | | | ६६८ |
| ९ | ० | | | | | | | ०० |
| १० | ४३२ | | २२० | | | | | ४३२ |
| ११ | ४६० | | | | | | | ६८० |
| १२ | ६०४ | | १८४ | | | | | ६०४ |
| १३ | १२८ | | २८४ | | | | | ३१२ |
| १४ | १६० | | | | १७६ (अग्रलेख) | ४८ | | ६६८ |
| १५ | ८४ | | | | | | | ८४ |
| १६ | २२० | | | | | | | २२० |
| १७ | ३३६ | | ३०८ | | | | | ६४४ |
| १८ | १२० | | | | | | | १२० |
| १९ | ० | | ९६ | | | | | ९६ |
| २० | २५६ | | | | | | २४० | ४९६ |
| २१ | १२६ | | | | | | | १२६ |
| २२ | १०० | | | | | | | १०० |
| २३ | ० | | ३६० | | | | | ३६० |
| २४ | १८४ | | | | | | | १८४ |
| २५ | ० | | | | | | | ०० |
| २६ | ० | | | | | ३२ | | ३२ |
| २७ | ० | | | | | ३६ | | ३६ |
| २८ | १०८ | | | | | ३२ | | १४० |
| २९ | ० | | | | | २० | | २० |
| ३० | ० | ७२ | | | | | | ७२ |
| | | | | | | | | |
| **एकूण** | **५५१८** | **१५२** | **२२८९** | | **१७६** | **२१६** | **२४०** | **८५९१** |

तक्ता क्र. २८

दैनिक लोकमत

(खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)

| वर्ष | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फेब्रुवारी २००१ | ३३६२ | १२६ | ३६८ | ५७७ | | ३२ | | **४४६५** |
| एप्रिल २००१ | ३७१० | ७४७ | ११२४ | ३११ | | | | **५८९२** |
| मार्च २००२ | ३८४१ | १४४ | १२९६ | | ३९० | | १५०८ | **७१७९** |
| ऑक्टोबर २००२ | ३७५० | | ३१६ | | ३४० | ८० | ९०० | **५३८६** |
| जून २००३ | २६७७ | ३९८ | ५६० | | १००२ | १७३ | ४०८ | **५२१८** |
| नोव्हेंबर २००३ | ५५१८ | १५२ | २२८९ | | १७६ | २१६ | २४० | **८५९१** |
| **एकूण** | **२२८५८** | **१५६७** | **५९५३** | ८८८ | **१९०८** | **५०१** | **३०५६** | **३६७३१** |
| टक्केवारी (%) | ६२ | ४ | १६ | ३ | ५ | १ | ९ | |

## वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील विविध प्रकारच्या बातम्यांची टक्केवारी

**दैनिक लोकमत**

आलेख क्र. ३



### तक्ता क्र. २९

**दैनिक पुढारी, केसरी, लोकमत या वृत्तपत्रातील विकासकामासंदर्भातील बातम्यांची ६ महिन्यांची आकडेवारी** **(खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमध्ये आहेत.)**

| वर्ष | उद्घाटन, निवेदन आंदोलन, माहिती | भ्रष्टाचार, चौकशी मागणी | विशेष वृत्त, समस्या | शासकीय धोरण, योजना, निर्णय | अग्रलेख, स्तंभलेख | वाचकांची पत्रे | जाहिरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुढारी | २१३६० | ४३०० | ११९२४ | २१०५ | ० | ५३५ | २७३१ | **४२९५५** |
| केसरी | २०३४७ | ६२१२ | ३२३१ | ३९५० | १५०४ | ८३२ | ७६६३ | **४३७३९** |
| लोकमत | २२८५८ | १५६७ | ५९५३ | ८८८ | १९०८ | ५०१ | ३०५६ | **३६७३१** |
| **एकूण** | **६४५६५** | **१२०७९** | **२११०८** | **६९४३** | **३४१२** | **१८६८** | **१३४५०** | **१२३४२५** |
| सरासरी | २१५२१ | ४०२६ | ७०३६ | २३१४ | ११३७ | ६२२ | ४४८३ | ४११४१ |
| टक्केवारी (%) | ५२ | १० | १७ | ६ | २.५ | १.५ | ११ | |


पुढारी, केसरी, लोकमत या वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील विविध प्रकारच्या बातम्यांची टक्केवारी
आलेख क्र. ४
टक्केवारी (सहा महिन्यांची)
६०
५०
४०
३०
२०
१०
उद्घाटन, निवेदन, आंदोलन, माहिती
भ्रष्टाचार, चौकशीची मागणी
विशेष वृत्त, समस्या
शासकीय धोरण, योजना
अग्रलेख, स्तंभलेख
वाचकांची पत्रे
जाहिरात
बातमीचे स्वरूप

## तक्ता क्र. ३०
## विविध वृत्तपत्रात विकास कामांसंदर्भात येणाऱ्या बातम्यांची महिन्याची सरासरी

**(खालील सर्व आकडे चौरस सेंटीमीटरमधील आहेत.)**

| वर्ष | पुढारी | केसरी | लोकमत |
|---|---|---|---|
| फेब्रुवारी २००१ | ६०२७ | ८३१७ | ४४५६ |
| एप्रिल २००१ | ८०७१ | ७०८३ | ५८९२ |
| मार्च २००२ | ६०२६ | ८३७४ | ७१७९ |
| ऑक्टोबर २००२ | ६००४ | ५५५५ | ५३८६ |
| जून २००३ | ७६६७ | ६१२८ | ५२१८ |
| नोव्हेंबर २००३ | ९१८० | ८१९५ | ८५९१ |
| **एकूण** | **४२९७५** | **४३६५२** | **३६७२२** |
| महिन्याची सरासरी | ७१६२ | ७२७५ | ६१२० |

## विकासकामांसंदर्भातील बातम्यांच्या सादरीकरणाचे विश्लेषण

विकासकामांचे उद्घाटन, विकासकामांबाबत निवेदन, विकासकामांसंबंधी आंदोलन, विकासकामांची माहिती आदी स्वरूपाच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये दिसून येतात. विकासकामांमधील भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाच्या विकास कामाच्या चौकशीची मागणी या बातम्यांचाही वृत्तपत्रांमध्ये समावेश असतो. विकासकामांवर वृत्तपत्रात विशेष वृत्त, स्तंभलेख, अग्रलेख देऊन अनेक मुद्यांचा उहापोह केल्याचे दिसून येते. विकासकामांसंबंधी शासकीय धोरण, शासकीय योजना, शासन निर्णय आदींचाही बातम्यांमध्ये समावेश असतो. विकासकामांसंदर्भातील जाहिराती आणि वाचकांच्या पत्रांनाही वृत्तपत्रात स्थान असते हे विविध दैनिकांच्या विश्लेषणात्मक अभ्यासावरून दिसून आले.

विकासकामांचे उद्घाटन, विकासकामांसंबधी निवेदन – आंदोलन – माहिती याविषयी ५२ टक्के इतक्या प्रमाणात बातम्या असतात. विकासकामांमधील भ्रष्टाचारावर आधारित किंवा विकासकामांच्या चौकशीची मागणी या संदर्भात १० टक्के बातम्या दिसून आल्या.

विकासकामांवरील लेख, विशेषवृत्त यांचे प्रमाण १७ टक्के तर अग्रलेख, स्तंभलेख यांचे प्रमाण २.५ टक्के आढळून आले.

शासकीय धोरण, शासकीय योजना, शासकीय निर्णय या विषयी ६ टक्के बातम्या दिसून आल्या, तर वाचकांच्या पत्राचे प्रमाण १.५ टक्का इतके आढळले. वृत्तपत्रामध्ये विकासकामांवरील जाहिरातीचे प्रमाणे ११ टक्के आढळून आले.

दैनिक पुढारी या वृत्तपत्रात महिन्याला ७१६२ चौरस सेंटीमीटर तर दैनिक केसरीमध्ये ७२७५ चौरस सेंटीमीटर आणि दैनिक लोकमतमध्ये ६१२० चौरस सेंटीमीटर इतक्या बातम्या आढळून आल्या. वरील सर्व दैनिकांची सरासरी पाहता वृत्तपत्रांमध्ये महिन्याला विकासकामांच्या बातम्यांचे प्रमाण ६८५२ चौरस सेंटीमीटर इतके आढळून आले. वृत्तपत्रांमध्ये रोज सर्व प्रकारच्या एकूण २२४०० चौरस सेंटीमीटर बातम्या असतात. हेच प्रमाण महिन्याला ६,७२,००० चौरस सेंटीमीटर इतके आढळून आले आहे. वरील आकडेवारी पाहता विकासकामांच्या बातम्यांचे वृत्तपत्रांमध्ये १.०१ टक्के प्रमाण आढळून आले.

### ४.५ विकासकामांबाबतच्या बातम्या व इतर बातम्या यांचा तौलनिक अभ्यास

वृत्तपत्रांमध्ये रोज विविध प्रकारच्या बातम्या प्रसिध्द होत असतात. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, विकासात्मक, सार्वजनिक कार्यक्रम, गुन्हेगारी, अपघात, आरोग्य, क्रीडा, जागतिक घडामोडी, शासकीय, अर्थ, मनोरंजन, जाहिराती, आंदोलने, मेळावे, भ्रष्टाचार, फॅशन, उद्योग, व्यवसाय आदीविषयक बातम्या आपण रोज वृत्तपत्रांमध्ये वाचतो.

वार्ताहर, वृत्तसंस्था, इंटरनेट, शासकीय पत्रके, खासगी संस्थांची प्रसिध्दीपत्रके, नागरिकांची निवेदने, पत्रकार परिषद, वाचकांची पत्रे, आदीद्वारे वृत्तपत्रांना बातम्या मिळत असतात. वाचकांना वाचायला जे आवडते, ते देण्याचा वृत्तपत्रांचा प्रयत्न असतो. महत्त्वाच्या बातम्यांना पहिल्या किंवा रंगीत पानावर स्थान दिले जाते. कमी महत्त्वाच्या बातम्यांना आतील पानांमध्ये स्थान दिले जाते, तसेच क्रीडा किंवा मनोरंजनात्मक बातम्यांना शेवटच्या पानावर स्थान दिले जाते.

विकासकामांबाबतच्या बातम्या आणि इतर बातम्या यांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी पुढारी (२३ फेब्रुवारी २००५), केसरी (२३ मे २००५) आणि सकाळ (२३ फेब्रुवारी २००५) ही वृत्तपत्रे निवडली.

**२३ फेब्रुवारी २००५ रोजीच्या पुढारी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या महत्त्वाच्या बातम्या खालीलप्रमाणे,**

१) इराणमध्ये भूकंपात ५०० ठार (नैसर्गिक आपत्ती, पान १ मथळा, रंगीत बातमी)

२) नरवाडात सराफी दुकान फोडून ९० हजाराचे दागिने लंपास (गुन्हेगारी वृत्त, पान १)

३) सोनीत विद्यार्थीनीची छेड काढल्यावरून मारहाण, ४ जखमी (गुन्हेगारी वृत्त, पान २)

४) नागवेलीवर मूळकुजव्या रोगाचा प्रादुर्भाव; शेतकरी हवालदिल
(शेतीविषयक वृत्त, पान ५)

५) कुपवाड परिसरात बेसुमार मुरूम उपसा : लाखोंची रॉयल्टी बुडीत
(विकासात्मक वृत्त, पान ५, रंगीत)

६) पलूस तालुक्यात परप्रांतीय मजुरांच्या संख्येत वाढ (विकासात्मक वृत्त, पान ९)

७) वांगी सोसायटीवर कदम पॅनलचे निर्विवाद वर्चस्व (राजकीय वृत्त, पान ९)

८) पोवारचे सात बळी; दक्षिण विभाग १८७ धावात गारद (क्रीडा वृत्त, पान १३)

९) नव्या तंत्रज्ञाद्वारे डायनाच्या मृत्यूची चौकशी
(जागतिक घडामोडी, पान १४, रंगीत बातमी)

१०) अर्थसंकल्पाकडून साखर उद्योगाच्या अपेक्षा (अर्थविषयक वृत्त, पान ४)

**२३ मे २००५ रोजीच्या केसरी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या महत्त्वाच्या बातम्या खालीलप्रमाणे,**

१) दिल्लीत दोन चित्रपटगृहात बॉम्बस्फोट; ३४ जखमी
(गुन्हेगारी वृत्त, पान १ मथळा, रंगीत बातमी)

२) बिहारमध्ये सरकार स्थापनेसाठी काँग्रेस पुढाकार घेणार (राजकीय वृत्त, पान १)

३) परप्रांतीय 'दीदी'चा संशयास्पद मृत्यू (गुन्हेगारी वृत्त, पान १)

४) पत्नीशी अनैतिक संबंधाच्या संशयावरून तरुणाचा खून (गुन्हेगारी वृत्त, पान १)

५) सोलापूर जिल्ह्यात यंदाही सरासरीपेक्षा कमी पाऊस (शासकीय वृत्त, पान १)

६) जत तालुक्यातील दहा पाणीपुरवठा योजना कुचकामी
(विकासात्मक बातमी, पान ३)

७) शेंग, गूळ, मिरचीच्या आवकेत घट (व्यापार वृत्त, पान ५)

८) राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाराष्ट्राला दुसरे स्थान (क्रीडा वृत्त, पान ८)

९) इस्त्राईलच्या हाना लास्लो हिला सर्वोकृष्ट अभिनेत्री पुरस्कार
(जागतिक घडामोडी, पान ८)

१०) शाळगावकर यांना उद्योगश्री, सचिनला कलाश्री, चंद्रकांत दळवी यांना
समाजसेवा पुरस्कार जाहीर (सामाजिक वृत्त, पान ३)

**२३ फेब्रुवारी २००५ रोजीच्या सकाळ वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या महत्त्वाच्या बातम्या खालीलप्रमाणे,**

१) हिमवर्षावातील बळी ३०० वर (नैसर्गिक आपत्ती, पान १)

२) तासगावात लॉजवर छापे; एकास अटक (गुन्हेगारी वृत्त, पान १)

३) दोन 'बिग बीं'ची पहिली-वहिली भेट (मनोरंजन वृत्त, पान १, रंगीत बातमी)

४) चार कोटीच्या रस्त्याचे पॅचवर्कही रखडलेलेच (विकासात्मक वृत्त, पान ५)

५) रांजणीत संत्र्यांची लागवड (शेतीविषयक, पान ५)

६) रोटरी चळवळ–समाजसेवेची शताब्दी (सामाजिक वृत्त, पान ४)

७) औषध कंपन्यांकडून ब्राह्मीला चांगली मागणी (आरोग्यविषयक वृत्त, पान ७)

८) कोल्हापुरात एप्रिलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विज्ञान परिषद (शैक्षणिक वृत्त, पान ११)

९) रमेश पोवारचे सात बळी (क्रीडा वृत्त, पान १६)

१०) ध्वनी कंपनाद्वारे नाणे हलविणारे ढोलवादन (सांस्कृतिक वृत्त, पान १२)

वरील बातम्यांचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, अपघात, खून, बलात्कार, भूकंप, यासारख्या बातम्यांना पहिल्या पानावर स्थान देण्यात आले आहे, तर विकासकामे, कृषी, सामाजिक, शैक्षणिक वृत्तांना आतील पानांमध्ये स्थान देण्यात आले आहे. शेवटच्या पानावर क्रीडा आणि जागतिक घडामोडींवर आधारीत बातम्यांना स्थान देण्यात आले आहे.

**वरील दैनिकांचा तुलनात्मक अभ्यास करून त्याची खालीलप्रमाणे वर्गवारी केली आहे.**

## तक्ता क्र. ३१
## दैनिक पुढारी २३ फेब्रुवारी २००५

| अ. क्र. | बातमीचा प्रकार | एकूण चौरस सेंटीमीटर | सरासरी | बातम्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विकास कामे | ४६८ | १.९७ | २ |
| २ | राजकीय, निवडणूकविषयक | ७७२ | ३.२५ | ९ |
| ३ | आंदोलने, निवेदने | २३६ | ०.९९ | ४ |
| ४ | मनोरंजन, साहित्य, शैक्षणिक | ५३२६ | २२.४३ | ३० |
| ५ | गुन्हेगारी, अपघात | २५२० | १०.६१ | २४ |
| ६ | शेती, अर्थ, उद्योग, व्यवसाय | १५४८ | ६.५१ | ९ |
| ७ | जाहिरात | ४६८४ | १९.७२ | २१ |
| ८ | क्रीडा | १४०८ | ५.९२ | ११ |
| ९ | वाचकांची पत्रे | ३५० | १.४७ | ६ |
| १० | शासकीय बातम्या | ८२० | ३.४५ | १० |
| ११ | जागतिक घडामोडी | १९६० | ८.२५ | १४ |
| १२ | सामाजिक उपक्रम, पुरस्कार | २६७२ | ११.२५ | २९ |
| १३ | आरोग्य | ३७६ | १.५८ | २ |
| १४ | इतर | ६०४ | २.५४ | १४ |
|  | **एकूण** | **२३७४४** | **१००** | **१८५** |

**तक्ता क्र. ३२**

**दैनिक केसरी २३ मे २००५**

| अ. क्र. | बातमीचा प्रकार | एकूण चौरस सेंटीमीटर | सरासरी | बातम्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विकास कामे | २३० | १.८७ | १ |
| २ | राजकीय, निवडणूकविषयक | ९५४ | ७.७६ | ९ |
| ३ | आंदोलने, निवेदने | ८० | ०.६५ | २ |
| ४ | मनोरंजन, साहित्य, शैक्षणिक | २४८० | २०.१८ | ११ |
| ५ | गुन्हेगारी, अपघात | ८५४ | ६.९४ | १४ |
| ६ | शेती, अर्थ, उद्योग, व्यवसाय | ७२४ | ५.८९ | ६ |
| ७ | जाहिरात | २२८९ | १८.६२ | ५ |
| ८ | क्रीडा | ७३२ | ५.९५ | ५ |
| ९ | वाचकांची पत्रे | २४० | १.९५ | ५ |
| १० | शासकीय बातम्या | २७८ | २.२६ | २ |
| ११ | जागतिक घडामोडी | ६१२ | ४.९८ | ४ |
| १२ | सामाजिक उपक्रम, पुरस्कार | १५२२ | १२.३८ | १७ |
| १३ | आरोग्य | २४ | ०.२० | १ |
| १४ | इतर | १२६९ | १०.३२ | ८ |
| | **एकूण** | **१२२२८** | **१००** | **९०** |

तक्ता क्र. ३३
दैनिक सकाळ २३ फेब्रुवारी २००५

| अ. क्र. | बातमीचा प्रकार | एकूण चौरस सेंटीमीटर | सरासरी | बातम्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विकास कामे | २५० | ०.९४ | ३ |
| २ | राजकीय, निवडणूकविषयक | ११४८ | ४.३१ | ११ |
| ३ | आंदोलने, निवेदने | ४०८ | १.५३ | ३ |
| ४ | मनोरंजन, साहित्य, शैक्षणिक | ५२०५ | १९.६२ | २२ |
| ५ | गुन्हेगारी, अपघात | २०३७ | ७.६५ | २६ |
| ६ | शेती, अर्थ, उद्योग, व्यवसाय | १६६९ | ६.२६ | १२ |
| ७ | जाहिरात | ७६७३ | २८८१ | २५ |
| ८ | क्रीडा | १०५२ | ३.९५ | ७ |
| ९ | वाचकांची पत्रे | ३५२ | १.३२ | ९ |
| १० | शासकीय बातम्या | ५७२ | २.१ | ५ |
| ११ | जागतिक घडामोडी | ५०८ | १.९० | ३ |
| १२ | सामाजिक उपक्रम, पुरस्कार | ३७९२ | १४.२४ | ३५ |
| १३ | आरोग्य | ९२४ | ३.४७ | ५ |
| १४ | इतर | १०३४ | ३.८८ | १ |
| | **एकूण** | **२६६२४** | **१००** | **१६७** |

### तक्ता क्र. ३४
### विकास वार्ता व अन्य बातम्यांचे मुल्यमापन (टक्केवारी)

| अ. क्र. | बातमीचा प्रकार | पुढारी | केसरी | सकाळ | सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | विकास कामे | १.९७ | १.८७ | ०.९४ | १.६० |
| २ | राजकीय, निवडणूकविषयक | ३.२५ | ७.७६ | ४.३१ | ५.१० |
| ३ | आंदोलने, निवेदने | ०.९९ | ०.६५ | १.५३ | १.०५ |
| ४ | मनोरंजन, साहित्य, शैक्षणिक | २२.४३ | २०.१८ | १९.६२ | २०.७४ |
| ५ | गुन्हेगारी, अपघात | १०.६१ | ६.९४ | ७.६५ | ८.४० |
| ६ | शेती, अर्थ, उद्योग, व्यवसाय | ६.५१ | ५.८९ | ६.२६ | ६.२२ |
| ७ | जाहिरात | १९.७२ | १८.६२ | २८.८१ | २२.३८ |
| ८ | क्रीडा | ५.९२ | ५.९५ | ३.९५ | ५.२७ |
| ९ | वाचकांची पत्रे | १.४७ | १.९५ | १.३२ | १.५८ |
| १० | शासकीय बातम्या | ३.४५ | २.२६ | २.१० | २.६० |
| ११ | जागतिक घडामोडी | ८.२५ | ४.९८ | १.९० | ५.०४ |
| १२ | सामाजिक उपक्रम, पुरस्कार | ११.२५ | १२.३८ | १४.२४ | १२.६२ |
| १३ | आरोग्य | १.५८ | ०.२० | ३.४७ | १.७५ |
| १४ | इतर | २.५४ | १०.३२ | ३.३८ | ५.४१ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की गुन्हेगारी, अपघात, खून, नैसर्गिक आपत्ती अशा स्वरूपाच्या बातम्यांचे प्रमाण ८.४० टक्के आहे. दैनिक पुढारी (२३ फेब्रुवारी २००५)च्या अंकात २४ बातम्या, केसरी (२३ मे २००५)च्या अंकात १४, तर सकाळ (२३ फेब्रुवारी २००५)च्या अंकात २६ बातम्या असे याचे प्रमाण होते. राजकीय व निवडणुकीसंदर्भातील बातम्यांची टक्केवारी ५.१०, शेती–अर्थ–उद्योगव्यवसायाशी संबंधित बातम्यांची टक्केवारी ६.२२, सामाजिक उपक्रम–पुरस्कार–निवडी अशा स्वरूपाच्या बातम्यांची टक्केवारी १२.६२ आहे.

वरील बातम्यांच्या तुलनेत विकासकामांच्या बातम्यांची टक्केवारी अतिशय अल्प म्हणजे १.६० टक्के इतकी दिसून आली. पुढारीमध्ये – २, केसरीमध्ये – १, तर सकाळमध्ये – ३ इतक्या विकासकामांशी संबंधित बातम्या दिसून आल्या. वरील तीनही दैनिकात विकासकामांच्या बातम्यांना आतील पानांवर स्थान देण्यात आले आहे.

### ४.६ वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठीची प्रश्नावली व त्याचे विश्लेषण

विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबत सांगली जिल्ह्यातून २५ पत्रकारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याकडून विषयाला अनुसरून तयार केलेली प्रश्नावली भरून घेतली. पुढारी, केसरी, सकाळ, लोकमत, तरुण भारत, पुण्यनगरी, जनप्रवास, जनचळवळ आदी विविध वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना भेटून जिल्ह्यातील विकासकामे आणि त्यासंदर्भातील वृत्तांकन याबाबत माहिती घेतली.

वार्ताहरांना विकासकामांसंदर्भात बातम्या लिहिता का?, लेख, विशेष वृत्त लिहिता का?, संबंधित बातम्यांची नागरिक, अधिकारी दखल घेतात का? अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले. विकासकामांच्या बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारतो का? किंवा भ्रष्टाचाराला आळा बसतो का? या मुद्द्यावरही संबंधित वार्ताहरांशी सविस्तर चर्चा केली. वार्ताहरांनी विकासकामांसंदर्भात दिलेल्या बातम्या आणि त्याचा विकासकामांवर झालेला सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम, याविषयी उदाहरणांसह माहिती घेतली.

**वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील बातम्यांबाबत वार्ताहरांची मते**

१) वृत्तपत्रांची नेमकी बातमी, लोकांचा रेटा आणि अधिकाऱ्यांची सकारात्मक भूमिका यामुळे विकासकामे मार्गी लागतात.

२) जनतेच्या मूलभूत गरजांसंदर्भातील विकासकामांवर लिखाण केल्यास नागरिक आणि अधिकाऱ्यांकडून दखल घेतली जाते.

३) विकासकामांचा पंचनामा करताना त्यातील चांगल्या गोष्टीही वार्ताहरांकडून मांडल्या जातात.

४) नागरिकांची दीर्घकालीन समस्या सुटल्यास त्या विकासकामाचे बातम्यांद्वारे कौतुक केले जाते.

५) वृत्तपत्रात बातमीदारांना विकासकामांवर लेख लिहिण्यास कमी जागा असते, त्यामुळे त्यांना बातम्यांवरच समाधान मानावे लागते.

६) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांसंदर्भात योग्य बातमी आल्यास याबाबत अधिक तपशिलासाठी नागरिकांकडून संबंधित वार्ताहराकडे चौकशी केली जाते.

७) विकासकामांसंदर्भातील सकारात्मक बातम्यांच्या कात्रणांचा संग्रह शासकीय कार्यालयात

केला जातो, तसाच नकारात्मक बातम्यांचेही त्यांच्याकडून कात्रणसंग्रह करावा आणि वार्ताहरांनी मांडलेले योग्य मुद्दे खुलेपणाने व खिलाडू वृत्तीने स्वीकारावेत.

८) विकासकामातील भ्रष्टाचाराबाबत बातमीमध्ये योग्य मुद्दे व पुरावे मांडल्यास त्याचा चांगला परिणाम विकासकामांवर होतो.

९) दर्जाहीन कामांवर तांत्रिकदृष्ट्या लिखाण केल्यास राजकीय लोक व वरिष्ठ अधिकारी दखल घेतात. नागरिकांकडून याप्रश्नी काही वेळा आंदोलनेही उभारली जातात.

१०) विकासकामांच्या प्रश्नावर बातमीतून सुचविलेला उपाय काही वेळा शासकीय अधिकाऱ्यांकडून स्वीकारला जातो.

११) विकासकामांच्या बातम्यांमुळे संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक होते. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांना नव्या कामांसाठी पाठबळ मिळते.

१२) बातमीदार सजग असेल व संबंधित विषयातील तज्ज्ञ असेल तर विकासकामांच्या बातम्या बिनचूक व सातत्याने प्रसिध्द होतात.

१३) भिडभाड न ठेवता वस्तुनिष्ठ लिखाण केल्यास विकासकामे त्वरित मार्गी लागतात व त्यांचा दर्जा सुधारतो.

१४) विकासकामांच्या बातम्यांचा राजकारणी लोकांकडून स्वार्थासाठी उपयोग केला जातो.

१५) विकासकामांची आवश्यकता वृत्तपत्रातून बातम्यांद्वारे लोकांना पटवून देता येते.

१६) वृत्तपत्रीय बातम्यांकडे लोक विश्वासार्हतेने पाहात असतात, त्यामुळे ती टिकविण्याचे आव्हान पत्रकारांसमोर आहे.

१७) समाजाच्या फायद्यासाठी विविध प्रकाराच्या विकासकामांवर वार्ताहरांनी लिखाण केले पाहिजे.

१८) विकासकामांच्या बातम्यांच्या सादरीकरणावर त्या बातमीचा प्रभाव अवलंबून असतो.

१९) विकासकामांवरील बातम्यांमुळे भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीच्या मनात भीती निर्माण होते.

२०) नागरिकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न हाताळल्यास त्यांच्याकडून त्याबाबत चांगली प्रतिक्रिया येते, तसेच संबंधित अधिकारी त्या वार्ताहराला बोलावून याप्रश्नी त्याच्याशी चर्चा करतात.

२१) वृत्तपत्रांच्या नियमित पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे मार्गी लागतात.

२२) विकासकामांसंदर्भात टीकात्मक बातमी प्रसिध्द झाल्यास त्याची दखल घेऊन नागरिक संबंधित विभागास जाब विचारतात. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना त्या बातमीची दखल घ्यावीच लागते.

२३) विकासकामांबाबत टीकात्मक बातमी प्रसिध्द झाल्यास सामाजिक संघटना त्याचा पाठपुरावा करतात, वेळप्रसंगी आंदोलनही उभारतात. सामान्य नागरिक मात्र याविषयी नुसतीच चर्चा करताना दिसतात, परंतु आंदोलनांसाठी पुढे येत नाहीत.

## वार्ताहरांच्या विकासकामांसंदर्भातील प्रश्नावलीचे वर्गीकरण (तक्ता क्र. ३५)

| प्रश्नाचे स्वरूप | बातम्यांची नागरिक व अधिकारी दखल घेतात ? | | बातम्यांचा पाठपुरावा करता का ? | | बातम्यांमुळे विकास कामांचा दर्जा सुधारतो का ? | | बातम्यांमुळे भ्रष्टाचारास आळा बसतो का ? | | वृत्तपत्रांचा विकास कामांवर प्रभाव पडतो ? | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| एकूण | २५ | ० | २५ | ० | २४ | १ | २४ | १ | २५ | ० |
| टक्केवारी | १०० | ० | १०० | ० | ९६ | ४ | ९६ | ४ | १०० | ० |

टीप : सांगली जिल्ह्यातील विविध दैनिकांच्या २५ पत्रकारांकडून प्रश्नावली भरून घेतली.

**प्रश्नावलीचे विश्लेषण**

विकासकामांसंदर्भातील बातम्यांची नागरिक व अधिकारी दखल घेतात का? या प्रश्नावर १०० टक्के वार्ताहरांनी 'होय' असे उत्तर दिले. विकासकामांसंदर्भात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या पाठपुरावा करत असल्याचे १०० टक्के वार्ताहरांनी सांगितले. विकासकामांसंदर्भातील बातम्यांमुळे त्या कामांचा दर्जा सुधारतो, तसेच भ्रष्टाचाराला आळा बसतो, असे ९६ टक्के वार्ताहरांनी सांगितले, तर ४ टक्के वार्ताहरांनी विकासकामांच्या बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारत नसल्याचे सांगितले. वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव पडतो, असे १०० टक्के वार्ताहरांनी सांगितले.

विकासकामांसंदर्भात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि त्याचा पाठपुरावा याबाबत विचारले असता ४४ टक्के वार्ताहरांनी उदाहरणासह सविस्तर माहिती सांगितली, तर २८ टक्के वार्ताहरांनी थोडक्यात माहिती दिली, परंतु उर्वरित २८ टक्के वार्ताहरांना याबाबत काहीच सांगता आले नाही. बऱ्याच वार्ताहरांकडे विकासकामांसंदर्भात त्यांनी स्वतः दिलेल्या बातम्यांचे कात्रण किंवा नोंद नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांना याबाबत सविस्तर माहिती देताना मर्यादा आल्या.

विकासकामांच्या बातम्या दिल्यामुळे त्याचा विकासकामांवर झालेला परिणामही वार्ताहरांनी उदाहरण देऊन विशद केला. काही वार्ताहरांनी सांगितले की, जलसिंचन योजनेच्या अपूर्ण कामांबद्दल कारणे व उपाययोजना यासंदर्भात लिहिले असता त्यातून जनतेचा रेटा तयार होऊन विकासकामे पूर्ण होण्यासाठी मदत झाली. आरफळ कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे निकृष्ट दर्जाची होत होती. याबद्दल वार्ताहरांनी वृत्तपत्रांमध्ये बातम्या देऊन पाठपुरावा केल्यानंतर त्या कामाच्या दर्जात सुधारणा झाल्याचे आढळून आले.सांगली येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बांधकामात भ्रष्टाचार आढळून आल्यानंतर त्यासंदर्भात वार्ताहरांनी बातमी दिली. या बातमीची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी त्या ठेकेदाराचे काम थांबवून बिलही रोखून धरले.

सांगली शहरातील फूटपाथची कामे निकृष्ट झाल्याबद्दल वृत्तपत्रातून आवाज उठविण्यात आला होता. या बातम्यांची दखल घेत महापालिकेच्या आयुक्तांनी प्रत्यक्ष कामावर जाऊन, प्रसंगी काँक्रीट फोडून कामाच्या दर्जाची तपासणी केली. त्यावेळी स्लॅबमध्ये सळीचा वापर न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या गैरप्रकाराबाबत संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून त्याचा ठेका रद्द करण्यात आला.

**प्रकरणाचा समारोप**

प्रस्तुत प्रकरणामध्ये विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांचे वर्गीकरण केले आहे. विकास कामांबद्दल उद्‌घाटन, आंदोलने, विकासकामातील भ्रष्टाचार, शासकीय धोरण, शासकीय योजना, विकासकामांवरील अग्रलेख, स्तंभलेख, विकासकामांवरील वाचकांची पत्रे तसेच विकासकामांवरील जाहिराती आदींबाबत माहिती घेतली.

वृत्तपत्रांनी विकासकामांसंदर्भात कोणत्या बातम्या द्याव्यात, कोणत्या देऊ नयेत, निकृष्ट दर्जाची कामे, रेंगाळलेली कामे याबाबत वृत्तपत्रांची जबाबदारी काय? याचा ऊहापोह या प्रकरणात केला. विकासकामांबद्दल नागरिकांचे मत काय आहे? कंत्राटदारांना कोणत्या अडचणी येतात, अधिकाऱ्यांचे म्हणणे काय यावर आधारीत वृत्तपत्रांची भूमिका काय असते याविषयी अभ्यास केला. विकासकामांच्या बातमी देणाऱ्या वार्ताहराकडून नागरिक, कंत्राटदार, शासकीय अधिकारी यांच्या काय अपेक्षा असतात? याचा अभ्यास केला. विकासकामांच्या बातम्या देताना वार्ताहराची नैतिकता काय असावी याविषयी संबंधित घटकांशी चर्चा केली.

दैनिक पुढारी, केसरी आणि लोकमत या वृत्तपत्रांमधील अभ्यासासाठी प्रत्येकी ६ महिने निवडले. या सहा महिन्यातील बातम्यांचे वर्गीकरण केले. या बातम्यांचा प्रभाव किती? विकासकामांसंदर्भातील बातम्यांचे इतर बातम्यांच्या प्रमाणात स्थान काय असते या दृष्टीनेही अभ्यास केला.

वार्ताहर विकासकामांसंदर्भात कोणत्या व कशा स्वरूपात बातम्या देतात? याविषयी माहिती घेतली. बातम्यांचा विकास कामांवर काय परिणाम होतो या विषयी सविस्तर चर्चा केली. तसेच वार्ताहराकडून विकासकामांसंदर्भात प्रश्नावली भरून घेऊन त्याचे विश्लेषण केले.

प्रकरण ५

# वृत्तपत्रातील विकासकामांबाबतच्या वृत्तांमुळे होणारे आर्थिक व सामाजिक परिणाम

## प्रकरण पाच : वृत्तपत्रातील विकासकामांबाबतच्या वृत्तांमुळे होणारे आर्थिक व सामाजिक परिणाम


५.१ : विकासकामांच्या बातम्यांमुळे होणारी जनजागृती आणि प्रतिक्रिया (प्रश्नावली–विश्लेषण)

५.२ : बातम्यांमुळे विकासकामांवर तसेच संबंधित यंत्रणेवर होणारे परिणाम

५.३ : बातम्यांमुळे विकासकामांमधील भ्रष्टाचारावरील अंकुश

५.४ : वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील जाहिराती व त्याचे फायदे

५.५ : वृत्तपत्रांमधील बातम्यांमुळे अनावश्यक विकासकामांवरील अंकुश

५.६ : रस्त्यांवरील अपघात आणि वृत्तपत्रीय बातम्या

५.७ : विकासकामे व वृत्तपत्रातील बातम्या यासंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया (प्रश्नावली व विश्लेषण)

५.८ : विकासकामांमुळे तसेच विकासकामांसाठी लागणाऱ्या साहित्यामुळे (माती, वाळू, वीट, दगड, मुरूम इत्यादी) पर्यावरणावर होणारे परीणाम, प्रदूषणात पडणारी भर आणि त्याबाबतची वृत्तपत्रांची जबाबदारी

५.९: वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील लोकसहभाग

५.१०: विकासवार्ता आणि विकासाचे मूल्यमापन (त्या–त्या परिसरामध्ये झालेले आर्थिक, सामाजिक बदल)

## ५.१ : विकासकामांच्या बातम्यांमुळे होणारी जनजागृती आणि प्रतिक्रिया (प्रश्नावली-विश्लेषण)

रस्ते उभारणी, पुलांचे बांधकाम, जलसंधारण बंधारे, पाणीपुरवठा योजना आदी विकासकामे ही लोकांच्या सोयीसाठी असतात. या विकासकामांसाठी वापरण्यात येणारा पैसा हा लोकांकडूनच विविध करांमधून उभारला जातो. आपल्या भागात कोणती विकासकामे सुरू आहेत, त्याचे फायदे-तोटे काय? विकासकामांचा दर्जा राखला जातो का? रखडलेले विकासकाम वेळेत कसे पूर्ण होईल? आदींबाबत जनजागृती होणे आवश्यक असते. हे जनजागृतीचे काम वृत्तपत्रांद्वारे चांगल्या प्रकारे होऊ शकते.

विकासकामांच्या काही योजना मंजूर होऊनही निधीअभावी रखडल्या जातात. त्यामुळे त्यांचा खर्च अनेक पटींनी वाढतो. महत्त्वाच्या योजना वेळेत पूर्ण होण्यासाठी लोकप्रतिनिधींवर लोकांचा दबाव निर्माण होणे आवश्यक आहे. अनेकदा विकासकामे निकृष्ट दर्जाची झालेली दिसून येतात. त्यामुळे त्या कामांमध्ये भ्रष्टाचाराला वाव असतो, असे म्हणता येईल. अशा विकासकामांबाबत त्या भागातील लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे. वृत्तपत्रांमध्ये बातम्या, लेख, विशेष वृत्त, अग्रलेख, वृत्तमालिका याद्वारे विकासकामांबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करता येऊ शकते.

लोकांमध्ये विकासकामांबाबत जागृती करणे का आवश्यक आहे तसेच विकासकामांच्या बातम्यांमुळे होणारी जनजागृती पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

## उदाहरण १

**५ फेब्रुवारी २००१** रोजी 'पुढारी' वृत्तपत्रात पान १ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**सांगली–कोल्हापूर चौपदरीकरणाचे काम लवकरच हाती**

**२३ मे २०१२** रोजी 'सकाळ' वृत्तपत्रात पान १ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**सांगली–कोल्हापूर चौपदरीकरणाला मुहूर्त**

**फोटो क्रमांक : ३५**



सांगली-कोल्हापूर चौपदरीकरणाला मुहूर्त

पुढील महिन्यात काम सुरू : मुंबईच्या कंपनीला ठेका, १९६ कोटींच्या प्रकल्पासाठी बांधकाम विभागाने दिली वर्क ऑर्डर

दृष्टिक्षेपात चौपदरीकरण

- काम पूर्ण करण्याची मुदत दोन वर्षे

वरील उदाहरणावरून असे दिसून येते की, २००१ मध्ये मंजूर असलेल्या विकासकामाला सुरुवात होण्यासाठी तब्बल ११ वर्षांनी मुहूर्त लागला. त्यामुळे २५ कोटींच्या या प्रकल्पाचा खर्च १९६ कोटींवर पोहोचला. रस्त्याच्या मानाने वाहनांची संख्या जास्त असल्याने या मार्गावर वारंवार अपघात घडतात. शासकीय आकडेवारीनुसार या ४१ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर दररोज १३ हजार वाहनांची वर्दळ आहे आणि रस्ते अपघातात वर्षाला सरासरी ४० ते ५० जण ठार आणि शेकडो लोक जखमी होतात. २००१ सालीच मंजूर असलेल्या या विकासकामासाठी वृत्तपत्रांनी जनरेटा उभारला असता तर हे विकासकाम वेळेत पूर्ण होऊन विकासकामासाठी खर्च होणाऱ्या पैशामध्ये मोठी बचत झाली असती, तसेच रस्ते चौपदरीकरणामुळे अपघातांचे प्रमाणही कमी झाले असते व मनुष्यहानी टाळता आली असती.

## उदाहरण २

दैनिक 'पुढारी'मध्ये ४ डिसेंबर २०११ रोजी पान ३ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**बायपासच्या नादात टेंभूचे २० लाख मातीत**

**फोटो क्रमांक : ३६**


बायपासच्या नादात टेंभूचे वीस लाख मातीत

अनिल बाबर यांच्या प्रस्तावाला कोलदांडा - पाईपा लंपास

टेंभू योजनेचे पाणी बायपासने मिळावे, यासाठी हिंगणगाव तलाव ते उपळावी–मायणीपर्यंत चार किलोमीटर अंतर पाईपा टाकून कॅनॉलला बायपास करण्याचा प्रस्ताव होता. या कामासाठी टंचाई निधीमधून २० लाख रुपयेही मंजूर झाले होते. काम सुरू झाल्यानंतर पाईपाही आणून टाकल्या होत्या. परंतु काही कारणाने काम रखडल्याने अधिकाऱ्यांनी पाईपा काढून नेल्या. हा प्रयोग यशस्वी झाला असता तर वीसहून अधिक गावांना पाण्याचा लाभ झाला असता. परंतु लोकप्रतिनिधी आणि जनतेने पाठपुरावा न केल्याने, निधीच्या खर्चाकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष न दिल्याने, तसेच शासकीय अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा केल्याने या कामाचे २० लाख रूपये वाया गेले. विकासकामांच्या बाबतीत वृत्तपत्रांमधून अशा बातम्या वारंवार आल्यास गैरप्रकारांना आळा बसू शकतो.

## उदाहरण ३

२३ ऑगस्ट २००५ रोजी 'पुढारी' या वृत्तपत्रात पान १ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**धरणे झाली, पण नियोजनाअभावी पाणी वाया**

(वृत्तमालिका – कृष्णा का कोपली? भाग ५)

**फोटो क्रमांक : ३७**




ऑगस्ट–२००५ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे कृष्णा नदीला महापूर आला. परंतु पाणी अडवून ते शेतीला पोहोचवता न आल्यामुळे १०० टी.एम.सी.हून अधिक पाणी वाया गेले यासंदर्भात वरील लेखात ऊहापोह करण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये ४० ते ५० वर्षापासून मोठी धरणे उभारण्यास सुरुवात झाली. अनेक धरणे उभारली गेली, परंतु त्या प्रमाणात सिंचनाचे क्षेत्र वाढले नाही. सिंचन योजना रखडल्याने धरणात साठवलेले पाणी पूर्ण क्षमतेने शेतीसाठी वापरले जात नाही. धरणातून शेतीला पाणी देण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित झाली पाहिजे, यासाठी कालवे, पोटकालवे काढून शेतात पाणी पोहोचविणे आवश्यक आहे. अशी विकासकामे झाली असती तर महापुरावेळी अती पाण्यामुळे निर्माण होणारी गंभीर परिस्थिती पाण्याच्या नियोजनामुळे टाळता आली असती आणि दुष्काळी भागातील शेतीला जादा पाणी देता आले असते अशी परखड टीका करत जनजागृतीचा प्रयत्न वरील लेखात करण्यात आला आहे.

## उदाहरण ४

१५ एप्रिल २०१२ रोजी 'पुढारी' या वृत्तपत्रात पान ५ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**विकासासाठी आंदोलने झाली क्षीण**

**राजकीय आंदोलने वाढली; प्रश्न बाजूला पडले**

**फोटो क्रमांक : ३८**


विकासासाठीची आंदोलने झाली क्षीण

राजकीय आंदोलने वाढली; प्रश्न बाजूला पडले

आंदोलने का थांबली?

आंदोलनासाठी आवश्यक असलेल्या नेतृत्वाचा अभाव झाल्याने तसेच नेतृत्व करणाऱ्यांनी सोयीस्कर राजकीय भूमिका घेतल्याने विकासासाठीची आंदोलने थांबली. तसेच काही आंदोलने ही राजकीय हेतूने प्रेरित बनू लागली. या सर्व गोष्टींचा विचार करून 'विकासासाठीची आंदोलने झाली क्षीण' या मथळ्याखाली विकासकामांशी संबंधित आंदोलनांच्या भवितव्याबाबत चिंतन करणारा लेख 'पुढारी'ने प्रसिध्द केला आहे. प्रस्तुत लेखात आंदोलने का क्षीण झाली? यावर सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. विकासकामांच्या भवितव्यासाठी आंदोलनांची दिशा कशी असावी, याबाबतही मत मांडले असून या लेखाद्वारे लोकांना विकासकामांबाबत जनजागृतीचा प्रयत्न केला आहे.

## उदाहरण ५

७ जानेवारी २००५ रोजी 'पुढारी' या वृत्तपत्रात पान ४ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**जलसंधारणाच्या चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान महत्त्वाचे : मनीषा म्हैसकर**

**फोटो क्रमांक : ३९**



# जलसंधारणाच्या चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान महत्त्वाचे

## मनीषा म्हैसकर

सांगली (प्रतिनिधी) : सांगली जिल्ह्यात राबविलेल्या जलसंधारणाच्या कामात वृत्तपत्रांचे योगदान फार महत्त्वाचे होते, त्यामुळेच आपण हे काम करू शकलो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मनीषा म्हैसकर यांनी आज येथे केले.

सांगली जिल्हा मराठी पत्रकार संघटनेच्यावतीने आयोजित केलेल्या पत्रकार दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. त्या

आणि आताची पत्रकारिता यात फरक पडू लागलेला आहे.

पत्रकार राजीव खांडेकर म्हणाले, एखादा विषय हाती घेतल्यानंतर पुढे त्याचा पाठपुरावा घेताना पत्रकार दिसत नाहीत. हा पाठपुरावा झाला पाहिजे. वाचकांना काय हवे आहे, ते देण्याचा प्रयत्न काही वृत्तपत्रांतून होऊ लागलेला आहे, पण अशा करमणूकप्रधान बातम्यापेक्षा लोकांचे प्रबोधन महत्त्वाचे आहे.

सांगली जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाने राबविलेल्या जलसंधारणाच्या कामात वृत्तपत्रांचे योगदान फार महत्त्वाचे होते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मनीषा म्हैसकर यांनी पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात बोलताना केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रांनी जलसंधारणाच्या कामांबाबत सातत्याने पाठपुरावा केला. दुष्काळ निवारणाच्या, जलसंधारणाच्या बातम्यांना ठळकपणे प्रसिध्दी दिली. विकासकामांच्या सर्व घटकांची, चांगल्या– वाईट बाजूंची चर्चा घडवून आणली. वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे लोकांना, लोकप्रतिनिधींना आणि शासकीय अधिकाऱ्यांना आपल्या समस्यांची आणि जबाबदारीची जाणीव झाली. त्यामुळे विकासकामे करताना त्याचा फायदा झाला. वरील गोष्टींची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी विकासकामांची चळवळ सुरू राहण्यासाठी वृत्तपत्रांचे मोलाचे योगदान असते हे अधोरेखित केले, हे या उदाहरणावरून दिसून येते.

वाचक सर्वेक्षणात वृत्तपत्रांमुळे विकासकामांसंदर्भात जगजागृती होते, असे ९६ टक्के लोकांनी सांगितले. तर ४ टक्के लोकांनी जनजागृतीसाठी वृत्तपत्रांच्या बातम्यांचा उपयोग होत नाही असे सांगितले.

**विकासकामांबाबतच्या बातम्यांमुळे होणाऱ्या जनजागृतीविषयी वाचकांच्या काही निवडक प्रतिक्रिया खालीलप्रमाणे –**

१) सामान्य जनतेला आपल्या परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती नसते. ती वृत्तपत्रांमुळे मिळते.

२) वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे लोकांना आणि लोकप्रतिनिधींना आपल्या समस्यांची आणि जबाबदारीची जाणीव होते.

३) ग्रामीण भागात आजही वृत्तपत्र हेच विकासकामांसंदर्भात जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे.

४) वृत्तपत्रातील बातम्यांमुळे विकासकामांविषयक लोकांचे मत तयार होत असते.

५) महत्त्वाच्या विकासकामांच्या बातम्यांचे कात्रण सामाजिक कार्यकर्त्यांनी किंवा शासकीय अधिकाऱ्यांनी लोकांची वर्दळ असणाऱ्या शासकीय कार्यालये (ग्रामपंचायत, तहसीलदार कार्यालय, इत्यादी) व सार्वजनिक ठिकाणी लावावीत. यामुळे लोकांमध्ये विकासकामांसंदर्भात जनजागृती होईल.

विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रीय बातम्यांबाबत सामान्य नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेऊन प्रश्नावली भरून घेतल्या. (तक्ता क्रमांक ३६ पान क्रमांक २२४) सांगली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून १० व सांगली महापालिका क्षेत्रातून ३० अशा एकूण १३० प्रश्नावली भरून घेतल्या. वृत्तपत्रात विकासकामांची परिपूर्ण बातमी असते का ? बातमीत योग्य बाजू मांडली जाते का ? बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो का ? बातम्यांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो का ? वृत्तपत्रीय बातम्यांचा विकासकामांवर प्रभाव असतो का? वृत्तपत्रीय बातम्यांमुळे जनजागृती होतो का ? आदी स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात आले.

विकासकामांच्या बातम्या वाचतो असे १०० टक्के वाचकांनी सांगितले. ३४ टक्के वाचकांनी विकासकामांची परिपूर्ण माहिती बातम्यामध्ये असते असे सांगितले तर १६ टक्के वाचकांनी वृत्तपत्रात विकासकामांसंदर्भात परिपूर्ण माहिती नसते असे सांगितले. २३ टक्के वाचकांनी बातम्यांमध्ये योग्य बाजू मांडलेली नसते असे सांगितले. ७३ टक्के वाचकांनी या बातम्यामध्ये पारदर्शकपणा असतो असे सांगितले तर २७ टक्के वाचकांनी पारदर्शकपणा नसतो असे सांगितले. बातम्यांमुळे विकासकामातील भ्रष्टाचाराला आळा बसतो असे ९३ टक्के वाचकांनी सांगितले. बातम्यांचा विकासकामांवर प्रभाव असतो असे ९८ टक्के लोकांनी सांगितले, तर २ टक्के वाचकांनी प्रभाव नसतो असे सांगितले.

## तक्ता क्रमांक : ३६

## सर्वसामान्य नागरिकांसाठीच्या विकासकामांसंदर्भातील प्रश्नावलीचे वर्गीकरण

| तालुका | विकासकामांवरील बातम्या वाचता का ? | | त्याची परिपूर्ण माहिती असते का ? | | | योग्य बाजू मांडलेली असते ? | | | बातम्यांमध्ये पारदर्शकता असते ? | | | बातम्यांचा उपयोग होतो ? | | | निकृष्ट कामे व भ्रष्टाचाराला आळा ? | | | जनजागृती होते ? | | बातम्यांचा विकासकामांवर प्रभाव? | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | नाही | होय | मध्यम | नाही |
| १ मिरज | १० | ० | ५ | ५ | ० | ५ | ३ | २ | ४ | ४ | २ | ५ | ५ | ० | ८ | २ | ० | ९ | १ | ९ | १ | ० |
| २ वाळवा | १० | ० | ६ | २ | २ | ४ | ३ | ३ | ६ | ० | ४ | ८ | २ | ० | ८ | २ | ० | ९ | १ | ७ | ३ | ० |
| ३ शिराळा | १० | ० | ४ | ५ | १ | ३ | ४ | ३ | ३ | ४ | ३ | ६ | ४ | ० | ४ | ६ | ० | १० | ० | ५ | ५ | ० |
| ४ तासगाव | १० | ० | २ | ३ | ५ | ३ | १ | ६ | २ | २ | ६ | ७ | ३ | ० | ४ | ४ | २ | ९ | १ | ६ | २ | २ |
| ५ पलूस | १० | ० | ३ | ७ | ० | ४ | ६ | ० | २ | ८ | ० | ८ | २ | ० | ७ | ३ | ० | ९ | १ | ५ | ५ | ० |
| ६ क.महां. | १० | ० | ८ | २ | ० | ६ | ३ | १ | ६ | २ | २ | ८ | २ | ० | ७ | ३ | ० | १० | ० | १० | ० | ० |
| ७ कडेगाव | १० | ० | ७ | २ | १ | ७ | २ | १ | ४ | ५ | १ | ७ | ३ | ० | २ | ६ | २ | १० | ० | ७ | ३ | ० |
| ८ खानापूर | १० | ० | ३ | ६ | १ | ५ | ५ | ० | ४ | ४ | २ | ७ | ३ | ० | ५ | ५ | ० | ९ | १ | ९ | ० | १ |
| ९ आटपाडी | १० | ० | २ | ४ | ४ | ३ | २ | ५ | ३ | ३ | ४ | ७ | १ | २ | ४ | ५ | १ | १० | ० | ६ | ३ | १ |
| १० जत | १० | ० | ४ | ४ | २ | ५ | ३ | २ | ५ | २ | ३ | ६ | ४ | ० | ८ | २ | ० | ९ | १ | ६ | ४ | ० |
| **सरासरी** | **१००** | **०** | **४४** | **४०** | **१६** | **४५** | **३२** | **२३** | **३९** | **३४** | **२७** | **६९** | **२९** | **२** | **५७** | **३८** | **५** | **९४** | **६** | **७०** | **२६** | **४** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **सांगली महापालिका कार्यक्षेत्र** | **३०** | **०** | **७** | **१८** | **५** | **७** | **१६** | **७** | **७** | **१५** | **८** | **१८** | **८** | **४** | **१०** | **१७** | **३** | **२९** | **१** | **१५** | **१५** | **०** |
| **सरासरी** | **१००** | **०** | **२३** | **६०** | **१७** | **२३** | **५४** | **२३** | **२३** | **५०** | **२७** | **६०** | **२७** | **१३** | **३३** | **५७** | **१०** | **९७** | **३** | **५०** | **५०** | **०** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **एकूण सरासरी** | **१००** | **०** | **३४** | **५०** | **१६** | **३४** | **४३** | **२३** | **३१** | **४२** | **२७** | **६५** | **२८** | **७** | **४५** | **४८** | **७** | **९६** | **४** | **६०** | **३८** | **२** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

# वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. ५



## वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. ६



# वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. ७



वृत्तपत्रात येणाऱ्या विकासकामांच्या बातम्यांबाबत संबंधित कंत्राटदारांची मते जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतली. सांगली जिल्ह्यातून २५ कंत्राटदारांकडून ही प्रश्नावली भरून घेतली.

विकासकामांवर वस्तुस्थितीवर आधारित बातम्या असतात का ? वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो का ? बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो का ? बातम्यांमुळे विकासकामांध्ये अडथळा निर्माण होतो का ? वृत्तपत्र प्रतिनिधी कामावर माहिती घेण्यासाठी येतात का ? आदी प्रश्न विचारून विकासकामांसंदर्भात कंत्राटदारांची मते जाणून घेऊन सूचनाही विचारण्यात आल्या.

वृत्तपत्रात विकासकामांच्या बातम्यांचे प्रमाण कमी असते असे २८ टक्के कंत्राटदारांनी सांगितले तर ६८ टक्के कंत्राटदारांनी विकासकामांच्या मध्यम स्वरूपात बातम्या असतात असे सांगितले. वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो असे ८४ टक्के कंत्राटदारांनी सांगितले, तर १६ टक्के कंत्राटदारांनी प्रभाव नसतो असे सांगितले. विकासकामांवर वस्तुस्थितीवर आधारित बातम्या नसतात असे २० टक्के कंत्राटदारांनी सांगितले तर २८ टक्के कंत्राटदारांनी अशा बातम्यांमध्ये पारदर्शकपणा नसतो असे सांगितले. बातम्यांमुळे विकासकामात अडथळा येतो असे ६० टक्के कंत्राटदारांनी सांगितले. वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो असे ९६ टक्के कंत्राटदारांनी सांगितले, तर ४ टक्के कंत्राटदारांनी दर्जा सुधारत नसल्याचे नमूद केले. विकासकामांबाबतच्या बातम्यांचा स्वतःच्या कामाबद्दल चांगला अनुभव आला असे २४ टक्के कंत्राटदारांनी सांगितले तर वाईट अनुभव आला असे १६ टक्के कंत्राटदारांनी सांगितले. वार्ताहर विकासकामांच्या ठिकाणी येऊन माहिती घेतात असे ३६ टक्के कंत्राटदारांनी सांगितले तर माहिती घेत नसल्याचे १२ टक्के कंत्राटदारांनी सांगितले. विकासकामांच्या ठिकाणी वार्ताहर येत नसल्याचे ५२ टक्के कंत्राटदारांनी सांगितले.

## तक्ता क्रमांक : ३७
## विकासकामांसंदर्भातील कंत्राटदारांसाठीची प्रश्नावली व तिचे वर्गीकरण

| प्रश्नाचे स्वरूप | विकासकामांच्या बातम्यांचे प्रमाण | | | वृत्तपत्रांचा प्रभाव असतो का ? | | वस्तूस्थितीवर आधारित माहिती असते का ? | | | बातम्यांमध्ये पारदर्शकता असते ? | | | बातम्यांमुळे विकासकामात अडथळा ? | | | बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारतो का ? | | | हेतुपुरस्कर बातम्या असतात ? | | बातम्यांचा विकासकामांवर परिणाम ? | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कमी | मध्यम | जास्त | असतो | नसतो | असते | मध्यम | नसते | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | मध्यम | नाही | होय | नाही | होतो | नाही |
| एकूण | ७ | १७ | १ | २१ | ४ | ११ | ९ | ५ | ९ | ९ | ७ | ४ | ११ | १० | १६ | ८ | १ | २२ | ३ | २२ | ३ |
| टक्केवारी | २८ | ६८ | ४ | ८४ | १६ | ४४ | ३६ | २० | ३६ | ३६ | २८ | १६ | ४४ | ४० | ६४ | ३२ | ४ | ८८ | १२ | ८८ | १२ |

टीप : सांगली जिल्ह्यातील विविध तालुक्यातील २५ कंत्राटदारांकडून प्रश्नावली भरून घेतल्या.

# वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित कंत्राटदारांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. ८



## वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित कंत्राटदारांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. ९



# वृत्तपत्रातील विकासकामासंबंधित कंत्राटदारांच्या प्रश्नावलीवर आधारित तक्ता

आलेख क्र. १०



### ५.२ : बातम्यांमुळे विकासकामांवर तसेच संबंधित यंत्रणेवर होणारे परिणाम

वृत्तपत्रे ही शहरी, ग्रामीण तसेच दुर्गम भागात सर्वच ठिकाणी पोहचत असल्याने त्याला मोठा वाचकवर्ग आहे. वृत्तपत्रात येणारी बातमी ही अजूनही लोकांकडून प्रमाणबद्ध मानली जाते. विकास कामांच्या बातम्यांना मोठा वाचक वर्ग (वाचक पाहणीनुसार १०० टक्के वाचक विकासकामाच्या बातम्या वाचतात) आहे. लोकोपयोगी मोठ्या विकासकामांबरोबरच निकृष्ट दर्जाच्या किंवा भ्रष्टाचारा संबंधीत बातम्यांची लोकांच्यात चर्चा होते.

आपल्या परिसरात होणाऱ्या व चालू असलेल्या विकासकामांबद्दल लोकांना जास्त कुतूहल असते. अशा बातम्या वृत्तपत्रात आल्यास त्या वाचून अधिक माहिती घेण्याचा लोकांचा कल असतो.

वाचक सर्वेक्षणानुसार विकासकामांच्या बातम्यांचा उपयोग होतो असे ९३ टक्के वाचकांनी सांगितले तर विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव असतो असे ९८ टक्के वाचकांनी सांगितले. वृत्तपत्रीय बातम्यांचा विकासकामांवर परिणाम (सकारात्मक किंवा नकारात्मक) होतो असे ९६ टक्के वाचकांनी सांगितले.

विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांच्या सर्वेक्षणानुसार ८४ टक्के कंत्राटदारांनी विकासकामांचा वृत्तपत्रावर प्रभाव असतो असे सांगितले. (तक्ता क्रमांक ३७ पान क्रमांक २२९) ८८ टक्के कंत्राटदारांनी बातम्यांचा विकासकामांवर परिणाम (सकारात्मक किंवा नकारात्मक) होतो असे सांगितले. तर ६० टक्के कंत्राटदारांनी बातम्यांमुळे विकासकामांमध्ये अडथळा निर्माण होतो असे सांगितले. वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकास कामांचा दर्जा सुधारतो असे ९६ टक्के वाचकांनी सांगितले.

**वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांवर तसेच शासकीय यंत्रणेवर होणारे परिणाम अभ्यासण्यासाठी उदाहरण म्हणून काही बातम्या खालील प्रमाणे –**

## उदाहरण १

१ जून २००३ रोजी 'केसरी' या वृत्तपत्रात पान ३ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**जलसंधारणाच्या कामांच्या तपासणीसाठी तालुकावार निरीक्षण समिती स्थापणार – जि. प. अध्यक्ष धेंडे, दैनिक 'केसरी'च्या वृत्ताची दखल**

**फोटो क्रमांक : ४०**



**जलसंधारणाच्या कामाच्या तपासणीसाठी तालुकावार निरीक्षण समिति स्थापणार : धेंडे**

*सांगली : जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी टंचाई निवारणासाठी सुरू असलेल्या जलसंधारणाच्या कामांची तपासणीसाठी तालुकावार निरीक्षण समित्या स्थापन करण्याचा निर्णय शनिवारी जिल्हा परिषदेच्या जलसंधारण समिति बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रवीण धेंडे होते.*

जलसंधारणाअंतर्गत रोजगार हमीतून सुरू असलेल्या कामाचा दर्जा, त्यातील भ्रष्टाचार आणि त्याकडे लोकप्रतिनिधींचे होणारे दुर्लक्ष याबाबत जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब मुळीक असा आग्रह श्री. मुळीक यांनी यावेळी धरला. यावर सर्वच सदस्यांचे एकमत झाल्यामुळे याच कामावर देखरेख करण्यासाठी आणि काम दर्जेदार करून

**दै. 'केसरी'च्या वृत्ताची दखल**

जलसंधारणाच्या कामाबाबत दैनिक 'केसरी'ने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची कात्रणेच काल सदस्य बाबासाहेब मुळीक यांनी सादर केली. त्यामुळेच हा निर्णय घेण्यात आला.

अशोक शिंदे, वाळवा तालुका- वसंतराव रगटे, शिराळा तालुका- उदयसिंग नाईक, आटपाडी तालुका- आण्णासाहेब पत्की, खानापूर कडेगाव तालुका बाबासाहेब मुळीक, कवठेमहांकाळ तालुका- स्वरदा पाटील, जत तालुका- बसवराज पाटील, श्रीनिवास भोसले.

यावेळी जवाहर योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विहिरींच्या लाभार्थीबाबत खानापूर व जत तालुक्यातील काही लाभार्थींच्या प्रस्तावांची फेरछाननी करण्याचेहि ठरले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्य पद्धतीबद्दलहि याच

जलसंधारणांतर्गत रोजगार हमीतून सुरू असलेल्या कामांचा दर्जा, त्यातील भ्रष्टाचार आणि त्याकडे लोकप्रतिनिधींचे होणारे दुर्लक्ष याबाबत जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब मुळीक यांनी वृत्तपत्रांमधील बातम्यांकडे समितीचे लक्ष वेधले. श्री. मुळीक यांनी यावेळी जलसंधारणाच्या कामांच्या दर्जाबाबत दैनिक 'केसरी'ने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या वृत्तांची कात्रणे सभेत सादर केली. या कामांचा दर्जा टिकवायचा असेल आणि त्यातून चांगले परिणाम अपेक्षित असतील, तर त्यासाठी जिल्हा परिषदेच्या जलसंधारण समिती सदस्यांना लक्ष द्यावे लागेल, असा आग्रह श्री. मुळीक यांनी यावेळी धरला. यावर सर्व सदस्यांचे एकमत झाल्याने याच कामावर देखरेख करण्यासाठी आणि काम दर्जेदार करून घेण्यासाठी जलसंधारण समितीमधील सर्वच सदस्यांच्या अध्यक्षतेखाली या समित्या स्थापन करण्याचे ठरले.

## उदाहरण २

३० जानेवारी २०१० रोजी लोकमत या वृत्तपत्रात पान १ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**वर्षात सहा कोटींची विनानिविदा कामे**

**आयुक्तांकडून अधिनियम धाब्यावर**

(वृत्तमालिका – कुंपणाची खाबुगिरी – भाग १)

**फोटो क्रमांक : ४१**



# वर्षात सहा कोटींची विनानिविदा कामे

आयुक्तांकडूनच अधिनियम धाब्यावर; आपत्कालीन कामांचा अधिकार नित्याच्या कामांसाठी; बड्या बिल्डरांवर कृपादृष्टी

महापालिकेच्या स्थापनेपासून गेल्या १२ वर्षांच्या कालावधीत गैरव्यवहाराच्या अनेक घटना घडल्या आणि उघडकीसही आल्या. विनानिविदा कामांनी तत्कालीन पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी वादग्रस्त ठरले. परिणामी दोन वर्षांपूर्वी महापालिकेत सत्तांतर झाले. आता विनानिविदा कामांबाबत पदाधिकारी, नगरसेवक सावध असले तरीही, प्रशासकीय स्तरावर बेकायदेशीररित्या विनानिविदा कामांचा सपाटा लावला आहे. या सर्व कामांवर प्रकाशझोत टाकणारी मालिका आजपासून...

अविनाश कोळी

सांगली, दि. २९ : महापालिकेचा कारभार मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार चालावा म्हणून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शासनाने ज्यांच्यावर सोपविली, त्या आयुक्तांनीच अधिनियमातील तरतुदींना धाब्यावर बसविले आहे. यापूर्वीच्या विशेष लेखापरीक्षणात विनानिविदा कामाचा मुद्दा गाजला असतानाही गेल्या वर्षभरात तब्बल सहा कोटींची विनानिविदा कामे करण्यात आल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ (३)(क) नुसार गेल्या वर्षभरात आयुक्तांच्या स्वाक्षरीने सुमारे सहा कोटींची विनानिविदा कामे करण्यात आली आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार केवळ आपत्कालीन परिस्थितीतच या कलमाचा वापर करणे बंधनकारक आहे. महापालिकेच्या स्थायी समितीला आर्थिक, धोरणात्मक निर्णयाचे अधिकार आहेत. तीन हजार रुपयांवरील कोणतेही काम निविदा पद्धतीनेच करण्याचा कायदा आहे. महापूर, भूकंप व अन्य

▶▶ पान २ वर



सांगली महापालिकेत प्रशासकीय स्तरावर बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या विनानिविदा कामांबाबत दैनिक लोकमतने 'कुंपणाची खाबुगिरी' ही पाच भागांची मालिका प्रसिध्द केली. महापालिकेचा कारभार मुंबई प्रांतिक अधिनियमानुसार चालावा, म्हणून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शासनाने ज्यांच्यावर सोपविली, त्या आयुक्तांनीच अधिनियमातील तरतुदींना धाब्यावर बसविले आहे. यापूर्वीच्या विशेष लेखापरीक्षणात विनानिविदा कामांचा मुद्दा गाजला . गेल्या वर्षभरात करण्यात आलेल्या तब्बल सहा कोटींच्या विनानिविदा कामांवर या मालिकेतून प्रकाशझोत टाकण्यात आला. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ (३) (क़) नुसार आपत्कालीन परिस्थितीतच विनानिविदा कामे करण्याचे बंधनकारक असते. परंतु या नियमाचा गैरवापर करून आयुक्तांनी तब्बल सहा कोटींची विनानिविदा कामे काढून बड्या बिल्डरांवर कृपादृष्टी केल्याचा ऊहापोह या वृत्तमालिकेतून करण्यात आला.

२६ मे २०११ रोजी 'लोकमत' या वृत्तपत्रात पान १ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**आयुक्तांच्या कामाची चौकशी सुरू.**

**नगरविकास खात्याने विनानिविदा कामांची माहिती मागविली.**

**फोटो क्रमांक : ४२**



26 M 2011

# आयुक्तांच्या कामाची चौकशी सुरू

## नगरविकास खात्याने विनानिविदा कामांची माहिती मागवली

सांगली | दि. २५ (प्रतिनिधी)

**आपत्कालीन** परिस्थितीत विनानिविदा कामे करण्यासाठी राखीव असलेल्या ६७ (३) क या कलमाचा गैरवापर केल्याप्रकरणी सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेची नगरविकास खात्यामार्फत चौकशी सुरू झाली आहे. आयुक्तांच्या अधिकारात ही सर्व कामे झाल्याने त्यांच्याकडून शासनाने माहिती मागवली आहे. 'लोकमत'ने याविषयीची मालिका प्रकाशित केली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ (३) (क) नुसार आयुक्तांच्या स्वाक्षरीने सुमारे सात कोटींची विनानिविदा कामे करण्यात आली होती. २५ डिसेंबर २००८ ते २५ ऑगस्ट २००९ या कालावधीतील कागदपत्रांनुसार सव्वाशे विनानिविदा कामे झाली आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार केवळ आपत्कालीन परिस्थितीतच या कलमाचा वापर करायचा आहे. तीन हजार रुपयांवरील कोणतेही काम निविदा पद्धतीनेच करण्याचा कायदा आहे. महापूर, भूकंप व अन्य आपत्तीकाळात स्थायी समितीच्या सभेपर्यंत थांबणे शक्य नसेल, अशावेळी तातडीच्या कामांसाठी हे कलम वापरण्याची सोय आहे. अधिनियमातील या तरतुदींना ठोकरून रस्त्यांचे डांबरीकरण, पॅचवर्क, मुरुमीकरण, खडीकरण, पावसाळी मुरुमाची कामे, औषध खरेदी, तुरटी खरेदी, केमिकल खरेदी, गटार बांधणे, उद्यानात खेळणी बसविणे, स्टेशनरी साहित्य, छपाई साहित्य खरेदी, पेव्हिंग ब्लॉक बसविणे, विद्युत व्यवस्था, प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, फर्निचर खरेदी अशी कामे करण्यात आली. शहरातील नामांकित ठेकेदारांवर या कलमानुसार विनानिविदा कामांचा वर्षाव झाला. आता नगरविकास खात्याने या सर्व कामांची यादी व तपशील मागवला आहे.

**प्रकरण भोवणार...**

- विनानिविदा प्रकरणावरून प्रशासनाची डोकेदुखी वाढली
- खुलासा करण्याची मुदत संपल्यानंतर शासनाचे पत्र प्राप्त
- नागरिक हक्क संघटनेकडूनही तक्रारी दाखल
- पावसाळी अधिवेशनातही उपस्थित होणार प्रश्न

आपत्कालीन परिस्थितीत विनानिविदा कामे करण्यासाठी राखीव असलेल्या ६७ (३) (क) या कलमाचा गैरवापर केल्याप्रकरणी सांगली, मिरज, कुपवाड महापालिकेची नगरविकास खात्यामार्फत चौकशी सुरू झाली. आयुक्तांच्या अधिकारात ही सर्व कामे झाल्याने त्यांच्याकडून शासनाने माहिती मागविली आहे. दैनिक 'लोकमत'ने याविषयी जानेवारी २०१० मध्ये 'कुंपणाची खाबुगिरी' ही वृत्तमालिका प्रसिध्द केली होती. याची शासकीय स्तरावर दखल घेतली गेली. आणि त्याचा परिणाम म्हणून नगरविकास खात्याने आयुक्तांच्या कामकाजाची चौकशी सुरू केली.

## उदाहरण ३

१४ नोव्हेंबर २००३ रोजी 'लोकमत' या वृत्तपत्रात पान १३ वर प्रसिध्द झालेली बातमी

**...अखेर रस्ता पॅचवर्कचे काम सुरू**

**फोटो क्रमांक : ४३**


...अखेर रस्ता पॅचवर्कचे काम सुरू

'लोकमत' इफेक्ट

इस्लामपूर ते किल्ले मच्छिंद्रगड फाट्यापर्यंत रस्त्याची दुरवस्था झाली होती. या रस्त्यावर नेहमीच अपघात होत होते. शेतकऱ्यांनी जलवाहिनीसाठी ठिकठिकाणी चरी खोदल्या होत्या. खड्डे चुकविताना वाहनधारकांमध्ये वादावादीचे प्रकार घडत. या खराब रस्त्याचा एका डॉक्टरलाही चांगलाच फटका बसला, तर त्याच्या दुसऱ्या दिवशी एका अभियंत्याची गाडी दुचाकीला ठोकरल्याने रस्त्याच्या दुरवस्थेची चर्चा ग्रामस्थांमध्ये चांगलीच रंगली होती. या सर्व  घटनांची आणि रस्त्याच्या दुरवस्थेची दैनिक 'लोकमत'ने दखल घेऊन वेळोवेळी वृत्त प्रसिद्ध केले. या वृत्ताची पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडून दखल घेतली गेली आणि किरकोळ दुरूस्ती फंडातून रस्त्याच्या पॅचवर्कचे काम करण्यात आले. पावसाळ्यापूर्वी रस्त्याची दुरुस्ती झाल्याने प्रवासी आणि ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले.

## उदाहरण ४

२८ डिसेंबर २०११ रोजी 'सकाळ' या वृत्तपत्रात पान ४ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**वाळू उपसा बोटी रातोरात हलवल्या**

**प्रदूषण महामंडळाकडून रेठरे हरणाक्ष येथील पाण्याचे नमुने तपासणीसाठी जमा**

**फोटो क्रमांक : ४४**



मिळावला. इर्वती अंकुरावतील याचे मार्गदर्शन लाभले.

# वाळू उपसाबोटी रातोरात हलवल्या

## प्रदूषण महामंडळाकडून रेठरे हरणाक्ष येथील पाण्याचे नमुने तपासणीसाठी जमा

**सकाळ वृत्तसेवा**

सकाळ बातमीचा परिणाम

भुवानीनगर, ता. २७ : रेठरे हरणाक्ष (ता. वाळवा) येथील कृष्णा नदी पात्रातील पाणीपुरवठा संस्थेचे इंटक चेंबर कोसळल्यानंतर त्या परिसरात असणाऱ्या वाळू व्यावसायिकांनी आपल्या बोटी रातोरात हलवल्या आहेत. परिसरात वाळू उपसा होतच नसल्याचे चित्र तयार करण्यात आले आहे. दरम्यान, आज प्रदूषण महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित परिसरात भेट देऊन पाण्याचे नमुने तपासणीसाठी नेले.

रेठरे हरणाक्ष येथील कृष्णा सहकारी पाणीपुरवठा संस्थेचा कृष्णा नदीत असणारा इंटक चेंबर क्रमांक एक वाळू उपशासाठी जिलेटिन कांड्यांचा स्फोट केल्याने ढासळला. संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या बाबतची तक्रार महसूल विभागाकडे केल्यानंतर या बाबतचा पंचनामा महसूल विभागाने केला आहे. मात्र हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर परिसरातील वाळू ठेकेदारांनी आपल्या वाळू उपशाच्या बोटी रातोरात हलवल्या आहेत. इंटकवेल असणाऱ्या परिसरात वाळू उपसा होत नसल्याचे चित्र ठेकेदारांनी तयार केले आहे. आज प्रदूषण महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी रेठरे हरणाक्ष परिसरात कृष्णा नदी परिसराला भेट दिली. नदीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत.

याबाबत तहसीलदार विवेक जाधव म्हणाले, "जिलेटीन कांड्यांच्या स्फोटामुळे इंटक चेंबर ढासळल्याची तक्रार पाणी पुरवठा संस्थेकडून झाली आहे. संबंधित ठिकाणी महसूल विभागाने पंचनामा केला आहे. मात्र, या बाबत शहानिशा करून निर्णय घेण्यात येईल."

रेठरे हरणाक्ष येथील कृष्णा सहकारी पाणीपुरवठा संस्थेचा कृष्णा नदीत असणारा इंटक चेंबर क्रमांक १ हा वाळू उपशासाठी जिलेटिन कांड्यांचा स्फोट केल्याने ढासळला. संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबतची तक्रार महसूल विभागाकडे केल्यानंतर याबाबतचा पंचनामा संबंधित अधिकाऱ्यांनी केला. मात्र हे वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर परिसरातील वाळू ठेकेदारांनी आपल्या वाळू उपशाच्या बोटी रातोरात हलवल्या. इंटकवेल असणाऱ्या परिसरात वाळू उपसा होत नसल्याचे चित्र ठेकेदारांनी तयार करण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या या वृत्ताची दखल घेऊन प्रदूषण महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी रेठरे हरणाक्ष येथे कृष्णा नदी परिसराला भेट दिली, तसेच नदीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी जमा केले.

## उदाहरण ५

२ मे २००४ रोजी 'केसरी' या वृत्तपत्रात पान ५ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**दैनिक 'केसरी'च्या वृत्तामुळे लिकेज सिमेंट बंधाऱ्याच्या कामास प्रारंभ**

**फोटो क्रमांक : ४५**



# दै. 'केसरी'च्या वृत्तामुळे लिकेज सिमेंट बंधाऱ्याच्या कामास प्रारंभ

***खंडेराजुरी (वार्ताहर) : जलसंधारणाच्या माध्यमातून खंडेराजुरी येथे गेल्याचवर्षी बांधलेल्या सिमेंटच्या बंधाऱ्याला गळती लागल्याने त्यातून पाणी वाहून गेले. दैनिक 'केसरी'ने या प्रश्नाला वाचा फोडल्याने या बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात झाली आहे.***

जलसंधारणाच्या माध्यमातून खंडेराजुरी येथे गेल्यावर्षी जवळे ग्रुप आणि कांबळे, माणगावे, सुतार, सुंगारे ग्रुप या ठिकाणी दोन सिमेंट बंधारे बांधण्यात आले. मात्र कमी खोलीचा पाया आणि निकृष्ट दर्जेचे काम केले गेल्याने या दोन ठिकाणी पावसाळ्यात पावसाचे पाणी त्या बंधाऱ्यात साठण्याऐवजी हा सिमेंट बंधारा पाण्याने पूर्ण भरला. मात्र या बंधाऱ्यामधून पाणी वाहून गेले. या बंधारा परिसरातील २५ ते ३० एकर बागायत शेतीला फायदा झाला असता असे तेथील शेतकऱ्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी बंधाऱ्या विषयी व पाण्याबद्दल अडचणी सांगितल्या. दै. 'केसरी'च्या वृत्ताची दखल घेऊन या लिकेज बंधाऱ्याचे काम कृषि विभागाचे सर्जेराव पाटील व कृषि साहाय्यक संजय पवार यांनी बाहेर गावचे कामगार आणून सध्या लिकेज सिमेंट बंधाऱ्याचे काम कृषि विभागाचे सर्जेराव पाटील व कृषि साहाय्यक संजय पवार यांनी बाहेर गावचे कामगार आणून सध्या किलेज सिमेंट बंधाऱ्याचे काम सुरू केले गेले आहे.

★ मुंबई : श्यामची आई चित्रपटात श्यामच्या आईची भूमिका करणाऱ्या वनमालाबाईंना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

खंडेराजुरी येथे जलसंधारणाच्या माध्यमातून गेल्यावर्षी बांधण्यात आलेल्या सिमेंटच्या बंधाऱ्याला गळती लागली होती. कमी खोलीचा पाया व निकृष्ट दर्जाचे काम केले गेल्याने या बंधाऱ्याला गळती लागली. त्यामुळे २५ ते ३० एकर शेतीला या पाण्याचा फायदा होऊ शकला नाही.

या निकृष्ट कामाचे वृत्त दैनिक 'केसरी'मध्ये आल्यानंतर शासकीय अधिकाऱ्यांनी याची दखल घेतली. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी बाहेर गावचे कामगार आणून गळतीच्या कामाची दुरुस्ती केली.

## उदाहरण ६

२ मार्च २०१३ रोजी ‘सकाळ’ या वृत्तपत्रात पान ४ वर प्रसिध्द झालेली बातमी –

**मिरज–म्हैसाळ रस्त्यावरील टोलनाका बंद**

**‘सार्वजनिक बांधकाम’ची कारवाई : ‘सकाळ’च्या पाठपुराव्यास यश**

**फोटो क्रमांक : ४६**



# मिरज-म्हैसाळ रस्त्यावरील टोलनाका बंद

## ‘सार्वजनिक बांधकाम’ची कारवाई : जोखड संपुष्टात; ‘सकाळ’च्या पाठपुराव्याला यश

मिरज, ता. १ : मिरज-म्हैसाळ रस्त्यावरील रेल्वे उड्डाण पुलाच्या पथकर वसुलीचा नाका सार्वजनिक बांधकाम विभागाने काल रात्री बारा वाजून १ मिनिटांनी बंद केले. गेली बारा वर्षे सुरू असणारी पथकर वसुली थांबली आहे.

पथकर वसुलीला मुदतवाढ न मिळाल्याने निर्णय घेण्यात आला. मुख्य अभियंत्यांच्या आदेशानुसार उपअभियंता सलीम मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाली. बेडग रस्ता आणि म्हैसाळ रस्ता या दोन ठिकाणी डायमेन्शन कन्स्ट्रक्शनने टोलनाके उभारले होते. अधिकाऱ्यांनी जनरेटर बंद केला. बूथ सील केला. ...ात संगणक, प्रिंटर, काही छापील पावत्या असे साहित्य आहे. ठेकेदाराशी झालेल्या करारानुसार सर्व मालमत्ता सार्वजनिक बांधकामच्या मालकीची आहे. पुलाचे अंदाजपत्रक निश्चित करताना टोलनाके उभारणी व यंत्रणेचा खर्चही ठेकेदाराला देण्यात आला होता.

### ‘सकाळ’चे यश

**पथकराचा जाच बंद व्हावा, यासाठी ‘सकाळ’ने जानेवारी २०१२ पासून पाठपुरावा सुरू ठेवला होता. पुलासाठी झालेला खर्च, २०१२ पर्यंत प्रत्येक वर्षी झालेला वसूल, ठेकेदाराने मागितलेला वाढीव खर्च याचा लेखाजोखा सातत्याने मांडला होता. खर्च वसूल झाल्याने टोलनाके बंद व्हावेत, यासाठी पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत जिल्हा परिषद, पंचायत समिती व पूर्व भागातील ग्रामपंचायतींनी टोलनाका बंद व्हावा म्हणून ठराव केले होते. या पाठपुराव्याला आज यश मिळाले. टोलला मुदतवाढ न देण्याचा निर्णय शासनाने घेतला. सार्वजनिक बांधकामाच्या अधिकाऱ्यांनीही सतत सकारात्मक भूमिका ठेवली.**

आता मुदत संपल्याने सर्व मालमत्ता सार्वजनिक बांधकामच्या ताब्यात आली. तसे पत्र शहर पोलिसांनाही देण्यात आले. आज सकाळी टोलनाक्यांवर सामसूम होती. बारा वर्षांत प्रथमच कर्नाटक व मिरज पूर्व भागातील वाहने टोलशिवाय शहरात आली. मनसे कार्यकर्त्यांनी टोल बंद व्हावा, यासाठी अनेकवेळा आंदोलने केली होती. त्यांनी निर्णयाचे स्वागत केले. शेतकरी संघटनेनेही नाक्यावर जाऊन आनंद व्यक्त केला.

**खर्च ८ वसुली १३ कोटी**

उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी आठ कोटी रुपये खर्च झालेत. जानेवारी २०१३ अखेर एकूण १२ कोटी ८८ लाख ८८ हजार रुपयांचा पथक...
झाला. एका जानेवारीत ९ ला...
हजार रुपये वसूल झाले. फे...
वसूल अद्याप सार्वजनिक बांध...
मिळालेला नाही. ठेकेदाराने
कोटींचे उद्दिष्ट सादर केले होते.
वसुलीसाठी २०२० पर्यंत ...
मागितली होती. रस्ते महामंड...
मुदतवाढीचा कोणताही
रात्रीपर्यंत आला नाही. अधि...
नाके सील केले. उर्वरित
वसुलीसाठी न्यायालयीन प्रक्रि...
शासनाबरोबर एकरकमी तडजो...
ठेकेदाराला आता अवलंबावे ...
पथकर वसुलीला पुन्हा
मिळण्याची शक्यता अ...
फेटाळून लावली.

मिरज–म्हैसाळ रस्त्यावरील पथकराचा त्रास बंद व्हावा, यासाठी ‘सकाळ’ने जानेवारी २०१२ पासून पाठपुरावा सुरू ठेवला होता. पुलासाठी झालेला खर्च, २०१२ पर्यंत प्रत्येक वर्षी झालेली वसूली, ठेकेदाराने मागितलेला वाढीव खर्च, याचा लेखाजोखा ‘सकाळ’ने वारंवार मांडला होता. खर्च वसूल झाल्याने टोलनाके बंद व्हावेत, यासाठी पाठपुरावा केला होता. याची दखल घेत जिल्हा परिषद, पंचायत समिती व मिरज पूर्व भागातील ग्रामपंचायतींनी टोलनाका बंद व्हावा, म्हणून ठराव केले होते. या पाठपुराव्याला टोल बंद झाल्यामुळे यश मिळाले. टोलला मुदतवाढ न देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

वरील सर्व उदाहरणांवरून विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांमुळे त्या कामांवर परिणाम (सकारात्मक किंवा नकारात्मक) होतो, हे दिसून आले. वृत्तपत्रातील बातमीची शासकीय पातळीवर दखल घेतली जाते, तसेच त्या कामातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जातो, असे दिसून आले.

**विकासकामांवर बातम्यांमुळे होणाऱ्या परिणामांबाबत वृत्तपत्र वाचकांची मते खालीलप्रमाणे –**

१) विकासकामांसंदर्भात आलेल्या बातम्यांची दखल शासन दरबारी घेतली जाते. त्यामुळे बंद पडलेली विकासकामे तातडीने सुरू होतात.

२) वृत्तपत्रात आलेल्या बातम्याची अधिकारी दखल घेऊन त्यावर उपाय करतात यातून वृत्तपत्रांचा प्रभाव जाणवतो.

३) वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झालेल्या बातम्यांमुळे निकृष्ट दर्जाच्या किंवा रेंगाळलेल्या कामांकडे लोकांचे लक्ष वेधले जाते.

४) वृत्तपत्रात विकासकामांविषयक आलेल्या बातमीची पूर्तता शासकीय अधिकाऱ्यांना करावी लागते. अन्यथा जनतेतून उठाव होतो आणि अधिकाऱ्यांना काहीवेळा निदर्शनालाही सामोरे जावे लागते.

५) सकारात्मक किंवा नकारात्मक दोन्ही बाजूंचा विचार करून वार्ताहराने लेख लिहावेत.

**वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांवर होणाऱ्या परिणामांबाबत वार्ताहरांचे काही अनुभव खालीलप्रमाणे –**

१) सांगली – मिरज रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या निकृष्ट कामाबाबत वृत्तपत्रात बातमी आल्यानंतर संबंधित ठेकेदारास योग्य आकाराची खडी तयार करण्यास अधिकाऱ्यांनी भाग पाडले.

२) सांगली येथील बाजार समिती इमारतीच्या बांधकामात भ्रष्टाचाराची बातमी दिल्यानंतर ते काम तात्काळ थांबवण्यात आले आणि त्या ठेकेदाराचे बिलही रोखले.

३) सांगली शहरातील फुटपाथची कामे निकृष्ट झाल्याबद्दल वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर आयुक्तांनी फुटपाथ फोडून कामाची तपासणी केली. यावेळी सळईचा वापर न केल्याचे निदर्शनास आले. याची दखल घेऊन त्या कंत्राटदाराचा मक्ता रद्द करून त्याला काळ्या यादीत टाकले.

४) मिरज येथील कृष्णा घाटावरील हिंदू स्मशानभूमीची दैन्यावस्था दूर करण्यासाठी बातमीद्वारे केलेल्या आवाहनास नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. महापालिकेच्या मदतीवर अवलंबून न राहता नागरिकांनी श्रमदानातून स्मशानभूमी परिसराचा कायापालट केला.

५) दै. 'तरुण भारत'मध्ये 'समस्या उपनगरांच्या' ही १६ भागांची मालिका प्रसिध्द करण्यात आली होती. या मालिकेत नगरसेवकांनी केलेल्या कामांचा लेखाजोखा मांडून तेथील अडचणींचा ऊहापोह करण्यात आला. याची दखल घेऊन दोन नगरसेवकांनी संबंधित बातमीदाराशी चर्चा केली व त्या परिसरातील अडचणी सोडविल्या.

६) सलगरे–मालगाव रस्त्यावर मुरूमाऐवजी माती टाकण्यात आली होती. यामुळे २०० ट्रॉली मुरूम वाचला. डांबरीकरणापूर्वी संबंधित कामाची छायाचित्रासह बातमी दै. 'पुण्यनगरी'मध्ये आल्यानंतर प्रशासनाने दखल घेऊन त्या रस्त्याची दुरूस्ती केली.

७) बोराटमळा (ता. आटपाडी) येथील रस्त्याच्या कामातील भ्रष्टाचाराची बातमी दै. 'केसरी'मध्ये प्रसिध्द झाली. याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन कामाची तपासणी केली. त्यात तथ्य आढळल्याने अद्यापपर्यंत त्या ठेकेदाराला बील अदा केलेले नाही.

### ५.३ : बातम्यांमुळे विकासकामांमधील भ्रष्टाचारावरील अंकुश

लवकर खराब होणारे रस्ते, निकृष्ट दर्जाच्या इमारती, सुमार दर्जाचे बंधारे, दर्जाहीन पूल, यामुळे विकासकामांमध्ये भ्रष्टाचार होत असतो, हे सिध्द होते. विकासकामांवर देखरेख करणारे शासकीय अधिकारी आणि विकासकामे करणारे कॉन्ट्रॅक्टर यांचे 'अर्थपूर्ण' संबंध बऱ्याच वेळा चव्हाट्यावर आले आहेत. लोकप्रतिनिधींचेही विकासकामांच्या दर्जाकडे दुर्लक्ष असते. सामान्य जनतेने विकासकामांबद्दल आवाज उठविल्यास त्यावर मर्यादा येतात. अशा परिस्थितीत विकासकामांमधील भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यास वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्र ही जनजागृती करण्यासाठीचे मोठे माध्यम आहे. भ्रष्टाचारामुळे जनतेच्या पैशाचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव किती, हे तपासणे आवश्यक आहे.

विविध वृत्तपत्रांमध्ये भ्रष्टाचारासंबंधी आलेल्या काही निवडक बातम्या खालीलप्रमाणे –

१) कोंतेवबोबलाद–तिकोंडी रस्त्याच्या कामाच्या चौकशीची मागणी
(केसरी, दि. ४ एप्रिल २००१, पान ९)

२) वारणा धरणाच्या निकृष्ट कामांच्या चौकशीची मागणी
(पुढारी, २२ फेब्रुवारी २००१, पान ९)

३) कापरी–इंगरूळमध्ये निकृष्ट कामांमुळे शासनाचा निधी पाण्यात
(लोकमत, विशेष वृत्त, २४ फेब्रुवारी २००१, पान ५)

४) दीड कोटीची विकासकामे बेकायदेशीर घुसडली : विरोधी पक्षनेते कुरणे
(केसरी, ८ एप्रिल २००१, पान ६)

५) टेंडर निघण्यापूर्वीच कामाचा ठेका देण्याचा अजब प्रकार
(पुढारी, २ एप्रिल २००१, पान ९)

६) निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याच्या सूचना
(लोकमत, ७ मार्च २००२, पान ६)

७) टेंभूच्या निविदा मिळविण्यासाठी कंत्राटदारांकडून दहशतीचा वापर
(केसरी, १९ एप्रिल २००१, पान १)

८) आटपाडीत पाटबंधारे विभागाच्या शाखाधिकाऱ्याला लाच घेताना पकडले

(पुढारी, ५ जून २००३, पान २)

९) नागरिकांना खड्ड्यात घालणारा हॉटमिक्सवरील कोट्यवधीचा खर्च

(लोकमत, विशेष वृत्त, २३ नोव्हेंबर २००३, पान २)

१०) महापालिकेने मारले रस्त्यांवर एक लाखाचे पांढरे पट्टे

(केसरी, ९ जानेवारी २००५, पान ३)

११) पूरसंरक्षक भिंतीचे काम निकृष्ट झाल्याची तक्रार (पुढारी, ६ जानेवारी २००५, पान १२)

निकृष्ट दर्जाची विकासकामे, लाच घेताना अधिकारी सापडला, निविदा मिळविण्यासाठी दहशतीचा वापर, कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकणे, टेंडर न काढताच कामे वाटणे, असे वरील सर्व प्रकार विकासकामांतील भ्रष्टाचाराशी निगडित आहेत.

**विकासकामातील भ्रष्टाचाराबाबत वृत्तपत्रवाचकांची मते व अपेक्षा खालीलप्रमाणे –**

१) विकासकामांमधील भ्रष्टाचाराला फक्त वृत्तपत्रांमुळेच आळा बसू शकतो.

२) वृत्तपत्रे ही सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत असल्यामुळे भ्रष्टाचाराची बातमी सर्वांना समजते.

३) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांमधील भ्रष्टाचाराची बातमी आल्यास लोकांमध्ये त्याबाबत चीड निर्माण होते.

४) निकृष्ट कामे व भ्रष्टाचाराविरोधात लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी, असे लिखाण वृत्तपत्रांमधून झाले पाहिजे.

५) विकासकामांमध्ये जर भ्रष्टाचार झाला असेल, तर संबंधितास शिक्षा होईपर्यंत वेळोवेळी पाठपुराव्याची बातमी द्यावी.

६) पत्रकारांनी योग्य पाठपुरावा केल्यास विकासकामातील भ्रष्टाचारावर नियंत्रण येऊ शकते.

७) वृत्तपत्रात भ्रष्टाचारासंबंधी स्वतःची बातमी आल्यास संबंधित अधिकारी, कंत्राटदार घाबरतात, आणि कामाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करतात.

८) वृत्तपत्रांमधून विकासकामांची मापे व प्रत्यक्ष काम यांचा ऊहापोह होणे आवश्यक आहे.

९) अनेकदा विकासकामे करणारे कंत्राटदार हे वृत्तपत्रांचे जाहिरातदार असल्याने काही निकृष्ट कामांकडे वृत्तपत्रांचे दुर्लक्ष होते.

१०) निकृष्ट दर्जाच्या विकासकामांना वृत्तपत्रांमधून ठळक प्रसिध्दी द्यावी.

वृत्तपत्रांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो, असे वाचक सर्वेक्षणात ९३ टक्के लोकांनी सांगितले, तर ७ टक्के लोकांनी वृत्तपत्रीय बातम्यांमुळे भ्रष्टाचाराबाबत काही फरक पडत नाही, असे मत मांडले.

पत्रकारांच्या सर्वेक्षणानुसार ९६ टक्के पत्रकारांनी बातम्यांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो असे सांगितले. (तक्ता क्रमांक ३६ पान क्रमांक २२४) तर ४ टक्के पत्रकारांनी भ्रष्टाचारावर या बातम्यांचा फरक पडत नसल्याचे सांगितले. तर ९६ टक्के कंत्राटदारांनी विकासकामांच्या बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारतो असे सांगितले. वरील अभ्यासावरून असे दिसून येते की विकासकामांमधील भ्रष्टाचाराच्या बातमीमुळे लोकांच्यात याबाबत चीड निर्माण होते. त्यातून त्या कामाबद्दल जनआंदोलनही तयार होण्याची शक्यता असते. प्रसंगी वरिष्ठ अधिकारी या घटनांची दखल घेऊन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करतात. भ्रष्टाचारासंबंधित वृत्तपत्रीय बातम्यांमुळे कारवाईला सामोरे जावे लागेल या भीती पोटी बरेच अधिकारी व कंत्राटदार भ्रष्टाचार करण्यास घाबरतात. यावरूनच वृत्तपत्रांचा भ्रष्टाचाराविरूध्दचा प्रभाव दिसून येतो.

### ५.४ वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील जाहिराती व त्याचे फायदे

वृत्तपत्रे ही वाडी–वस्त्या, खेडोपाडी, गाव, शहरे आदि सर्वच ठिकाणी पोहचत असल्यामुळे बातम्या आणि जाहिराती बहुसंख्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे. विकासकामे स्पर्धात्मक दरात झाल्यास यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होतो. विकासकामे जाहीर निविदा सूचनांद्वारे वृत्तपत्रातून प्रसिद्ध केली जातात. त्यामुळे अनेक कंत्राटदारांना या निविदांबाबत माहिती मिळते. त्यामुळे निकोप पद्धतीने या निविदांसाठी स्पर्धा होते आणि कमीत कमी रकमेला ही कामे कंत्राटदारांना दिली जातात.

वृत्तपत्रांमध्ये जाहीर निविदा सूचनांद्वारे विकासकामे प्रसिद्ध झाल्यामुळे कामे मिळवण्यासाठी होऊ शकणाऱ्या वशिलेबाजी आणि गैरकृत्यांना आळा बसतो. सर्वसामान्य नागरिकांनाही या निविदा सूचनांमुळे आपल्या भागात कोणती विकासकामे होणार आहेत, त्याची अंदाजपत्रकीय किंमत किती याची माहिती मिळते. त्यामुळे नागरिकांचेही या कामांवर लक्ष राहून गैरकृत्यांना काही प्रमाणात आळा बसतो.

वृत्तपत्रांद्वारे प्रसिद्ध होणाऱ्या निविदा सूचनांमध्ये कामाचे नाव, कामाची रक्कम, सुरक्षा अनामत, निविदा फॉर्मची किंमत, कामांसाठी आवश्यक असणारा ठेकेदाराचा वर्ग, काम पूर्ण करणेची मुदत, निविदा शर्ती, कोऱ्या निविदा मिळण्याची तारीख, मोहोरबंद निविदा स्वीकृती तारीख, निविदा उघडण्याची वेळ आदी गोष्टींचा समावेश असतो.

शासकीय जाहिरात वितरण धोरणानुसार कामांची किंमत २० लाखांपेक्षा कमी असल्यास ती निविदा सूचना किमान स्थानिक पातळीवरच्या एक दैनिक आणि एक साप्ताहिक वृत्तपत्रात द्यावी लागते. जर एखादे काम २० लाख रूपयांपेक्षा जास्त आणि ५५ लाख रूपयांपेक्षा कमी रकमेचे असल्यास ती निविदा स्थानिक पातळीवरच्या एका दैनिकात आणि एका साप्ताहिकात द्यावी लागते. कामाची रक्कम जर ५० लाख रूपयांपेक्षा जास्त असल्यास स्थानिक पातळीवरचे एक मराठी दैनिक, राज्य पातळीवरचे एक मराठी दैनिक आणि राज्य पातळीवरच्या एका इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध करावी लागते.

**तक्ता क्रमांक : ३८**

**वृत्तपत्रनिहाय प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींची मूल्यमर्यादा खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | एका कामाचे मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिद्धीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १) | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रुपये २० लाखापर्यंत आहे अशी जाहिरात | जिल्हा माहिती अधिकारी | एक ‘क’ वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २) | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रुपये २० लाखाच्या वर ते ५५ लाखापर्यंत आहे अशी जाहिरात | विभागीय माहिती उपसंचालक | एक ‘ब’ वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| ३) | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रुपये ५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | संबंधित ‘अ’ वर्ग दैनिकात व त्या विभागातील ‘ब’ व त्या जिल्ह्यातील एका ‘क’ वर्ग दैनिकास |

## ५.५ वृत्तपत्रांमधील बातम्यांमुळे अनावश्यक विकासकामांवरील अंकुश

वृत्तपत्रातील बातम्यांमुळे विकासकामांमधील योग्य–अयोग्य बाजू जनतेसमोर येत असते. त्यामुळे या बातम्यांतील मुद्द्यांच्या आधारे लोकांमध्ये त्या विकासकामांबद्दल सकारात्मक किंवा नकारात्मक चर्चा होत असते. कोणती कामे लोकोपयोगी आहेत? कोणती कामे अनावश्यक आहेत? या दृष्टीनेही या बातम्यांद्वारे लोकमत बनत असते. बऱ्याच वेळा लोकांच्या उपयोगी नसणारी किंवा गरज नसणारी विकासकामे होताना दिसतात. अशा अनावश्यक कामांमुळे सार्वजनिक पैशांचा अपव्यय होतो. जनतेकडून कररूपाने जमा झालेल्या पैशाचा अपव्यय टाळण्यासाठी वृत्तपत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

विकासकाम कधी अनावश्यक असू शकते का? असा प्रश्न सहाजिकच उपस्थित होऊ शकतो. परंतु अनेकदा गरज नसताना आर्थिक अथवा राजकीय लाभासाठी विकासकामांची खैरात केली जाते. अशी विकासकामे अनावश्यकच म्हटली पाहिजेत. या विषयाचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी खालील उदाहरण पाहू,

**फोटो क्रमांक : ४७**



वरील फोटो क्र ४७ मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव ते विटा हा चकाचक असलेला रस्ता दिसत आहे. हा रस्ता खराब झाला नसला तरीही येथे दरवर्षी डांबरीकरण करण्यात येते. फोटो क्र. ४८ मध्ये म्हैसाळ ते बोलवाड रस्ता दिसत आहे. सोलापूरहून म्हैसाळ, कागवाड, चिकोडी, बेळगाव या ठिकाणी जाण्यासाठी अवजड वाहनांना या रस्त्याचा मोठा उपयोग होतो. पण या रस्त्याची गेल्या दहा वर्षात दुरुस्ती झालेली दिसत नाही.

**फोटो क्रमांक : ४८**



या रस्त्यावर खाचखळगे चुकवताना अनेकवेळा अपघात झालेले आहेत, तर बऱ्याच वेळा वाहन चालकांमध्ये हाणामारीचे प्रसंगही उद्‌भवतात. त्यामुळे म्हैसाळ–बोलवाड या रस्त्याची दुरूस्ती आवश्यक असताना चांगल्या प्रतीचा असणाऱ्या तासगाव–विटा रस्त्यावर मात्र दुरूस्तीच्या नावाखाली दरवर्षी अनावश्यक खर्च केला जातो.

वृत्तपत्रांच्या वार्ताहरांचा सर्वत्र जागरूकपणे वावर असतो. त्यामुळे आजूबाजूला घडणाऱ्या चांगल्या–वाईट बाबींची नोंद ते करू शकतात. तसेच जागरूक नागरिकही विकासकामांमधील चुका किंवा दुसरी बाजू वार्ताहरांसमोर मांडत असतात. त्यामुळे वार्ताहराने सजग राहून अनावश्यक विकासकामांची माहिती घेऊन ती वृत्तपत्रात देणे महत्त्वाचे ठरते. बऱ्याच वेळा शासकीय अधिकाऱ्यांकडून आवश्यक असणारी विकासकामे न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जिथे गरज नाही, अशा ठिकाणी अनावश्यक विकासकामे रेटली जातात. काही वेळा लोकप्रतिनिधींच्या दबावामुळेही अनावश्यक विकासकामे केली जातात. काही वेळा तर एकाच विकासकामाची दोन–तीन वेळा बोगस बिले घेतली जातात. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी लोकजागृती करण्याच्या दृष्टीने वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची ठरते.

विकासकामांवरील बातम्यांमुळे अनावश्यक विकासकामांना आळा बसतो, असे मत कंत्राटदारांच्या प्रश्नावली (मिरज – प्रश्नावली क्र. ७) मध्ये व्यक्त करण्यात आले आहे.

वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या अनावश्यक विकासकामांवरील प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या पुढीलप्रमाणे,

१) लोखंडी प्लेटस्‌च्या नाहक खरेदीमुळे 'कृष्णा खोरे'ला ४ कोटी रूपयांचा भूरदंड (केसरी, दि. ३ एप्रिल २००३, पान २)

२) महापालिकेने मारले रस्त्यांवर १ लाखाचे पांढरे पट्टे (केसरी, ९ जानेवारी २००५, पान ३)

३) महापुरात नवा पूल व बायपास रस्ता कुचकामी (पुढारी, १३ ऑगस्ट २००५, पान १३)

४) सहा कोटी खर्च; पण समस्या आहे तशाच : समस्याग्रस्त माधवनगर–४ (पुढारी, पान ५)

**फोटो क्रमांक : ४९**



सहा कोटी खर्च; पण समस्या आहे तशाच

माधवनगर : शिवाजी कांबळे

सन २००० पासून आतापर्यंत रस्ते, पाणी अशा विकासकामांवर सुमारे कोटींचा निधी खर्च झाला आहे; परंतु गावची कोणतीही समस्या सुटली नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, ठेकेदार व लोकप्रतिनिधी यांनी हा निधी संगनमताने हडप केल्याचा आरोप होत आहे.

माधवनगर ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामांवर सुमारे पाच कोटी रुपये खर्च झाले आहेत; परंतु येथील नागरिकांची कोणतीही समस्या सुटलेली नाही. बांधकाम विभाग, ठेकेदार व लोकप्रतिनिधी यांच्या भ्रष्ट कारभारामुळे हा विकास निधी नेमका कुठे व किती मुरला याची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. अपवाद सोडला तर गावातील सर्व रस्ते

माधवनगर : लाखोचा खर्च करून रस्त्याची अवस्था खराबच राहिली आहे. (छाया : मिलिंद)

विकासकामांवर लाखो रुपये खर्ची पडतात; परंतु नागरी समस्या मात्र आहे तशाच आहे. झालेल्या विकासकामांचा दर्जा व त्यावर झालेल्या खर्चाची

समस्याग्रस्त

झालेली दिसतात.

ग्रामपंचायत, आमदार व खासदार निधीतून होणाऱ्या कामांसाठी ठराविक ठरलेल्या ठेकेदारांनाच ठेके दिले जातात. इतक्या मोठ्या प्रमाणावर शासनाच्या पैशाच्या अपव्यय होत

स्थानिक अन्य कराच्या माध्यमात
प्रत्येकवर्षी सुमारे वीस लाखांचे उत्प
मिळते. बारावा वित्त आयोग, यशव
ग्रामसमृद्धी योजना, निर्मल ग्रा
आदींच्या माध्यमातून तसेच आमदा
खासदार निधी, जिल्हा परिषदेचा नि
आदीच्या माध्यामातून लाखो रुप
मिळत असतात.

लोकवर्गणीतून काही रक्क
उपलब्ध झाली आहे. सन २००
ते २००९ या काळामध्ये विवि
योजनेच्या माध्यमातून सुमारे पाच को
रुपये खर्ची पडले आहेत. यामधी
वर्गवारी अशी ग्रामपंचायतीचा स्व
चा निधी १ कोटी, आमदार निधी
कोटी ५० लाख, खासदार निधी ७
लाख, जिल्हा परिषद निधी १ कोटी ५
लाख, यशवंत ग्रामसमृद्धी, बारावा वि
आयोग आदींच्या माध्यमातून पंचाय

माधवनगरमध्ये विकासकामांवर ९ वर्षात ६ कोटी रुपये खर्च झाले. परंतु येथील नागरिकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. याचाच अर्थ तीच ती विकासकामे दाखवून अनेक वेळा बिले लाटण्यात आली आहेत. बांधकाम विभाग, ठेकेदार व लोकप्रतिनिधी यांच्या भ्रष्ट कारभारामुळे हा विकासनिधी नेमका कोठे व किती मुरला? याची चौकशी व्हावी, अशी नागरिकांकडून मागणी होत आहे. दरवर्षी विविध योजनांमधून माधवनगरमधील विकासकामांवर लाखो रुपये खर्ची पडतात. परंतु नागरी समस्या आहेत तशाच आहेत.

५) मुरुमात मुरले पैसे ! (लोकमत, २४ ऑक्टोबर २०१०, पान १)

सांगली महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी मुरुमाचा मोठा बाजार मांडला. सिमेंट कॉंक्रीटने

सजलेल्या वसाहतीमध्ये मुरुमाचा भराव टाकण्याचा प्रकार, तसेच एका शाळेच्या पटांगणावर अडीचशे ट्रक मुरुम टाकण्याची कामगिरी महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. सांगलीवाडीच्या मागासवर्गीय वसाहतीमध्ये १४ ऑगस्ट २००९ मध्ये ३ लाख ३५ हजाराचा मुरुम रस्ते दुरूस्तीसाठी टाकण्यात आला. वास्तविक या वसाहतीला भेट दिल्यानंतर तेथील सर्व रस्ते काँक्रीटचे असल्याचे दिसून आले. तसेच नवीन वसाहतीमधील शाळा क्रमांक २२ च्या परिसरात ४ लाख ३३ हजार रुपयांचा मुरुम टाकण्यात आला. वास्तविक शहरातील अनेक गुंठेवारी भागात पावसाळी मुरुम टाकणे आवश्यक असताना शाळेच्या पटांगणावर अनावश्यक मुरुम टाकला जात आहे.

दैनिक 'लोकमत'ने वृत्तमालिकेद्वारे महापालिकेच्या दलित सुधारणा समितीच्या माध्यमातून शासनाच्या निधीचा झालेला गैरवापर उघडकीस आणला. या वृत्तमालिकेची आयुक्त मेतके यांनी गंभीर दखल घेतली आणि शहर अभियंत्यांना वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या वृत्तमालिकेमुळे दलित संघटनांनीही आक्रमक भूमिका घेत शासनाकडे तक्रारी केल्या. त्यामुळे महापालिकेतील दलितवस्ती सुधार समितीचे तत्कालिन पदाधिकारी, तसेच काही शासकीय अधिकारी कंत्राटदार यांचे धाबे दणाणले आहे.

६) 'पीडब्ल्यूडी' इमारतीतून लाखोचे साहित्य गायब (लोकमत, २६ जुलै २०११, पान १)

'सांगलीतील चिंतामणीनगर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेली इमारत गेल्या २० वर्षापासून वापराविना पडून आहे. या

**फोटो क्रमांक : ५०**


26 जुलै 2011

# 'पीडब्ल्युडी' इमारतीतून लाखोंचे साहित्य गायब

■ ना चोरीचा पत्ता ना फिर्याद ■ शासनाची मालमत्ता रामभरोसे

अविनाश कोळी | दि. २५ (सांगली)

**बीस साल बाद...**

**पाण्याची टाकीही गायब...**

**खबर लागल्यानंतर स्वच्छता मोहीम**

**फोटो क्रमांक : ५१**



27 जुलै 2011

सामाजिक न्याय भवनजवळील बेवारस इमारतीतूनही साहित्य चोरीस

# 'पीडब्ल्यूडी'चे चोरांसाठी आणखी एक दालन

# सार्वजनिक बांधकाम विभागात खळबळ

इमारतीची दशा...

लफडेखोरांचा अड्डा

चिंतामणीनगर आणि जुना बुधगाव रस्त्यावरील इमारतीना विद्युत व पाणीपुरवठ्याची परवानगी मिळाली नसल्यामुळे इमारती पडून राहिल्या. गावापासून इमारती दूर असल्याने अधिकाऱ्यांनी निवासास नकार दर्शविला. चोरी व अन्य गोष्टींना ठेकेदारही जबाबदार आहे.

- एम. बी. खरे
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग

इमारतीचा वापरच नसल्याने इमारतीची दारे, खिडक्या, फर्निचर, टाईल्स असे साहित्य चोरट्यांनी काढून नेले आहे. बांधून पूर्ण झाल्यापासून इमारत वापरात नसल्याने शासकीय पैशाचा अनावश्यक खर्च का केला गेला? असा प्रश्न उपस्थित होत आहे', वरील बातमी प्रसिध्द झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी याप्रकरणी कार्यकारी अभियंत्यांना खुलासा करावा लागला, अनेक वर्षे बेवारस स्थितीत पडलेल्या या इमारतीची अचानक स्वच्छताही करण्यात आली. तसेच सहा महिन्यांच्या आत ही इमारत दुरूस्त करण्याचे आश्वासनही कार्यकारी अभियंत्यांनी दिले.

वरील बातम्यांच्या उदाहरणांवरून असे दिसून येते की गरज नसताना आर्थिक अथवा राजकीय लाभासाठी अनावश्यक विकासकामे केली जातात. अशा अनावश्यक कामांसाठी खर्च होणाऱ्या पैशाचा अपव्यय टाळण्यासाठी वृत्तपत्रांनी आणि त्यांच्या प्रतिनिधींनी जागरूक असणे आवश्यक आहे. अनावश्यक कामे शोधून काढून अशा कामांवर परखड लिखाण केल्यास त्यात बदल होऊ शकतो, अधिकारी जागे होतात, लोकही उठाव करतात.

### ५.६ रस्त्यांवरील अपघात आणि वृत्तपत्रीय बातम्या

रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत किंवा खराब रस्त्यांमुळे झालेल्या अपघाताबाबत वृत्तपत्रातून जोरदार आवाज उठविण्यात येतो. बरेच वेळा शासकीय अधिकारी या वृत्तांची दखल घेऊन संबंधित खराब रस्त्यांची दुरूस्तीही करतात. रस्ते अरुंद आणि त्या रस्त्यांवर वाहनांचे प्रमाण जास्त असेल तर ते अपघाताला कारणीभूत ठरते. सांगली जिल्ह्यात १९९६ पासून आजअखेर एकूण १७ हजार २१ अपघात झाले असून एकूण ४ हजार १४६ जणांचा प्राण गेला, तर १९ हजार ३२ जण जखमी झाले आहेत. सांगली जिल्ह्यातील अपघातांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे,

**तक्ता क्रमांक : ३९**

| वर्ष | अपघातांची संख्या | मृतांची संख्या |
|---|---|---|
| १९९६ | १९२० | २१९ |
| १९९७ | १११३ | २३२ |
| १९९८ | १०८३ | २४३ |
| १९९९ | १११६ | २७० |
| २००० | ११६९ | २४९ |
| २००१ | ११४६ | २५५ |
| २००२ | ११०१ | २७४ |
| २००३ | १०३५ | २९८ |
| २००४ | ८९८ | १८८ |
| २००५ | १०९५ | २५० |
| २००६ | १०२४ | २८८ |
| २००७ | १०४६ | २७८ |
| २००८ | १०९६ | २७४ |
| २००९ | ११४५ | ३१२ |
| २०१० | १०३० | २९० |
| २०११ | ८०४ | २२६ |

खराब रस्त्यांमुळे झालेल्या अपघाताबाबत वृत्तपत्रातून जोरदार आवाज उठविण्यात येतो. बऱ्याच वेळा शासकीय अधिकारी यावृत्तांची दखल घेऊन संबंधित खराब रस्त्यांची दुरूस्तीही करतात. रस्ते अरुंद आणि त्या रस्त्यांवर वाहनांचे प्रमाण जास्त असेल तर ते अपघाताला कारणीभूत ठरते.

अनेक रस्ते अरुंद आहेत. बऱ्याच ठिकाणी धोकादायक वळणे आहेत. तर काही ठिकाणी वाहतुकीला अडथळे आहेत. या सर्व गोष्टी रस्ते अपघाताला आमंत्रण ठरतात. त्यामुळे रस्ते हे निरापराध नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरतात, असेच म्हणावे लागेल. रस्त्यांचा दर्जा, रूंदीबाबत योग्य काळजी घेतल्यास अनेक प्रमाणात अपघात टाळता येतील.

सांगली जिल्ह्यात दुचाकी, चारचाकी, टॅक्सी, रिक्षा, बस, ट्रॅक्टर यांची एकूण संख्या ५ लाख इतकी आहे. ही वाहने या रस्त्यांवरून ये जा करीत असतात शिवाय इतर जिल्ह्यामधून येणाऱ्या वाहनांची संख्याही प्रचंड आहे. गेल्या १० वर्षात रस्त्यांमध्ये फारसे बदल झालेले नाहीत. वाहनांची झालेली भरमसाट वाढ, अरुंद रस्ते, वाहन चालविणाऱ्यांकडून वाहतूक नियमांचा भंग या गोष्टींमुळे अपघातांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. रस्त्यांवर झालेल्या अपघातांमधील ६० टक्के अपघात हे खराब रस्ते तसेच अरुंद रस्त्यांमुळे होतात. तर ४० टक्के अपघात हे गाडी चालविणाऱ्या ड्रायव्हरची चूक आणि गाडीची खराब अवस्था यामुळे होतात.

खराब रस्त्यांबद्दल वृत्तपत्रांमध्ये बऱ्याच बातम्या प्रसिद्ध होत असतात. रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी नागरिकांनी केलेल्या आंदोलनाचीही बातमी वृत्तपत्रात येत असते. परंतु शासकीय यंत्रणेचे याकडे बऱ्याच वेळा दुर्लक्ष असते. यामागे निधीची कमरता की शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, की लोकप्रतिनिधींचे अज्ञान याबाबतही वृत्तपत्रांनी आवाज उठविला पाहिजे. बऱ्याच वेळा अपघात घडल्यानंतर त्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धीस आल्यानंतर शासकीय यंत्रणेला जाग येते आणि मगच खराब रस्त्यांची डागडुजी केली जाते. अपघाताला कारणीभूत ठरणारे खड्डे वेळोवेळी दुरुस्त केल्यास मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी टाळता येईल.

**फोटो क्रमांक : ५२**



# आष्टा-वडगाव मार्गावरील वळण धोकादायक

**वर्षांत १५ अपघात : ११ जणांनी जीव गमावला**

**धोकादायक वळणामुळे आष्टा-वडगाव मार्गावर वर्षभरात झालेल्या अपघातात ११ जणांनी जीव गमावला.**

काही वेळा अपघातांमुळे मनुष्यहानी जरी झाली नाही तरी सार्वजनिक संपत्तीचे मात्र मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. उदा. ही वार्ता 'मिरज एमआयडीसीतील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर अर्धा ते एक फूट खोल खड्डे पडले आहेत. यातील एका खड्ड्यात टेंम्पो सापडल्याने चाकाचा कणा मोडला. सर्व साहित्यही रस्त्यावर पडले. यामुळे उद्योजकाचे साडेसात हजाराचे नुकसान झाले. उद्योजकांकडून नियमित कर भरणा होतो. मात्र महापालिका प्रशासनाकडून कोणतीच सुविधा येथे पुरविली जात नाही. या बद्दल उद्योजक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.'

वरील बातमीवरून असे दिसून येते की, उद्योजकांकडून कर वसूल करूनही महापालिकेकडून मूलभूत नागरी सुविधा पुरविल्या जात नाहीत. त्यामुळे रस्त्यांवरील अपघात रोखणे अशक्य होते. तसेच सार्वजनिक संपत्तीचे या अपघातामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. याबाबतीत वृत्तपत्रांनी ठळक बातम्या दिल्या पाहिजेत. त्यामुळे वेळोवेळी रस्ते दुरूस्त होऊन मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी व सार्वजनिक संपत्तीचे नुकसान टाळता येईल.

**५.७ विकासकामे व वृत्तपत्रातील बातम्या यासंदर्भात शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया (प्रश्नावली व विश्लेषण)**

विकासकामे मार्गी लागण्यासाठी लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांच्याबरोबरच शासकीय अधिकाऱ्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण ठरते. विकासकामांचे अंदाजपत्रक तयार करणे, विकासकामांवर देखरेख ठेवणे, विकासकामांची बिले तयार करणे आदी जबाबदाऱ्या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांवर येतात.

अंदाजपत्रकातील मापांप्रमाणे काम करून घेणे व कामांचा दर्जा राखणे, या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना पार पाडाव्या लागतात. शासकीय अधिकाऱ्यांशी संबंधित विकासकामांच्या खालील बातम्या पाहू :

१) पुढारी — २२ फेब्रुवारी २००१ – वारणा धरणाच्या निकृष्ट कामांच्या चौकशीची मागणी, पान ७

२) पुढारी — २ एप्रिल २००१ – टेंडर निघण्यापूर्वी कमाचा ठेका देण्याचा अजब प्रकार, पान ९

३) पुढारी — ५ जून २००२ – आटपाडीत पाटबंधारे विभागाच्या शाखाधिकाऱ्याला लाच घेताना पकडले, पान २

४) केसरी — १२ एप्रिल २००१ – वायफळे पाझर तलावाच्या कामाच्या चौकशीची मागणी, पान ५

५) केसरी — १२ नोव्हेंबर २००३ – महापालिकेची कामे बेकायदेशीर व छुप्या पध्दतीने सुरू, स्थायी समिती सदस्य मुन्ना कुरणे यांचा आरोप, पान ३

६) लोकमत — ९ एप्रिल २००१ – तांदुळवाडी ते कुंडलावाडी रस्त्याची दुरवस्था, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, पान ७

७) लोकमत — ३० नोव्हेंबर २००३ – गटरांचे निकृष्ट बांधकाम लोकांनी पाडले, पान ५

वरील उदाहरणांवरून असे दिसून येते की, काही शासकीय अधिकारी चुकीच्या मार्गाचा वापर करतात. तसेच काही अधिकारी विविध सार्वजनिक कामे म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण समजतात. यामुळे कामाचा दर्जा बिघडतो व सार्वजनिक पैशांचा अपव्यय होतो. त्यामुळे विकासकामांचा योग्य

दर्जा राखण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. याच दृष्टिकोनातून विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांबाबत शासकीय अधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेऊन प्रश्नावली भरून घेतली.

विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांची दखल घेता का?

वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव आहे का?

या बातम्या वस्तुस्थितीवर आधारित असतात का?

या बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो का?

या बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो का?

या बातम्यांमुळे विकासकामांमध्ये अडथळा निर्माण होतो का?

या साऱ्या मुद्द्यांवर शासकीय अधिकाऱ्यांची मते जाणून घेतली. त्यासाठी सांगली जिल्ह्यातून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महापालिका, पाटबंधारे या शासकीय कार्यालयातील विकासकामांवर देखरेख करणाऱ्या २५ अधिकाऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतल्या. शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण खालीलप्रमाणे –

वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांची दखल घेतो, असे सांगणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के होते.

वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव आहे, असे ८० टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले, प्रभाव नसतो, असे २० टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले.

वृत्तपत्रांमध्ये विकासकामांच्या वस्तुस्थितीवर आधारित बातम्या असतात, असे ६० टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले, तर ४० टक्के अधिकाऱ्यांनी वस्तुस्थितीवर आधारित बातम्या नसतात, असे सांगितले.

विकासकामांच्या बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारतो, असे ७५ टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले.

विकासकामांच्या बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो, असे २० टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले, तर पारदर्शकपणा काही प्रमाणात असतो, असे ५० टक्के अधिकाऱ्यांनी सांगितले.

विकासकामांच्या बातम्यांचा उपयोग होतो, असे सांगणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण १०० टक्के होते.

**विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांबाबत शासकीय अधिकाऱ्यांची मते व विचार खालीलप्रमाणे :-**

१) विकासकामांच्या बातम्यांमध्ये शासनाकडे उपलब्ध निधी, कामात येणाऱ्या तांत्रिक अडचणी याचा कोणताही विचार अथवा अभ्यास नसतो.

२) विकासकामांसंदर्भात विनाकारण, पूर्वग्रहदूषितवृत्तीने, हेतुपुरस्सर बातमी दिल्यास वृत्तपत्राची विश्वासार्हता कमी होऊ शकते.

३) वृत्तपत्रातील बातम्यांमुळे शासकीय अधिकाऱ्यांचा ज्या भागाशी संपर्क कमी आहे, अशा भागातील विकासकामांसंदर्भातील अडचणी समजण्यास मदत होते.

४) वृत्तपत्रांनी विकासकामात येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय व तांत्रिक बाबींची माहिती घेणे आवश्यक आहे.

५) वृत्तपत्रांनी आपल्या बातम्यांमध्ये विकासकामांसंबंधी लोकांची आग्रही मागणी व त्या विकासकामाची गरज या मुद्द्यावर भर द्यावा.

६) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे संबंधित शासकीय यंत्रणेवर योग्य प्रकारे काम करण्यासाठी जनतेचा दबाव राहतो.

७) शासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या विकासकामांची संबंधित यंत्रणेकडून पूर्ण माहिती घेऊन, तसेच खातरजमा करून मग ती बातमी वृत्तपत्रात दिल्यास लोकांना योग्य माहिती मिळेल.

८) विकासकामांना गती देण्याचे काम वृत्तपत्रीय बातम्यांमुळे होते.

९) वार्ताहरांनी विकासकामांच्या वस्तुस्थितीवर आधारित बातम्या देण्यासाठी शोधपत्रकारितेचा वापर करावा.

१०) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारण्यास मदत होते.

११) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे फक्त रेंगाळलेल्या कामांनाच अडथळा येतो आणि योग्य प्रकारे सुरू असलेल्या कामांना या बातम्यांचा फायदा होतो.

१२) विकासकामांचे नियोजन करण्यासाठी बऱ्याच वेळा वृत्तपत्रीय बातम्यांचा उपयोग होतो.

१३) विकासकामांच्या बातम्यांमुळे त्या भागाची प्रगती लोकांच्या लक्षात येते.

१४) विकासकामांसंदर्भातील बातम्या बऱ्याच वेळा दिशादर्शक व मार्गदर्शक ठरतात.

वरील मुद्यांचा विचार करता असे दिसून येते की, बातम्यांमुळे शासकीय अधिकाऱ्यांना परिसरातील विकासकामांसंदर्भातील अडचणींची जाणीव होते. या बातम्या विकासकामांचे नियोजन करण्यासाठी मार्गदर्शक व दिशादर्शक ठरतात. तसेच वृत्तपत्रीय बातम्यांमुळे शासकीय यंत्रणेने योग्य प्रकारे काम करण्यासाठी दबाव राहतो.

## ५.८ विकासकामांमुळे किंवा विकासकामांना लागणाऱ्या साहित्यामुळे (माती, वाळू, वीट, दगड, मुरूम इत्यादी) पर्यावरणावरील परिणाम आणि त्यासंबंधी वृत्तपत्रांची जबाबदारी

निसर्गाचे बदलते स्वरूप हा निसर्गनिर्मित की मानवनिर्मित संकट ? हा प्रश्न आता निर्माण होऊ लागला आहे. भूकंप, महापूर, दुष्काळ यासारख्या गंभीर संकटांचा सामना करावा लागत आहे. पर्यावरणाचा ढासळता समतोल हे याचे मुख्य कारण मानले जाते. वाडी–वस्त्या, गावे, शहरे यामुळे जंगले उजाड झाली. रस्त्यांच्या कामासाठी लागणाऱ्या दगड, खडी या साहित्यांसाठी डोंगर उघडे–बोडखे होऊ लागले आहेत. माळराने संपुष्टात येऊ लागली आहेत. शहराबरोबरच ग्रामीण भागातही मानवनिर्मित सिमेंटची जंगले इमारतीच्या रूपाने उभी राहू लागली आहेत. अर्थात हा बदल काळाचा महिमा मानावा लागेल. परंतु त्याचा मानवी जीवनावर व वातावरणावर होणारा परिणाम विचारात घेतला जातच नसेल तर ते दुदैवच म्हणावे लागेल.

नद्या, नाले, ओढे, सागर ही निसर्गसंपदा जोपासण्याची भावना आता दुलक्षित होताना दिसत आहे. त्याचाच परिणाम भूर्गभातील पाण्याचा उपसा वाढल्याने पावसाचेही प्रमाण घटले आहे. आता नदीपात्रातील बेसुमार वाळू उपसा हे नवे मानवनिर्मित संकट उभे ठाकले आहे. पाण्याची गंभीर परिस्थिती असताना लहान–मोठे नाले, नद्या, ओढे यातून वाळू उपसाच्या कामाला शासनानेच कायदेशीर स्वरूप देऊन प्रोत्साहन दिले. बेसुमार वाळू उपशामुळे नदीकाठची शेती उजाड होण्याचा धोका आहे. महसुलाच्या नावाखाली सरकारने आपली तिजोरी भरण्यासाठी वाळूचे लिलाव सुरू केले आणि हे नवे संकट ओढावून घेतले. वाळू उपशामुळे होणाऱ्या संकटाकडे सर्वांचेच आपोआप दुर्लक्ष होत आहे. नदीपात्रातील वाळूउपसा पर्यावरणास धोकादायक असल्याची जाणीव असतानाही शासनाचे याकडे डोळेझाक करण्याचे धोरण आहे. याविषयी वृत्तपत्रांनी जोरदार आवाज उठविला पाहिजे. वृत्तपत्रांनी याबाबत आपली जबाबदारी ओळखून बेसुमार वाळूउपशामुळे पर्यावरणास होणाऱ्या धोक्याविषयी जनजागृती करण्यासाठी अशा बातम्यांना ठळक प्रसिद्धी दिली पाहिजे. गिलावा, वीट बांधकाम अशा आवश्यक गोष्टींपुरताच वाळूचा वापर करून काँक्रीटसारख्या बाबतीत क्रश्ड सॅण्ड (क्रशरवर दगडापासून बनवलेली वाळू) वापरण्यासाठी बातम्या तसेच लेखाद्वारे लोकांची जागृती केली पाहिजे.

**वृत्तपत्रात विकासकामांच्या पर्यावरणसंबंधी आलेली प्रातिनिधिक स्वरूपाची बातमी पुढील प्रमाणे.**

**फोटो क्रमांक : ५३**



वाळू उपशामुळे खचला कृष्णाकाठ

- जिलेटीनच्या स्फोटांमुळे नदीपात्रातील मासे मृत्युमुखी पडू लागले.
- कृष्णाकाठच्या जनतेचे आरोग्य धोक्यात.
- काळ्या सोन्यातून प्रशासन व वाळू ठेकेदार मालामाल.
- रस्ते खड्डेमय झाल्याने नदीकाठच्या जनतेचे हा
- जॅकवेल, इंटकवेल पडण्याची भीती.
- शिरटेतील शेतकऱ्यांची प्रांताधिकाऱ्यांकडे धाव
- तहसीलदारांकडे तक्रारी करूनही अनेक बाबती कारवाया ठप्पच.
- वाळू ठेकेदारांना पायघड्या घातल्या जात असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप.

**विकासकामांच्या साहित्यामुळे पर्यावरणाच्या होत असलेल्या नुकसानीवर आधारित बातमी**

वीट भट्ट्यांसाठी नदीकाठच्या मातीची मोठ्या प्रमाणावर खुदाई होत असून आता नदीकाठच राहिलेला नाही. नदीकाठी असलेल्या नागरी वस्त्यांपर्यंत ही मातीखुदाई करण्यात आली आहे. त्यामुळे पुराच्या वेळी नागरी वस्त्यांमध्ये पाणी घुसण्याचा नवा मार्ग बनला आहे. नदीकाठच्या मातीची अनियमित खुदाई केल्यामुळे पुराच्या वेळी काठ ढासळण्याचे प्रमाण वाढत आहे. अर्थात शेतीलाही धोका निर्माण होत आहे.

इमारत उभारणीत विटांचा वापर नियोजनबद्ध पद्धतीने केला पाहिजे. आतील भिंतीसाठी विटांचा वापर न करता लाकडी पार्टीशन, जिप्सम पार्टीशन आदींचा वापर केल्यास मातीसारख्या गौण खनिजांना पर्याय उपलब्ध होऊ शकेल. सिमेंटच्या विटाही मातीच्या विटांना पर्याय म्हणून वापरता येतील.

लाकडी पार्टीशन, जिप्सम पार्टीशन, सिमेंट विटा या पुन्हा पुन्हा वापरता येत असल्यामुळे त्याच्या वापराबाबत वृत्तपत्रांनी जनजागृती केली पाहिजे. तसेच विटांच्या भिंतीपेक्षा लाकडी पार्टीशन, जिप्सम पार्टीशन स्वस्त असल्यामुळे त्याचे फायदेही वृत्तपत्रांनी लोकांना पटवून दिले पाहिजेत.

### ५.९ : वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील लोकसहभाग

विकासकामे ही सर्वसामान्य लोकांच्या उपयोगासाठी असतात. त्यामुळे विकासकामांमधील लोकसहभाग हा महत्त्वाचा ठरतो. वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामातील लोकसहभाग वाढावा, लोकांची चळवळ उभी रहावी, अशी अपेक्षा असते. निकृष्ट दर्जाचे काम रोखण्यासाठी लोकांचा दबाव निर्माण होणे, रखडलेल्या विकासकामांसाठी जनआंदोलनाचा रेटा तयार होणे, आवश्यक विकासकामांसाठी लोकप्रतिनिधींवर दबाव येण्यासाठी जनमत तयार होणे, यासाठी वृत्तपत्रातून विकासकामांबाबतच्या विविध बातम्यांना ठळक प्रसिध्दी मिळण्याची आवश्यकता असते.

वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होणाऱ्या विकासकामांवरील वाचकांच्या पत्रांमधूनही लोकांची विकासकामांबाबतची जागरूकता दिसून येते. वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे मोर्चे, आंदोलने काढून विकासकामांची मागणी करणे, हाही विकासकामांसंदर्भातील लोकचळवळीचा एक भाग आहे.

वृत्तपत्रीय बातम्या आणि विकासकामांमधील लोकसहभाग याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झालेल्या काही बातम्या पाहू.

१) कृष्णा खोरे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लोकसहभाग आवश्यक : अधीक्षक अभियंता (लोकमत, ३ जून २००३, पान ७)

२) विकास प्रकल्प राबविताना स्थानिक मताला प्राधान्य हवे : मेघा पाटकर (लोकमत, ९ जून २००३, पान ५)

३) आधी विकासकामे, मग मते - वाचकांची पत्रे (केसरी, २१ एप्रिल २००३, पान ४)

४) पलूस-आंधळी रस्त्याची दुरवस्था - वाचकांची पत्रे (पुढारी, १० फेब्रुवारी २००१, पान १०)

५) शिगाव परिसरातील ग्रामसभांमध्ये विकासकामांवर चर्चा (पुढारी, ५ फेब्रुवारी २००१, पान ७)

६) लोकसहभागातून सहकारी तत्त्वावरील जलसंधारणाचा प्रयोग; उमराणी येथील भारतातील सर्वात पहिला प्रयोग (केसरी, २२ जून २००३, पान ५)

७) गटारांचे निकृष्ट बांधकाम नागरिक व मनपाने पाडले (लोकमत, ३० नोव्हेंबर २००३, पान ५)

८) विकासकामांतील लोकसहभागाने अवर्षणावर मात करणे शक्य : जिल्हाधिकारी सौ. म्हैसकर (केसरी, २५ नोव्हेंबर २००३, पान ९)

९) पलूसच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी बांधले ६ वनराई बंधारे (केसरी, ६ डिसेंबर २००४, पान १)

१०) महापालिकेकडून लोकांचा अपेक्षाभंग – नागरिकाची मुलाखत (लोकमत, १६ जून २००३, पान ८)

पुढारी, केसरी, लोकमत या दैनिकांमधील अभ्यासासाठी निवडलेल्या कालावधीतील विकासकामांवरील वाचकांच्या पत्रांचे प्रमाण हे विकासकामांच्या एकूण बातम्यांच्या १.५ टक्के दिसून आले.

वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामातील लोकसहभाग याविषयी वार्ताहरांच्या सर्वेक्षणात आढळून आलेले मुद्दे व वरील अभ्यासावरून असे दिसून येते की वृत्तपत्रांची नेमकी बातमी, लोकांचा रेटा आणि अधिकाऱ्यांची सकारात्मक भूमिका, यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागतात. विकासकामांच्या बातम्या वृत्तपत्रात आल्यामुळे त्यांचा गरजू कामगारांना रोजगारासाठी उपयोग होतो. मिरजेतील कृष्णा घाटावरील स्मशानभूमीची दैन्यावस्था नष्ट करण्यासाठी वृत्तपत्रात बातमीद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात आले. या आवाहनास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. महापालिकेवर अवलंबून न राहता नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सामूहिक काम करून श्रमदानातून परिसराचा कायापालट केला. यावरून असे लक्षात येते की विकासकामांमधील लोकसहभाग वाढविण्यासाठी वृत्तपत्रांच्या बातम्या महत्त्वपूर्ण ठरतात.

**५.१० : विकासकामे, विकासकामांच्या बातम्या आणि त्या परिसरामध्ये झालेले आर्थिक – सामाजिक बदल**

विकासकामांमुळे त्या परिसराचा चेहरामोहराच बदलून जातो. चांगले रस्ते व रस्त्यांच्या जाळ्यामुळे त्या परिसरातील उद्योग, व्यवसाय तेजीत येतात. उद्योग–व्यवसायामुळे लोकांना रोजगार मिळतो. धरणे, सिंचन योजनांच्या विकासकामांमुळे शेती भररभराटीला येऊन आर्थिक सुबत्ता येते. नदीवरील पुलांमुळे अनेक शहरे आणि खेडी एकमेकांना जोडली जातात. त्यामुळे व्यापार वाढण्यास मदत होते. मोठे प्रकल्प व महत्वाची विकासकामे मार्गी लागण्यास वृत्तपत्रांचा मोलाचा वाटा आहे. वृत्तपत्रीय बातम्यांमुळे नवीन विकासकामांना चालना मिळते, रेंगाळलेली विकासकामे मार्गी लागतात, लोकांच्यात विकासकामांबद्दल जागृती होते. त्यामुळे परिसरात झालेल्या आर्थिक व सामाजिक बदलाबाबत वृत्तपत्रीय बातम्याही महत्त्वाच्या ठरतात.

**आर्थिक व सामाजिक बदलाच्या संदर्भात विविध वृत्तपत्रात आलेल्या काही महत्त्वाच्या बातम्या खालीलप्रमाणे –**

१) कवठेमहांकाळला म्हैसाळ योजनेचे पाणी आल्यास तरुणांची शहरी ओढ कमी – खासदार प्रकाशबापू पाटील (केसरी वृत्त)

२) लोकसहभागातून सहकारी तत्त्वावरील जलसंधारणाचा प्रयोग; उमराणी येथील भारतातील सर्वात पहिला प्रयोग. (केसरी, २२ जून २००३, पान नं. ९)

३) पलूसच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी बांधले सहा वनराई बंधारे. (केसरी, ६ डिसेंबर २००४, पान नं. १)

४) स्काऊट गाईड विभागातर्फे जिल्ह्यातील पहिला वनराई बंधारा उभारण्याचा मान सलगरेला. (केसरी, १४ डिसेंबर २००४, पान नं. ५)

५) 'म्हैसाळ' पाण्याचा हजारो एकरांना लाभ; मालगावमध्ये द्राक्षबागांना जीवदान (सकाळ, विशेष वृत्त, १७ डिसेंबर २०११, पान ५)

विकासकामांच्या बातम्यामुळे परिसरात होणारे आर्थिक आणि सामाजिक बदल अभ्यासण्यासाठी उदाहरण म्हणून कृष्णा खोऱ्यातील पाणी योजनांच्या बातम्यांचे विश्लेषण करणे महत्त्वपूर्ण ठरेल.

कृष्णा खोरे प्रकल्पामध्ये टेंभू, ताकारी आणि म्हैसाळ योजनेचा समावेश होतो. या योजनांच्या कामांना १९८४ पासून सुरुवात झाली, परंतु त्यानंतर १०-१२ वर्षे या योजना रखडल्या गेल्या. युती सरकारच्या काळात १९९७-९८ पासून या योजनांना थोडी गती आली, मात्र पुन्हा तीन-चार वर्षांनी निधीअभावी पुन्हा या योजनांची कामे ठप्प झाली. वृत्तपत्रांनीही या विकासकामांचे महत्त्व जाणून चौफेर बातम्या देऊन नागरिक आणि लोकप्रतिनिधींमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान या योजनांशी संबंधित विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झालेल्या काही प्रातिनिधिक स्वरूपाच्या बातम्या पुढीलप्रमाणे -

१) निधीअभावी राज्यातील असंख्य पाणी योजना कोरड्या
(केसरी, विशेष वृत्त, २ फेब्रुवारी २००१, पान ६)

२) युतीच्या काळात नियोजन न झाल्यामुळेच कृष्णा खोरेची कामे रखडली : आमदार म्हेत्रे
(पुढारी, ४ एप्रिल २००१, पान ३)

३) म्हैसाळ योजनेच्या सहाव्या टप्प्याचे काम जूनअखेर सुरू : पाटबंधारे मंत्री घोरपडे
(लोकमत, ९ एप्रिल २००१, पान ७)

४) निधी उपलब्ध झाल्यास टेंभू योजना लवकरच पूर्ण (पुढारी, २९ एप्रिल २००१, पान ९)

५) म्हैसाळ कालव्याचा फायदा शेतकऱ्यांना कधी मिळणार ?(केसरी, विशेष वृत्त, १६ सप्टेंबर २००१, पान ५)

६) कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांसाठी २०० कोटींची तरतूद करू : मुख्यमंत्री
(पुढारी, २० मार्च २००२, पान १)

७) कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांसाठी पुरेसा निधी द्या; पश्चिम महाराष्ट्रातील ३५ आमदारांचे राज्यपालांना साकडे (केसरी, २१ मार्च २००२, पान १)

८) कृष्णा खोरेची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी प्रसंगी मंत्रीपदही पणाला लावू : आर. आर. पाटील (पुढारी, २३ मार्च २००२, पान २)

९)	कृष्णा खोरे महामंडळ दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर

(पुढारी, विशेष वृत्त, २ ऑक्टोबर २००२, पान १)

**फोटो क्रमांक : ५४**



अनेक विभाग बंद करण्याच्या हालचाली : कर्जरोखे कंत्राटदारांच्या गळ्

कृष्णा खोरे महामंडळ दिवाळखोरीच्या

कोल्हापूर (श्रीराम पवार) : ...महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले ...अडवायचे स्वप्न ठेवून स्थापन ...कृष्णा खोरे विकास महामंडळ ...रीच्या उंबरठ्यावर उभे ...स्पष्ट होत आहे. आर्थिक व्यवस्थापन पूर्णतः ...या महामंडळाला ...ही दोन-दोन महिने देता ...ांची थकलेली बिले ...रत आहेत. यातच या ...डळ, एक विभाग ...मह राज्यातील बाजारात ...

नियोजित बाँडस् मारण्याचा भन्नाट पवित्रा आता महामंडळ घेत आहे.

कृष्णा खोरे विकासाच्या निमित्तानं साऱ्या पश्चिम महाराष्ट्राला दाखवलेल्या सिंचन स्वप्नाचे धिंडवडे निघत असताना शासनाची या प्रश्नाकडे पाहण्याची भूमिका पूर्णतः नाकर्तेपणाची राहिली आहे. शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर असताना गाजावाजा करून कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना झाली. सुरुवातीला महामंडळाकडून धडाक्यात एका पाठोपाठ एक प्रकल्पांचे नारळ फुटत गेले.

ओघात महामंडळ स्थापन करताना ठेवले... आडाखे हे फसवं स्वप्नरंजन होतं ... लख्ख जाणीव आता सर्वच पातळ्य... झाली आहे. काही काळ यातून साऱ्यां... दिवाळी झाली. काही कंत्राटदार ... होते. नवनवी यंत्रणा घेत होते. ...

कृष्णा खोरे चक्रव्यूह...

व्याजानं पैसे काढून गुंतवत हो... साऱ्यांचं भलं करणारा 'व्यवहार... होता, पण ती गणितंही वरवरची ...

१०)	ताकारी, म्हैसाळ टेंभू, आरफळ योजनांचे वास्तव व भवितव्य–समस्या

(लोकमत, स्तंभलेख, १९ ऑक्टोबर २००२, पान ४)

११)	रखडलेल्या प्रकल्पांमुळे दुहेरी नुकसान – कृष्णा खोरे चक्रव्यूहात

(पुढारी, वृत्तमालिका, ६ ऑक्टोबर २००२, पान १)

१२)	पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी केले काय? – कृष्णा खोरे चक्रव्यूहात

(पुढारी, वृत्तमालिका ९ ऑक्टोबर २००२, पान ५)

१३)	कृष्णा खोरे कंत्राटदारांनी बिलासाठी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात कोंडले

(पुढारी, १७ ऑक्टोबर २००२, पान १)

१४)	कृष्णा खोरे प्रकल्पाच्या प्रश्नावरही जरा शक्तिप्रदर्शन कराल काय?

(पुढारी, विशेष वृत्त, २ जून २००३, पान १३)

१५)	कृष्णा खोरेच्या पदरात अखेर काही पडलेच नाही

(पुढारी, विशेष वृत्त, १० जून २००३, पान १३)

१६)	कृष्णा खोरे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लोकसहभाग आवश्यक : अधीक्षक अभियंता घाटे

(लोकमत, १३ जून २००३, पान ७)

१७) टेंभू योजना- सर्वच राजकीय पक्षाच्या लोकांनी एकत्र येण्याची गरज

(पुढारी, विशेष वृत्त, २७ जून २००३, पान १३)

**फोटो क्रमांक : ५५**



पुढारी सांगलीवार्ता

ष्णा खोरे प्रकल्पाच्या प्रश्नावरही जरा 'शक्तिप्रदर्शन' करा

१८) केंद्राने मदत केल्यास दुष्काळी भागातील पाणीप्रकल्प त्वरित मार्गी : मुख्यमंत्री शिंदे

(पुढारी, २ नोव्हेंबर २००३, पान ३)

१९) टेंभू योजनेचे काम सहा महिन्यात पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील : संरक्षण मंत्री फर्नांडिस

(केसरी, ३ नोव्हेंबर २००३, पान ३)

२०) सिंचनात प्राधान्य कशाला (लोकमत, अग्रलेख, १४ नोव्हेंबर २००३, पान ४)

२१) ताकारी-म्हैसाळ योजनांच्या अपयशाची जबाबदारी स्वीकारून पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी राजीनामा द्यावा : डॉ. पाटणकर (केसरी,१६ नोव्हेंबर २००३, पान ३)

२२) टेंभूला २१२ कोटी, तर ताकारी-म्हैसाळ योजनांसाठी १२२ कोटीचा निधी

(पुढारी, २० नोव्हेंबर २००३, पान १)

२३) पाणी योजनांना गती देण्यासाठी प्रचंड पैसा हवा - टेंभू पाणीयोजना/भाग ५

(पुढारी, वृत्तमालिका, २ ऑगस्ट २००५, पान ४)

वरील सर्व बातम्यांवरून असे दिसून येते की, १९९६ पासून जोर धरलेल्या कृष्णा खोरेच्या पाणी योजना २००१ मध्ये रखडल्यानंतर वृत्तपत्रांनी वेगवेगळ्या बातम्या, विशेष वृत्त, लेखमालिका, अग्रलेख, स्तंभलेख याद्वारे जनजागृती केली. या बातम्यांची लोकांनीही दखल घेऊन निवेदने,

आंदोलने, पत्रकार परिषद याद्वारे लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या कालावधीत पाणी योजनांना निधी मिळविण्यासाठी वातावरण तापवण्यात वृत्तपत्रे यशस्वी ठरली.

**फोटो क्रमांक : ५६**



जिल्ह्यातील सिंचनाची कामे पूर्ण करण्यासाठी दबाव आणणार !

लोकप्रतिनिधींचा निर्धार

वृत्तपत्रांच्या रेट्यामुळे लोकप्रतिनिधींनीही आपली जबाबदारी ओळखून जिल्ह्यातील सिंचनाची कामे पूर्ण करण्यासाठी शासनदरबारी दबाव आणण्याचा निर्धार केला. मुख्यमंत्र्यांनाही या घडामोडींची दखल घेऊन या योजनांसाठी निधी जाहीर करावा लागला. केंद्रातूनही संरक्षणमंत्र्यांना येथे येऊन या योजनांच्या निधीसाठी लोकांना दिलासा द्यावा लागला. पुढे वृत्तपत्रांनी निर्माण केलेल्या रेट्याला यश येऊन दुष्काळी भागासाठी वरदान ठरणाऱ्या या योजनांना टप्प्या-टप्प्याने निधी मिळत गेला, हे वरील बातम्यांवरून दिसून येते.

जसजशा या योजना पूर्णत्वास येऊ लागल्या, तसतसे सांगली जिल्ह्यातील कायम दुष्काळी असलेल्या जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, कडेगाव, खानापूर तालुक्यातील ३५० हून अधिक गावांमध्ये पाणी खेळू लागले. या पाण्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी होऊ लागला. हजारो हेक्टर माळरान व पडिक जमीन ओलिताखाली आली. पाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी धाडसाने ऊस, द्राक्षे, डाळींब यासारखी नगदी पिके घेऊ लागले. कृषीउत्पादन वाढल्याने प्रक्रिया उद्योगही सुरू होऊ लागले. साखर कारखाने, कोल्ड स्टोअरेज, वायनरी उभ्या राहू लागल्या. अशा मोठ्या प्रकल्पांशी संबंधित छोटे-मोठे उद्योगही निर्माण होऊ लागले. रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होऊ लागल्या. यामुळे आर्थिक सुबत्ता येऊन लोकांचे राहणीमान सुधारले.

कृष्णा खोऱ्यातील टेंभू, ताकारी आणि म्हैसाळ या योजना पूर्णत्वास येऊ लागल्यानंतर दुष्काळाशी वर्षानुवर्षे संघर्ष करणाऱ्या कवठेमहांकाळ, जत, आटपाडी, खानापूर, मिरज पूर्व भाग, तासगाव तालुक्यातील काही भाग तसेच कडेगाव परिसराला काय लाभ झाले, हे पुढील प्रातिनिधिक बातम्यांवरून दिसून येते.

## उदाहरण १

'म्हैसाळ' पाण्याचा हजारो एकरांना लाभ; मालगावमध्ये द्राक्षबागांना जीवदान

(सकाळ, विशेष वृत्त, १७ डिसेंबर २०११, पान ५)

**फोटो क्रमांक : ५७**



'म्हैसाळ' पाण्याचा हजारो एकरांना लाभ

शेतकऱ्यांचा शेकडो पंपांद्वारे उपसा : मालगावमध्ये द्राक्षबागांना जीवदान

म्हैसाळ प्रकल्पाच्या पाण्याचा मिरज पूर्व भागातील हजारो एकर शेतीसाठी उपयोग झाला आहे. करपू लागलेल्या द्राक्षबागा आणि अन्य पिकांना जीवनदान मिळाले. सन २०११ या वर्षात पावसाचे प्रमाण अत्यल्प होते. विहिरी व कूपनलिकांमधील पाण्याने ऑक्टोबरमध्येच तळ गाठला. बहराला आलेल्या द्राक्षबागा वाया जाण्याची भिती होती. म्हैसाळ योजनेच्या पाण्याने त्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे होणारे कोट्यवधीचे नुकसान वाचले आहे.

## उदाहरण २

**म्हैसाळ योजनेमुळे 'येथे ओशाळला दुष्काळ'; तीन तालुक्यांना लाभ, ६५० कोटींचे उत्पादन, ३२ हजार एकर ओलिताखाली** (पुढारी, विशेष वृत्त, २६ एप्रिल २०१२, पान १३)

**फोटो क्रमांक : ५८**



म्हैसाळ योजनेमुळे 'इथे ओशाळला दुष्काळ'

तीन तालुक्यांना लाभ : ६५० कोटींचे उत्पादन; ३२ हजार एकर ओलिताखाली

म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे मिरज पूर्व भाग, कवठेमहांकाळ तालुक्याचा पश्चिम व दक्षिण भाग आणि तासगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळ संपुष्टात आला आहे. या योजनांच्या पाण्यामुळे दुष्काळ ओशाळून गेला आहे. म्हैसाळच्या पाण्याचा यंदा १६ हजार एकर क्षेत्रास लाभ झाला आहे. त्यातून ६५० कोटी रूपयांचे उत्पादन निघाले आहे. द्राक्ष व इतर पिकांमुळे दुष्काळी दैन्य हटल्याचे चित्र दिसत आहे. भीषण दुष्काळामुळे माणसांना जगणेही मुश्कील झालेले असताना 'म्हैसाळ'च्या लाभक्षेत्रातील पाणी पोहोचलेली गावे नदीकाठचे जीवन जगत असल्याचे चित्र दिसत आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांमध्ये शेती हिरवी दिसत आहे. पावसाळ्यापेक्षा जास्त क्षेत्र उन्हाळ्याच्या आणि दुष्काळाच्या काळात हिरवे झाले आहे.

म्हैसाळ योजनेमुळे १६ हजार १५७ एकरातील द्राक्षबागा जगल्या आहेत. यामुळे सुमारे २ लाख ४२ हजार २५५ टन द्राक्षांचे उत्पादन मिळाले आहे. त्यातून ६५० कोटी रूपयांचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले आहे. दरवर्षी द्राक्षबागा जगविण्यासाठी कोट्यवधी रूपये टँकरवर खर्च होतात, परंतु यंदा शेतकऱ्यांचे हे पैसे वाचले आहेत. दुष्काळ असूनही जनावरांना जगविण्यासाठी आवश्यक असलेला चारा म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे उपलब्ध झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दारातील पशूधन जगले आहे.

## उदाहरण ३

**'म्हैसाळ'ने वाचविली दुष्काळी टापूची १० वर्षे**

(पुढारी, वृत्त मालिका, २९ एप्रिल २०१२, पान १३)

**फोटो क्रमांक : ५९**



'म्हैसाळ'ने वाचविली दुष्काळी टापूची दहा वर्षे

कवठेमहांकाळ : गोपाळ पाटील

सन २००३-०४ च्या दुष्काळाच्या जखमांवर खपली बसली नाही; तोच दुसरा महादुष्काळ! दहा वर्षापूर्वीच्या दुष्काळामुळे तासगावचा पूर्व भाग, कवठेमहांकाळ आणि मिरज पूर्व भाग १० वर्षे मागे पडला होता. त्यातून आता कोठे सावरला आहे. द्राक्षबागांची स्थिती पूर्ववत होत आहे, डाळिंब बागा वाढत आहेत. ऊस आणि इतर पिकांसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.

२००३ व ०४ च्या दुष्काळामुळे तासगावचा पूर्व भाग, कवठेमहांकाळ व मिरज पूर्व भागातील हजारो एकर द्राक्ष व डाळींब बागा शेतकऱ्यांना अक्षरशः तोडून टाकाव्या लागल्या होत्या. यामुळे हा दुष्काळी टापू शेतीच्या बाबतीत १० वर्षे मागे पडला होता. त्यातून हा भाग आता कोठे सावरला आहे. द्राक्षबागांची स्थिती पूर्ववत होत आहे. डाळींब बागांचे क्षेत्र वाढत आहे. ऊस व इतर पिकांसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. तेवढ्यात आता पुन्हा दुष्काळ पडला. त्यामुळे शेतकरी संपला असता. मात्र 'म्हैसाळ'चे पाणी शेतांमधून खेळू लागल्याने ही योजना दुष्काळी भागासाठी 'ओॲसिस' ठरली आहे. या योजनेचे पाणी वापरून १६ हजारहून अधिक एकर शेतीला जीवनदान मिळाले आहे. यातून या भागातील शेतकऱ्यांना ६५० कोटींचे उत्पादन मिळाले आहे. त्यामुळे येथील लोकांचे अर्थकारण पूर्णपणे बदलून आर्थिक सुबत्ता आली आहे.

## उदाहरण ३

**टँकरचे सव्वा चार कोटी रूपये वाचले**

तीन तलाव, परिसरातील नाले व दहा कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यात पाणी

(पुढारी, वृत्त मालिका, २७ एप्रिल २०१२, पान १३)

**फोटो क्रमांक : ६०**



# टँकरचे सव्वा चार कोटी रुपये वाचले

## तीन तलाव, परिसरातील नाले व दहा कोल्हापूर पद्धतीचे बंधाऱ्यात पाणी

**कवठेमहांकाळ : गोपाळ पाटील**

दुष्काळ आणि टँकर यांचे नाते अतूट आहे. कवठेमहांकाळ पश्चिम, तासगाव आणि मिरजपूर्व भागात यंदा मात्र म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे या परिसरातील पिण्याच्या पाण्याचे टँकर गायब झाले आहेत. टँकर दिसतात ते केवळ पाणी भरण्याच्या ठिकाणी. त्या उलट कोरडे पडणारे तलाव, बंधारे, नाले पाण्याने भरलेले दिसत आहेत. यामुळे टँकरवर होणारा सुमारे सव्वा चार कोटी रुपयांचा खर्च वाचला आहे. म्हैसाळमुळे २ लाख १५ हजार लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

**इम्पॅक्ट 'म्हैसाळ'चा**

दुष्काळात लोकांचे हाल होते ते पिण्याच्या पाण्यासाठी. केवळ टँकरवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय राहत नाही. टँकरचे पाणी माणसी २० लिटर या प्रमाणे दिले जाते. त्यामध्ये जनावरांच्या पिण्याचे पाणी नसते. त्यामुळे पाण्यासाठी दाहिदिशा भटकंती करण्याशिवाय पर्याय राहत नाही. यंदाचा दुष्काळ २००३-०४ च्या दुष्काळापेक्षा भयावह आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी जवळपास संपली आहे. त्यामुळे बोअर आणि विहिरींचे झरे आटले आहेत. लोकांना टँकरशिवाय पर्याय राहिलेला नाही. या काळात म्हैसाळच्या लाभ क्षेत्रात मात्र यंदा टँकर दिसत नाही. कवठेमहांकाळ तालुक्यातील २४, मिरज तालुक्यातील २२ आणि तासगाव तालुक्यातील १० गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बहुतांशी प्रमाणात सुटल्याचे चित्र दिसत आहे. या गावांपैकी केवळ दोन-चार ठिकाणी पाणी पोहचू शकत नाही, अशाच ठिकाणी टँकर दिसतो.

**दोन लाख लोकांची तहान भागविली**

दुष्काळी परिस्थितीत म्हैसाळ योजना ही या परिसरातील लोकांची आधार झाली आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकृत माहितीनुसार मिरज तालुक्यातील १ लाख २२ हजार, कवठेमहांकाळ तालुक्यातील ६५ हजार आणि तासगाव तालुक्यातील २८ हजार लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता सुटला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी प्रशासनावर पडणारा ताण यामुळे बऱ्याच प्रमाणात कमी झाला आहे. माणसी २० लिटर प्रमाणे दररोज सुमारे ४३० टँकरची आवश्यकता भासली असती. ही गरज म्हैसाळ योजनेने पूर्ण केली आहे. यासाठी या काळात सुमारे सव्वा चार कोटी रुपयांचा खर्च प्रशासनाला करावा लागला असता. याशिवाय लोकांच्या मोठ्या रोषास तोंड द्यावे लागले. ही परिस्थिती यंदा आल्याचे दिसत नाही.

**टँकर भरण्यास स्रोत मिळाले**

दुष्काळी काळात प्रशासनाची जेव्हा उडते ती टँकर कोठे भरायचा? यामुळे. विहिरी, कूपनलिका, तलाव कोरडे पडतात. या काळात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर भरण्यास स्रोत उपलब्ध होत नाहीत. म्हैसाळ योजनेचे पाणी कालव्यातून वाहत असल्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील विहिरींची पाण्याची पातळी वाढली आहे. त्याशिवाय ओढे, नाल्यांना आणि नदीस वाहते पाणी आहे. त्यामुळे टँकर भरण्यासाठी पाणी सहजपणे उपलब्ध होत आहे.

म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे ऑगस्टपासून कवठेमहांकाळ तालुक्यातून वाहणाऱ्या अग्रणी नदी बहुतांशी ठिकाणी वाहताना दिसते. गव्हाणपासून धुळगावपर्यंत अग्रणीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिले आहे. १० पैकी ८ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यामध्ये सध्या पाणी आहे. त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना पाणी प्रश्न संपला आहे. त्याचबरोबर नांगोळे आणि बसाप्पावाडी तलावात पाणी सोडण्याची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. बंडगरवाडी तलावात योजनेतून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे. तीन तालुक्यातील तीन लघू आणि मध्यम तलावात पाणी सोडण्यात आले आहे. तर २६ पाझर तलाव, १४ नाला बांध भरून देण्यात आले आहेत. **क्रमशः**

अग्रणी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यामध्ये साचून असलेले पाणी.

**भरलेले तलाव, बंधारे**

**कवठेमहांकाळ तालुका :** [illegible] **मिरज तालुका :** [illegible]

**टँकरचा खर्च**

[illegible]

कवठेमहांकाळ, पश्चिम तासगाव आणि मिरज पूर्व भागात म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे या परिसरातील पिण्याच्या पाण्याचे टँकर गायब झाल्याचे चित्र दिसत आहे. कोरडे पडणारे तलाव, बंधारे, नाले म्हैसाळ योजनेच्या पाण्याने भरलेले दिसत आहेत. यामुळे टँकरवर होणारा सुमारे सव्वाचार कोटींचा खर्च वाचला आहे. म्हैसाळ योजनेमुळे २ लाख १५ हजार लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

तसेच म्हैसाळ योजनेचे पाणी कालव्यातून वाहात असल्याने कालव्याच्या लाभक्षेत्रातील विहिरींची पाण्याची पातळी वाढली आहे. याशिवाय ओढे, नाल्यांना तसेच नदीस वाहते पाणी आहे. त्यामुळे टँकर भरण्यासाठी सहजपणे उपलब्ध होत आहे. म्हैसाळ योजनेच्या पाण्यामुळे कवठेमहांकाळ तालुक्यातून वाहणारी अग्रणी नदीत बहुतांश ठिकाणी पाणी दिसते. गव्हाणपासून धुळगावपर्यंत अग्रणी नदीपात्रात बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न सुटला आहे.

वरील सर्व मुद्द्यांचा व उदाहरणांचा विचार करता असे म्हणता येईल की वृत्तपत्रांनी विकासकामांच्या बातम्यांद्वारे जनरेटा उभा केल्यास संबंधित विकासकामे लवकर पूर्ण होतात. त्या कामांचा दर्जाही चांगला राखला जातो. नागरिक, लोकप्रतिनिधींना बातम्यांद्वारे वेळोवेळी जागरूक केले जाते. योग्य वेळी विकासकामे पूर्ण झाल्यास ती कमी खर्चात होतात. तसेच या कामांचा जनतेलाही आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून चांगला फायदा होतो.

**प्रकरणाचा समारोप**

वृत्तपत्रे ही सर्वभागात पोहोचत असल्याने विकासकामांबाबत वृत्तपत्रांद्वारे जनजागृतीचे चांगले काम होते, हे अभ्यासावरून दिसून आले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून सर्वसामान्य लोकांकडून प्रश्नावली भरून घेऊन विश्लेषण केले असता असे लक्षात आले की, १०० टक्के वाचक विकासकामांशी संबंधित बातम्या वाचतात. विकासकामांच्या संदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांचा कामांचा योग्य दर्जा राखण्यासाठी उपयोग होतो. या बातम्यांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो, तसेच जनजागृतीसाठी विकासकामांच्या बातम्यांचा उपयोग होतो.

जिल्ह्यातील विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांच्या मुलाखती घेऊन तसेच प्रश्नावलीद्वारे अभ्यास केला. यावेळी विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव असतो, असे कंत्राटदारांनी मान्य केले, तसेच विकासकामांच्या बातम्यांमुळे कामांचा दर्जा सुधारतो, अशी कबुलीही त्यांनी दिली. बातम्यांमुळे विकासकामांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतो, असेही कंत्राटदारांनी सांगितले.

बातम्यांमुळे विकासकामांवर तसेच संबंधित शासकीय यंत्रणेवर परिणाम होतो, हे संशोधन अभ्यासावरून दिसून आले. वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे कामांचा दर्जा तपासणीसाठी निरीक्षण समिती नेमण्यात आल्याचे उदाहरणही अभ्यासातून आढळून आले, तसेच विनानिविदा कामांविषयी लेखमालिका वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्यानंतर महापालिका आयुक्तांच्या कामकाजाच्या चौकशीचे आदेश देण्यात आल्याचेही दिसून आले. निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाची बातमी प्रसिध्द झाल्यानंतर त्याची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेतली व कामाच्या दर्जाची तपासणी केली. यामध्ये कंत्राटदार दोषी आढळल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली.

वरील उदाहरणांवरून बातम्यांचा विकासकामांमधील भ्रष्टाचारावर अंकुश असतो, हेही लक्षात

आले. अनावश्यक विकासकामांना वृत्तपत्रीय बातम्यांमुळे आळा बसतो, हेही या प्रकरणातील अभ्यासावरून दिसून आले.

विकासकामांशी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या. वृत्तपत्रातील विकासकामांच्या बातम्यांची दखल घेतो, असे शासकीय अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले, तसेच वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो, हेही त्यांनी मान्य केले. बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो असेही शासकीय अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले.

वृत्तपत्रात आलेल्या विकासकामांसंदर्भातील बातम्यांमुळे जनरेटा उभा राहून विविध महत्त्वाचे प्रकल्प पूर्णत्वास येत असल्याचे दिसून येते. विकासकामांमुळे परिसराची प्रगती झाल्याचे आढळून आले, तसेच पाणी योजना पूर्ण झाल्यामुळे लोकांना शेतीद्वारे आर्थिक लाभ झाल्याचे दिसून आले. या सर्वांचा परिणाम म्हणून लोकांच्या राहाणीमानात सुधारणा झाल्याचे आढळले आणि यामध्ये वृत्तपत्रांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे, हे संशोधन अभ्यासावरून लक्षात आले.

संशोधनाअंती लक्षात आलेले निष्कर्ष व शिफारसी यांचा आढावा पुढील प्रकरणात घेतला आहे.

## प्रकरण ६

# निष्कर्ष व शिफारशी

## प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

### ६.१ : निष्कर्ष

### ६.२ : शिफारशी

**परिशिष्टे**

१ : प्रश्नावली

२ : नकाशा

३ : संदर्भ सूची

अ) संदर्भ ग्रंथ सूची

ब) वृत्तपत्र सूची

क) तक्ता सूची

## सारांश

‘वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव’ या विषयाचा अभ्यास करताना जिल्ह्यातील महत्त्वाच्या विकासकामांना भेटी देऊन माहिती घेतली. विकासकामांशी संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्याशीही चर्चा केली. ज्यांच्यासाठी विकासकामे करण्यात येतात, त्या सामान्य नागरिकांना भेटून, त्यांच्या मुलाखती घेऊन, तसेच त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेऊन ‘विकासकामांवरील वृत्तपत्रांचा प्रभाव’ अभ्यासला. विविध वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना भेटून ते विकासकामांसंदर्भात देत असलेल्या बातम्या, लेख, विशेष वृत्त याबाबत चर्चा केली, तसेच संशोधनासाठी निश्चित केलेल्या कालावधीतील विविध दैनिकांच्या अंकांचा विविध अंगांनी अभ्यास केला.

प्रबंधातील अभ्यास व विश्लेषणातून दिसून आलेले निष्कर्ष पुढे मांडले आहेत. प्रस्तुत निष्कर्ष मांडताना संशोधन अभ्यासासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे तसेच गृहीतके लक्षात घेतली आहेत. याशिवाय प्रस्तुत प्रकरणात वृत्तपत्रे, पत्रकार, शासकीय अधिकारी, कंत्राटदार यांच्यासाठी संशोधकाने सुचविलेल्या शिफारशींचाही समावेश करण्यात आला आहे.

**निरीक्षण**

१) शासकीय विकास योजनांबद्दल जनजागृती करण्यात वृत्तपत्रे यशस्वी झाली असल्याचे दिसून आले. वृत्तपत्राकडून जनजागृतीचे काम होते, असे ९६ टक्के वाचकांना वाटते.

२) वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो, हे संशोधन अभ्यासातून आढळून आले. ९६ टक्के वृत्तपत्र वाचकांनी आणि विकासकामे करणाऱ्या ८४ टक्के कंत्राटदारांनी वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो, असे सांगितले. विकासकामांवर देखरेख करणाऱ्या ८० टक्के शासकीय अधिकाऱ्यांनीही विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव असल्याचे मान्य केले.

३) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो, असे दिसून आले. संबंधित शासकीय अधिकारी किंवा गुणनियंत्रण दक्षता विभागापेक्षा वृत्तपत्रांच्या बातम्यांमुळेच विकासकामांचा दर्जा सुधारतो असे ९८ टक्के लोकांना वाटते, तर ९६ टक्के कंत्राटदारांनी तसेच ७५ टक्के शासकीय अधिकाऱ्यांनी वृत्तपत्रातील बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो, असे सांगितले.

४) परिसरामध्ये विकासकामे होण्यासाठी वृत्तपत्रीय बातम्या, लेख यांचा उपयोग होतो. ९३ टक्के वाचकांनी, तसेच ८८ टक्के कंत्राटदारांनी आणि १०० टक्के शासकीय अधिकाऱ्यांनी विकासकामांच्या बातम्यांचा उपयोग होतो, असे सांगितले.

५) विकासकामांवर शासकीय अधिकाऱ्यांचे गुणवत्ता राखणारे नियंत्रण नसते, असे आढळून आले. ८० टक्के वाचकांनी विकासकामांचा दर्जा राखण्यात अधिकारी अपयशी ठरत असल्याचे सांगितले. तसेच बातम्यांमुळेच विकासकामांवर नियंत्रण राहात असल्याचे आवर्जून सांगितले.

६) विकासकामांसंदर्भात बातम्या देताना त्या पूर्णपणे अभ्यास करून किंवा संबंधितांकडून माहिती घेऊन दिल्या जात नाहीत, असे आढळून आले.

७) विकासकामे पूर्ण होण्यासाठी शासकीय निधीचा योग्य वापर होत नसल्याचे आढळून आले.

८) विकासकामांमुळे दळण-वळण सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरातील लोकांचे राहणीमान सुधारल्याचे दिसून आले. तसेच परिसरात जलसिंचन योजनांची कामे मोठ्या प्रमाणात झाल्याने लोकांमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण झाली आहे आणि यासाठी वृत्तपत्रांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे संशोधनातून दिसून आले.

९) विकासकामांबाबतच्या बातम्यांना बहुधा वृत्तपत्रांच्या आतील पानात स्थान दिले जाते. महत्त्वाच्या विकासकामांऐवजी 'स्पॉट न्यूजला' वा 'हार्ड न्यूजला' ठळक प्रसिध्दी दिली जाते. विकासवार्ता क्वचितच 'हार्ड न्यूज' असते.

१०) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांच्या उद्‌घाटनांच्या बातम्या (विशेष करून राजकीय पुढाऱ्यांच्या हस्ते उद्‌घाटन) ५२ टक्के इतक्या प्रमाणात दिसून येतात.

११) विकासकामांवर सांगली जिल्ह्यात दरवर्षी राज्य सरकार, जिल्हा परिषद व स्थानिक पातळीवर सरासरी २०० कोटी रुपये खर्च होतात.

१२) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांसंदर्भातील भ्रष्टाचाराच्या बातम्यांना सर्वात जास्त वाचक (६० ते ८० टक्के) आहे, तर आंदोलने, निवेदनांच्या बातम्यांची वाचकसंख्या मध्यम (२० ते ४० टक्के) आहे.

१३) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांच्या बातम्यांचे एकूण प्रमाण अत्यंत अल्प म्हणजे १.०१ टक्के आढळले.

१४) वार्ताहर सजग आहे, किंवा वृत्तपत्रे जास्त प्रमाणात पोहोचतात, तेथे विकासकामे चांगल्या प्रतीची होतात. (उदा. जिल्ह्याचे ठिकाण, तालुक्याची ठिकाणे, मोठी गावे)

१५) नवीन योजना किंवा विकासकामे यांच्याबद्दल वृत्तपत्रांनी आवाज उठविल्यास त्याची शासकीय यंत्रणेकडून दखल घेतली जाते. (उदा. : सांगली–कोल्हापूर चौपदरीकरण)

१६) विकासकामांच्या पूर्ततेसाठी वृत्तपत्रांनी आवाज उठविल्यास लोकप्रतिनिधींकडून त्याची दखल घेतली जाते. (उदा. : जत, कवठेमहांकाळ, आटपाडी तालुक्यातील दुष्काळाबाबत वृत्तपत्रांनी आवाज उठविल्यानंतर मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या परिसराला भेट देऊन अपूर्ण पाणी योजनांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

१७) जागरूक लोक वृत्तपत्रांच्या माध्यमातून खराब कामांबाबत आवाज उठवितात. तेथील विकासकामे चांगल्या प्रतीची आढळून येतात. (उदा. : तासगाव, कवठेपिरान परिसरातील रस्ते.)

१८) वृत्तपत्रांमधून निकृष्ट दर्जाच्या विकासकामांबद्दल बातमी प्रसिध्द झाल्यानंतर जनतेतून रेटा निर्माण होतो, आणि अशा जनरेट्यामुळे कामांच्या दर्जात सुधारणा झाल्याचे दिसून येते.

१९) वृत्तपत्रात निकृष्ट दर्जाच्या विकासकामांबद्दल बातमी प्रसिध्द झाल्यानंतर त्याची शासकीय

पातळीवर वरिष्ठांकडून दखल घेतली जाते. अशा कामांची चौकशी होऊन संबंधित कंत्राटदार, अधिकारी यांच्यावर कारवाई होते. तसेच काही ठिकाणी संबंधित काम योग्य दर्जाचे करून घेतले जाते. (उदा. : सांगली–इस्लामपूर रस्ता चौपदरीकरणाचे काम)

२०) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांसंदर्भातील अग्रलेख अथवा स्तंभलेख अत्यंत कमी (२.५ टक्के) प्रमाणात आढळतात.

२१) वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या टेंडर नोटिसा (जाहिराती) या संबंधित ठेकेदार वगळता वाचकांकडून अल्प (२० ते ४० टक्के) प्रमाणात वाचल्या जातात.

२२) साठ टक्के वाचकांना जलसंधारणाच्या कामांबाबत जास्त उत्सुकता असल्याचे आढळले.

२३) वृत्तपत्रांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो, असे ९३ टक्के वाचकांचे मत आहे.

२४) वृत्तपत्रांमुळे लोकांना आपल्या भागातील विकासकामांची माहिती मिळते, असे ९६ टक्के लोकांना वाटते.

२५) वृत्तपत्रांनी सखोल बातम्या आणि विशेष वृत्त द्यावीत, असे २० टक्के लोकांनी उत्स्फूर्तपणे सांगितले.

२६) वृत्तपत्रांकडून विकासकामांच्या बातम्यांबाबत पाठपुरावा होत असल्याने एखाद्या कामासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली, तर संबंधित विकासकामांचा दर्जा हमखास सुधारतो.

२७) वृत्तपत्रीय बातम्यांचा विकासकामांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतो, असे ९६ टक्के लोकांना वाटते.

२८) वृत्तपत्रांच्या प्रभावामुळे रखडलेली विकासकामे सुरू होतात, असे ९३ टक्के लोकांना वाटते.

२९) विकासकामांच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये आल्यामुळे त्याचा रोजगार शोधत असणाऱ्यांना उपयोग होतो.

३०) योग्य माहिती घेऊन अचूक बातमी दिल्यास वृत्तपत्राचा विकासकामांवर प्रभाव निर्माण होतो, तर वरवरच्या माहितीच्या आधारे दिलेल्या बातम्यांमुळे लोकांमध्ये गैरसमज पसरतो.

३१) वृत्तपत्रांमध्ये बऱ्याच वेळा बातमीत त्रयस्थपणाचा अभाव जाणवतो.

३२) विकासकामांसंदर्भात बातम्यांचा नेतेमंडळी आश्वासने देऊन मतांसाठी वापर करतात, असे ६० टक्के वाचकांना वाटते.

### ६.१ निष्कर्ष

१) शासकीय विकास योजनांबद्दल जनजागृती करण्यात वृत्तपत्रे यशस्वी झाली आहेत.

२) वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो, हे संशोधन अभ्यासातून आढळून आले.

३) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो. संबंधित शासकीय अधिकारी किंवा गुणनियंत्रण दक्षता विभागापेक्षा वृत्तपत्रांच्या बातम्यांमुळेच विकासकामांचा दर्जा सुधारतो, असे दिसून आले.

४) परिसरामध्ये विकासकामे होण्यासाठी वृत्तपत्रीय बातम्या, लेख यांचा उपयोग होतो.

५) विकासकामांवर शासकीय अधिकाऱ्यांचे गुणवत्ता राखणारे नियंत्रण नसते, असे आढळून आले.

६) विकासकामांसंदर्भात बातम्या देताना त्या पूर्णपणे अभ्यास करून किंवा संबंधितांकडून माहिती घेऊन दिल्या जात नाहीत, असे आढळून आले.

७) विकासकामे पूर्ण होण्यासाठी शासकीय निधीचा योग्य वापर होत नसल्याचे आढळून आले.

८) विकासकामांमुळे दळण–वळण सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरातील लोकांचे राहणीमान सुधारल्याचे दिसून आले. तसेच परिसरात जलसिंचन योजनांची कामे मोठ्या प्रमाणात झाल्याने लोकांमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण झाली आहे आणि यासाठी वृत्तपत्रांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे संशोधनातून दिसून आले.

**या क्षेत्रातील पुढील संशोधनासाठी खालील विषयांमध्ये वाव आहे.**

'वृत्तपत्रांचा विकासकामांवरील प्रभाव' या विषयी अभ्यास केल्यानंतर मला वृत्तपत्रीय बातम्यांची उपयुक्तता प्रकर्षाने जाणवली. वृत्तपत्र हे जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. त्यात येणाऱ्या बातम्या, लेख, वाचकांची पत्रे, अग्रलेख आदींचा विकासकामांना रास्त दिशा देण्यासाठी उपयोग होतो. एकतर वृत्तपत्रीय प्रकाशझोतामुळे जनमताचा रेटा तयार होतो. त्यापाठोपाठ शासकीय यंत्रणा दोष दूर करून कामाला लागते. निर्णय घेणारी यंत्रणा, प्रशासन आणि अंमलबजावणी या तीनही स्तरावर योग्य परिणाम होतो, असे आढळून आले. त्यामुळे या क्षेत्रातील अधिक संशोधनासाठी मी पुढील विषय सुचवित आहे.

१. 'कृष्णा खोरे' प्रकल्पामधील विकासकामांवर असलेला वृत्तपत्रांचा दबाव

२. पश्चिम महाराष्ट्रातील विकासकामांचा धडाका व त्या संदर्भातील विकासकामांचा प्रभाव

३. जलसंधारणाच्या कामांसंदर्भातील वृत्तपत्रांची उपयुक्तता.

४. पश्चिम महाराष्ट्रातील विकासकामांचे धोरण ठरविताना वृत्तपत्रांचे असलेले योगदान.

### ६.२ शिफारसी

१) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांच्या बातम्यांचे एकूण प्रमाण अत्यंत अल्प म्हणजे १.०१ टक्के असून या बातम्या लोकांच्या उपयोगी असल्यामुळे त्यांचे प्रमाण वाढवावे.

२) विकासकामांसंदर्भात शासनाने दिलेली माहिती किंवा वैयक्तिक माहितीवर आधारित बातमी बऱ्याच वेळा दिली जाते, त्याऐवजी वार्ताहराने जागेवर जाऊन स्वतः स्वतंत्रपणे माहिती गोळा करून निरपेक्षपणे बातमी द्यावी.

३) विकासकामांच्या बातमीची शहानिशा करण्यासाठी उपलब्ध असणारे मार्ग आणि यासंबंधी प्रशासनातील जबाबदार व्यक्तींची माहिती वृत्तपत्रांमधून द्यावी, तसेच बातम्यांमध्ये संबंधित वार्ताहर, अधिकारी व कंत्राटदार यांचे संपर्क क्रमांक द्यावेत.

४) विकासकामांसंदर्भातील वाचकांच्या पत्रांचे प्रमाण अत्यंत अल्प (१.५ टक्के) असून चांगल्या दर्जाच्या कामांसाठी लोकांनी आपले विचार वाचकांच्या पत्राद्वारे मांडले पाहिजेत. त्यासाठी त्यांना योग्य आवाहनही वृत्रपत्रांनी बातमीच्या महत्वानुसार करायला हवे.

५) कामांचा दर्जा सुधारण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी निरपेक्ष भावनेने लक्ष ठेवावे, यासाठी वृत्तपत्रांनी रेटा लावावा. त्याचा पाठपुरावा करावा. तडजोडी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांबद्दल वृत्तपत्रांमध्ये माहिती छापून समाजाला सावध करावे.

६) वृत्तपत्रांमधून मोठ्या कामांच्या दर्जाबाबत चर्चा व्हावी, तसेच आपल्या वृत्तपत्राद्वारे वाचकांचे सर्वांगीण चर्चा करणारे व्यासपीठ निर्माण करून जागृती घडवावी. वृत्तपत्र विषयक शिक्षण देणाऱ्या संस्थांनी अभ्यासक्रमात तसा विषय ठेवावा.

७) वार्ताहरांना विकासकामांच्या तांत्रिक गोष्टींची कार्यशाळेद्वारे माहिती द्यावी, तरच ते विकासकामांचा दर्जा व गुणवत्तेबाबत आवाज उठवू शकतील.

८) विकासकामांबद्दल बातम्या लिहिणारे पत्रकार किमान पदवीधर, वृत्तपत्र विद्येचे शिक्षण घेतलेले तसेच ते संगणक साक्षर असावेत, तरच त्यांच्याकडून अपेक्षित लिखाण होऊ शकेल.

९) विकासकामांबद्दल लोकांनी उदासीनता सोडून देऊन वाचकांच्या पत्राद्वारे त्यांनी विकासकामांबद्दल आपले स्पष्ट व परखड मत व्यक्त करावे, म्हणजे ते संबंधित अधिकारी, कंत्राटदार व समस्त लोकांना कळू शकेल.

१०) वृत्तपत्रांनी अनावश्यक विकासकामांबद्दल आवाज उठवावा. दैनिकांनी आवश्यक कामांची किंवा प्रकल्पांची तज्ज्ञांच्या माध्यमातून आपल्या वृत्तपत्रात चर्चा घडवून आणावी.

११) महत्त्वाच्या विकास योजनांवर अग्रलेख, विशेष वृत्त किंवा ती मुख्य वार्ता करता येतो का? याचा संपादकीय विभागाकडून वेळोवेळी विचार व्हायला हवा.

१२) वाळूउपसा, मातीउपसा तसेच दगड, मुरूम उत्खनन, यामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाबाबत उपाययोजनांची चर्चा घडवावी.

१३) वृत्रपत्रांचा वार्ताहर कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधील नसावा.

१४) विकासकामांच्या बातम्या देताना वृत्तपत्रांनी कोणाचीही बाजू न घेता विकासकामे योग्य रीतीने पूर्ण व्हावीत, यासाठी प्रयत्न करावेत.

१५) विकासकामांसाठी सरकारी यंत्रणा गतिमान असण्यासाठी वृत्तपत्रांनी कायम जनआंदोलनाचा रेटा उभा करावा.

१६) विकासकामांच्या बातम्यांना छायाचित्राची जोड द्यावी, तरच परिणाम घडतो.

१७) विकासाची उपयुक्तता व गुणवत्ता यासंदर्भात वृत्तपत्रांनी बातम्या देताना तडजोड करू नये.

१८) विकासकामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे दिसत असेल, तर संबंधितास शिक्षा होईपर्यंत वेळोवेळी बातमीचा पाठपुरावा करावा.

१९) योग्य व चांगले विकासकाम करणाऱ्याचा वृत्तपत्रातून गौरव व्हावा, त्यामुळे अशा लोकांना प्रोत्साहन मिळेल व गुणवत्ता वाढेल.

२०) सकारात्मक व नकारात्मक दोन्ही गोष्टींचा विचार करून विकासकामांवर लेख लिहावेत.

२१) वार्ताहरांनी साम, दाम व दंड यांच्या दबावास बळी न पडता विकासकामांबाबत बातम्या नि:पक्षपातीपणे लिहाव्यात.

२२) लोकांना आपल्या परिसरातील विकासकामांची माहिती मिळण्यासाठी वृत्तपत्रांनी विकासकामांसंदर्भात दोन–तीन महिन्यातून एकदा तरी वेगळी पुरवणी द्यावी.

२३) रखडलेल्या विकासकामांबद्दल वृत्तपत्रांनी परखड टीका करावी. वाचकांच्या, तज्ज्ञांच्या व संबंधितांच्या मुलाखती प्रसिध्द कराव्यात.

२४) वृत्तपत्रांनी विकासकामांना किती निधी मिळतो, व तो कशा प्रकारे वापरला जातो, याबाबत

लिहावे.

२५) निकृष्ट दर्जाच्या व अपूर्ण विकासकामांना ठळक जागा द्यावी.

२६) निकृष्ट कामे व भ्रष्टाचाराबाबत लोकजागृती निर्माण व्हावी, असे लिखाण वृत्तपत्रांमधून झाले पाहिजे.

२७) वार्ताहरांनी विशेष प्रसंगी माहितीअधिकाराचा वापर देखील करावा आणि लोकांपुढे सत्य परिस्थिती मांडावी.

२८) विकासकामांमधील सर्व बाबींची सविस्तर माहिती वृत्तपत्रांनी द्यावी. उदा. कामाचा खर्च, कामाची मुदत, कामातील मापे.

२९) वृत्तपत्रांमध्ये विकासकामांबाबतचे अग्रलेख, स्तंभलेख आणि विशेष वृत्त यांचे प्रमाण कमी (२० टक्के) असून ते वाढण्यासाठी वृत्तपत्रांनी प्रयत्न करावेत.

३०) वृत्तपत्रांनी लोकांच्या हिताच्या विकासकामांसंदर्भातील बातम्या द्याव्यात.

३१) वृत्तपत्रांचे ग्रामीण भागातील विकासकामांकडे कसे दुर्लक्ष होते, त्या बातम्या जास्त प्रमाणात द्याव्यात.

३२) वृत्तपत्रांनी जनहिताच्या दृष्टीने आवश्यक असणारी विकासकामे प्रभावीपणे मांडवीत. म्हणजे ती शासनापर्यंत पाहोचून त्यावर योग्य ती कार्यवाही होईल.

३३) इतर राज्यातील चांगल्या विकासकामांची माहितीही वृत्तपत्रांनी द्यावी.

३४) महत्त्वाच्या विकासकामांतील बातम्यांचे कात्रण सामाजिक कार्यकर्त्यांनी शासकीय कार्यालयात (उदा. ग्रामपंचायत, तहसिलदार कार्यालय आदी.) व सार्वजनिक ठिकाणी लावल्यास जनजागृती होईल.

३५) नियोजित विकासकाम झाले तर लोकांचा काय फायदा होईल, याची माहिती वृत्तपत्रांनी द्यावी.

३६) विकासकामांसंदर्भात वैचारिक, अभ्यासपूर्ण व प्रभावीपणे बातमी मांडणे आवश्यक आहे.

३७) विकासकामे करताना कंत्राटदारांना येणाऱ्या अडचणींची माहितीही (निधीची तरतूद, कोर्ट केस, मंजुरी, बिल न मिळणे, आदी.) वृत्तपत्रांनी द्यावी.

३८) वृत्तपत्राकडे तक्रारदर्शक बातमी आल्यास त्याची खातरजमा करूनच प्रसिध्द करावी.

३९) विकासाच्या दृष्टीने योग्य व जनहिताच्या कामांचा वृत्तपत्रांनी पाठपुरावा करावा.

४०) विकासकामांची सविस्तर माहिती द्यावी, त्यामुळे सामान्य लोकांमध्ये जागरूकता निर्माण होईल.

४१) विकासकामांवर चुकीची अथवा हेतूपुरस्सर बातमी देणाऱ्या वार्ताहराला समज द्यावी.

४२) विकासकामांसंदर्भातील 'पेड न्यूज' टाळाव्यात. त्यांचे समूळ उच्चाटन व्हायला हवे.

४३) शासकीय अधिकारी, शासनाचा तांत्रीक प्रतिनिधी व संबंधित नागरिक यांच्याशी चर्चा करून सर्व माहिती घेऊन बातमी द्यावी.

४४) तालुक्याच्या ठिकाणी वृत्तपत्राचा प्रतिनिधी जागरूक असल्याने तेथील विकासकामांचा दर्जा सुधारलेला दिसतो, तसेच वृत्तपत्रांनी सांगली जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामात विशेष उत्सुकता दाखविल्यामुळे कामेही दर्जेदार झाली आहेत, त्यामुळे इतर जिल्ह्यातील वृत्तपत्र प्रतिनिधींनी सांगली जिल्ह्यात येऊन जलसंधारणाच्या कामांची पाहणी करावी, व संबंधित वृत्तपत्र प्रतिनिधींची भेट घेऊन माहिती घ्यावी.

## १ प्रश्नावली

### अ) सर्वसामान्य लोकांसाठीची प्रश्नावली

१) वृत्तपत्रात विकास कामासंदर्भात येणाऱ्या बातम्या आपण वाचता काय ? असल्यास कोणत्या ?

२) विकासकामासंदर्भात वृत्तपत्रात परिपूर्ण माहिती असते काय ?

३) या बातम्यांमध्ये योग्य बाजू मांडली जाते काय ?

४) या बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो काय?

५) वृत्तपत्रात आलेल्या बातम्या (उदा. खराब झालेले रस्ते दुरूस्त करण्याची मागणी, नवीन कामांची मागणी यांचा उपयोग होतो काय ?

६) वृत्तपत्रे निकृष्ट विकासकामे व त्यामधील भ्रष्टाचार याबाबत आवाज उठवितात काय ? त्याचा उपयोग होतो काय ? वृत्तपत्रांमुळे भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो काय?

७) वृत्तपत्रात आलेल्या जलसंधारण, पाझर तलाव, शेततळी, अशा प्रकारच्या विकासकामासंदर्भात बातम्या जनजागृतीसाठी उपयोगी पडतात काय ?

८) विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव जाणवतो का? असल्यास कितपत जाणवतो ?

९) एखाद्या वृत्तपत्राची भूमिका एखाद्या विकासकामावर सकारात्मक अथवा नकारात्मक परिणाम करू शकते का ?

१०) विकासकामासंदर्भात वृत्तपत्रांकडून आपल्या अपेक्षा काय?

**मुलाखत देणाऱ्याची वैयक्तिक माहिती**

१) नाव : ----------------------------------

२) पत्ता : ----------------------------------

३) शिक्षण : ----------------------------------

४) वय : ----------------------------------

५) नोकरी / व्यवसाय : ---------------------------------

**ब) वृत्तपत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्यांसाठी प्रश्नावली**

१) विकासकामासंदर्भात आपण बातम्या लिहिता का ?

२) आपण विकासाबाबत नेमके कोणते लिखाण करता ?

३) बातम्या लिहिता की लेख ?

४) लेखात कोणते विषय हाताळले ?

५) विकासकामासंदर्भात दिलेल्या बातम्यांची नागरिक व संबंधित अधिकारी दखल घेतात का ? ते त्याची चर्चा करतात का ?

६) 'त्या' बातम्यांचा पाठपुरावा होतो का ?

७) विकास कामासंदर्भात दिलेल्या बातम्यांमुळे कामाचा दर्जा सुधारतो का ?

८) एखाद्या कामात भ्रष्टाचार होत असल्यास बातम्यांमुळे अशा गैरकृत्यास आळा बसतो का ? (शक्य असल्यास उदाहरण द्यावे)

९) आपल्या कार्यक्षेत्रातील गेल्या दहा वर्षातील विविध विकास कामांसंदर्भातील वृत्तपत्रांची भूमिका कितपत प्रभावी ठरते ? (उदा. वृत्तपत्रातील वृत्तामुळे काही कामे मार्गी लागली काय ? कोणती ?)

१०) विकास कामे व आपण दिलेल्या बातम्या याबाबत अन्य काही अनुभव ?

**मुलाखत देणाऱ्याची वैयक्तिक माहिती**

१) नाव : ------------------------------------

२) पत्ता : ------------------------------------

३) शिक्षण : ------------------------------------

४) वय : ------------------------------------

५) नोकरी / व्यवसाय : -----------------------------

सही

**क) वृत्तपत्र संपादक किंवा संपादकीय विभागातील ज्येष्ठ यांच्यासाठी प्रश्नावली**

१) विकासकामांसंदर्भात खालील पैकी कोणत्या बातम्या वाचक जास्त प्रमाणात वाचतात ? (टक्केवारी अंदाजे)

(१) विकासकामांचे उद्‌घाटन

(२) विकासकामांची मागणी

(३) आंदोलन, निवेदन

(४) विशेष वृत्त

(५) शासकीय धोरण, निर्णय (मंजुरी व निधीबाबत)

(६) अग्रलेख / स्तंभलेख

(७) जाहिराती (टेंडर)

(८) वाचकांची पत्रे

(९) विकासकामांमधील भ्रष्टाचार

२) लोकांच्या दृष्टीने अशा बातम्यांना कितपत महत्त्व असते ? लोक अशा बातम्या वाचतात का ? या बातम्यांची लोकांच्यात चर्चा होते का ? जनजागृती होते का ?

----------------------------------------------

----------------------------------------------

३) आपल्या वृत्तपत्राचा विकासकामांसंदर्भात दृष्टिकोन कसा आहे ? 'त्या' बातम्यांना प्राधान्य देता का ?

----------------------------------------------

----------------------------------------------

४) विकासकामांबद्दल दिलेल्या बातम्यांचा (उदा. नवीन रस्त्यांची मागणी, रस्ते दुरुस्तीची मागणी, निकृष्ट दर्जाचे रस्ते, विकासकामांमधील भ्रष्टाचार इ.) पाठपुरावा कसा करता ?

----------------------------------------------

----------------------------------------------

५) अशा बातम्यांची सरकारी पातळीवर दखल घेतली जाते का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

६) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांमधील भ्रष्टाचार (गैरप्रकार) रोखला जातो का? कामाचा दर्जा सुधारतो का?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

७) विकासकामांवर वृत्तपत्रांचा प्रभाव असतो का?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

८) विकासकामे व आपण दिलेल्या बातम्या याबाबत काही अनुभव

-----------------------------------------------

-----------------------------------------------

९) निकृष्ट दर्जाच्या विकासकामांसंदर्भात आंदोलनाच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर त्या संदर्भातील काही आंदोलकांकडून कंत्राटदार आणि शासकीय अधिकारी यांच्याशी आर्थिक तडजोडी सारखे गैरप्रकार घडतात का?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१०) एखाद्या नवीन विकास योजनेसाठी वृत्तपत्राने आवाज उठविल्यानंतर त्याचा नेमका परिणाम काय होतो ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

११) लवकर खराब होणारे रस्ते, दोन–तीन वर्षात दुरुस्तीला येणाऱ्या शासकीय इमारती यामुळे त्या कामांवर शासकीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतो का ? अशा बाबतीत वृत्तपत्रांची भूमिका काय असावी ?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

१२) दैनिकांच्या वार्ताहरांना विकास कामांच्या मंजुरीची बातमी कशी मिळते ?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

१३) त्यांना विकासकामांसंदर्भातील शासकीय अध्यादेशाची (जी.आर.) ची माहिती असते का?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

१४) ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना या बातम्यांचा फायदा होतो का ?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

१५) विकासकामांमुळे किंवा विकासकामांसाठी लागणाऱ्या साहित्यांमुळे पर्यावरणावर होणारे परिणाम आणि त्याबाबतची वृत्तपत्रांची जबाबदारी

----------------------------------------------------

----------------------------------------------------

१६) विकासकामे व वृत्तपत्रे याबाबत काही शिफारशी

----------------------------------------------------

----------------------------------------------------

**ड) विकासकामांसंबंधित कंत्राटदारांसाठी प्रश्नावली**

१) वृत्तपत्रात विकासकामांसंदर्भातील बातम्या किती प्रमाणात असतात ?

(कमी, मध्यम, जास्त)

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) विकासकामांसंदर्भात वृत्तपत्रात वस्तुस्थितीवर आधारित माहिती असते का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४) या बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

५) विकासकामांसंदर्भातील बातम्यांमुळे विकासकामांमध्ये अडथळा निर्माण होतो का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

६) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

७) विकासकामांसंदर्भात हेतूपुरस्सर बातम्या दिल्या जातात का ?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

८) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतात का ?

---------------------------------------------------

---------------------------------------------------

९) तुम्ही करत असलेल्या विकासकामांबद्दल कधी वृत्तपत्रात (चांगली / वाईट) बातमी आली आहे का ? त्याबाबत काही अनुभव

---------------------------------------------------

---------------------------------------------------

१०) तुम्ही करीत असलेल्या विकासकामांच्या ठिकाणी वृत्तपत्र प्रतिनिधी येतात का ? जर येत असल्यास आपणाकडून विकासकामांसंदर्भात परिपूर्ण माहिती घेतात का ?

---------------------------------------------------

---------------------------------------------------

११) विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांबाबत आपल्या काही सूचना

**इ) विकासकामांशी संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली**

१) वृत्तपत्रात आलेल्या विकासकामांसंदर्भातील बातम्यांची दखल घेता का ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

२) वृत्तपत्रांचा विकासकामांवर प्रभाव असतो का ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

३) वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील बातम्या वस्तुस्थितीवर आधारित असतात काय ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

४) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामांचा दर्जा सुधारतो का ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

५) या बातम्यांमध्ये पारदर्शकपणा असतो का ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

६) वृत्तपत्रीय बातम्यांमुळे विकासकामात अडथळा निर्माण होतो का ?

--------------------------------------------------

--------------------------------------------------

७) विकासकामांसंदर्भात हेतूपुरस्सर बातम्या दिल्या जातात का ?

--------------------------------------------------

----------------------------------------------

८) विकासकामांसंदर्भात माहिती घेण्यासाठी आपणाकडे वृत्तपत्र प्रतिनिधी येतात काय ? आपणाकडून माहिती घेऊन योग्य बातमी दिली जाते का ? याबाबत काही अनुभव

---------------------------------------------

------------------------------------------

९) वृत्तपत्रात आलेल्या विकासकामांच्या बातम्यांचा आपणास काही उपयोग होतो का ? होत असल्यास कशा प्रकारे ?

---------------------------------------------

------------------------------------------

१०) विकासकामांसंदर्भातील वृत्तपत्रीय बातम्यांबाबत आपल्या काही सूचना

---------------------------------------------

------------------------------------------

सांगली जिल्हा नकाशा नकाशा क्रमांक : १



महाराष्ट्राचा नकाशा नकाशा क्रमांक : २



भारतचा नकाशा

नकाशा क्रमांक : ३



## ३) संदर्भ सूची

### अ) संदर्भ ग्रंथ सूची


१) आपला सांगली जिल्हा
लेखक – श्री. एन. बी. गुरव सर
प्रकाशक – श्री. राज प्रकाशन, कवठेमहांकाळ
प्रकाशन वर्ष – २०११

२) इतिहास
लेखक – प्रा. प्रशांत देशमुख
प्रकाशक – विद्याभारती प्रकाशन, लातूर
प्रकाशन वर्ष – १५ ऑक्टोबर २००१

३) पावले पत्रकारितेची
लेखक – श्री. एस. के. कुलकर्णी
प्रकाशक – सकाळ पेपर्स ट्रस्ट, पुणे
प्रकाशन वर्ष – १५ डिसेंबर १९९८

४) पी. डब्ल्यू. डी. मेड इझी
लेखक – श्री. विष्णू पालवे
प्रकाशक – विश्व निर्माता प्रकाशन, नाशिक
प्रकाशन वर्ष – २०११

५) पेटलेले पाणी – पेटणारे पाणी
लेखक – प्रा. डॉ. अनिलराज जगदाळे
प्रकाशक – सुमेरू प्रकाशन, डोंबिवली
प्रकाशन वर्ष – २१ ऑगस्ट २००४

६) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास
लेखक – रा. के. लेले
प्रकाशन – कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
प्रकाशन वर्ष – १९८४

७) महाराष्ट्र रोड ॲटलस
लेखक – आर. पी. आर्य
प्रकाशक – इंडियन मॅप सर्व्हिस, जोधपूर
प्रकाशन वर्ष –२००५

८) महाराष्ट्रातील नद्या
लेखक – श्रीकांत तापीकर
प्रकाशक – स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे

प्रकाशन वर्ष – ९ एप्रिल २००५
९) महाराष्ट्रातील प्रसार माध्यमे –काल आणि आज
लेखक – संजय कोल्हटकर, प्रसाद कुलकर्णी
प्रकाशक – डायमंड पब्लिकेशन, पुणे
प्रकाशन वर्ष – नोव्हेंबर २००९
१०) वार्ताजगत्
लेखक – श्री. एस. के. कुलकर्णी
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
प्रकाशन वर्ष – २००२
११) वृत्तपत्र व्यवस्थापन आणि वृत्तपत्रीय लेख
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
प्रकाशन वर्ष – २००३
१२) सांगलीच्या पाऊलखुणा....!
लेखक – चिंतामणी सहस्त्रबुद्धे
प्रकाशक – सकाळ पेपर्स लिमिटेड, कोल्हापूर
१३) सिंचन क्षेत्रातील समृद्धीच्या दिशा
संपादक – महेश सुर्वे
महाराष्ट्र सिंचन परिषद स्मरणिका
प्रकाशन वर्ष –२००८
१४) संपादन
लेखक – अरविंद व्यं. गोखले
प्रकाशक – टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
प्रकाशन वर्ष – २००२
१५) आर्थिक व सामाजिक समालोचन जिल्हा सांगली
सांखिकी विभाग, महाराष्ट्र शासनचा अहवाल
प्रकाशन वर्ष – १९९६, १९९७, १९९८, १९९९, २०००, २००१, २००२, २००३, २००४, २००५, २००६, २००७, २००८, २००९, २०१०, २०११, २०१२,
१६) योजना मासिक (नियतकालिक)
संपादक – ज्योती अजय आंबेकर, मुंबई
प्रकाशन वर्ष – मार्च २०१२

### ब) वृत्तपत्र सूची


१) दै. केसरी, फेब्रुवारी २००१, एप्रिल २००१, मार्च २००२, ऑक्टोबर २००२, जून २००३, नोव्हेंबर २००३

२) दै. पुढारी, फेब्रुवारी २००१, एप्रिल २००१, मार्च २००२, ऑक्टोबर २००२, जून २००३, नोव्हेंबर २००३

३) दै. लोकमत, फेब्रुवारी २००१, एप्रिल २००१, मार्च २००२, ऑक्टोबर २००२, जून २००३, नोव्हेंबर २००३

४) दै. केसरी, १९९६ ते २०१२ मधील निवडक अंक

५) दै. पुढारी, १९९६ ते २०१२ मधील निवडक अंक

६) दै. लोकमत, १९९६ ते २०१२ मधील निवडक अंक

७) दै. सकाळ, १९९६ ते २०१२ मधील निवडक अंक

### क) तक्ता सूची


| क्रमांक | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | सांगली जिल्ह्यातील मुद्रणालये आणि त्यांनी प्रकाशित केलेली वर्तमानपत्रे | ५८ |
| २ | सांगली जिल्ह्याची लोकसंख्या | ७० |
| ३ | सांगली जिल्ह्यातील रस्त्यांचे वर्गीकरण व एकूण लांबी | ७१ |
| ४ | विकासकामांच्या मंजुरीची प्रक्रिया | ८५ |
| ५ | विकासकामांच्या मंजुरीबाबतचे अधिकार | ८६ |
| ६ | विकासकामांसाठी उपलब्ध असणारा वेगवेगळ्या प्रकारचा शासकीय निधी | ८७ |
| ७ | सांगली जिल्ह्यातील विकासकामांवर १९९६ ते २००६ या कालावधीत झालेला खर्च | १०९ |
| ८ | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (फेब्रुवारी २००१) | १४० |
| ९ | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (एप्रिल २००१) | १४३ |
| १० | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (मार्च २००२) | १४५ |
| ११ | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (आक्टोंबर २००२) | १४७ |
| १२ | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (जून २००३) | १४९ |
| १३ | दै. पुढारीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (नोव्हेंबर २००३) | १५१ |

| | | |
|---|---|---|
| १४ | दै. पुढारीमधील सहा महिन्यांतील बातम्यांची एकूण आकडेवारी | १५२ |
| १५ | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (फेब्रुवारी २००१) | १५९ |
| १६ | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (एप्रिल २००१) | १६१ |
| १७ | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (मार्च २००२) | १६३ |
| १८ | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (आक्टोंबर २००२) | १६५ |
| १९ | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (जून २००३) | १६७ |
| २० | दै. केसरीमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (नोव्हेंबर २००३) | १७० |
| २१ | दै. केसरीमधील सहा महिन्यांतील बातम्यांची एकूण आकडेवारी | १७१ |
| २२ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (फेब्रुवारी २००१) | १७९ |
| २३ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (एप्रिल २००१) | १८२ |
| २४ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (मार्च २००२) | १८५ |
| २५ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (आक्टोंबर २००२) | १८७ |
| २६ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची महिन्यातील आकडेवारी (जून २००३) | १९० |
| २७ | दै. लोकमतमधील विकासकामांसंदर्भातील विविध बातम्यांची | |

| | | |
|---|---|---|
| | महिन्यातील आकडेवारी (नोव्हेंबर २००३) | १९३ |
| २८ | दै. लोकमतमधील सहा महिन्यांतील बातम्यांची एकूण आकडेवारी | १९४ |
| २९ | दै. पुढारी, दै. केसरी, दै. लोकमत या वृत्तपत्रातील विकासकामांसंदर्भातील बातम्यांची सहा महिन्यातील आकडेवारी | १९६ |
| ३० | विविध वृत्तपत्रात विकासकामांसंदर्भात येणाऱ्या बातम्यांची महिन्याची सरासरी | १९८ |
| ३१ | दै. पुढारी, २३ फेब्रुवारी २००५ या अंकातील सर्वच बातम्यांचे वर्गीकरण | २०३ |
| ३२ | दै. केसरी, २३ मे २००५ या अंकातील सर्वच बातम्यांचे वर्गीकरण | २०४ |
| ३३ | दै. सकाळ, २३ फेब्रुवारी २००५ या अंकातील सर्वच बातम्यांचे वर्गीकरण | २०५ |
| ३४ | विकासवार्ता व अन्य बातम्यांचे मूल्यमापन | २०६ |
| ३५ | वार्ताहरांच्या विकासकामांसंदर्भातील प्रश्नावलीचे वर्गीकरण | २११ |
| ३६ | सर्वसामान्य नागरिकांसाठीच्या विकासकामांसंदर्भातील प्रश्नावलीचे वर्गीकरण | २२४ |
| ३७ | विकासकामांसंदर्भातील कंत्राटदारांसाठीची प्रश्नावली व तिचे वर्गीकरण | २२९ |
| ३८ | वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींची मूल्यमर्यादा | २४७ |
| ३९ | सांगली जिल्ह्यातील अपघातांची संख्या | २५४ |